
# सखारामबापू

५२
स. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८९३



REFBK-0007783

— लि. भी.

ક્ર. પ. ૯૧૩

૧૦૫૯૦૮
૨૭/૩/૫૩

પં ૯૧૩

पुष्प नववें

पेशवाईतील स्वराज्यनिष्ठ मुत्सद्दी

# सखाराम बापू बोकील

यांचें

# ★ ऐतिहासिक चरित्र ★


लेखक

**लिंगो भीमराव नाईक गळतगेकर**

अॅडव्होकेट, समादेवी गल्ली, बेळगांव.



मुद्रक

स. वा. कार्नविंदे, व्यवस्थापक, जयभारत प्रिंटिंग प्रेस,

७८१ रविवार पेठ, बेळगांव.

प्रकाशक

का. गो. रानडे, चिटणीस,

ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति (बेळगांव),

१७५ सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें.



REFBK-0007783



५२.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

७७८३



किंमत तीन रुपये.

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति बेळगांव

--::०::--

ही समिति स्थापन होऊन नऊ वर्षे होऊन गेलीं. या समितीचे पहिले दोन ग्रंथ " नारायणराव पेशवे यांचा खून की आत्महत्या " व " तोतयाचें बंड " हे ता. ३१-८-१९४४ रोजीं प्रसिद्ध झाले. त्यानंतर पुढें दोन वर्षाचे आंत आणखी सहा पुस्तकें निरनिराळ्या इतिहासतज्ज्ञ लेखकांकडून लिहवून घेण्यांत आलीं. अशा प्रकारें खालीं दिलेलीं आठ पुस्तकें या पूर्वींच प्रसिद्ध केलीं असून आतां हें नववें पुष्प **सखाराम बापू बोकील** यांचें चरित्र या समितीतर्फे तयार होत आहे:-

| | |
|---|---|
| १ **नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्या**–<br>(लेखक पां. गो. रानडे) पृष्ठें १५००, दोन भाग. | कि. रु. १४ |
| २ **तोतयाचें बंड**–(लेखक पां. गो. रानडे) | कि. रु. १।- |
| ३ **राघो भरारी**–(लेखक स. रं. सुंठणकर) | कि. रु. ४ |
| ४ **सदाशिवराव भाऊ** (लेखक वि. म. भुस्कुटे) | कि. रु. ४ |
| ५ **सखाराम हरी**–(लेखक य. रा. गुप्ते) | कि. रु. ३ |
| ६ **त्र्यंबक सूर्याजी**–(लेखक बा. स. कुलकर्णी) | कि. रु. १ |
| ७ **जुळे तोतये**–(लेखक वि. स. वाकसकर) | कि. रु. ४ |
| ८ **मोंगल मर्दिनी ताराबाई** (ले. वैं. रंगूबाई भोसले) | कि. रु. ७ |

वरील ग्रंथांच्या लेखकांनीं मुद्रकांनीं व प्रकाशकांनीं या बाबतींत समितीस जें सहाय्य केलें त्याबद्दल ही समिति त्यांची आभारी आहे.

या सर्व पुस्तकांच्या आधारासंबंधीं अगर त्यांतील मतें व अनुमानें या संबंधीं आणि त्या पुस्तकांच्या पुरस्कर्त्यांच्या मतासंबंधीं ते ते लेखक व ते ते पुरस्कर्ते सर्वस्वी जबाबदार आहेत. ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति बेळगांव हिचेवर त्यांच्या मतमतांतरासंबंधीं कोणतीच जबाबदारी नाहीं.

ता. १५-७-१९५२.

चिटणीस
**ऐ. ग्रं. प्र. समिति, बेळगांव.**

'ऐतिहासिक ग्रंथप्रकाशन समिति-बेळगांव' नें

# प्रसिद्ध केलेले ग्रंथ.

| ग्रंथाचें नांव | लेखक | किंमत रु. आ. पै. |
|---|---|---|
| १ नारायणराव पेशवे यांचा खून कीं आत्महत्त्या, भाग दोन | पां. गो. रानडे | १४–०–० |
| २ तोतयाचें बंड | पां. गो. रानडे | १–४–० |
| ३ राघो भरारी यांचें चरित्र | स. रं. सुंठणकर | ४–०–० |
| ४ सदाशिवरावभाऊ यांचें चरित्र | वि. म. भुस्कुटे | ४–०–० |
| ५ सखाराम हरी गुप्ते यांचें चरित्र | य. रा. गुप्ते | ३–०–० |
| ६ त्रिंबक सूर्याजी प्रभु यांचें चरित्र | बा. स. कुलकर्णी | १–०–० |
| ७ जुळे तोतये | वि. स. वाकसकर | ४–०–० |
| ८ मोंगलमर्दिनी ताराबाई | वै. रंगूबाई भोसले | ७–०–० |

वरील सर्व ग्रंथ एकदम घेणारास ते रु. २० ला देण्यांत येतील. रवानगी खर्च निराळा.

**मिळण्याचा पत्ता**—का. गो. रानडे,

**चिटणीस**, ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति (बेळगांव.)

१७५ सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड पुणें २

[library stamp] ग्रं. क्र. ११५५८० २९/३/५७

# प्रास्ताविक दोन शब्द

"*History* is indeed little more than the register of the crimes, follies and misfortunes of mankind."

—*Gibbon.*

आमचे बेळगांवचे वकील मित्र श्री. लिंगो भिमराव नाईक गळतगेकर यांनीं "श्री सखाराम बापू यांचें चरित्र" लिहून त्यास प्रास्ताविक दोन शब्द आह्मी लिहावे अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्यांच्या ग्रंथाची वाचक वर्गाला थोडीशी तोंडओळख करून देण्याचें धाडस आह्मीं करीत आहों. 'धाडस' ह्मणण्याचें कारण आम्हीं साहित्यिक किंवा धंदेवाईक लेखक अगर इतिहाससंशोधक वा इतिहासकारहि नाहीं. असें असता या ऐतिहासिक चरित्राला आम्हीं प्रास्तावना लिहावी हें सकृत् दर्शनीं थोडें चमत्कारिक वाटल्यावांचून राहाणार नाहीं. तरीहि हें काम आम्हीं मोठ्या आनंदानें व खुषीनें पत्करिलें आहे. याला कारणें दोन. (१) हा ग्रंथ बेळगावच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिती तर्फे प्रसिद्ध करण्यांत येत आहे. ही संस्था स्थापन करण्याचे कामीं कै. वा. इतिहासभास्कर श्री. पा. गो. रानडे व कै. वा. गुरुवर्य अण्णासाहेब लठ्ठे यांनीं निर्भीडपणें, निस्संकोच वृत्तीनें व निव्वळ सत्यान्वेषणाच्या दृष्टीनेंच पुढाकार घेऊन "महाराष्ट्र इतिहास मंदिर" जें हा कालपर्यंत ठराविक धंदेवाईक मूठभर लोकांची मिरास होऊन बसलें होतें तें आम जनतेच्या ताब्यांत देऊन तेथील मिरासदार 'बडवे.' व वतनदार 'पुजारी' यांची उचलबांगडी केली. ही आमच्या मतें एक अपूर्व गोष्ट होय. कारण हे तथाकथित विद्वान मिरासदार, सत्याला खिशांत कोंबून, बाजारांत जो खोटा ऐतिहासिक माल मांडीत होते तोच खरा म्हणून गिरवाकब जनता खुशाल स्वीकारीत होती. ही अनिष्ट प्रथा बंद पाडण्या करितां व इतिहासाच्या खोट्या चलनी नोटा बाजारांत चालू नयेत या उदात्त हेतूनें आमच्या वरील दोन्ही स्नेह्यांनी ह्या "ऐतिहासिक

ग्रंथ प्रकाशन समितीची " स्थापना केली व तिच्या करवीं पदरमोड करूनहि ऐतिहासिक घटणांवर सत्यप्रकाश पाडणारीं आठ प्रकाशनें या पूर्वी प्रसिद्ध केलीं असून हें त्या समितीचें नववें प्रकाशन आहे. कै. अण्णासाहेब लठ्ठे जे एके काळचे ब्राम्हणेतर प्रथितयश पुढारी व कॉंग्रेस सरकारचे मुंबई प्रांताचे पहिले कर्तबगार अर्थसचीव होते; ते तर आम्हांला गुरुस्थानीं होते व कै. वा. रानडे हे ब्राम्हण कुळांत जन्मले, पण मनानें, हाडानें व मनगटानें सच्चे मराठे गडी म्हणून आमचे परम स्नेही होते. तेव्हां ही प्रस्तावना लिहून आम्हीं ह्या दोघांचें एक प्रकारें ऋणच फेडीत आहों असें वाटलें (२) दुसरें कारण श्री नाईक हे धंद्यानें वकील आहेत. आमचाहि धंदा वकीलीचाच आहे. यामुळें आमचें व त्यांचें गोत्र एकच आहे. आपला नित्याचा उद्योग सोडून त्यांनीं व आम्हीं हा जो 'अव्यापारेषु व्यापार' केला आहे त्याचें कारण एकच. तें म्हणजे छंद ( **Hobby** ). आम्हीं इतिहासलेखक म्हणून जरी जगापुढें नसलों तरी इतिहासाचे साक्षेपी अभ्यासू म्हणून इतिहासवाचनाची, मननाची व चिंतनाची आम्हांला गोडी आहे व याची साक्ष आमचे आम्हींच! श्री. नाईक यांनीं नुसतें वाचन, मनन व चिंतन करूनच आपलें समाधान करून घेतलें नाहीं तर त्यानीं श्री. सखारामबापू या पेशवाईतील अव्वल दर्जाच्या सरदारावर व मुत्सद्यावर आतापर्यंतच्या इतिहासकारांनीं मोठा अन्याय केल्याचें निदर्शनास आल्यावरून आपली लेखणी उचलली व जनतेच्या 'न्यायालयापुढें सत्यकथन' करण्याच्या इराद्यानें बापूंचें चरित्र लिहिलें याबद्दल त्यांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

२. महाराष्ट्राच्या इतिहासांत बरेच विवादित प्रश्न आहेत. श्री. शिवाजी महाराजांचे श्री समर्थ रामदासस्वामी हे राजकीय गुरु होते किंवा नाहीं? नाना श्रेष्ठ कीं महादजी श्रेष्ठ? आणि त्यांपैकीच नाना श्रेष्ठ कीं बापू श्रेष्ठ? हाहि एक वाद आहे. श्रीशिवाजीमहाराज व रामदासस्वामी यांचा वाद हल्लीं मिटला आहे. नाना व महादजी यांपैकीं महादजीच श्रेष्ठ हें बेळगांवचेच श्री. नातू वकील यांनीं सन १८९४ मध्यें

सं. नं. ८९३



माधवराव शिंदे यांचें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें आहे. आजही बेळगांवच्याच एका तरुण वकीलानें पुढें येऊन नाना व बापू यापैकीं बापूच श्रेष्ठ असें सप्रमाण व साधार सिद्ध करून देऊन बापूंच्या बद्दल आजपर्यंत जे वेडेवांकडे प्रवाद व ऐतिहासिक अर्धसत्यें बुद्धिपुरस्सर प्रसृत करण्यांत आलीं होतीं त्यांना या ग्रंथांत चोख उत्तर दिलें आहे.

३ दुर्दैवानें महाराष्ट्रांत सामान्य जनतेचा असा समज झालेला आहे कीं नाना फडणीसासारखा मुत्सद्दी व मंत्री झाला नाहीं. मराठ्यांचें बुडतें तारूं तारण्याचा त्यांनें आटोकाट प्रयत्न केला. ह्या खोट्या समजुतीस अनुसरून नानाच्या चहात्यांनीं, नानाला अचाट बुद्धिमत्तेचा, अफाट सामर्थ्याचा अपूर्व कर्तृत्वाचा 'मंत्र्युत्तम नाना' करून टाकला व तो शिवाजी महाराजांच्या प्रमाणें एक राष्ट्रीय पुरुष होता असें भासवून त्यांचा उत्सव त्याच्या जन्मगांवीं, वेळास येथें पन्नास वर्षांपूर्वी सुरू केला, व सन् १९५० मध्यें "मंत्र्युत्तम नाना फडणीस उत्सव पन्नाशी" साजरी करून "नानांची शकावली" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत येथून तेथून नानाची अवास्तव स्तुति व बापूंची निंदा आणि नालस्ती केलेली आहे. अर्थात हें करीत असतांना निरनिराळ्या पूर्वींच्या लेखकांचे व वक्त्यांच्या भाषणांचे उतारे त्यांत दिले आहेत. त्यामुळें बापूंच्या चरित्राचें परीक्षण करतांना नानाबद्दलचा हा "उत्सव पन्नाशी ग्रंथ" डावलून चालणार नाहीं.

४. राष्ट्रीय पुरुषांचे महोत्सव करण्याची प्रथा महाराष्ट्रांत श्री शिवाजी महाराजांचे उत्सवानें सुरू झाली. श्री शिवाजी महाराजांनीं मुसलमानांची सत्ता नेस्तनाबूत करून स्वराज्य स्थापिलें व स्वधर्म राखिला. त्यामुळें त्यांचें नांव घेतांच महाराष्ट्रीयांचें अंतःकरण भरून येतें. त्यांचा उत्सव हा राष्ट्रीय सणाचा दिवस मानला जातो. पण आद्यछत्रपतींच्या जोडीला नाना फडणवीसास बसविल्याचें पाहून न्यायी, निःपक्षपाती व विचारी माणसास हंसूं आल्यावांचून राहात नाहीं. कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शामभटाची तट्टाणी ! नाना फडणीस व श्री. शिवाजी महाराज यांची एका मालिकेंत गोंवण

करून नानाच्या कैवाऱ्यांनीं आपल्या अनैतिहासिकपणाचें व गाजर पारखेपणाचें प्रदर्शन मात्र केलें आहे. हा हास्यास्पद प्रयत्न आजहि होत आहे याची मनाला खंत, खेद व रुखरुख वाटल्यावांचून राहत नाहीं.

५. मंत्र्युत्तम नाना फडणवीस या पुस्तकांत पान २३।२४।२५ वर कै. लो. टिळकांच्या भाषणाचा उतारा दिला आहे. त्यांत लो. टिळकांनीं नानाची मुक्तकंठानें स्तुति केली असून बापू हा स्वार्थपरायण होता म्हणून त्यास किंमत देतां येत नाहीं वगैरे उद्‌गार काढले आहेत. ही लो. टिळकांनीं नानाची जी थोरवी गाइली आहे व सखाराम बापूची जी अवहेलना केली आहे यास ऐतिहासिक बूड किंवा बैठक मुळींच नाहीं. इंग्रजांच्या सत्तेखालीं हिंदुस्थान हा गुलामांचा देश म्हणून पन्नास वर्षांपूर्वीं कोणत्याहि सटर-फटर ऐतिहासिक माणसास राष्ट्र-पुरुषाचा मान देऊन स्वदेशप्रीति वाढविण्याचे मिषानें त्यावेळीं हा मार्ग योजला गेला असल्यास तें क्षम्य होतें, पण स्वराज्यप्राप्ती नंतर १९५० सालीं नानास मंत्र्युत्तम असा किताब देऊन खोटा इतिहास प्रसृत करणें हें मुळींच रास्त होणार नाहीं. तें ऐतिहासिक असत्यकथनाचें पाप समजण्यांत येईल. इतिहासाच्या धारवाडी कांटचाला हें पाप सहन होणार नाहीं.

६. नानाबद्दल हा चालत आलेला रूढ समज कसा चुकीचा व असत्यावर आधारलेला आहे हें श्री. नाईक यांनीं सखाराम-बापूच्या प्रस्तुत चरित्रांत उत्तम प्रकारें आधार देऊन सिद्ध केलें आहे, व नानापेक्षां बापू सर्व दृष्टीनें श्रेष्ठ कसे होते हेंहि साधार दाखवलें आहे. बापूंच्या कर्तृत्वाबद्दलची माहिती पान १२८ ते १३२ वर देऊन बापूंची लोकप्रियताच नाना व बापू यांच्या वैमनस्याला कारण झाली हें विशद केलें आहे. प्रकरण ११ मध्यें नाना व बापू यांच्या मध्यें वैमनस्याचा अग्नि कसा पेटला होता याबद्दलचें जें विवेचन केलें आहे तें अत्यंत अचूक व मार्मिक आहे. नानाचें सर्व वर्तन स्वार्थ-परायण होतें. बारभाईच्या कारभारांत बापूनें 'द्यावें' असा शेरा

मारावयाचा व 'देववावें' असा शेरा नानानें मारावयाचा. म्हणजे पेशव्यांचे अधिकार बापूंकडे व कारभाऱ्याचे अधिकार नानाकडे असें होतें. नानानें गंगाबाईला आपल्या वजनाखालीं आणलें व 'द्यावें' असा शेरा तिच्याकडून मारवून घेऊन 'देववावें' असा शेरा आपण करून कामें उरकण्यास सुरवात केली. या व अशा नानाच्या वर्तनामुळें नानाला पेशवाईचा अनियंत्रित सत्ताधारी बनण्याची इच्छा असल्याबद्दल बापूंची खात्री झाली. नानाची भूमिका स्वार्थी होती. राघोबादादानें तेरा लाखांचा मुलूख मागितला असतां नानानें तो दिला नाहीं, पण निजामाला आपल्या बाजूस वळवून घेण्यासाठीं मात्र अठरा लाखांचा, शिंद्यांना दहा लाखांचा व इंग्रजांना तीन लाखांचा मुलूख अशी खैरात नानानें केली. म्हणून बापूंना नाना कारभारांत नको असें वाटलें व त्यांनीं नानाविरुद्ध मोरोबांच्या कारस्थानांत मदत केली, अशी कारणमीमांसा देऊन बापूंच्या वर्तनाचे समर्थन केलें आहे. "आजपावेतों सर्व इतिहासकारांनीं नाना हा सर्व गुणांचें माहेरघर होतें, पेशवाई टिकविण्याची त्यानें शिकस्त केली, त्याच्या निधनानंतर पेशवाईंत कर्तबगार माणूस राहिला नाहीं, म्हणून पेशवाई बुडाली वगैरे गोष्टी गृहीत धरून त्याच्याशीं विसंगत वर्तन कोणी केलें असेल तर तें देशद्रोहीपणाचें, विश्वासघाताचें व नीचपणाचें असें म्हणण्याची परंपरा त्यांनीं पत्करली आहे. हें मूल्यमापन सर्वस्वीं चुकीचें आहे" असा सिद्धांत लेखकानें मांडून आजपावेतों बापूंवर टीका करणाऱ्या इतिहासकारांना चांगलाच तडाखा दिला आहे. नानानें बापूला तुरुंगांत डांबून सूड उगवून घेतला. एकूण नानाची ठेवण कशी पापप्रवृत्त होती याचा ग्रंथकारानें पाढा वाचून १५९ व १६० पृष्टांवर त्या पापांची यादी दिली आहे ती अशी:-- (१) तुरुंगांत बापूला नानानें सन्मानानें वागवणें हें नानाच्या स्वभावाला सोडून होतें, (२) सदाशिवरावाला तोतया ठरवून उपवास घडवून नानानें मारिलें, (३) राघोबास वैयक्तिक सूडामुळें देशोधडीस लाविलें, (४) आनंदीबाईला तुरुंगांत डांबून तिचे हाल हाल केले, (५) भाऊला सोडवितों अशी आशा दाखवून पार्वती

बाईला शेवटपर्यंत फसविलें, (६) सवाईमाधवरावास राज्य म्हणजे तुरुंग वास असें वाटून आत्महत्या करण्याची पाळी त्याच्यावर आणली, (७) गंगाबाईच्या मृत्यूबद्दलहि नानावर कांहीं लोक आरोप ठेवितात ( ग्रँटडफ ), (८) दुसऱ्या बाजीरावासहि नानाचा तुरुंगवास असह्य झाला होता, (९) स्वतःचा चुलत बंधु मोरोबा ह्याचे हाल केले, (१०) राघोबाच्या सखाराम हरी गुप्ते, व्यंकटराव घोरपडे वगैरे उमद्या सरदारांना हालहाल करून मारण्यांत आलें, (११) जन्मभर नानाला मदत केलेल्या महादजी शिंदे व परशरामभाऊ पटवर्धन यांना नानानें मारेकऱ्यांमार्फत मारवलें असाहि तत्कालीन ऐतिहासिक पुरावा नानाविरुद्ध आहे. ( शिंद्यांना नानानें मारवलें या बाबतचा कीनचा इंग्रजी उतारा पुढें १३ व्या परिच्छेदांत दिला आहे ). "बापूला कैद केल्यानंतर नाना फडणवीस दख्खनचा राजा झाला व शिंदे त्याचे सहकारी बनले ( प. कै. ५।४० ). अशा तऱ्हेनें या वयोवृद्ध, तपोवृद्ध, कर्तबगार आणि आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत पेशवाईची काळजी वाहिलेल्या बापूचा आपल्या सुलतानी इच्छेच्या पूर्ततेसाठीं नानानें अत्यंत निंद्य रीतीनें शेवट केला. बापूची योग्यता मोठी होती.....समरांगणावर त्याची तलवार श्रेष्ठ होती कीं मुत्सद्देगिरीची त्याची लेखणी श्रेष्ठ होती हें सांगता येणार नाहीं.... बापूच्या इतका अष्टपैलू मुत्सद्दी पेशवाईत झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. त्याच्यावर दुटप्पीपणाचा आरोप करणाऱ्यांनीं बापूंनीं आयुष्यभर पेशवाईच्या हितासाठीं त्यागच केला होता याकडे पाहिलें नाहीं याचें दुःख वाटतें." अशा प्रकारचे उद्गार ग्रंथकारानें काढले आहेत, त्याच्याशीं आम्हीं सहमत आहोंत. कारण नसतांना नानाला वर चढवून बापूला खालीं ओढण्याचा पद्धतशीर प्रयत्न महाराष्ट्रांत आज कित्येक वर्षें होत आहे. इतिहास म्हणजे स्वकपोलकल्पित कथा नसून घडलेल्या व झालेल्या गोष्टींचें व परिस्थितीचें यथातथ्य प्रतिबिंब ( Photographic picture ) असावयाला पाहिजे. पण प्रत्यक्षांत असें होत नाहीं म्हणून इतिहासशास्त्राची टिंगल करण्यांत येते. बऱ्याच वेळां इतिहासांत असत्याचा पुरस्कार केला जातो, आपल्या

डोळ्यादेखत घडलेल्या एका प्रसंगाला अगदीं उलट स्वरूप दिल्याचें व तें सर्व मान्य झाल्याचें निदर्शनाला आल्यामुळें सर वॉल्टर रॅले यानें आपण लिहिलेल्या जगाच्या इतिहासाचा नाश करून टाकिला. या त्याच्या कृत्यांत थोडा माथेंफिरुपणा व अतिरेक असला तरी त्यांत मोठा अर्थबोध व शहाणपण आहे. तें हें कीं कोणाही समंजस माणसानें ऐतिहासिक गोष्टीचा जाणून बुजून विपर्यास करूं नये. ‘ Paint me as I am ’ हा क्रॉमवेलचा बीजमंत्र प्रत्येक इतिहासकारानें आपल्यापुढें ठेवला पाहिजे. “ **सत्यासत्यासी मन केलें ग्वाही । मानियलें नाहीं बहुमता ॥** ” हा श्री तुकारामबुवांचा मंत्र प्रत्येक इतिहासकारानें जपून बहुमताच्या विरुद्ध असलें तरी जें सत्य असेल तें निर्भयपणें त्यानें जगापुढें मांडलें पाहिजे. म्हणजे ‘ History is a fable agreed upon by a few scholars, हें व्हॉल्टायरचें वचन खोटें ठरेल व इतिहासाचा बोज राहील.

७. प्रत्येक बाबीला दोन बाजू असतात. या दोन्हीं बाजूंचा विचार केल्याशिवाय सत्य हाताला लागत नाहीं. ‘ One man’s word is no man’s word; we should quietly hear both sides ’ ही जर्मन कवी गटे याची उक्ति किती सार्थ आहे ! या दृष्टीनें विचार केल्यास बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथप्रकाशन समितीतर्फे प्रसिद्ध होत असलेलीं प्रकाशनें आदरणीय व स्वागतार्ह आहेत. महाराष्ट्राच्या इतिहास-क्षेत्रांत जी मिरास व मक्तेगिरी सुरू आहे तिला काट्शह देण्याचा यशस्वी प्रयत्न या समितीनें केलेला आहे. त्यामुळें चिडून जाऊन या समितीचे प्राण जे कै. इतिहासभास्कर रानडे यांच्यावर शिखंडी शरसंधान करून पुणें येथील अहिताग्नि मंदिरांत त्यांची मानखंडणा करण्यांत आली. हें कृत्य प्रत्यक्ष तरुण मंडळींच्या हातानें झालें असलें तरी त्या हातामागें कांहीं प्रतिष्ठित पुढाऱ्यांची व बुद्रुक वर्तमानपत्रकारांची डोकीं खास होतीं याबद्दल आम्हांला मुळींच शंका नाहीं. कारण या निंद्य व भ्याड हल्याचा निषेध करण्यासाठीं एकहि जबाबदार वर्तमान-पत्र अगर पुढारी किंवा इतिहासकार ( श्री. ओतूरकरांशिवाय ) पुढें आला नाहीं. ही पुणेरी गुंडगिरीची परंपरा निबंधमालाकार चिपळूणकर काला-

पासूनची आहे. दयानंद सरस्वतींवर या पुण्यांत शेणमार झाला ! त्याचें भडक वर्णन निबंधमालेंत वाचावयास मिळतें ! आणि हे मालाकार मराठीचे शिवाजी व आद्य राष्ट्रीय चळवळीचें प्रवर्तक !! दयानंदाबरोबर महादेव गोविंद रानडे यांनाहि शेणमाराचा प्रसाद मिळाला होता. म. जोतीराव फुले व रा. ब देशमुख यांच्या नालस्तीनें निबंध मालेंतील कितीतरी अंक व पृष्ठें भरून किंवा बरबटून निघालीं आहेत. श्री. आगरकर यांची त्यांच्या हयातींत स्मशान-यात्रा याच पुण्यांत टारगट पोरांकरवीं काढण्यांत आली. श्री. नामदार गोखले यांची गणपती उत्सवांत नाना प्रकारची कुटाळी करून त्यांचा मानभंग पुण्यांतच करण्यांत आला होता ! नामदार गोखले यांच्यावर निंदाव्यंजक पदें करून तीं गाईलीं जात असतांना मोठमोठे पुढारी 'टोपी घालून' मिटक्या मारून ऐकत असत. तसेंच याच पुण्यांत कोल्हापूरचे छत्रपति शाहूमहाराज यांचे अध्यक्षतेखालीं शिवाजी सोसायटीची वार्षिक सभा भरली असतांना ती पुणेरी सराईत गुंडांकडून उधळून लावून, वर पुन्हां महाराजांवर गर्दी जमावाची मारामारी केली म्हणून एका 'मोऱ्या'मार्फत पुणें फौजदारी कोर्टांत फिर्यादहि दाखल केली होती. ही गोष्ट होऊन तीस वर्षेंहि अजून झालीं नाहींत. सारांश या पुण्यांतील गढूळ परंपरेंत चिपळूणकर काळापासून आज तागायत बदल झालेला नाहीं याचा खेद वाटतो. नानांची तळी उचलून धरून सखाराम बापूंवर आग पाखडणारे लोक याच वर सांगितलेल्या परंपरेंतील आहेत म्हणून हा इतिहास येथें सांगावा लागला. तेव्हां इतिहासभास्कर रानडे यांची सभा उधळून त्यांस पुणेंकरांनीं मार दिला यांत कांहींच नवल नाहीं.

८. नाना म्हणजे सद्‌गुणांचा पुतळा व बापू म्हणजे स्वार्थाची व देशबुडव्याची मूर्ति हें म्हणणें चुकीचें आहे. या दृष्टीनें ग्रंथकारानें बापूचे गुण दाखवून नानाच्या पापांचा जो पाढा वाचला तो केवळ उत्तराला प्रत्युत्तर नसून सत्यपूर्ण व वस्तुस्थितिनिदर्शकहि आहे. नानांचे अशाप्रकारें असत्यानें जड झालेलें पारडें या ग्रंथाच्या वाचनानें थोडें तरी हलकें झाल्या वांचून राहाणार नाहीं. नानांच्या

वरील बऱ्याच आरोपांना खुद्द कै. लो. टिळकांनीं उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. पण कै. लो. टिळकांच्या पुण्याईनें देखील नानांच्या मोठेपणाला लागलेलें खग्रास ग्रहण सुटणारें नाहीं. मग तें उत्सव कमिटीनें कितीहि टाहो फोडला तरी कसें सुटेल ? हा खग्रास झालेला कृत्रिम मोठेपणाचा नानाचा तारा यापुढें तरी सूज्ञ व चाणाक्ष वाचकांच्या दृष्टीला निस्तेज झालेला दिसेल. नानाच्या बाजूनें लो. टिळकांनीं केलेला खुलासा आरोपीच्या बचावासाठीं केलेल्या वकीलाच्या भाषणासारखा आहे. तो इतिहासकाराला शोभण्यासारखा खास नाहीं.

९. नाना फडणीसानें आपल्या सर्व हयातींत पेशवाईची सत्ता आपल्या हातीं येण्यासाठीं व टिकण्यासाठींच आपलें शक्तिसर्वस्व वेंचलें. त्यापायीं कुणालाही तुरुंगांत डांबण्यास अगर मारण्यास, कोणालाही कोणताही प्रांत देण्यास अगर कोणाकडून काढून घेण्यास नानानें कधींही कमी केलें नाहीं, आणि या त्याच्या सुलतानी इच्छेच्या आड जो कोणी गेला अगर जाईल अशा नानाला संशय आला त्याचा कांटा काढण्यास नाना सदैव दक्ष होता. नाना अर्धा शहाणा होता, तो सबंध शहाणा असता तर त्यानें पेशवाईच्या एवजीं फडणीशीशाही स्थापून भट्टवंशानें जसा छत्रपतीला कैदेंत ठेवून आपल्या घराण्याचा स्वार्थ साधला तसा नानानें पेशवाई गारद करून आपला "भानुवंश" पुण्यावर व मराठी राज्यावर लादला असता. पण नानाचें व समशेरीशीं वांकडें असल्यामुळें त्याला तसें करतां आलें नाहीं, व याच कारणामुळें त्याची महत्वाकांक्षाहि पेशवाईचें फडणीशीपद आपल्याकडे ठेऊन घेण्यापुरती मर्यादित राहिली. पेशव्याच्या गादीवरील माणसांचा बाहुल्याप्रमाणें उपयोग करून आपण पेशव्याचे नांवानें 'सुलतान' म्हणून सर्व अधिकार गाजवणें हेंच त्याचें साध्य राहिलें. नाना हा मत्सरी, जहरी, द्वेषी व स्वार्थी होता. स्वतःच्या स्वार्थाच्या आड येणाऱ्यास तो घातपातीपणानें नेस्तनाबूत करीत असे. असें करीत असतांना राष्ट्रप्रीति, स्वदेशप्रेम, मराठी राज्याच्या वाढीची लालसा या गोष्टींची गंधवार्ताहि त्याला नव्हती. शिवाय अशा प्रकारच्या कल्पनाहि त्यावेळीं अस्तित्वांत नव्हत्या. 'दौलतीची सेवा करणें' 'स्वामीच्या मिठास जागणें' मग तो

स्वामी परकीय मुसलमान असो किंवा फिरंगी असो वा इंग्रज असो. ह्याला रजपुतांचा इतिहास साक्ष देतो. महाराष्ट्रांत शाहाजी भोंसले, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, वाडीचे सावंत वगैरे मंडळींचा इतिहास देखील तीच रडकथा सांगतो. या गोष्टीला फक्त श्री. शिवाजी माहाराज व राणा प्रताप हे अपवाद असून त्यांनींच या कल्पनेला आळा घातला व स्वातंत्र्य स्थापिलें. त्यामुळें आम्हीं आज हिंदू म्हणून जगतों आहों. नाहींतर अफगाणिस्थानांत किंवा आजच्या पाकिस्थानांत जी हिंदूची दैना दिसत आहे तीच आमचीहि झाली असती. तेव्हां श्री. शिवाजी महाराज अगर प्रतापसिह यांच्या पंक्तीस नाना कदापि बसूं शकत नाहीं. तो साधासुधा स्वार्थी, कावेबाज पण धूर्त व धोरणी माणूस होता. त्याला भलतेच गुण चिकटवून त्याचा राष्ट्रीय उत्सव करण्यांत आपण मात्र आपलें हसूं करून घेत आहोंत.

१०. महाडच्या कारस्थानांत नानाची मुत्सद्देगिरी शिगेला पोंचली होती असें त्याचे चाहाते म्हणतात, पण आमच्या मतें त्यांत त्याच्या मुत्सद्देगिरीचें संपूर्ण दिवाळें निघाल्याचें दिसून येतें. या कारस्थानानें इंग्रजांचा मराठी राज्यांत शिरकाव होण्यास मोका मिळाला. निजामाला सवलत दिली गेली व त्याचा दिवाण बंधमुक्त झाला. यांत बाजीराव पेचांत आला व नानांचा कार्यभाग साधला. पण नानाच्या या स्वार्थाची किंमत म्हणून बाजीरावाला मराठी राज्याचें दान इंग्रजांना द्यावें लागलें व शिवसम्राटांनीं स्थापिलेलें मराठी राज्य बुडालें, नानासाहेब पेशव्यांनीं आपला शत्रु तुळाजी आंग्रे याचा नाश करण्यासाठीं इंग्रजांना बोलावून मुंबईचा समुद्र किनारा इंग्रजांच्या हवालीं केला. इंग्रजांना मराठी राज्यांत आणण्यास कारणीभूत झालेले पेशवाईंतील हे दोन नाना, बाळाजीपंत नातूपेक्षां निराळ्या प्रकारचे देशद्रोही आहेत असें आम्हांला वाटत नाहीं. सूर्याजी पिसाळ अगर बाळाजीपंत नातू सारखे क्विस्लिंग्ज सर्वत्र सहजच दिसून येतात, पण नानासाहेब पेशवे अगर नाना फडणीसासारखे देशद्रोही, ऐतिहासिक दृष्टीचें अंजन

घातलेल्या डोळस व विचारी माणसासच दिसूं शकतात. नाना व त्याचे साथीदार यांच्या खऱ्या स्वरूपाबद्दल आह्मीं वर जें विधान केलें आहे त्याला आधार खालीं देत आहोंत. (य. गो. कानेटकर यांचे सखारामबापू बोकील चरित्र पान ६३, ६४ व ६५) " जानोजीच्या सल्यावरून निजामानें आपल्या सैन्याच्या दोन टोळचा केल्या. एकीनें पेशव्यांच्या मुलखांत शिरून लुटालुट करावी, दुसरीनें मराठचांचें सैन्य अडवून धरावें— मोंगलाकडे गेलेला गोपाळराव पटवर्धन यानें गोपिकाबाईला मोंगली सैन्य पुण्यावर आणीत नाहीं अशी हमी दिली होती. परंतु आयत्या वेळीं त्याचें त्याला विस्मरण झालें असावें. पुणें शहराचा कोतवाल नारो आप्पाजी यानें मोठा भूदंड भरून सरकारी वाडे वांचविले, परंतु सर्व चीजवस्त मोंगलांनीं लुटून नेली. नाना फडणीस एका वस्त्रानिशीं लोहगडास पळून गेला.... मोंगलांची स्वारी ह्मणजे मराठी राज्यावर आणीबाणीचा प्रसंग हें सर्वांनीं जाणलें. अशा प्रसंगीं एकोप्यानें वागल्याशिवाय दौलत सांवरणार नाहीं असें सर्वत्रांस वाटलें....सखारामबापू सर्व मसलतींचा प्रमुख होता, व त्याचे शिंदे होळकरांपासून तों पथक्यापर्यंत सर्वांवर पराकाष्ठेचें वजन होतें. निजामाकडे गेलेले लोक हरतऱ्हेनें परत आणण्याचें काम सखाराम बापूकडे (नानाकडे नव्हे) सोंपविण्यांत आलें....गोपाळराव पटवर्धनासारखे आधारस्तंभ शत्रूस मिळाले ही गोष्ट अत्यंत वाईट होती. 'त्यांनीं असें करावयास नको होतें.' असें माधवरावाचें मत होतें. याला गोपाळराव उत्तर देतो '**पेशव्यांचें हित केल्यानें हे मोक्षास नेतात, मोंगलांचें हित केल्यास मोक्ष नाहीं ऐसा पदार्थ नाहीं. कोणाची तरी नोकरीच करावयाची. ईश्वराच्या घरीं ब्राह्मण, हिंदु, मुसलमान, म्हार सर्व एकच. परंतु जी बाजू धरली ती तडीस न्यावी** " हें पाहून ' A devil can cite scriptures for his own purpose ' या इंग्रजी म्हणीची आठवण येते....बापूंचा स्वभाव नानाप्रमाणें कडक नसल्यानें पुष्कळशी मंडळी त्यांच्या कारभारावर संतुष्ट असत. सामान्य लोकांशीं वागतांना बापू परोपकारी, दयाळू, व धार्मिक वृत्तीचे होते. सर्वांशीं गोड बोलून तडजोडीच्या वृत्तीनें वागून आपलें

काम हलक्या हातानें हातोहात साधण्याची खुबी त्याला ( बापूला, नानाला नव्हे ) साधली होती. तशी पेशवाईंतील कोणाहि मुत्सद्यास साधली नाहीं. शत्रूची खुमखुमी जिरवून पुनः त्याचेशीं सामोपचारानें वागण्यास बापूची तयारी असे. पटवर्धनांसारख्या हाडवैऱ्याबरोबरहि समेट करून खांद्यास खांदा भिडवून कामकाज करावयाचें चोहोंकडे संदर्भ लावून ठेवावयाचा आणि आपणास जेथें परिस्थिति अनुकूल दिसेल तेथें मोहरें इरेस घालावयाचें. ( बापूच्या ) कर्तबगारीबद्दल कोणाचेंहि दुमत नाहीं....तुम्हीं ( बापू, नाना नव्हे ) काल-चक्रासहि फिरवाल अशीच पुष्कळांची खातरी. त्यामुळेंच माधवराव व नानासाहेब ह्यासारख्यांना वाटे कीं हा आपल्या लगामी असावा. (पान २५२)

" आठराव्या शतकाच्या अखेरीस ( म्हणजे नाना बापूंच्या काळांत ) मराठेशाहीचें राज्ययंत्र बिघडून कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं." ( व म्हणूनच मोंगल, टिपू व इंग्रजांचें फावलें ). त्या काळीं दौलतीची सेवा, स्वामीभक्ति अगर स्वामीसेवा होती, पण त्या कालीन पत्रव्यवहारांत देशभक्ति, देशप्रेम, स्वधर्मसेवा, राष्ट्रहित हे शब्द चुकूनहि दृष्टीस पडत नाहींत. इंग्लंडमध्यें फितूर एकहि झाला नाहीं. त्या राष्ट्रांतील पिट, हॅमडन, डिस्रायली किंवा क्लाईव्ह यांच्याशीं इकडील नाना किंवा बापूची तुलना करणें अजीबात चुकीचें आहे. स्वराज्यपूर्व मुसलमानी अंमलांतील परिस्थितीबाबत संतश्रेष्ठ तुकारामबुवा म्हणतात " **ऐसे धर्म झाले कलीं । पुण्यरंक पाप बळी । सांडिले आचार । द्विज चहाड झाले चोर " ॥ " बैसोनिया तक्ता । अन्यायेंवीण पिडिती लोकां ॥ तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धांवा " ॥ " संता नाहीं मान । देव मानी मुसलमान ॥ ऐसे पोटाचे मारिले । देवा ऐशा विटंबिलें ॥ घाली लोटांगण । वंदी नीचांचे (मुसलमानाचे) चरण ॥ तुका म्हणे धर्म । न कळे माजल्याचा भ्रम " ॥ " थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार ॥ सांडुनिया द्विजवर । दावल पीर स्मरताती " ॥ " कैसे विनाश कालाचे कौतुक । राजे झाले प्रजांचे अंतक " ॥ " देवासी भाका करुणा वेगें । स्मरावें अंतरीं रे ॥ आगाये**

वैकुंठनायका । काय पाहातोसिया कौतुका । कळीनें गांजिलें लोकां । देतो हाका सेवक तुकयाचा " ॥ तत्कालीन लोकांच्या मनस्थितीचें वर्णन श्री. तुकाराम महाराजांनीं फारच सार्थपणें केलें आहे. न्यायमूर्ती रानडे म्हणतात " नव्या प्रागतिक काळानुक्रमें इष्ट अशी नवी रचना राज्ययंत्रांत बापू, नाना सारख्या मुत्सद्यांस करतां आली नाहीं. तिकडे त्यांनीं जाणून बुजून दुर्लक्ष केलें. महादजीसारखे राज्यकार्यधुरंधर, कुशल असे मुत्सद्दी सेनानायक गत झाले. उरलेल्यांच्यांत संघशक्ति नाहींशी झाली. व्यक्तिबळानें तिची जागा व्यापणें अशक्य झालें. तेव्हां हा राज्याचा डोलारा कोलमडून पडला. चांगली माणसें लयास गेलीं. राहिलेलीं माणसें कितीहि मोठीं असलीं तरी त्यांच्यांत एकोपा नसल्यानें केवळ एकांडे शिलेदारीनें किंवा टांकदारीनें त्यांना मराठी साम्राज्याची विस्कटलेली घडी नीट बसवितां आली नाहीं. त्यामुळें मराठी राज्य नाश पावलें. दुहीनें व स्वार्थानें आंतून पोखरलेली सत्ता एतद्देशीय सत्तेशीं मुकाबला करण्यास कदाचित समर्थहि झाली असती, पण इंग्रजासारख्या प्रबल व प्रभावी सत्तेशीं तिचा मुकाबला झाल्यानें ती नामोहरम होणें क्रमप्राप्तच होतें." त्या वेळच्या लोकांच्या मनस्थितीबद्दल यदुनाथ सरकार म्हणतातः—

" The first danger of the new Hindu Kingdom established by him ( Shivaji ) in the Deccan lay in the fact that the national glory and prosperity, resulting from the victories of Shivaji and Bajirao I created reaction in favour of Hindu Orthodoxy. It actuated caste distinction and ceremonial purity of daily rites which ran counter to the homogenuity and simplicity of the poor and politically depressed Maratha Society. Thus his political success sapped the main foundation of that success. In the security, power and wealth endangered by their independence the Marathas of the 18th century forgot the past record of muslim persecution. The social grades turned against each other. The Brahmins

living east of the Sahyadri despised those living west. ( देशस्थ कोंकणस्थांचा वाद ) ....While Chitpawan Brahmins were waging war with the Deshasta Brahmins, a bitter jealousy raged between the Brahmin Minister and Governors and the Kayastha Secretaries..... Rabindranath Tagore remarks " **A temporary enthusiasm sweeps over the country and we imajine that it has been united; but the rents and holes in our body social, do their work secretly; we can not retain any noble idea long.** "....... Shivaji and to a lesser extent Bajirao I preserved an admirable balance between war and deplomacy. But the latter day Marathas lost their practicability. They trusted too much to diplomatic trickery, as if empire were a pacific game of chess.... Thus while the Maratha spider was weaving his endless cobweb of hollow alliances and diplomatic counterplot, the mailed fist of Welleslay was thrust into his laboured but flimsy tissue of state-craft (राजकारण) and by a few swift and judicious strokes. his defence and screen was torn away and his power left naked and helpless.....The man of action, the soldier statesman always triumphs over the scheming Machiavel. "

—Shivaji and his Times, Pages 480 to 490.

वरील अवतरणांत मराठी राज्य कां बुडालें याची जी मीमांसा यदुनाथ सरकार यांनीं केली आहे ती आमच्या मतांशीं संपूर्णतया जुळतें. " वाचिवीरापेक्षां कृतिवीर व शिपायी बाण्याचा पुरुष हा नेहमीं पाताळयंत्री चाणक्यावर व कावेबाज कलुषावर मात करतो, " हें त्यांचें म्हणणें अगदीं सत्य आहे. म्हणून नाना हा स्कीमिंग मॅचिव्हेल असल्यानें त्याची शक्ति मर्यादितच होती. तो कृतिशून्य असल्यानें त्याच्या मुत्सद्देगिरीची धांव तोकडीच होती. नाना शिपायी नसल्यानें

त्याची कर्तबगारी लंगडी पडत असे व त्याला कोणातरी शिपायी गड्याचा आधार घ्यावा लागे. म्हणून नानाला आपलें स्थान कसें तरी स्थिर ठेवण्याला जिवापाड मेहेनत करावी लागली. पेशवाई वांचवावी किंवा मराठी राज्याची बढती व्हावी ही राष्ट्रीय भावना त्याला बिलकुल नव्हती. तो स्वार्थी होता. स्वतःचा उत्कर्ष कसा होईल, स्वतःची दौलत कशी वांचली व राखली जाईल याकडे नानाचा ओढा होता. बाजीरावाला गादीवर आणतांना, स्वतःला मुलगा नसल्यामुळें, आपल्या दत्तकपुत्राला बाजीरावानें मान्यता द्यावी असेंहि एक कलम करारांत घालण्यांत आलें होतें. असें ज्याचें मलीन व मलूल चारित्र्य व कर्तबगारी आहे तो राष्ट्रपुरुषहि नाहीं व मंत्र्युत्तमहि नाहीं.

११. सखाराम बापूच्या चरित्रांत नानाविषयीं इतका उहापोह झालेला पाहून कांहींना संशय येईल कीं ही प्रस्तावना नानाच्या दोषांचें आविष्करण करण्याकरितां लिहिलीं कीं बापूच्या गुणांचें गान गाण्याकरितां लिहिली ? कोणाहि पुरुषाचें चरित्र त्याच्या काळांत त्याचे जे प्रतिस्पर्धी व विरोधी असतील त्यांच्या चरित्रांशीं तुलना करून सांगितल्याशिवाय तें पुरें होणार नाहीं. विशेषतः नानाचे चाहाते जेव्हां बापूची निंदा करून नानाला गौरवतात, तेव्हां या दोघांपैकीं खरा शहाणा व कर्तबगार कोण व खरोखरी मराठी राज्य कोणामुळें बुडालें याची मीमांसा करणें भाग पडतें. वस्त्र जसें आडव्या उभ्या धाग्याचें बनतें तसें नानाच्या चरित्रांत बापू, व बापूच्या चरित्रांत नाना येणारच. नायकाचें वर्णन करतांना खलपुरुषासहि आणावें लागतें व त्याच्या गुणदोषांचीहि चर्चा करावी लागते. म्हणून नानाला राष्ट्रप्रेम, देशभक्ति वगैरे सारखे गुण चिकटवणें कसें अयोग्य आहे हें आम्हांला या प्रसंगानें दाखवावें लागलें. नाना हा पेशवाईंतील कलिपुरुष होता असें आमचें प्रांजल मत आहे व त्याची झळ बापूला विशेष लागली म्हणून या पुरुषाविषयीं एवढें विस्तारानें येथें विवेचन करावें लागलें त्याची वाचक क्षमा करतील.

१२. शिवकालीन राष्ट्रप्रेम व धर्मासक्ति, देशभक्ति व लोकप्रीति पेशवाईंत औषधालाहि पहावयास मिळत नाहीं. स्वार्थं, आपमतलबीपणा व हेवादावा ह्यांनीं हा सर्व इतिहास बरबटलेला व बुजबुजलेला आहे. याची काहीं ठळक उदाहरणें खालीं देत आहोंत:—
(१) धनाजी जाधवाचा पुत्र चंद्रसेन व पहिला पेशवा, जो धनाजीचा आश्रित होता, त्यांच्यांत तंटा होऊन चंद्रसेन मोंगलांना जाऊन मिळाला. (२) बाजीराव व त्र्यंबकराव दाभाडे यांचें आपसांतील युद्ध. (३) आंग्रे याच्या वैयक्तिक भांडणामुळें नानासाहेब पेशव्यानें त्याचा निःपात करण्यासाठीं इंग्रजांना घरांत घेऊन मराठी आरमार नाहींसें केलें. (४) प्रतिनिधि, मिरजकर, नागपूरकर व इतर अनेक सरदार पेशव्यांचे विरुद्ध मोंगलांना जाऊन मिळाले. (५) पेशवे घराण्यांतील मंडळी आणि त्यांचे मुत्सद्दी प्रसंगानुसार मुख्य सत्तेविरुद्ध बंड करून हैदर, मोंगल, कोल्हापूरकर, दिल्ली दरबार व रोहिले यांना जाऊन मिळाले व स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं सातारचे राजे व त्यांचे पेशवे यांना पेचांत आणण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. हा काळा इतिहास पेशवाईंत सुरू होऊन मराठी सत्तेबरोबरच नाश पावला. या स्वार्थांधतेला कोणीहि अपवाद नव्हते. नानाला ह्या मालिकेंतून बाहेर काढतां येणार नाहीं. वरीलप्रमाणें आणखीं कांहीं उदाहरणें आम्हीं देत आहोंत. अटकेपार स्वारी संपल्या नंतर राघोबानें शिंद्यांवर नजीबखानाचें पारिपत्य करण्याची कामगिरी सोंपविली असतां मल्हारराव होळकर शिंद्यांना सांगतात “ **बाबा तुमचा मूळ स्वभाव ( अज्ञानी ), अटकेपासून रामेश्वरापर्यंत एक छत्री राज्य जाहलें. हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र खळी ( बडा शत्रू ) राहिला आहे. त्याचें पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून जासुदा करवीं पैसा आणितील....तुम्हीं नजीबखानाचें पारिपत्य कराल तर तुम्हांस पेशवे धोतरें बडवावयास लावतील.** ” ( अत्रेकृत मल्हारराव होळकर यांचें चरित्र पान ९७ ते १०१ ). अहिल्याबाईवर स्वारी करण्यास राघोबा निघाला तेव्हां ती युद्धास उभी राहिली. गोपाळराव पटवर्धनाप्रमाणें तीहि म्हणाली कीं, “ **आम्हांला काय ? कोठेंही चाकरीच करावयाची,**

सं. नं. ..........
स्थळ प्रत



मग ती पेशवाईचीच करावी असें कोणी सांगितलें ? आम्ही मोंगलांचीहि चाकरी करून आमचें राज्य राखूं. " या फुटीर वृत्तीच्या पापापासून खुद्द माधवराव पेशवा देखील मुक्त नव्हता. काकाच्या ( रघुनाथरावाच्या ) विरुद्ध मराठा सरदारांनीं मोंगलांस जाऊन मिळावें असा त्याचा सल्ला होता. त्याच्या गुप्त परवानगीनेंच गोपाळराव पटवर्धन वगैरे मराठा सरदार निजामाकडे जाऊन मिळाले होते. कर्तबगार हिंदूंना मुसलमान किंवा इंग्रज यांची नोकरी करण्यांत कसलाच कमीपणा दाटत नव्हता. पेशवाईतील साडेतीन शहाण्यांपैकीं एक शहाणा विठ्ठल सुंदर हा संगमनेरचा ब्राम्हण असून निजामाची चाकरी करीत होता. एकनाथासारखे साधु देखील मुसलमानांची चाकरी करीत होते. त्याचप्रमाणें बाळाजीपंत नातू हा इंग्रजांची चाकरी करीत होता. या अराष्ट्रीय वृत्तीमुळेंच येथें परचक्रें आलीं व दास्य आलें. याबाबत प्रो. सीले यांचे खालील अर्थाचे उद्‌गार महत्वाचे आहेतः—

" India is not a nation. It is a geographical expression. No nation can be conquered by a foreign country. India was conquered by Indians and the British meant one thing and acheived another. They stumbled upon an Empire, because there was soto say a political vacuum and the British simply filled it up."

वरील प्रो. सीले यांचे उद्‌गार वाचून नेपोलियननें फ्रान्सचा राजमुकुट आपल्या डोक्यावर धारण कसा केला याबद्दल जे उद्‌गार त्यानें काढले त्यांची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. ते असेः—

" I found the Crown of France in the gutter and I picked it up with my sword."

१३. मराठ्यांतील ही दुही व अंदाधुंदी पाहून इंग्रजांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेविली होती कीं मराठी राज्य आपसांतील दुहीनें व कलहानें कोलमडून पडेल. श्री. कानेटकरांनीं हेस्टिंग्सचें याबाबत एक पत्र दिलें आहे. त्यांत तो म्हणतो " पुण्याचें

कारभारी मंडळ अगदींच दुर्बळ आहे. ज गृहस्थ कारभार चालवितात त्यांस राज्य चालविण्याचा कायदेशीर कांहींच हक्क नसून शिवाय त्यांची आप-आपसांत गोडी नाहीं. त्यांच्यांत वरिष्ठ सखारामबापू. तो आतां वयोवृद्ध व दुखणेकरी आहे. त्याचा दुसरा साथीदार नाना फडणवीस. या दोघांनींच पुणें सरकारच्या वतीनें पुरंदरच्या तहावर सह्या करून दिल्या. परंतु ते कारभारास कंटाळले आहेत. **लोकांचा पेशवे सरकारवरील विश्वास नाहींसा झाला आहे.** भाऊबंदकी, फितुरी सर्व ठिकाणीं सुरू आहेच. कांहीं दिवसांनीं ती विकोपास जाईल. राज्य खंबीरपणें चालण्यास मुख्यतः विश्वास व इभ्रत लोकांत कायम असणें जरूर आहे, परंतु सर्व ठिकाणीं त्याचा अभाव आहे." यास खरे यांची पुष्टि आहे. नानाबद्दल खरेशास्त्री म्हणतात 'पाटीलबुवांवर प्रसंग आला असतां त्यांनीं नानाजवळ कुमक मागितली. ते मत्सर बुद्धीनें आपणांस मदत करणार नाहींत म्हणून पाटीलबुवांनीं नानास लिहिलें कीं 'मी म्हणजे अगदींच निराश झालों असें नाहीं. परंतु रजपूत राजे व बादशहा यांनीं इंग्रजांशीं राजकारण केलें असें मला खास वाटतें. तेव्हां इंग्रजांच्या ताब्यांत हिंदुस्थानांतील प्रांत गेले असतां त्यांचें वर्चस्व किती वाढेल व त्यापासून मराठी राष्ट्रास किती धोका पोंचेल याचा तुम्ही आपल्याशीं विचार करून पाहावा. तुम्हांविषयीं माझ्या मनांत मत्सरबुद्धि खचित नाहीं. ती मजविषयीं तुमच्या मनांत वसत असेल तर काढून टाकावी....आपल्या दोघांचा धनी एक. त्याचें ज्यांत हित तेंच आपणांस कर्तव्य. तें करण्याविषयीं आपण दोघेहि झटूं या. फक्त मजविषयींच जर तुम्हांस मत्सर वाटत असेल तर तुम्हीं आपल्या मनास विचारा कीं (१) मोरोबादादानें तुम्हांविरुद्ध कारस्थान उभें केलें तेव्हां तुम्हांस पाठबळ कोणीं दिलें? (२) तुमचे प्रतिस्पर्धी सखारामबापू यास तुमच्या ताब्यांत कोणी आणून दिलें? (३) तोतयाचें बंड कोणी मोडलें? (४) तळेगांवांत इंग्रजांचा पराभव कोणी केला? (५) लढाईचा बहुतेक भार आपल्या शिरावर घेऊन शेवटीं इंग्रजांशीं फायदेशीर तह

कोणीं करून दिला ? या निरनिराळ्या प्रसंगीं मी किती उपयोगी पडलों याचा विचार करा आणि जे दुष्ट लोक चुगल्या सांगत असतील त्यांचीं तोंडें बंद करा ते आम्हां दोघांचेहि शत्रु आहेत. कोणीकडून हिंदुस्थानांत मराठ्यांची सत्ता कायम राहावी, आपणांमध्यें कलह उत्पन्न होऊन सर्व राष्ट्राचा नाश न व्हावा एवढी गोष्ट झाली म्हणजे झालें.'' (खरेकृत नाना फडणीस चरित्र पान १३२ ते १३८). पान १३७ वर खरे शास्त्री लिहितात, "श्रीमंत शिंद्याबरोबर जेव्हां जेव्हां बाहेर जातील तेव्हां तेव्हां त्यांनीं परशराम भाऊस पाठवीत असावें. पेशव्यांजवळ जीं नोकर माणसें असत तीं नानांच्या घळणांतील होतीं. त्यामुळें पाटील बुवांचें व श्रीमंतांचें कारभाराविषयीं एकांतीं भाषण होण्याचे प्रसंग फारसे येत नसत. पण जेव्हां येत तेव्हां शिंदे पेशव्यास अर्ज करीत कीं 'मीं आज तीस पस्तीस वर्षे हिंदुस्थानांत राहून बहुत श्रम साहसें केलीं, शेकडों लढाया मारल्या, त्यांत स्वामीचें पुण्यप्रतापें करून यश पावत आलों मोठमोठ्या राजांस पादाक्रांत केलें, बादशाही मानमरातब आणून श्रीमंतांच्या पायांशीं सादर केले....आतां एकच हेतु उरला कीं, **म्हातारपणीं मी देशीं आलों आहें** तर आमरण पायांचा नित्य सहवास घडावा व येथील राज्यकारभार संभाळून **दक्षिण दिशेसाठीं स्वामींचा प्रताप अधिकाधिक उज्वलित करावा.** यासाठीं हल्लीं नानाफडणीस व हरिपंत कारभार करीत आहेत तो मजकडे द्यावा व दोघांस घरीं बसवावें....शिंदे यांनीं नानांची मुरवत न ठेवतां कारभागंत ढवळाढवळ करण्यास सुरवात केली....तेव्हां नानास साहजिकच वाईट वाटलें कीं शिंदे आपल्याशीं इतके धिटाईनें वागतात ते पेशव्यांच्या आंतून पाठबळाशिवाय वागत नाहींत. एकदां लोहगांवच्या नदींत पेशवे व शिंदे नाव खेळवीत असतां त्यांचें कांहीं संभाषण झालें तें कोणी नानास येऊन सांगितलें. त्यावरून त्याची वरील समजूत दृढ होण्यास कारण झालें. नंतर नाना पेशव्यांस एकांतीं गांठून बोलले कीं, "पाटीलबाबांनीं मराठी शिलेदारास निरोप देऊन

परकी लोकांस चाकरीस ठेवलें आहे, व त्यावर टोपीवाले अधिकारी नेमून त्यांच्या तऱ्हेची कवायत शिकविली आहे. यावरून ब्राम्हणांच्या हातांतील सत्ता केवळ बळजोरीनें काढून घेऊन आपण सर्व मराठी राज्यांत मुख्य व्हावें असा त्यांचा इरादा दिसतो. सरकारी मर्जी त्यावर विशेष. शिंद्याचे मनोरथास मीं आड यावें तर सरकारचें मला पाठबळ नाहीं. त्यामुळें मीं फिका पडत चाललों आहें. इतउत्तर कारभार करण्यांत शोभा नाहीं. श्रीमंत गर्भस्थ होते तेव्हांपासून इमानानें सेवा करून मराठी राज्य मीं इतक्या नांवारूपास आणिलें. आतां ब्राम्हण सत्तेचा विनाशकाल आलेला दिसतो. या करितां ती गोष्ट घडून येण्यापूर्वीं कोठेंतरी एकांतीं बसून देव डोळे मिटवीपर्यंत त्याचेंच भजनपूजन करून कालक्षेप करावा असें मनांत आहे. या करितां श्रीमंतांनीं मला काशीस जाण्याकरितां निरोप द्यावा." या उताऱ्यावरून नानाच्या मनाची ठेवण काय होती याची खात्री पटते. नानाला मराठी राज्य व त्याची उन्नती याची मुळींच काळजी नव्हती. आपल्यापेक्षां पाटीलबुवा मोठा होईल तर त्याला खालीं ओढावा व आपली सत्ता टिकवावी एवढाच त्याचा प्रयत्न होता. शिवाय मराठी राज्यांत ब्राम्हणी सत्ताच असावी, ती शिंद्याच्या हातीं –ते मराठे म्हणून–जाऊं नये अशी राष्ट्रघातकी, संकुचित व जातीय वृत्ति नानाची होती हें स्पष्ट दिसतें. काशीला जाण्याची परवानगी मागणें म्हणजे पेशव्यास आव्हान देणेंच होतें. हा कांगावाच होता. हें काशीला जाण्याचें अस्त्र नानानें बरेच वेळां यशस्वी रीतीनें वापरल्याचें नमूद आहे. या बाबत रियासतकार म्हणतात "इतिहासग्रंथांत व खरे शास्त्री यांनीं लिहिलेल्या चरित्रांत नानासंबंधीं अनेक किरकोळ तपशील सांपडतात. ते एकत्र करण्यासारखे आहेत. पानिपतावरून विरक्तावस्थेंत कायमचा काशीवास करण्याचा नानाचा विचार होता. पण त्याला ती यात्रा एकदांहि घडण्याचा योग आला नाहीं. मात्र महादजी शिंदे पुण्यास आल्यापासून व पुढें बाजीरावाचे अमदानींत 'मीं कारभार सोडून काशीस जाऊन राहतों' असे बेत अनेकवार (नानानें) जाहीर

केले. परंतु त्यापैकीं नुसते बहाणे किती व खऱ्या विरक्तीचे किती हें ठरविण्यास मार्ग नाहीं. " ( मराठी रियासत उत्तर विभाग ३ पान १०५ ). औरंगजेबानें बाप व भाऊ यांचा कांटा काढण्यासाठीं आपण मक्केला जातों म्हणून उठविलेली भूमका व बतावणी ही नानांची काशीला जाण्याची शक्कल या एकाच वर्गांतील आहेत. महादजीचा कांटा काढल्यानंतर त्याला उर्वीतल निर्वीर झालें व पेशवाईचा तो डिक्टेटर कांहींकाळ तरी झाला. रियासतकार सदर पुस्तकाच्या पान १२१ वर लिहितात कीं:—" छत्रपति व पेशवे या दोन पदांची संपूर्ण सत्ता त्याचे ( नानाचे ) हातीं होती. परंतु लष्करी कामांत तो सर्वथैव लंगडा असल्यानें त्याच्या कारभारांत यश आलें नाहीं. लष्करी कौशल्य त्याचे अंगीं असतें तर **तो आपलाच स्वतंत्र राजवंश स्थापूं शकला असता.** " नानाच्या वाटेंतील महादजीचा कांटा त्यानें कसा दगा व खून करून काढला याबद्दल महादजीचे चरित्रकार एस्. जी. कीन, सी. आय्. ई; एम्. ए. 'हिंदुस्थानचें शास्ते' या मालिकेमध्यें पान १८५–१८६ वर म्हणतातः—

" He ( Sawai Madhavrao ) soon made the Patil his favourite and constant companion in field sports and open air pursuits for which the grave and sedentary Nana was both unwilling and unfit."

वरीलप्रमाणें सुरवात करून पुढें नानाला " Cool and crafty Brahmin minister " व " Between two men of almost equal power, one ( शिंदे ) being braver, the other ( नाना ) more unscrupulous." वगैरे शेलकीं विशेषणें लावलीं आहेत व नाना व महादजी यांची तेढ कशी वाढली होती व पाटीलबोवांचें वजन पेशव्यांवर कसें बसलें होतें व त्याबद्दल नानाला कसें वाईट वाटलें होतें याचें समग्र वर्णन देऊन शेवटीं ते म्हणतातः—

" But the contest was destined to be a sudden end. On the 12th of February 1794, it was announced that Sindia had

died of fever at a Suburb of Poona; but there is no record of his previous illness. The usually well-informed and contemporanious author of Tarikh--i--Mazfan gives a detailed account, according to which the Patil had been way-laid, the evening before, by an armed gang **employed by Nana, who had certainly good reason to wish for his removal.** It is stated further that Sindia and his attendants made such a stout defence that assailants were driven off, but the chief sustained wounds of such severity as to cause his death next day."

या बाबत ग्रंट डफनें मारेकरी कोण होता त्याच्या नांवाचा उल्लेख केला नाहीं, पण त्याच्या खालील वाक्यावरून नानाच मारेकरी होता असाच सूर निघतोः—

'The death of Mahadaji was an event of great political importance as he was inimical to the over-grown ascendancy of the Brahmins.'

रियासतकार सरदेसाई यांनीं महादजी शिंद्याबाबत ऐतिहासिक पत्र-संग्रहाचा १९३७ सालीं जो भाग प्रसिद्ध केला आहे त्याला यदुनाथ सरकार यांनीं आपले दोन शब्द ( Foreward ) दिले आहेत त्यांत नानानें महादजीबद्दल अढी धरली होती व त्याला बाक्या प्रसंगाच्या वेळीं मदत दिली नाहीं. पुणें दरबारांत त्याला **फितूर, बेमान** वगैरे विशेषणें दिलीं जात व शिंद्याला पुणें दरबारनें मदत न करण्यांत मूर्खपणा केला, आणि शिंद्याच्या निंमी अक्कल जरी नानाला असती व त्यानें त्याला योग्य ती कुमक केली असती तर मराठ्यांचा इतिहास निराळा झाला असता असें प्रतिपादन केलें आहे. त्यांतील कांहीं भाग खालीं देत आहोंतः—

" These records prove that in establishing Maratha control over the Imperialist Government of Delhi and wiping off the disgrace of Panipat, Mahadaji had to labour

alone, nay in the teeth of pin-pricks and covert opposition by the Court of Poona....Poona Government denied to him money and armed help in his sorest need and even insulted him in public....He was called in the Poona Government Letters, a cheat, a disloyal servant, a selfish up-start.....Nana Faranwisa's agent ( and spy ) at his camp, Sadashiv Dinkar, held a language towards Sindia, which can be paralleled by that of British Residents of the quaking Indian Princes in the days of Lord Dalhousie....He triumphed in the end, no doubt, and confounded his enemies and candid friends....but after what a tremendous loss of valuable time and avoidable waste of his resourses. If the Maratha Machiavelli ( Nana ) had possessed only half the great Florentines's patriotism and honesty or even a wise perception of self-interest and had backed Mahadaji at the out-set, then the unchangable position which the great Sindia gained for the Maratha race in January 1789 would have been achieved fully four years earlier and the whole course of Maratha history might have been different."

१४. मराठी राज्य हें आळा सुटलेल्या पेंढीप्रमाणें पेशवे काळीं झालें होतें. त्यामुळें जरी त्यांनीं सर्व हिंदुस्थान पादाक्रांत केला, अटकेवर झेंडे रोवले, बंगालपर्यंत स्वाऱ्या करून इंग्रजांना धाक घातला, हैदर, टिपू व निझाम यांना जेरीस आणलें, रजपूत, रांगडे व बुंदेले नेस्तनाबूत केले, तरी शेवटीं त्यांना इंग्रजांपुढें नामोहरम व्हावें लागलें. याचा आम्हीं आतांपर्यंत उहापोह केला. साम्राज्यें जीं स्थापिलीं जातात तीं टोळधाडीनें स्वाऱ्या करून किंवा नुस्ती लांडगेतोड करून स्थापतां किंवा राखतां येत नाहींत. आंतून स्वार्थानें पोखरलेल्या व देश, धर्म किंवा राष्ट्र यांच्या विषयीं अभिमानशून्य पण स्वकुल व स्वगोत्र यांचा बडेजाव व्हावा म्हणून वाटेल त्याची भाकरी खाऊन चाकरी करणारे मानकरी व सरदार ज्या देशांत आहेत त्या देशाला ऊर्जित काळ कसा यावा, किंवा त्यांचें राष्ट्र किंवा राज्य कसें टिकावें ? " मराठे व इंग्रज " या

पुस्तकास जोडलेल्या उपोद्घातांत पान २, ३, ४ व १० वर खरे शास्त्री यांनीं आमच्या प्रमाणेंच मराठी राज्य बुडण्याचीं कारणें दिलीं आहेत. देशाभिमानाचा अभाव, ग्रामसंस्था, रीतिरिवाज व वतनहक्क यांत राज्यकर्ते जोंपर्यंत ढवळा-ढवळ करीत नाहींत तोंपर्यंत ते कोण आहेत काय करतात याची पंचायत न करण्याची मनोवृत्ति हीं मुख्य कारणें होत असें म्हटलें आहे. शिवाजीच्या वेळीं राज्याभिमान तरी होता, तोहि पेशवाईमध्यें शिल्लक राहिला नाहीं. ह्याबाबत अमात्यानें मराठीमध्यें राजनीतीवर जो ग्रंथ लिहिला आहे तो मुळांत जिज्ञासू वाचकांनीं अवश्य वाचावा. त्यांत श्री. शिवाजी महाराजांची राजकीय नीति कशी होती, व पुढें पेशवाईंत तिला हरताळ फांसल्यानें मराठी राज्य इतक्या लवकर लयाला गेलें हें कळून येईल.

१५. इंग्रज डॉक्टरानें बादशहाच्या मुलीला औषध देऊन बरें केलें त्यावेळीं तो डॉक्टर स्वतःला कांहीं घेत नाहीं तर '**माझ्या देशाच्या लोकांस तुमच्या राज्यांत व्यापाराची सवलत द्या**' असें म्हणतो. मीर जाफरच्या मृत्यूमुळें क्लाइव्हला मिळालेल्या पैक्याचा विनियोग त्यानें आपल्या देशाच्या लष्करी अंमलदारांच्या उपयोगार्थ केला. याच्या उलट खर्ड्याच्या लढाईनंतर तह ठरविते वेळीं **नाना फडणीसास तीन हजार रुपये उत्पन्नाचें गांव निझाम देतो आणि नाना तें स्वतःकरतां ठेऊन घेतो.** हा फरक देशाभिमान अगर राष्ट्राभिमान नानाला चिकटविणाऱ्यांनीं अवश्य पाहावा. खरे शास्त्र्यांनीं पुढें असेंहि म्हटलें आहे कीं परक्यांचा तोफखाना ठेवणें, परकी लोक ठेवून आपला बचाव करणें, त्यापायीं त्या परक्यांस पगार सातपासून दहा रुपयापर्यंत देणें आणि मावळ्यांना पगार तीन रुपये देणें, यामुळें परावलंबित्व आलें व आपल्या माणसांचें महत्व कमी झालें. "शिवाजीच्या काळांत सर्वांना कर्दनकाळ भासणारे मावळे पेशवाईंत तेवढे नादान ठरले कीं काय? हेच मावळे जगांत उत्कृष्ट लढवय्ये म्हणून नाणावलेल्या इंग्रज, फ्रेंच वगैरे लोकांच्या खांद्यास खांदा भिडवून सांप्रतच्या महायुद्धांत बरोबरीनें लढतात आणि जर्मनांससुद्धां चीत करतात हेंहि निदर्शनास आलें. योग्य उत्तेजन व शिक्षण मिळाल्यास येथपर्यंत त्यांची पात्रता आहे हें पेश-

याईत कोणास देखील खरें वाटलें नसतें. '' आपलें सैन्य ठेवून त्यांना नवीन शिक्षण देऊन तयार करण्याची अक्कल नानास कधींहि आली नाहीं. स्वतःचे अंगरक्षक म्हणून त्यानें अरब ठेविले होते आणि त्यांनीं नानाच्या मृत्यूनंतर त्याचें प्रेत आपला पगार चुकता होईपर्यंत हालवूं दिलें नाहीं हें प्रसिद्धच आहे.

१६. मराठ्यांनीं मोहिमा केल्या, प्रांत जिंकले, पण त्यावर व्यवस्थित अशी सत्ता प्रस्थापित करण्याची पद्धत त्यांच्यांत व पेशवाईंत नव्हती. सदर पुस्तकांत खरेशास्त्री ह्मणतात " शाहूचा दरारा नानासाहेबांत नव्हता आणि नानासाहेबांचा माधवरावांत नव्हता; मग माधवरावाचा दरारा नानासारख्या कारभाऱ्यांत कोठून असणार ? ( पान १६ ) " शांततेच्या काळांत मराठ्यांचें राज्य सर्वत्र होतें आणि अस्वस्थतेच्या काळांत कुठेंच नव्हतें अशी दशा होण्याचें कारण कोणताहि प्रांत मराठ्यांचे ताब्यांत पूर्णपणें आला नव्हता हेंच होय. '' मराठ्यांनीं तुळजापूर व काशीसारखीं पवित्र क्षेत्रेंहि शत्रूंच्या तावडींतून सोडविलीं नाहींत. त्यांना फारशी धर्माची चाड नव्हती. परशराम भाऊ पटवर्धनासारखा मराठ्यांचा ब्राह्मण सेनापती श्री. शंकराचार्यांचा मठ लुटून आपली तुंबडी भरतो ही किती शरमेची गोष्ट आहे ? पेशवाईंत जात्यंधता बुजबुजली होती. पेशव्यांकडून आंग्र्यांचा नायनाट करण्यांत आला यालाहि प्रमुख कारण तो चित्पावनांचा द्वेष्टा होता व पेशव्यांचें बरेच आप्तइष्ट त्यांच्या मुलखांत राहात होते त्यांचा त्यानें छळ चालविला होता हें होय असें खरेशास्त्र्यांचें मत दिसतें. देशस्थ कोंकणस्थ वाद, कायस्थ व प्रभु प्रकरणें, ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद, पेशवाईत फारच बोकाळले होते. " नाना म्हणजे ब्राम्हण्य '' असें समीकरण मानण्यांत येत होतें यांत काय तें समजावें.

१७ इंग्रजांशीं मराठ्यांचा ज्या वेळीं मुकाबला झाला तेव्हां इंग्रजांबद्दलची इत्थंभूत बातमी मराठ्यांना असणें प्राप्त होतें. पण हे लोक कुठले, त्यांचे सैन्य किती, त्यांना कोणाचा किती पाठिंबा आहे वगैरे माहिती मिळविणें मुत्सद्यांना प्राप्त होतें. पण अशी कोणतीही माहिती

नानाला नव्हती. जी माहिती नानाला देण्यांत येत असे ती ऐकीव व हवेवरील निराधार व कल्पित असे. याच्या उलट इंग्रजांना मात्र मराठ्यांची बित्तंबातमी मिळत असे. कारण स्वार्थी व फितूर माणसांची पेशवाईंत बरीच गर्दी होती. याबाबत खरे शास्त्री वरील परिच्छेदांत म्हणतात " आमचा पुणें सातारा इंग्रजानीं कां घेतला आणि त्यांचा मद्रास-कलकत्ता आम्हीं कां घेऊं शकलों नाहीं याचा संक्षेपानें येथपर्यंत विचार केला. तो असा:—(१) देशाभिमान शून्यता, (२) समूहानें कार्य करण्याची नालायकी (३) स्वार्थ साधनाची बेसुमार हांव (४) आळस (५) हेळसांड (६) दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगीं खिळले आहेत. तेच आमच्या राज्यनाशाला कारणीभूत झाले आहेत." या सर्व विवेचनावरून पेशवाईंतील खरा इतिहास कोणत्या प्रकारचा होता व नानाची खरी किंमत काय होती हें समजून येईल.

१८. इतिहास-शिक्षणापासून जर कांहीं बोध घ्यावयाचा असेल तर वरील दोष व दुर्गुण आम्हीं जितके लवकर नाहींसे करूं तितकी आमची उन्नति लवकर होणार आहे. पण हे दुर्गुण आमच्यांत होते व आहेत हें आधीं कबूल करावयास हवें. त्यावर पांघरूण घालून आम्हीं आमच्या पूर्वजांची खोटी स्तुति केली तर आत्मनाश व राष्ट्रघात झाल्यावांचून राहणार नाहीं. यासाठीं आमचा खरा इतिहास पुढें आला पाहिजे. मतमतांतरें असणें हें जिवंतपणाचें लक्षण आहे. ह्मणूनच इतिहासाची नवीन व दुसरी बाजू पुढें मांडल्याबद्दल बेळगांवच्या ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समितीचें आम्हीं पुणेकरांनीं अभिनंदन व स्वागत केलें पाहिजे. पण वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. थोडासा कुठें विरोधी सूर निघाला कीं पुण्या मुंबईतील मिरासदार ब्राह्मण इतिहास-भक्तांची तळव्याची आग मस्तकाला जाते. एखाद्याच्या मताला विरोध असल्याबद्दल तक्रार नाहीं, पण त्या माणसाला आपले विरोधी मत मांडण्याचा हक्क आहे हें कबूल केलें पाहिजे. ह्याबद्दल व्हाल्टेयरचें खालील सुप्रसिद्ध वचन विचार करण्यासारखें आहे:—

नं. प्र.



" I shall disagree on all points with a man but I shall fight and die for his right to say what he thinks to be right. "

असें असतां कै. इतिहासभास्कर रानडे यांचेवर त्यांच्या 'खून कीं आत्महत्त्या' या पुस्तकाबद्दल टीकात्मक अशी जी व्याख्यानमाला टिळक स्मारक मंदिरांत पुणें येथें झाली त्यांत पुस्तकाचे गुणदोषांवर न बोलतां ग्रंथकारावर हीन व असत्य अशी वैयक्तिक नालस्तीची टीका करण्यांत आली होती. त्यापैकीं एका जांबुवंत वक्त्यानें 'बेळगांव' या शब्दावर शाब्दिक कोटी करून '**बेलगामी रानडे**' असा पोरकट व टारगट कोटीक्रम करून सभेंत हंशा पिकविला व आपलेंहि हंसें करून घेतलें. दुसरे एक इतिहासतज्ञ महंत 'इतिहासभास्कर' या शब्दामुळें संतापून जाऊन रानडे यांना '**इतिहास-नस्कर**' असा अहेर करते झाले. आम्हीहि या महंतांना '**इतिहास-बस्कर**' (म्हणजे इतिहास सांगणें पुरे कर) ही पदवी बहाल करतों. कारण या टीका-कारानें इतिहासाचें '**बस्कर**'च केलें आहे. हे महंत संसारांत ब्रम्हचारी असल्यानें जसे निपुत्रिक राहिले तसेच इतिहास क्षेत्रांतहि ते वांझोटेच आहेत. कारण त्यांनीं एखादा आधारभूत इतिहासग्रंथ लिहिल्याचें आमच्या पाहण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं. तेव्हां या महंतानें महामहोपाध्यायांची जरतारी शालजोडी टाकून देऊन इतिहासाचें फाटकें तुटकें बस्कर तरी धारण करावें, नाहीं तर इतिहासावर बोलण्याचें अगर इतर इतिहास लेखकावर वेडगळ तोंडसुख घेऊन पोरकट टीका करण्याचें बस्म करावें अशी आमची त्यांना सूचना आहे. वांझ बाईला दुसऱ्याच्या पोराचें वावडें असतें हा जगाचा नियम आहे. म्हणूनच 'पोर होईना व सवत साहीना' हा वाक्यप्रचार रूढ झाला आहे. इतिहास-भास्कर रानडे यांच्या १४०० पानांच्या ग्रंथांत या महंतांना १४ पानें देखील महत्वाचीं वाटलीं नाहींत. हा अजब शोध सभेपुढें मांडून त्यांनीं टाळ्या मिळविल्या व इतिहास-भास्कर रानडे यांना कांहीं टारगट स्वरूपाच्या शिक्षा ठोठावण्यासहि कमी केलें नाहीं. असले हे बनावट रामशास्त्री एखादा ग्रंथ लिहितील तर त्यांच्या विद्वत्तेची व इतिहासज्ञानाची

कल्पना महाराष्ट्रांतील विचारवंतांना येईल. व त्यांचें ऐतिहासिक मूल्य ठरवितां येईल. साहित्य सम्राटांनीं रानडे यांना ‘Devil's advocate’ असा ह्या सभेंत शेरा मारून हे उलटचा काळजाचे गृहस्थ आहेत असाहि वर अहेर केला. ऐतिहासिक पुस्तकाबाबत त्यांतील अंतस्थ मुद्यांचें खंडण-मंडण करण्याऐवजीं व्यक्तिगत निंदा व शिव्यांचा शिमगा या बुद्रुक व बहुरूपी लोकांनीं केला हें त्यांच्या वर उल्लेखलेल्या पुणेरी चिपळूणकरी परंपरेला धरून असलें तरीं निंद्य व गर्ह्यच आहे. प्रा. फाटकांनीं ‘खून कीं आत्महत्या’ ह्या पुस्तकाचा एक दोष प्रामुख्यानें मांडला कीं हें पुस्तक अस्सल कागदपत्रांवर व तत्कालीन लेखांवर आधारलेलें नाहीं. कारण लेखकाला त्या पुराव्यांची गंधवार्ताहि नव्हती. म्हणून त्यानें बखरी व आख्यायिकांवर भर देऊन आपल्या ग्रंथाचीं पानें भरून काढलीं आहेत. म्हणून विचारवंत वाचकांनीं त्याला स्पर्शहि करूं नये. गिब्बनच्या ‘The Decline and Fall of the Roman Empire’ या पुस्तकावर डेव्हिस यानें असाच आरोप केला होता. त्याला गिब्बननें जें सणसणीत उत्तर दिलें त्याची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. तें असें:—

“Mr. Devis is bold enough to conceive some hopes of persuading his readers that an historian who has employed several years of his life and several hundreds of pages on the ‘Decline and fall of the Roman Empire’ had never read OROSIOS or th Augustan History..... If he takes the trouble of calling at my place any afternoon when I am not at home, my servant shall show him my library well furnished with the useful authors, ancient as well as modern, who have supplied me with the materials of my history.”

इतिहास-भास्कर रानडेहि प्रोफेसर मजकुरांस स्वर्गांतून असेंच उत्तर देतील कीं त्यांनीं १०-१२ वर्षें सतत अभ्यास करून जो ग्रंथ लिहिला त्याच्या आधारभूत ऐतिहासिक पुस्तकांचा संग्रह प्रा. फाटक यांना पाहावयाचा असेल तर त्यानीं आजहि त्यांच्या पश्चातहि त्यांच्या वार-

त्यांच्या घरीं जाऊन तो अवश्य पाहावा व आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घ्यावें व प्रामाणिकपणें आपली चूक कबूल करावी. तत्कालीन पत्रव्यवहाराचें जें गौडबंगाल महाराष्ट्रांतील कांहीं तथाकथित इतिहासकार करीत आहेत ती नुसती हातचलाखी आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. तत्कालीन सर्व पत्रव्यवहार अगदीं बरोबर असतो व मागाहून लिहिलेल्या बखरी सर्व खोटयाच असतात. ही विचारसरणी एकांगी व चुकीची आहे. अशा प्रकारची वैयक्तिक व भरमसाट टीका पुण्याच्या मिरासदारांनीं केल्यानंतर पुण्यांतच अहिताग्नि-मंदिरांत दोन्ही पक्षांची बाजू मांडली गेली. त्यांत दादापक्षातर्फे आम्हींहि दोन व्याख्यानें दिलीं होतीं. त्यांत केवळ अस्सल कागदपत्राच्याच आधारावर इतिहासग्रंथ लिहून दाखवा असें जाहीर आव्हान नानापक्षाच्या लोकांस दिलें होतें. पण तें कोणींहि अद्यापपर्यंत स्वीकारलेलें नाहीं. एवढेंच नव्हे तर नानाच्या बाजूनें श्री. रानडयांना उत्तर देणारा ग्रंथ लिहिणाऱ्यास दोनशें रुपयांचें बक्षिस नाना फडणीस स्मारक समितीनें ठेवलें होतें तरी सुद्धां कोणी तसा ग्रंथ लिहिला नाहीं हें लक्षांत ठेवण्या सारखें आहे. रानडे यांना मुद्यांनीं मारणें अशक्य वाटल्यावरून त्यांना या लोकांनीं गुद्दे दिले. तशी त्यांनीं पूर्वीपासून तयारीच केली होती. कारण एका बुद्रुक वक्त्यानें टिळक स्मारक मंदिरांत जाहीर धमकीहि दिली होती कीं " रानडे यांच्या तर्फेचीं व्याख्यानें पुण्यांत कशीं होतात हें आम्हीं पाहून घेऊं. " प्रतिपक्षाचें म्हणणें ऐकूनहि न घेण्याची वृत्ति या मंडळींत कां असावी ? नाना राष्ट्रपुरुषच ठरला पाहिजे हा हट्ट कां ? नाना म्हणजे ' ब्राम्हण्य ' म्हणून कीं काय ? याविषयीं ऐतिहासिक निबंध–मराठेशाही कशानें बुडाली ? पान १५८ वर चिंतामणराव वैद्य म्हणतात " राज्यवंशसत्तेच्या कल्पनेंतहि आमच्यांत सचोटी नाहीं. हा तंटा मुख्यतः ब्राम्हणांनींच माजवला आणि त्यामुळेंच विनाशक फूट मराठेशाहींत पडली. " पुढें पान १६० वर ते म्हणतात " यजमानास अंकित ठेऊन नोकरानें किंवा प्रधानानें अथवा सरदारानें राज्य भोगण्याची अन्यायाची तृष्णा ब्राम्हणांनाहि आवरतां आली नाहीं, हें पाहून खेद

होतो....शिववंशास पेशव्यांनीं खाल्लें, पेशव्यांस खाण्याचा यत्न नानानें व दौलतरावानें केला, होळकरास खाण्याचा यत्न एका ब्राम्हण कारभाऱ्यानें केला. पण या अनीतीच्या प्रचारामुळें सर्वांस इंग्रजांनीं खाल्लें हें लक्षांत घेतलें पाहिजे. '' इतिहास काळांतील कोणीहि माणूस राष्ट्र-घातकी असेल तर तो ब्राम्हण होता म्हणून त्याच्याबद्दलचें सत्य उजेडांत आणावयाचें नाहीं अशी वृत्ति पुण्याच्या ब्राम्हणी इतिहासकारांची दिसते. या बाबत श्री. शेजवलकर लिहितात “ आमच्या इकडेहि असे इतिहासकार ( सत्यालापाचें समर्थन करणारे ) अविश्रुत नाहींत. पण राष्ट्राच्या सध्यांचे विप्लवांत आपल्या सिद्धांतांचें समर्थन करणें त्यांस जड जातें एवढेंच. एक संशोधक माझ्याशीं बोलतांना म्हणाले “ अहो पेशव्यांबद्दल लिहितांना आपणास जरा जपूनच लिहिलें पाहिजे. नाहींतर ब्राम्हणेतर आपल्याच वाक्यांचा अहेर आपणांस करावयाचे." ( नानासाहेबांचे चरित्रास श्री. शेजवलकरांनीं लिहिलेली प्रस्तावना ).

१९. इतिहासकाराला जातगोत असता कामा नये. पक्षपातानें लिहिलेला इतिहासच नव्हे. जुन्या माहितीवरून पण नव्या विचारसरणींतून विचार करून आपणाला जें वाटेल तें मांडावें व असें करीत असतांना कोणाचा मुलाहिजा ठेवूं नये. या दृष्टीनें श्री. नाईक यांचें सखारामबापूचें चरित्र स्वागतार्ह व आदर्शहि खास झालें आहे. जे. बी. एस् हालडेन यानें ‘ Is History a fraud ? ( इतिहास म्हणजे फसवेगिरी का )’ या आपल्या निबंधांत खालीलप्रमाणें म्हटलें आहे:—

“ Every generation must rewrite history. New facts become available and old facts are interpreted anew.”

या तत्वास अनुसरून नव्या दृष्टीनें व समतोल बुद्धीनें जुनी माहिती जमेस धरून श्री. नाईक यांनीं बापूचें साधार व सुंदर चरित्र लिहून मराठा इतिहासभक्तांना उपकृत केलें आहे. याबद्दल आम्हीं त्यांचें व त्यांच्या प्रकाशन समितीचे आभार मानून मोठ्या आनंदानें अभिनंदन करतों.

२० श्री. नाईक यांनीं बापूच्या चरित्राचा शेवट फारच आकर्षक पद्धतीनें केला आहे. ते म्हणतात "समाजांत सर्व काळांत कोणी नाना असतो व तो एखाद्या बापूला आपल्या अधिकाराच्या बळावर जमीनदोस्त करतो. हें पाहून अशा नानापासून सावध राहण्याची दक्षता वाचकांनीं घेण्याचें ठरविलें तर माझ्या या लिखाणाचें सार्थक झालें असें मीं मानीन." या उताऱ्यावरून या कर्नाटकी लेखकाची मराठी भाषा किती मुद्देसूद व मार्मिक आहे, त्यांची दृष्टि किती तीक्ष्ण व भेदक आहे, त्यांची अनुमानें व निष्कर्ष कसे अचूक व समतोल आहेत हें दिसून येईल. शिवाय हा सिद्धांत मांडतांना श्री. नाईक यांच्या व्यावहारिक ज्ञानाची व अनुभवाचीहि चुणुक दिसते.

२१. शेवटीं सर्व वाचक वर्गाचे आभार मानून साधु–श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराजांच्या एका सार्थ अभंगानें आम्हीं या प्रास्तावाचें भरत वाक्य गावून आपली रजा घेतोंः—

**" बोलिलों तें कांहीं तुमचिया हिता। वचन नेणता क्षमा कीजे ॥ वाट दावी तया न लागी रुसावे। अतित्याई जीवें नाश पावे ॥ निंब दिला रोग तुटाया अंतरीं। पोभाळिता वरी अंत चरे॥ तुका म्हणे हित देखण्यास ( डोळस ) कळे। पडती आंधळें कूपा माजीं॥"**

श्रीकृष्ण प्रासाद पुणें २ — शंकर बळवंत चव्हाण.

ता. १२-८-१९५२.

# निवेदन

मराठ्यांचा इतिहास तत्कालीन लोकांनीं लिहून ठेविला नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. त्याबाबत अधिकृत टिपणें अगर टांचणेंहि तत्कालीन लोकांनीं ठेविलीं नाहींत. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल उपलब्ध असलेला पुरावा म्हणजे (१) कागदपत्रें (२) बखरी (३) आख्यायिका (४) विदेशीय लोकांनीं लिहून ठेविलेल्या कांही हकीगती हा होय. हा पुरावा सुसंगत इतिहास लिहिणेस पुरेसा नाहीं. मराठ्यांचा इतिहास लिहितांना इतिहासकाराला ठिकठिकाणीं कल्पना चालवावी लागते, अर्थ शोधावा लागतो, अडखळावें लागतें व अशा सर्व अडचणींतून तो जुळवून लिहावा लागतो. तसा तो लिहिला गेला असल्यामुळें त्याबाबत मतामतांचा गलबला निर्माण झाला आहे.

आज मराठ्यांचा इतिहास नवीन दृष्टीकोनांतून लिहिला जात आहे. प्रस्तुत कांहीं महत्वाचा नवीन पुरावा मिळाल्यामुळें इतिहास बदलावा लागत आहे असें नव्हे. महत्वाचा थोडाबहुत पुरावा मिळाला आहे, पण तेवढ्यावरून इतिहास बदलणें जरूरीचें झालें आहे असें नाहीं. सुसंगतपणें इतिहास लिहिण्यास जरूर तो पुरावा असता तर प्रश्न निराळा होता. इतिहास जुळवून लिहिलेला असल्यामुळें जे दुवे इतिहासकारांनीं आपल्या कल्पनेनें सांधले आहेत ते बिनचूक आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. ते दुवे निराळ्या भूमिकेवरून पाहणाऱ्याला निराळे दिसणें स्वाभाविक आहे.

त्यास अनुसरून कै. इतिहासभास्कर रानडे यांनीं आपला निराळा दृष्टिकोन महाराष्ट्रापुढें मांडला आहे.

सखारामबापू बोकील यांचें चरित्र श्री. य. गो. कानेटकर यांनीं लिहिलें आहे. इतर इतिहासकारांनींही त्यांच्याबद्दल आपलीं मतें नोंदून ठेवलीं आहेत. नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युपर्यंतची बापूंची कामगिरी उत्तम व निर्दोष होती, या बद्दल सर्वांमध्यें एकवाक्यता आहे. माधवरावांच्या कारकीर्दीत, राघोबा व माधवराव यांच्या दुहीबाबत, कांहीं इतिहासकारांनीं दोषाचें खापर बापूंच्या माथीं मारलें आहे. कांहींनीं बापूंच्या "बारभाई"च्या कारस्थानाला स्वार्थी म्हटलें आहे, व पुनः राघोबाला मदत करण्याचा बापूंनीं प्रयत्न केला, त्याबाबत त्यांना विश्वासघातकी म्हटलें आहे. याचें माझ्यामतें मुख्य कारण म्हणजे आतांपर्यंतच्या सर्व इतिहासकारांनीं नाना फडणवीस हे राष्ट्रपुरुष होते, त्यांना स्वराज्याची अत्यंत काळजी होती, त्यांनीं राज्य मोठ्या शिकस्तीनें राखलें, त्यांच्या मृत्यूनंतर योग्य नेत्यांच्या अभावीं मराठेशाही बुडाली वगैरे गोष्टी गृहीत धरून, इतरांच्या वर्तनाचा मेळ या गृहीत तत्वाशीं घालण्याचा प्रयत्न केला आहे हें होय. इतिहासकालीन व्यक्तींच्या कोणत्याही वर्तनाचा अर्थ लावतांना त्या व्यक्तींच्या व त्या गोष्टीशीं संबंध असणाऱ्या इतर मुख्य व्यक्तींच्या स्वभावधर्माचें आकलन करून घेणें अत्यंत इष्ट व जरूरीचें आहे. त्याचप्रमाणें त्या प्रसंगाचें महत्व, गांभीर्य व त्याचा उगम, याचेंहि ज्ञान करून घेणें भाग आहे. असा सर्व बाजूंनीं पूर्ण विचार करून, त्या वर्तनाचा अर्थ लावला पाहिजे, नाहीं तर तो कांहीं वेळां

चुकल्याशिवाय राहणार नाहीं. हाच प्रकार, जुने कागद-पत्र, बखरी व आख्यायिका यांचा आहे. तात्पर्य माझ्या मतें ऐतिहासिक सिद्धांत पुढें मांडतांना व्यक्तीच्या स्वभावधर्माला प्राधान्य दिलें पाहिजे. त्या स्वभावधर्माशीं त्या व्यक्तीचें वर्तन सुसंगत असते, हा सिद्धांत लक्षांत ठेवून त्या व्यक्तीचें त्या स्वभावधर्माशीं विसंगत असें वर्तन दिसूं लागल्यास, त्यांत कोठें तरी, कांहीं तरी भानगड आहे, हें ताडलें पाहिजे व त्या दृष्टीनें विचार करून आपले सिद्धांत इतिहास लेखकानें मांडले पाहिजेत. तरच त्या इतिहासास जिवंतपणा येईल. नाहीं तर तो वस्तुस्थितीचा निर्जीव सांगाडाच होईल.

आजवर बहुतेक इतिहासकारांनीं या गोष्टीकडे द्यावें तसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. त्यामुळें त्यांचे कांहीं सिद्धांत चुकणें हें क्रमप्राप्त झालें आहे. जुन्या इतिहासकारांनीं कागदो-पत्री पुराव्यास प्राधान्य दिलें आहे. कोणत्याही कागदपत्राचा ऐतिहासिक अर्थ लावतांना त्या कागदांतील व्यावहारिक अर्थ जमेस धरून चालणार नाहीं. कागद कोणीं लिहिला ? कोणास लिहिला ? कोणत्या परिस्थितींत लिहिला ? लिहि-तांना लिहिणाऱ्याची मनःस्थिति कशी होती ? लिहिणा-ऱ्याचे व ज्याला तो कागद लिहिला त्यांचे संबंध कसे होते ? त्या दोघांचेही स्वभावधर्म कोणत्या पद्धतीचे होते ? या सर्व प्रश्नांचा खोल विचार करून या सर्व गोष्टींशीं मेळ बसेल असाच अर्थ त्यांतून काढावा लागेल, नाहींतर तो चुकल्याशिवाय राहाणार नाहीं. आपण एक काल्पनिक उदा-हरण घेऊं. सखारामबापूंनीं गोपाळराव पटवर्धन यांना चिठी पाठवली कीं—" आपली करामत पाहून आश्चर्य वाटलें. दौलती

संबंधीचा आपला इमान पाहून मी थक्क झालों ! " या वाक्यांचा वरवर दिसणारा अर्थ घेतल्यास गोपाळरावांची करामत व दौलतीसंबंधींची त्यांची कळकळ याची बापूंनीं शिफारस केली आहे असा निघेल. सदर चिठ्ठी गोपाळराव मोंगलास मिळाला व पुण्यावर त्यानें शत्रूकडून चाल करविली त्या वेळीं लिहिली. बापू व गोपाळराव यांचें मनोमन बरें नव्हतें. दौलतीवर चहूं बाजूंनीं संकटें येत होती. बापू त्या वेळीं पेशव्यांचे कारभारी होते. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, त्यांचा एकमेकांशीं मेळ बसवून, अर्थ काढला तर बापूंनीं संतापानें व पिळवटलेल्या अंतःकरणानें वरील वाक्य व्यंग्यार्थानें लिहिलें असलें पाहिजे, असें दिसतें. त्यांत गोपाळरावाची स्तुति नसून त्याची निर्भर्त्सनाच दिसेल. तात्पर्य शब्दांचा सरळ अर्थ प्रत्येक ठिकाणीं बरोबर ठरणार नाहीं. तसें केल्यास सत्याला सोडून एखादा निष्कर्ष आपल्या कडून काढला जाण्याचा संभव आहे व तसें कांहीं इतिहासकारांचें झालेंही आहे. प्रस्तुत पुस्तकांत वरील सर्व निकषांवर घांसून जे सिद्धांत, जसे निघतात तसे वाचकांच्यापुढें ठेविले आहेत. तसें करीत असतांना लेखकाला तर्कानें कांहीं कारणपरंपरा बसवावी लागली. अर्थात त्याला तर्काशिवाय दुसरा आधार नाहीं. पण तसा काढलेला निष्कर्ष त्या त्या परिस्थितींत बसतो कीं नाहीं हें वाचकांनीं पाहावें. निराधार तर्कट म्हणून बाजूस सारूं नये अशी मी वाचकांना नम्र विनंति करतों.

श्री. कानेटकर यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक बापू संबंधी माहिती मिळवून " सखारामबापूचें चरित्र " हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांचा व माझा ज्या ठिकाणीं विरोध नाहीं, त्या

ठिकाणीं मीं त्यांचाच आधार घेतला आहे. पण बापूंच्या उत्तर आयुष्यांतील भागाबाबत माझें बऱ्याच ठिकाणीं त्यांच्याशीं दुमत असल्यानें त्या ठिकाणीं मीं माझें म्हणणें मांडण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. हें चरित्र मीं श्री. कानेटकरांना 'वाट पुसत'च लिहिलें आहे. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत चरित्र लिहिण्याच्या कामीं कै. इतिहासभास्कर पां. गो. रानडे यांनीं मला जें प्रोत्साहन दिलें त्याचें मूल्य मापन शब्दानें करतां येणार नाहीं. हें पुस्तक लिहिण्याबाबत त्यांनीं अत्यंत आग्रह करून माझ्या मनाची तयारी केली. माझ्या व्यवसायांतून हें काम कसें पुरें होणार अशी शंका मला नाउमेद करीत होती. दररोज तगादा करून, लिहिण्याचें काम पुरें करण्यास त्यांनीं मला भाग पाडलें. त्यांच्या अशा प्रोत्साहनाच्या अभावीं माझ्याकडून हें चरित्र लिहिलें गेलें नसतें. कै. इतिहासभास्कर पां. गो. रानडे यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

कै. इतिहासभास्कर रानडे यांच्या मृत्यूनंतर "ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति" उघडी पडल्यासारखी वाटली. माझ्या पुस्तकाच्या हस्तलिखिताचें प्रकाशन कै. रानडे यांच्या हयातींतच झालें होतें, तरी तें छापण्याचें काम हातीं घेण्यासारखी समितीची आर्थिक स्थिती नव्हती. पण समितीच्या पुस्तकांची अत्यंत चिकाटीनें व परिश्रमानें विक्री करून कै. इतिहासभास्कर रानडे यांचे वडील बंधु श्री. का. गो. रानडे यांनीं पैसा उभारला व हें चरित्र छापून काढलें याबद्दल मी त्यांचे आभार मानावेत तितके थोडे आहेत. त्यांच्या मदतीविना या पुस्तकाची छपाई पार पडलीच नसती.

या पुस्तकाबाबत माझ्या अनेक मित्रांनीं वेळोवेळीं ज्या अमूल्य सूचना केल्या व हरतऱ्हेची मदत केली त्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांतल्या त्यांत श्री. स. रं. सुंठणकर व श्री. बा. रं. सुंठणकर यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागतो.

माझे मित्र श्री. मा. ना. कुलकर्णी यांनीं हस्तलिखित तपासणें, प्रुफें तपासणें, वगैरे अत्यंत किचकट पण महत्वाचीं कामें–जीं मला स्वतःला व्यवस्थितपणें करतां येत नाहींत–अत्यंत कळकळीनें केल्याबद्दल त्यांचे कोणत्या शब्दांत आभार मानावेत हें समजत नाहीं.

पुण्यांतील माझे मित्र श्री. य. रा. गुप्ते यांनीं मला या पुस्तकाच्या कामीं सर्व प्रकारें मदत केली. बापूंचें हस्ताक्षर मिळवून दिलें. बापूंची विहीर व बापूंचा झरा यांचे फोटो त्यांनीं घेतले. या पुस्तकांतील सर्व ब्लॉक्स त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं तयार करवून दिले. अशा हरतऱ्हेनें त्यांनीं अत्यंत कळकळीनें मला जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

गेल्या वर्षी पुण्यांत "सखारामबापू यांचें चरित्र" या विषयावर आहिताग्नि मंदिरांत माझें व्याख्यान झालें. या पुस्तका बाबतचे विचारच मीं त्या वेळीं पुणेकराच्या पुढें मांडलें होते. ही संधि मला मिळवून दिल्याबद्दल पुण्यांतील माझे सर्व स्नेही व आचार्य राजवाडे यांचा मी आभारी आहे.

या पुस्तकांतील सर्व ब्लॉक्स उत्कृष्ट असे तयार करून दिल्याबद्दल पुण्यांतील सुप्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. अगाशे यांचा मी आभारी आहे. तसेंच येथील "जयभारत मुद्रणालयाचे"

चालक श्री. फानविंदे यांनीं या पुस्तकाची सर्व छपाई बाइंडिग व बाह्य सजावट अत्यंत काळजीपूर्वक व सुबक रीतीनें वेळेवर करून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

बेळगांव येथील " चित्र मंदिर"चे चालक श्री. किशाबापू कुलकर्णी यांनीं आपलीं सर्व कामें बाजूस ठेऊन सखारामबापूचें तैल चित्र व मुखपृष्ठावरील सुंदर चित्र तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

सखारामबापूचें हस्ताक्षर या पुस्तकांत छापण्यासाठीं दिल्याबद्दल श्री. आबा चांदोरकर व सरदार बावडेकर या उभयतांचा मी फार ऋणी आहे.

या पुस्तकासाठीं प्रस्तावना लिहिण्याचें महत्वाचें काम माझे मित्र श्री. शंकरराव चव्हाण वकील पुणें यांनीं अत्यंत प्रेमळपणानें वेळांत वेळ काढून केलें. त्यांनाहि माझ्याप्रमाणेंच वकीली व्यवसायांतून सवड काढावी लागली. पण तशी सवड काढून प्रस्तावना लेखनाची ही कामगिरी त्यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन शक्य तितक्या लवकर करून दिली याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.


याशिवाय माझ्या इतर अनेक स्नेही मंडळींनीं मला या पुस्तकाच्या कामीं जी मदत केलेली आहे त्या सर्वांचे मी आभार मानतों. विस्मरणानें ज्यांचा नामनिर्देश राहिला असल्यास त्यांनीं मला क्षमा करावी.

बेळगांव ता. १५-८-१९५२. लिं. भी. नाईक.

---

सखारामबापू बोकील यांचें

## हस्ताक्षर



# -: अनुक्रमणिका :-

—::०::—


पृष्ठ

प्रकरण १ लें १

**बापूंचा त्रोटक पूर्व वृत्तांत—**

बापूंच्या जन्मकाळाचा निर्णय. २ बापूंचें बालपण व शिक्षण. ३ बापूंचा पेशवाईंत शिरकाव. ४ बापूंचा पेशवाईंतील दर्जा वाढला. ५ बापूंची मोहिमेंतील कामगिरी. ६ बापू पेशवाईचे कारभारी झाले. ७ बापूंच्या हातीं दिल्लीचें राजकारण आलें. ८ बापू व कुंभेरीचा वेढा. ९ शिंदे व होळकर यांचा बेबनाव. १० बापूंवरील आक्षेपास उत्तर व बापूंची बढती.

प्रकरण २ रें

**बापूंची अटकेपार कामगिरी—**

अबदल्लीची दिल्लीवर स्वारी. २ बापूंची बुंदेल खंडांतील कामगिरी. ३ बापूंची अंतर्वेदींतील कामगिरी. ४ मराठ्यांचा अटकेवर झेंडा. ५ बापूंवरील आक्षेप. ६ दोन्ही पत्रांची मीमांसा. ७ दादाचे पाय मागें ओढण्यांत नानासाहेबांचें स्वार्थी धोरण. ८ बापूंची पंजाबची निरवा-निरव. ९ नजीबाच्या उपेक्षेची जबाबदारी होळकर यांचेवर पडते. १० नजीबाच्या उपेक्षेची फलश्रुति. ११ दादाच्या अटकेच्या मोहिमेपर्यंत कर्ज कां झालें. १२ बापूंवरील आरोप व त्यास उत्तर. १३ कर्ज कां झालें याबद्दल नानासाहेबांची खात्री.

प्रकरण ३ रें १९

उरळीचा तह—

पानपत नंतरची परिस्थिति. २ पेशव्यांच्या घरांतील दुही. ३ निजामावर स्वारी. ४ उरळीच्या तहाची झडती. ५ बापूंवरील मत्सरी आरोप. ६ उरळीच्या तहाची छाननी.

प्रकरण ४ थें व ५ वें ३०

बापू आणि बेकीचा प्रश्न—

दुहीची प्रस्तावना. २ देशस्थ कोंकणस्थ वाद. ३ दुहीचें मूळ. ४ दुहीच्या उभारणीचें रहस्य. ५ कंपूवाल्यांनीं आपला कावा साधला. ६ गृहकलहाचा आद्य प्रवर्तक कोण. ७ दुहीचें बींज व बापूंची भूमिका. ८ घोडनदीच्या लढाईला कंपूवालेच जबाबदार. ९ घोडनदीच्या लढाईचें पर्यवसान. १० स्वार्थांध नानाकंपू. ११ निजामाशी युद्ध. १२ दादा व बापू स्वार्थी नव्हते. १३ नाना कंपूची पुनः उचल. १४ दादांनीं अर्धें राज्य मागितलें म्हणे. १५ नाना फडणीसांची महत्वाकांक्षा. १६ बापूंनीं तह घडवून आणला पण नानाकंपूनें तो मोडला. १७ दादा विश्वासघातानें कैद झाले. १८ दादांना कां कैद केलें. १९ बापूबद्दल माधवरावांना काय वाटत होतें. २० पेशवाईचें रक्षण करण्यास दादा व बापू हेच लायख होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. क. ५८४९३

प्रकरण ६ वें ६०

## नारायणरावाची कारकीर्द—

माधवरावांनीं दादा व बापू यांना विश्वस्त नेमिल्यामुळें कंपूवाल्यांना चीड. २ नारायणरावाची कारकीर्द कंपूवाल्यांना अधिक अनुकूल. ३ दादा व बापू यांना कारभार अडचणीचा होता. ४ दादाच्या मुलीचें लग्न व त्याचा नारायणरावावर झालेला परिणाम. ५ हैदरवरील स्वारीस नारायणरावाचा विरोध. ६ हैदरवरील मोहिम दादांना तहकूब करावी लागली. ७ दादांना कैद केलें हें धाडस नारायणरावाचें नव्हे. ८ दादाचा काय दोष होता. ९ दादांना पकडण्याच्या मागें कोण असावें. १० बापूंनीं दादांना कां सोडवलें नाहीं. ११ दादांचें नैतिक बळ नाहींसें करणें भाग होतें. १२ नारायणरावाचा पोरकटपणा. १३ कट व त्याचें पर्यवसान.

प्रकरण ७ वें

## कटाचें स्वरूप व परिणाम—

कटांत कोण कोण सामील होते. २ नारायणरावाच्या खुनाची रूढ हकीकत. ३ कट एकटच्या दादांनीं केला नाहीं. ४ कटांत नाना सामील होते नाहीं. ५ कट कां अस्तित्वांत आला. ६ कटाचा खरा हेतू. ७ नानांची भूमिका. ८ "ध" चा "मा" आनंदीबाईनें केला नाहीं. ९ सुमेरसिंगानें "ध" चा "मा" केला नाहीं. १० "ध" चा "मा" नानांनींच करविला. ११ नारायणरावाच्या

खुनाचा मुत्सद्यांवर भिन्नभिन्न परिणाम. १२ बापूंना दादाविरुद्ध नानांनीं बिथरविलें. १३ दादाची बाजू लंगडी पडली. १४ नारायणरावाच्या वधाचा दूरगामी परिणाम.

**प्रकरण ८ वें** ७९

**बारभाईचें कारस्थान—**

दादा व बापू यांच्या मैत्रीचा दुवा. २ बापू दादाविरुद्ध बिथरले. ३ पेंचांत धरून बापूंना बारभाईत खेंचलें. ४ बापूशिवाय बारभाईचें कारस्थान यशस्वी झालेंच नसतें. ५ दादाची मनःस्थिति. ६ बारभाईच्या कारस्थानाचा उगम. ७ दादापुढील राजकीय प्रश्नांची निवड. ८ दादाच्या सैन्यांतून मुत्सद्यांनीं पाय काढला. ९ गंगाबाईच्या नांवानें राज्यकारभार करण्याची मसलत. १० कारस्थानाच्या उगमाचा काळ. ११ पार्वतीबाईस मुत्सद्यांनीं आपल्या बाजूस वळवलें. १२ गंगाबाईची पुरंदरास रवानगी. १३ दादाला कारस्थानाचा पत्ता नव्हता. १४ दादाच्या लष्करांत फितूर. १५ नाइलाजानें दादानें हैदरशीं तह केला. १६ फितूरी लोकांना दादाकडून शासन. १७ बारभाईचें कारस्थान म्हणजे बंड होतें. १८ कारस्थानांत सामील होण्यांत बापूची अक्षम्य चूक. १९ नानांनीं हें कारस्थान अधिकारलालसेनें रचिलें. २० नानानें काय साधलें. २१ बारभाईच्या कारभाराची व्यवस्था. २२ बारभाई म्हणजे काय.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथ क्र. ३७१३८५

प्रकरण ९ वें ९५

**बापूचें नेतृत्व—**

बापूंनाच सर्वाधिकारी नेमिलें. २ दादाशीं प्रसंग फार बिकट होता. ३ पुरंदरचा बंदोबस्त. ४ निजाम बारभाईंना मिळाला. ५ बापूंनीं बरेच सरदार आपल्या बाजूस ओढले. ६ शिंद्यांचें मुत्सद्दी धोरण. ७ बापूंनीं आपला पक्ष बळकट केला. ८ बापूंनीं स्वतःच्या नांवें कर्जरोखे देऊन पैसा उभारला. ९ लोकांकडून कामें करून घेण्याची बापूची हातोटी. १० दादांचा मैदानावर पराभव करणें जरूर होतें. ११ दादांच्या साताऱ्यांतील कारस्थानाचा बंदोबस्त. १२ कासेगांवच्या लढाईत दादांचा विजय. १३ पराभवाची बातमी ऐकून नानांचे पाय गेले. १४ हरिपंत बाजू सावरतील असा बापूंना विश्वास १५ दादा पुण्यावर चाल करणार अशी कंडी. १६ दादाची समेटाची भाषा. १७ दादाच्या अटी मुत्सद्यांनीं कां फेटाळल्या. १८ मुत्सद्यांनीं लढाईचें शिंग कां फुंकलें. १९ पत्रव्यवहारावर नानांचें नियंत्रण. २० मुत्सद्दी व दादा यांच्या भांडणाला अटी-तटीचे स्वरूप आलें. २१ दादानें लढाई टाळून पळ काढला. २२ दादा होळकराकडे गेल्यामुळें मुत्सद्यांना धोका. २३ परिस्थितीचा पेंच. २४ महादाजीचें दुटप्पी संधान. २५ शिंद्यांच्या संधानाला दादा मान्यता देईना. २६ पुरंदरास समेटाचें पुनः बोलणें. २७ कारभारी फौजेंत दाखल झाले. २८ मुत्सद्यांच्या हातांतून दादा निसटला. २९ दादाच्या सैन्याची दाणादाण. ३० आनंदीबाईची

बापू व नाना यांना पत्रें. ३१ राघोबा इंग्रजाकडे जाण्यास नानाच जबाबदार. ३२ इकडे शत्रूंना फावलें.

प्रकरण १० वें ११३

**बापू आणि इंग्रज—**

साष्टीवर इंग्रजांचा १७६९ पासून डोळा. २ दादाच्या भांडणांत इंग्रजांना साधलें. ३ इंग्रजांशी तोंड देण्याचे बापूचे चतुराईचे मार्ग. ४ नानासाहेबांनीं आरमार नष्ट केलें होतें. ५ साष्टी गेल्यामुळें बापूंना फार वाईट वाटलें. ६ सुरतेचा तह. ७ बारभाई व इंग्रज यांची चकमक. ८ निजाम बिथरला. ९ दादाशीं तह करण्याचा बापूचा मानस. ९ इंग्रजांची बातमी काढण्याची बापूंची युक्ति. १० बापूंनीं कलकत्त्यास संधान बांधलें. ११ बापूचें हेस्टिंग्सला उत्तर. १२ पत्रांतून बापूची मुत्सद्दीगिरी स्पष्ट होते. १३ इंग्रजाबरोबर तहाच्या वाटाघाटी. १४ वाटाघाटी फिसकटल्या. १५ पुरंदरचा तह. १६ पुरंदरच्या तहाबाबत कानेटकरांचें मत. १७ पुरंदरचा तह मोडला. १८ इंग्रजांना बापूंचें सडेतोड उत्तर. १९ साष्टीबाबत बापूंचा पत्रव्यवहार. २० तोतयाशीं संधान दादांनीं बांधलें. २१ तोतया खरा कीं खोटा. २२ तहाच्या अटी पाळण्याबाबत इंग्रजांशीं घासाघीस. २३ बापूनें इंग्रजांना चकवलें. २४ बापूंचा सर्वत्र वचक. २५ बापूच्या आयुष्याचा उच्चांक.

प्रकरण ११ वें १२८

**नाना व बापू यांच्यामध्यें वैमनस्य—**

बापूचा मान व नानास वैषम्य. २ शिंदे म्हणजे नानाचा हुकमी एक्का. ३ बापूच्या अधिकारास नानानें गंगाबाईच्या कडून शह दिला. ४ शिंद्यांना मलिदा देऊन नानानें त्यास आपणाकडे वळवलें. ५ नानाबद्दल बापूला संशय. ६ नाना सर्वसत्ताधीश झाला तर. ७ बापूच्या विचाराचें चक्र फिरू लागलें. ८ बारभाईंत सामील होण्यांत आपली चूक झाली हें बापूंना पटलें. ९ आपल्या चुकीचा परिणाम बापूंनीं पाहिला. १० बापूनें आपल्या पापाचें परिमार्जन करण्याचें ठरविलें. ११ मोरोबाचें कारस्थान. १२ खोल विचाराअंतीं ही मसलत केली होती. १३ मोरोबाचें कारस्थान राष्ट्रहिताचें होतें. १४ कारस्थानाची सिद्धता. १५ नानाबद्दल दादाला पूर्ण अविश्वास होता. १६ मोरोबाचें इंग्रजांना आमंत्रण. १७ नानाचे मदतनीस या वेळीं फार दूर होते. १८ मोरोबानें पुणें हस्तगत केलें. १९ नाना व मोरोबाचा बापूंनीं तह घडवून आणला. २० दादा शिक्षा करतील या भीतीनें बापूंनीं समेट केला नाहीं. २१ समेट झाला तरी नानाची कारवाई सुरूच होती. २२ बापूंनीं नानाशीं सख्य जोडिलें. २३ कानेटकर व इतर इतिहासकारांनीं बापूवर असे आरोप कां केले ? २४ नानाची महाराष्ट्रांत स्तुति कां झाली ? २५ मोरोबाच्या कारस्थानांत बापू सामील झाले तें योग्यच होतें २६ कानेटकरांचे आरोप निराधार.

२७ नाना बऱ्याच लोकांना कारभारांत नको होता. २८ बापूंची पेशवाईची कळकळ २९ मोरोबाची कैद. ३० इंग्रजांशीं पुन: बेबनाव. ३१ इंग्रजांना बापूनें त्यांच्याच कृतीनें उत्तर दिलें. ३२ भोसल्यांना अनुकूल करून घेण्याचा इंग्रजांचा प्रयत्न. ३३ बापूनें इंग्रजांची समजूत घातली. ३४ इंग्रजांशीं लढाई. ३५ दादाला चीत करण्याची नानाची अजब युक्ति. दादाला ही मात्रा अचूक लागू पडली. ३७ दादा बारभाईचा पराभव करण्यास या वेळीं समर्थ होते. ३८ वडगांवचा तह.

प्रकरण १२ वें १५२

" बापूंचा शोचनीय शेवट "---

नानाची वक्र दृष्टि बापूवर फिरली. २ बापूंना कैद करण्यास लटकें कारण काढलें. ३ शिद्यांनीं बापूंना कैद केलें. ४ बापूंच्या कैदेमुळें निर्माण झालेली परिस्थिति. ५ बापूंच्या कैदेनंतर निर्माण झालेल्या स्थितीस जबाबदार कोण ? ६ बापूला कैद करण्यास दाखवलेलें कारण साफ खोटें. ७ फितूरीच्या चिठ्या बनावट असल्या पाहिजेत. ८ कैद झाल्या वेळची बापूंची मनोभूमिका. ९ बापूचा सरंजाम व सर्व मिळकत जप्त. १० तुरुंगांत बापूचे हाल. ११ श्री. कानेटकरांचें बापूच्या तुरुंगवासाबाबतचें विधान चुकीचें. १२ तुरुंगांतच बापूंचा अंत. १३ बापूंची योग्यता. १४ बापूंचा स्वभाव व खासगी आयुष्य. १५ बापूंचा खासगी कारभार. १६ नानांचा स्वभाव धर्म. १७ बापूंचा मनोधर्म. १८ बापूंची आत्महुति. १९ बापूंचा एकमेव दोष. २० राजकारण व भावनाप्रधानता.

---



**सखाराम भगवंत बोकील.**

पेशवाईतील स्वराज्यनिष्ठ मुत्सद्दी. राघोबादादांचे कट्टर अनुयायी पण नानांच्या जाळ्यांत अडकून नाश पावलेला थोर पुरुष.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८५८३
(मूळ प्रत)

॥ श्री ॥

पेशवाईतील स्वराज्यनिष्ठ मुत्सद्दी

# सखारामबापू बोकील

## प्रकरण १ लें

## बापूंचा त्रोटक पूर्व-वृत्तांत.

**बापूंच्या जन्मकाळाचा निर्णयः—**

पुण्यापासून सोळा सतरा मैलावर "कऱ्हे पाठार" नांवाचा भाग आहे. त्या भागांत सासवडपाशीं "हिवरें" नांवाचा गांव आहे. त्या गांवांतील "बोकील" घराण्यांत बापूंचा जन्म झाला, त्यांचा जन्म कोणत्या सालीं झाला याबद्दल कांहीं पुरावा उपलब्ध नाहीं. श्री देव यांच्या मतें बापूंचा जन्म इ. स. १७०६ सालीं झाला असावा असें आहे. रियासत-कारांनीं बापूंचा जन्म काळ सन् १७१६ असा दिला आहे. दोन्हींही मतें अनुमानावरच आधारलेलीं आहेत. याबावत श्री. देव यांचेंच मत ग्राह्य धरावें असें वाटतें. कारण पटवर्धनी कागदपत्रांतून बापूंना "वृद्ध" "कपि" अशीं नामाभिधानें वापरलेली आढळतात. त्यावरून पाहातां तत्कालीन मुत्सद्यांत बापू बरेच वडील असावेत असें दिसतें. म्हणून बापूंचा जन्म १७०६ सालीं झाला असावा असें वाटतें.

### २ बापूंचें बालपण व शिक्षणः— ★

हिवरें येथील बोकील घराणें खानदानी असून श्री शिवाजी महाराजांच्या वेळेपासून प्रसिद्ध होतें. श्री. पंताजी गोपीनाथ हे या घराण्यांतील प्रसिद्धीस आलेले पहिले गृहस्थ होत. पंताजी गोपीनाथ हे श्री शिवाजी महाराजांच्याकडे बऱ्याच मोठ्या हुद्यावर होते. बापूंचे वडील भगवंतराव हे थोरल्या बाजीराव साहेबांच्याकडे नोकरीस असावेत असें वाटतें. बापूंच्या बालपणाची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. ते पहिल्यांदा महादाजीपंत पुरंदऱ्यांच्याकडे शिलेदार होते असें दिसतें. ( भा. इ. स. त्रै. १९४९.८.८८ ) त्यानंतर १७३२ सालीं बाजीराव पेशव्यांनीं शनिवारवाडा बांधतांना बापूंना कारकून म्हणून ठेवून घेतलें. ( वाडकैफियत १६२ ) या बाबतींत खालील आख्यायिका प्रसिद्ध आहेः– बाजीरावांना पुरंदऱ्यांच्याकडे जेवणाचें आमंत्रण होतें. बाजीरावांना तिळाच्या चटणीची फार आवड असे. त्या दिवशीं जेवणांत तिळाची चटणी करणेचें विस्मरणानें राहून गेलें. जेवावयास बसतांच चटणी न केल्याबद्दल बाजीरावांनीं पृच्छा केली. पुरंदरे गडबडले ! बापूंनीं प्रसंगावधान राखून उत्तर दिलें कीं " आज रविवार असल्यानें तीळ, मधु, मांस इत्यादि वर्ज्य आहेत. म्हणून चटणी केली नाहीं." आणि लागलीच तसा शास्त्राधार म्हणून दाखवला. या हजरजबाबीपणाबद्दल बाजीराव खूष झाले व " हा माणूस मजला पाहिजे " असें महादाजीपंत पुरंदऱ्यांना सांगून त्यांनीं बापूंना आपलेकडे घेतलें.

### ३ बापूंचा पेशवाईंत शिरकावः— ★

बापूंचें लष्करी व कारकूनी शिक्षण श्रीमंत नानासाहेब, सदाशिवराव भाऊ व राघोबादादा यांच्या बरोबर झालें. सुमारें १७३५ मध्यें बापू कारकूनी सोडून सरदारी करूं लागले. बाजीरावाच्या कारकीर्दीच्या शेवटीं बापूंनीं त्यांच्या बरोबर स्वाऱ्यांत भाग घेतला होता. पुढें सन १७४१ सालीं नानासाहेबांच्या माळव्याच्या स्वारींत व उत्तरेंतल्या मोहिमेंत बापू होते. बापूंची नांव घेण्यासारखी, पहिली कामगिरी म्हणजे १७४७ मधील भाऊंची कर्नाटकांतील स्वारी होय. या स्वारींत भाऊ सेनापती व बापू त्यांचे कारभारी होते. भाऊ त्या वेळीं १६–१७ वर्षें वयाचे असल्यानें स्वारीचा सर्व

भार बापूंच्यावर पडला. या स्वारींत बापूंनीं सावनूरचा नबाब व निजामाचा मुलगा नासीरजंग यांचा पराभव केला व बहादूर बेंडयाचा किल्ला सर केला. या स्वारीच्या सर्व हालचाली बापूच पहात होते. या स्वारींतूत अलोट संपत्ति आणून बापूंनीं शाहूराजांचें कर्ज फेडलें. त्यामुळें बापूंवर शाहूराजे व नानासाहेब यांचा लोभ जडला व बापूंचा तनखा सालीना रु. २५०० करण्यांत आला.

**४ बापूंचा पेशवाईतील दर्जा वाढला :—** ★

सन १७४८ च्या नेवाईच्या स्वारींत बापू होते, या वेळीं दिल्लींतील वजीर मन्सूर अल्लीखान याजबरोबर मराठ्यांचें जें राजकारण झालें, त्यांतूनच मराठ्यांच्या उत्तरेच्या राजकारणास सुरवात झाली. या राजकारणांत बापूंचा महत्वाचा भाग होता. या स्वारींतून आल्यानंतर बापूंना पालखीचा मान मिळाला. व त्यांचा तनखा रु. ६००० झाला. या नंतर सदाशिवराव भाऊ कोल्हापुरास संभाजी राजे यांचेकडे जावयास निघाले. त्या वेळीं महादाजीपंतांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला व त्यांच्या जागीं बापूंची नेमणूक झाली. पण या बाबीमुळें, महादाजीपंत व बापू यांचे व नानासाहेबांचे संबंध जिव्हाळचाचे होण्याऐवजीं साशंकपणाचे झाले. पण पुढें इ. स. १७५१ मध्यें नानासाहेबांनीं बापूंना पुनः बोलावून घेतलें व त्यांना राघोबादादांच्या स्वारीचा कारभारी नेमून गुजराथेंत पाठवलें. या वेळेपासून राघोबादादांची व बापूंची गट्टी जमली ती बारभाईच्या कारस्थानापर्यंत टिकली.

**५ बापूंची मोहिमेंतील कामगिरी :—** ★

या वेळीं दिल्लीच्या दरबारांत आपापसांत फूट होऊन सर्वत्र नादानपणा पसरला होता. त्यामुळें परचक्रापासून प्रजेचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य दिल्ली दरबारांत राहिलें नव्हतें. उलट आपसांतींतील तंट्यांत दुसऱ्यांची मदत घेऊन प्रजेला लुबाडावयाचें, असा क्रम तेथें सुरू होता. या संधीचा फायदा घेऊन मराठ्यांनीं आपला हात दिल्लीच्या राजकारणांत पसरावयाचा असें ठरविलें व त्यास अनुसरून मराठ्यांनीं सफदर जंगास मदत दिली, व बुंदेलखंड काबीज करून दुआबकडे आपला मोर्चा वळवला. फरूकाबाद

येथें रोहिल्यांचा पराभव करून दिल्लीकडे चढाई केली. त्यामुळें बादशहाचें धाबें दणाणलें व त्यानें मराठ्यांशीं तह केला. या तहाला " अहमदनामा " म्हणतात. या तहामुळें राजपुताना, पंजाब, माळवा व रोहिलखंड या प्रांतांची सनद मराठ्यांना मिळाली व बादशाहीचे तिच्या सर्व शत्रूंपासून रक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांनीं घेतली. त्यामुळें स्वाभाविकपणेंच उत्तरेकडे फार मोठा फौजफांटा ठेवणें पेशव्यांना भाग पडलें आणि याच अहमदनाम्यामुळें पुढें मराठ्यांवर पानिपतचे अरिष्ट कोसळलें.

### ६ बापू पेशवाईचे कारभारी झाले:—

★

शाहूच्या मृत्यूनंतर दमाजी गायकवाड पेशव्यांना मानीनासा झाला. त्याचा बंदोबस्त करून गुजराथेंत आपला वचक बसवण्यासाठीं, पेशव्यांनीं राघोबादादास सैन्यानिशीं पाठविलें. या मोहिमेंत बापू त्यांचे कारभारी होते. राघोबानें गायकवाडांचें देणें घेणें मिटवले व गायकवाडानें जरूर असेल तेव्हां पेशव्यास १०००० फौज द्यावी व पेशव्यांनीं अहमदाबाद जिंकून गायकवाडास द्यावें असें ठरलें. याप्रमाणें गायकवाडाचा वंदोबस्त केला या स्वारींत नानासाहेबांनीं मुद्दामच कारभारी म्हणून बापूंची निवड केली होती. दक्षिणेकडील मोहीम त्यांनीं उत्तम प्रकारें पार पाडली, म्हणून या हुषार व अनुभवी माणसाची निवड या मोहिमेंतहि करण्यांत आली होती. गायकवाडासह बापू–राघोबांनीं अहमदाबादच्या किल्याला वेढा दिला व मार्च १७५३ मध्यें तो सर केला. किल्यावर श्रीपत बापूची नेमणूक करून, किल्यांतील शिबंदीच्या खर्चासाठीं म्हणून गायकवाडाकडून सहा लक्ष रुपये घेतले.

### ७ बापूंच्या हातीं दिल्लीचें राजकारण आलें:—

★

यावेळीं पेशव्यांचा उत्तरेकडील सरदार अंताजी माणकेश्वर यानें अजमीर, अकबराबाद व २२ सुभे यांचा वसूल घेण्याच्या अटीवर बादशहास अहमदशाहा अबदालीच्या विरुद्ध मदत करण्याचें वचन दिलें. त्यामुळें बापू व राघोबा यांना उत्तर हिंदुस्थानांत जाण्याबद्दल पेशव्यांकडून लिहून आले. त्या प्रमाणें सर्व मराठी फौज जयनगरास आली व बापू आणि चंद्रचूड यांची, अंताजी माणकेश्वरास मदत करण्यासाठीं, दोआबकडे रवानगी

झाली. बापूंनीं अंतरवेदींत शिरून सुमारें २०० ठाणीं काबीज केलीं व बुंदेल खंडातून रोहिल्यांना हांकून देण्याचा निश्चय करून त्यांनीं रोहिल्यांच्या फौजेवर अचानक हल्ला चढवला व त्याचा पराभव केला. या नंतर बापूंची फौज दिल्लीवर चालून गेली. त्यांनी बादशाहा अहंमदशाहाचा पराभव केला त्याला पदच्युत करून अजीजुद्दीनला पातशाहा म्हणून गादीवर बसविलें. ८२ लक्ष रुपये देणेच्या करारावर गाजीउद्दीनच्या मुलास वजीरी दिली.

## ८ बापू व कुंभेरीचा वेढा:— ★

कुंभेरीच्या जाटाचें पारिपत्य करण्याची बादशाहानें पेशव्यांना विनंती केली. त्या प्रमाणें राघोबा व होळकर यांनीं कुंभेरीस वेढा दिला. पण कुंभेरीचा किल्ला मजबूत असल्यानें मराठ्यांचा इलाज चालेना. लढ्यांत मल्हाराव होळकर यांचा मुलगा गोळी लागून मरण पावला. या संतापानें मल्हाररावानें किल्ला जमीनदोस्त करण्याची प्रतिज्ञा केली. जाट घाबरला पण त्यानें जयाप्पा शिंद्याशीं संधान बांधलें. या काव्यानें मल्हारराव अधिक चिडला, व त्यानें राघोबांस याबद्दल विचारलें. राघोबाला पेंच पडला. होळकर व शिंदे हीं दोनही बडीं धेंडें! त्यांना दुखवतां येत नव्हतें. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी राघोबादादांनीं बापूंना बोलवून घेतले. बादशहा पेशव्यांच्या मदतीला यावयाचा होता. पण त्यानें जाटालाच मदत केली. या सर्व अडचणीच्या परिस्थितीचा विचार करून बापूंनीं राघोबा दादाला सल्ला दिला. " शिंदे व होळकर सारख्याच योग्यतेचे. त्यांच्या म्हणण्याला श्रीमंतांनी सारखाच मान दिला पाहिजे. पुत्रशोकामुळें मल्हाररावांना प्रसंगाचें महत्व दिसत नाहीं. या वेळीं जाटाशीं तह करणेंच योग्य. " हा सल्ला सर्वांना पटला. होळकरांनाही विचाराअंतीं हें पटलें व जाटाशीं समेट झाला. नंतर होळकर पातशाहावर चालून गेले व त्यांनीं त्याची फौज उधळून लावली.

## ९ शिंदे व होळकर यांचा बेबनाव:— ★

या प्रकरणापासून शिंदे-होळकर पेशव्यांना कितपत मानीत होते हें निदर्शनाला आलें. खुद्द पेशवे किल्ल्याला वेढा देऊन बसलेले असतांना पेशव्यांच्याच एका सरदारानें शत्रूला पाठीशी घालावे हा बेइमानीपणा होता.

पण शिंद्याला मुठीत ठेवण्याची बापू व राघोबा यांच्यांत ताकद नव्हती असेंच म्हणावें लागतें. याचा अर्थ शिंद्याची रग जिरवण्याचें सामर्थ्य त्यांचे अंगी नव्हतें असें नाहीं. मालक या नात्यानें पेशव्यांची जी जबर शिंदे यांचेवर असावयास पाहिजे होती ती नव्हती एवढेंच. या प्रसंगानें शिंदे व होळकर यांचें मनोमन कायमचे तुटलें. याचा परिणाम असा झाला कीं मराठ्यांचें उत्तरे कडील सामर्थ्य सुसंघटित न राहतां स्वार्थ परायण बनलें. शिंदे एका बाजूस गेले कीं होळकरांनीं दुसऱ्या बाजूस जावें किंवा शिंदे मनःपूर्वक एखाद्या मनसब्यांत भाग घेऊं लागले कीं होळकरांनीं अंग चोरावें असा प्रकार सुरू झाला.

**१० बापूवरील आक्षेपकांस उत्तर व बापूंची बढती:—** ★

कुंभेरीचें काम संपल्यावर बापू व राघोबा दिल्लीस आले, व नंतर दक्षिणेंत परतले. याबाबत श्री. कानेटकर म्हणतात कीं बापूंनीं जिकलेल्या प्रांताची अगर दिल्लीची व्यवस्था नीट न लावतां सर्व कामें अर्धवट टाकून दक्षिणेंत प्रयाण केलें हीं त्यांची चूक झाली. ते म्हणतात " नानासाहेब हे लांब होते. त्यांना दूरवरच्या अडचणी समजणें शक्य नव्हतें. बापूंनीं त्याचा विचार करून सर्व स्थिरस्थावर झाल्यानंतरच आपण येतो, नाहींतर परिस्थिति बिघडेल याची स्पष्ट कल्पना नानासाहेबांस द्यावयास पाहिजे होती." हा आक्षेप आम्हांला बरोबर आहेसें वाटत नाहीं. कारण बापू अगर राघोबा दोघेहि हुकुमाचे बंदे होते. नानासाहेबांनीं परतण्याचा हुकूम सोडला तर तो त्यांना पाळणें भाग होते. बापूंनीं त्यावेळची प्रत्यक्ष परिस्थिति नानासाहेबांना कळविलीही असेल, नाहीं असें म्हणतां येणार नाहीं; आणि तरीही नानासाहेबांनीं बापूंना परत येण्याचा हुकूम दिला असेल. नानासाहेबांचें स्वाऱ्यांचें धोरण एवढेंच दिसतें कीं स्वाऱ्या करून पैसा मुबलक आणावा. जिंकलेल्या प्रांतावर आपलें वर्चस्व बसवण्याला त्याच्या कारकीर्दींत सर्वत्र गौणत्व दिलेलें दिसतें. बापूंच्या प्रस्तुतच्या स्वारीनंतर दुसऱ्या स्वारींत त्यांनीं अटकेवर झेंडा लावला. हिंदुस्थानाबाहेर मराठ्यांचें राज्य पसरण्याची उमेद राघोबानें पत्रानें नानासाहेबांस कळविली. पण नानासाहेबांनीं याला उत्तर काय दिलें ? बापू व राघोबांना ताबडतोब

सैन्यानिशीं परत बोलावलें ! याबाबत अत्यंत दुःखानें दादानें नानासाहेबांस पत्र लिहिलें आणि त्यांत जिंकलेल्या प्रांतांची सर्व व्यवस्था अर्धवट राहतें असें कळवले आहे. या दोन्हीही प्रसंगीं बापूंना परत बोलावण्याची कांहीं गरज होती असें दिसत नाहीं. बापूना सर्व कामें अर्धवट टाकून परत बोलावणें हा नानासाहेबांचा अदूरदर्शीपणा होता. त्यांत बापूंची कांहींच चूक नव्हती. या स्वारींतील बापूंच्या कामगिरीवर नानासाहेब खूष होते. त्यांनीं बापूंचा तनखा सालीना रुपये १९००० केला, व चार गांवें त्याना इनाम दिलीं. श्री. कानेटकर म्हणतात त्याप्रमाणें बापूंची चूक झाली असती तर नानासाहेबांनीं हीं इनामे त्यांना दिलीं नसती. यावरून एकच गोष्ट सिद्ध होतें कीं बापू केवळ नानासाहेबांनीं परत बोलावलें म्हणूनच कामें अर्धवट सोडून परत आले. आणि त्याचे जे कांहीं दुष्परिणाम झाले त्याची जबाबदारीं नानासाहेबांच्यावर पडते.

---

## प्रकरण २ रें.

# बापूंची अटकेपार कामगिरी.

**अबदल्लीची दिल्लीवर स्वारी:—** ★

दिल्लींत मराठ्यांचें बस्तान ठीक बसणें नजीब खानासारख्या पाताळ यंत्री माणसाला रुचणें शक्य नव्हतें. त्यानें मराठयांना दिल्लीतून हांकून लावण्यासाठीं अबदल्लीला पाचारण केलें. शिंद्यांनीं मारवाडांत हस्तक्षेप केल्यामुळें माधोसिंग मराठयांच्यावर उलटला होता. पाचारणा प्रमाणें अबदल्ली आला. त्यानें पंजाब घेतला. दिल्ली व मथुरा हीं शहरें घेतलीं व दोन्ही ठिकाणीं मोठ्या कत्तली केल्या. मराठ्याचें उत्तरेंत सैन्य होतें पण त्याचा अबदल्लीपुढें निभाव लागला नाहीं. अंताजी माणकेश्वरानें खूप

शिकस्तीनें अबदल्लीला तोंड देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचाही निभाव लागला नाही. अबदल्लीनें आपला मुलगा तैमूरशहा याला पंजावचा सुभेदार नेमिलें. गाजीउद्दीन पुनः वजीर झाला. नजीबाला बक्षीगिरी मिळाली; ही वार्ता पुण्यास येतांच अबदल्लीचा मोड करण्याचे पेशव्यांनीं ठरवलें. व त्या कामगिरीवर राघोबाची नेमणूक झाली. बापू त्यांचे कारभारी झाले. राघोबानें जयनगरला तळ दिला, व सरदारांच्या फौजा येईतोंपर्यंत कांही काळ वाट पाहिली. मराठ्यांचें सैन्य येत असल्याचें पाहून अबदल्लीनें काढता पाय घेतला. या बाबत श्री. कानेटकरांनीं "अबदल्लीशीं लगट न करण्याचें धोरण जाणूनबुजून स्वीकारलें होतें कीं काय असा संशय येतो" असें सखाराम बापू चरित्रांत म्हटलें आहे. या बाबत बापूंनीं खुलासा आपल्या पत्रांत केला आहे कीं, "आमच्या जवळ फौजफांटा पुरेसा नसल्यामुळें आस्ते आस्ते कूच करीत आहो" ( पे. द. २१-२७ ) भरपूर सैन्य नव्हतें म्हणून पेशवे आस्ते चालले होते. पेशवे येत आहेत हें पाहूनच अबदल्ली पळाला. पेशव्यांच्या संघटित सैन्यास तोंड देण्याची अबदल्लीची तयारी नव्हती व अपुऱ्या सैन्यानिशीं अबदल्लीवर चाल करण्याचा आतताईपणा करण्याची बापू व राघोबा यांना इच्छा नव्हती हाच त्याचा मतितार्थ दिसतो.

**२ बापूंची बुंदेल खंडांतील कामगिरी:—**

★

जयनगरहून गंगाधर यशवंत वगैरे २५००० फौजेसह बापू अंतर्वेदीत आले. त्यांनीं दातिया व मेडते हीं सर केली व पाहाडसिंग बुंदेल्याच्या मुलखांत ते शिरले. या वेळीं पाहाडसिंग, गुमानसिंग व खुमानसिंग यांच्यामध्यें गादीबद्दल तंटा सुरू होता. जगतरायानंतर पाहाडसिंगानें गादी बळकावली होती. त्याला बापूंनीं आपण व त्याच्या राज्यांतील चार मोठे जें सांगतील तें ऐकावें असा निरोप पाठवला. पण त्यानें दाद दिली नाहीं. बापूनीं त्याचा सर्व मुलूख जप्त केला. बापूंना आज्ञा होती कीं "नजराण्याचा ऐवज मातबर ठरोन ये आणि साहस न लागता सरकार काम होऊन ये ऐसें धोरण असावें." यास अनुसरून जेवढा पैसा मिळवता आला तेवढा बापूनीं मिळवला. या स्वारींत त्रिंबकराव मामाहि होते. मामा नेहमीं पटवर्धनांच्या बाजूचे असत. बापू व पटवर्धन यांचें बरें नसे. या स्वारींत राघोबाच्या

आज्ञेविरुद्ध बापूंनीं एकाचा पक्ष धरला, अशी तक्रार राघोबाकडे गेली. त्याला उत्तर म्हणून बापूंनीं कळवलें कीं "मालकाच्या आज्ञेविरुद्ध मी कधींही वर्तन करणार नाहीं. शब्दावर विश्वास ठेवूं नये." बापूंच्या उत्तरानें राघोबाचें समाधान झालें. अर्थात ही तक्रार त्रिंबकरावांनींच केली असावी असें स्पष्ट होतें; आणि ती खोटी होती हेंहि सिद्ध होतें.

### ३ बापूंची अंतर्वेदींतील कामगिरी:-- ★

बुंदेल खंडांतील इतर राजांच्या कडून खंडणी वसूल करीत करीत बापूंनी अंतर्वेदींत प्रवेश केला. यावेळीं तेथील परिस्थिति फारच कठिण होती. मराठ्यांचा अंमल बहुतेक सर्व ठिकाणचा उठला होता. वजीरांचें ठाणें फरूकाबादेस होतें व रोहिल्यांशीं त्यानें संधान बांधलें होतें. अयोध्येचा वजीर सुजाउद्दवला हाही फौजबंद होता. मराठ्यांनीं प्रवेश करतांच रोहिल्यांनीं त्यांची ठाणीं रिकामीं केलीं. मराठ्यांचा अंमल सुरू झाला पण रोहिल्यांचा अद्याप पराभव व्हावयाचा होता. सुजाचें व रोहिल्यांचें जरी वांकडें होतें तरी मराठ्याविरुद्ध एक होण्याचीं त्यांचीं कारस्थानें सुरू होतीं. वजीराचा गंभीरा नदीजवळ तळ होता व सुजाचें ठाणें कासावेसंदी येथें होतें. या दोन्ही ठिकाणांत फक्त आठ मैल अंतर होतें. रोहिल्यांचें सैन्य फरूकाबादेस होतें. वजीर व रोहिल्यांचा मिलाफ झाल्यास त्याचा पराभव करणें कठिण होतें. मराठ्यांचें सैन्य या तीन्ही सैन्यांच्या कोंडींत अडकलेलें होतें. सुजा व रोहिले यांचें जरी वांकडें होतें तरी सुजा कपटी असल्यानें त्याचा व रोहिले यांचा केव्हां मिलाफ होईल याचा नेम नव्हता. बापूंना यापैकीं कोणाचाच विश्वास नव्हता. बापूंनीं सुजा व वजीर या दोघांसहि, समेटाचें बोलणें सुरू ठेवून, वाटाघाटींत गुंतवून ठेविलें. नारोशंकर याचेकडे मोठी फौज देऊन, त्याला रोहिल्यांवर पाठविलें; आणि आपण व गंगाधर यशवंत यांनीं सिकंदराबादपाशीं वजीराचा दिल्लीला जाण्याचा मार्ग रोखून धरला. नारोशंकरानें रोहिल्यांचा पराभव करून त्यांना गंगापार हांकून दिलें. अशा परिस्थितींत मराठ्यांशीं सख्य करणें आतां आपल्याला सोयीचें वाटल्यानें त्यानें अबद्दलीच्या सैन्याला हांकून लाविलें. त्यामुळें रोहिल्यांनींही तात्पुरता तह केला. अशा

तऱ्हेनें बापूंनीं सर्वांना झुलवून यश मिळवलें. परिस्थिति गंभीर असतांना आपण समर्थ होईपर्यंत नरमपणा धारण करून त्यांनीं युक्तीनें परिस्थिति अनुकुल करून घेतली व आबांत यश संपादन केलें. हें यश केवळ त्यांच्या मुत्सद्देगिरीचेंच फल होतें.

४ मराठ्यांचा अटकेवर झेंडा:— ★

विठ्ठल शिवदेव यानें दिल्ली काबीज करून नजीबखानास पकडलें. राघोबानें अलमशाहास गादीवर बसवलें आणि गाजीउद्दीनास त्याचा वजीर नेमिलें. नंतर बापूही दिल्लीस आले. आतां अबदल्लीचें सैन्य व त्याचे साथीदार यांचा मोड करावयाचा होता, व नानासाहेबांच्या पत्राप्रमाणें नजीबाला नाहींसा करणें, जाटाशीं मैत्री करणें, बंगालांतून चौथाई वसूल करणें, वगैरे कामें राघोबा व बापूंना करावयाचीं होतीं. बापू नजीबखानाला नाहींसा करणार होते. पण मल्हारराव होळकर यांनीं मध्यस्ती करून त्याला वाचविलें. पण नजीबाच्या इतर गोड बोलण्याला कांहींच दाद न देतां वजीराच्या सांगण्यावरून अबद्लीच्या लोकांना हांकून लावण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें. मराठे आपल्यावर येत आहेत असें पाहून अबद्लीचा मुलगा जीव घेऊन पळून गेला. पण दुराणी सरदार लढाईला सज्ज झाले. बापू व दादा यांनीं त्यांचा सरहिंद येथें पराभव केला व लाहोर शहरांत मोठ्या थाटानें प्रवेश केला व दुराण्यांचा अटकेपर्यंत पाठलाग करून त्यांना अटकेपार हांकून लावलें. भिमथडीचीं तट्टें अटकेचें पाणी प्यालीं. यावेळीं मराठी राज्याचा कळस झाला. मराठ्यांचें अधिराज्य झालें होतें. पंजाब प्रांत मराठ्यांनीं घेतल्यामुळें अबदल्लीनें आपला वकील पाठवून मराठ्यांशीं सलोखा करण्याचा प्रयत्न केला. इराणच्या राजघराण्यांतील एका मनुष्यानें अबदल्लीविरुध्द आपल्याला साहाय्य करावें म्हणून राघोबाकडे आपला वकील पाठवला. या व्यक्तीच्या भेटीस " पालखींत बसून यावें " असे बापूंनीं राघोबास कळवलें. " इराणचा मनुष्य आपलेकडे आला ही गोष्ट फार महत्वाची आहे " असें राघोबानें एका पत्रांत कळवलें आहे.

५ बापूवरील आक्षेपः— ★

बापूंच्या या मोहिमेबद्दल इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात "पंजाबवर स्वारी करण्याच्या कामीं बापूनें घिसाडघाई केली. व त्यामुळें पानिपतचा प्रसंग मराठ्यांवर आला." हें विधान चुकीचें असल्याचें खालील गोष्टी विचारांत घेतल्यास स्पष्ट दिसण्यासारखें आहे. राघोबाच्या पत्रांतून त्यावेळची परिस्थिति समजण्यासारखी आहे. राघोबा म्हणतो " लाहोर, सुलतान, काश्मीर वगैरे अटकेकडील सुभ्यांचा बंदोबस्त करून अंमल बसवावा, त्यास कांहीं जाला, कांहीं होणें तोही लवकर करतों. तैमूर सुलतान व जाहानखान यांचा पाठलाग करून फौज लुटून घेतली. थोडीशी झडत पडत अटकेपार पिशावरास ते पोचले. अब्दाली इराणावर चालून गेला. त्याची फौज इराणच्या पातशहानें लुटून घेतली. अब्दल्ली कंदहारास आला. इराण्याची फौज पाठलाग करीत आली आहे. या प्रांतीचे सरदार व जमीनदार अब्दालीचे जबरदस्तीमुळें त्यास रुजू होते. हल्लीं रफीक होऊन सेवा करून दाखवूं, अब्दालीस तंबी करूं. अैशा त्यांच्या अर्ज्या आल्या आहेत. अब्दालीचा धर सुटला आहे. तिकडून इराणच्या शाहानें जेर दस्त केलें. इकडून जोरा पोचवून सरकारचा अंमल अटकेपार करावा. त्याचा पुतण्या व दौलतीचा वारस स्वामी पाशीं देशास आला तो स्वामीनीं आम्हांकडे पाठवला होता. त्यास अलीकडे थोडी बसावयास जागा देऊन अटकेपार काबूल पेशावरचा सुभा देअं. अब्दालीच्या फौजेवर अबदुल समदखान सर-हिंदेंत होता. तो सरकारांत पाडाव आहे. तो व आणखी या प्रांतीचे फौज, इराणी, मोंगल देऊन मशार निल्हेची ( इराणच्या दौलतीचा वारस ) रवानगी करतो. हें तिकडील पैरवी करतील, स्वामीचे पुण्य प्रतापें अब्दालीस जोरा पोचवून तंबी करतील. पारिपत्य उत्तम प्रकारें करून अटकेपार अंमल बसवतील. लाहोर प्रांतीं रेणको अंताजी व रायाजी सखदेव ऐसे ठेविले. तेहि राहतील." " यानंतरचे दुसरे पत्री राघोबा लिहितोः— " इराणच्या पातशाहाचे स्वदस्तुरचे कागदही आम्हांस व मल्हारबास आले होते कीं लौकर कंदहारेस यावें आणि याचें परिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आम्हीं तरी काबूलचा सुभा अब्दुल रहीमखान स्वामीनीं

पाठवला त्यास देतो. फौज वगैरे साहित्यहि करतो. काबूल व कंदहार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून अलमगीरपर्यंत होते. ते आम्ही विलायतेस कां द्यावें ? यास्तव तूर्त येथें सुभे देतों. इराणच्या शाहास या सुभ्यांची दरकार नसेल. तो इराणचा अंमल करील. आम्ही कंदहार पर्यंत अंमल बसवून तूर्त त्यास गोडच जाब पाठवणार आहों. जंबू, काश्मीर वगैरे तमाम वकील आले आहेत. मामलत थोडी बहुत अटके अलीकडील करीत आहों. पलीकडील तूर्त होत नाहीं. खटपट मात्र होईल. तूर्त तांतडीमुळें जें होईल तें करतों. तूर्त माघारें फिरणेचा डौल स्वामीचे आज्ञेवरून धरिला आहे. याजमुळें जे होतें तेंच करतों. तटी लावीत नाहीं. यदांतर सारी शिबंदी खालीच राहील. शिबंदी वारतांच कठिण होईल. दोन वर्षांनीं कांहीं सोईस लागेल. स्वामीस कळावें. "

**६ दोन्ही पत्रांची मीमांसा:—** ★

या पत्रांवरून खालील गोष्टी करण्याचा राघोबाचा मानस होता असें दिसतें. (१) इराणच्या राजकारणांत हात घालून अब्दल्लीला नेस्त नाबूत करावा. (२) कंदहार व अटकेपारचे सुभे हिंदुस्थानला जोडावेत. (३) अब्दल्लीचा पुतण्या व राज्याचा वारस यास पेशव्यांचा सुभेदार म्हणून या प्रांतावर नेमावें (४) अब्दल्लीचा पुरा मोड केल्यानंतर पंजाब वगैरे ठिकाणीं आपला अंमल व्यवस्थितपणें बसवावा. वरील पत्रांवरूनन हेंहि सिद्ध होतें कीं नानासाहेबांनीं तांतडीनें बोलावल्यावरून राघोबादादा व बापू यांना सर्व कामें अर्धवट टाकून मागें परतावें लागलें. राघोबादादा दुःखानें लिहितात " सर्व शिबंदी खालीच जाईल. शिबंदी वारतांच कठिण पडेल " याचा असा अर्थ आहे कीं सर्व तयारी वांया जाणार, उभारलेलें सैन्य सोडावें लागणार, सैन्य सोडल्यास जड जाणार आणि ही तयारी वांया गेल्यास दोन वर्षें सोईस लागणार नाही ! सर्व बाजूंनीं जय मिळत असतां, हिंदुस्थानचें राज्य कंदहारपर्यंत पोंचण्याची उत्तम संधि आली असतां, मरठ्यांचा शत्रू अब्दल्ली याला त्याच्याच प्रांतांत घुसून नामोहरम करून टाकण्याचा व मराठ्यांचा हिंदुस्थानांतील मार्ग निष्कंटक करण्याचा समय आला असतां दादा व बापू यांना नानासाहेबांनीं

सं. नं. ८५९३



परत बोलाविलें, त्यामुळें त्यांचें सर्व कार्य अर्धे राहिलें. हिंदवी राज्याची हद्द कंदहारपर्यंत नेण्याची त्यांची महत्वाकांक्षा जागच्या जागीं जिरली. ही निराशा त्या पत्रांत स्पष्ट दिसते. नानासाहेबांनीं दादाला परत बोलावलें हें स्पष्ट दिसतें. यामुळें कंदाहारपर्यंत भरारी मारण्याची धमक दाखवणाऱ्या राघोभरारीचे पंख नानासाहेबांनीं तोडले व हिंदुस्थानचें साम्राज्य पसरवण्याची चालून आलेली संधि कायमची दवडली! अबदल्लीला जिवंत राहायला वाव देऊन आपल्या हातांनीं मराठ्यांसाठीं पानपतची चिता तयार करून ठेविली!

७ दादाचे पाय मागें ओढण्यांत नानासाहेबांचें स्वार्थी धोरण:— ★

राघोबाच्या पत्राप्रमाणें वस्तुस्थिति नव्हती अगर कंदहारपर्यंत जाण्याचा दम मराठी सैन्यांत नव्हता असें कोणाही इतिहासकाराचें म्हणणें नाहीं. तसेंच दक्षिणेंत मराठेशाहीवर त्यावेळीं एकादें संकट आलें होतें आणि तें उत्तरेकडील सर्व सैन्य परत आणल्याखेरीज निवारतां येण्यासारखें नव्हतें असेंहि नाहीं. उत्तरेंतील राजकारण दादा व बापू नानासाहेबांना वरचेवर विचारूनच ठरवीत होते. असें असतांना नानासाहेबांनीं राघोबा व बापू यांना निकडीनें कां बोलावलें असावें याचा विचार करणें प्राप्त आहे. याबाबतींत कागदपत्र कांहीं उपलब्ध नसलेनें अनुमान बांधणें भाग आहे. यावेळीं राघोबाचा डंका हिंदुस्थानभर वाजत होता. सखारामबापू सारखा सव्यसाची मुत्सद्दी त्याचा कारभारी होता. बापू व राघोबा यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. नानासाहेबांनीं स्वतः कारस्थान करून छत्रपतीला पोटगीदार बनवलें होतें. त्यामुळें आपले सरदारहि आपल्याविरुद्ध कारस्थानें करतील अशी शंका त्यांच्या मनांत असणें स्वाभाविक होतें. त्यांच्या पत्नी गोपिकाबाई या कारस्थानी व मत्सरी होत्या. सदाशिवराव भाऊंना कारभारांत घेण्यास त्यांचा विरोध झाला होता. दिराचा नांवलौकिक त्यांना पसंत नव्हता. मल्हारराव होळकर यांना "पेशवे आतां काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत अधिराज्य करतील" अशी धास्ती वाटत होती. पुढें दत्ताजीराव शिंद्यांना त्यांनीं ही धास्ती बोलूनही दाखवली होती व नजीबखानाला जीवदान देवविलें होतें. तात्पर्य होळकर यांना पेशव्यांच्या बद्दल अनास्था

व धास्ती वाटत होती असें स्पष्ट दिसतें. मल्हारराव होळकरांनीं नानासाहेबांना असें कळवलें असण्याचा संभव आहे कीं दादा–बापू यांना इतक्या शिबंदीनिशीं पंजाबांत ठेवलें तर ते कदाचित स्वतंत्र होतील आणि नानासाहेबांना भारी होतील. याच ठशाचा सल्ला गोपिकाबाईंनींही दिला असण्याचा संभव आहे. पानिपतच्या वेळीं अशा प्रकारची शंका त्यांनीं भाऊसाहेबाबद्दल व्यक्त केली होती व म्हणून विश्वासरावांना स्वारीवर पाठवलें गेलें होतें. अशा प्रकारें कोणाकडूनहि नानासाहेबांना सल्ला दिला गेला असेल तर त्यांच्या संशयी मनाला तो पटणें स्वाभाविक होतें. राघोबाच्या मनांत तसें आलें असतें तर स्वतंत्र राज्य स्थापणें शक्य आहे असें मानण्यासारखी परिस्थिति होती. अशा प्रकारची शंका नानासाहेबांना वाटली असावी म्हणून त्यांनीं दादा व बापू यांना मागें खेचलें असावें. याशिवाय दुसरें सयुक्तिक अनुमान या बाबतींत निघूं शकत नाहीं.

### ८ बापूंची पंजाबची निरवानिरव :— ★

पंजाबची व्यवस्था जेवढी लावणें शक्य होतें तेवढी लावली. जयनगरकडे असलेल्या जनकोजी शिंदे यास दिल्लीस जाऊन आधीं नजीबखानाची वाट लावण्यास तांतडीचें पत्र पाठवलें. त्यांत राघोबा लिहितो "करोड रुपये शिबंदी वाढली तरी पुरवेल. एवढी जोड आम्हांस द्यावी. आम्हींच पारिपत्य केलें असतें. परंतू मल्हाररावांनीं धर्मपुत्र म्हणून अगत्य धरून आपले तर्फेनें अंतर्वेद प्रांत कुरुक्षेत्रापासून कुंजपुरा देखील चोवीस लाखांची मामलत त्याचे स्वधीन केली. माधवसिंग जयनगरकर, विजेसिंग मारवाडी वगैरे बहुत धर्मपुत्र मल्हारबास आहेत. या धर्मपुत्रांचा फलादेशहि भोगीत आले." अशा प्रकारें नजीबखानाचा शेवट करण्याविषयीं कळकळीचा निरोप शिंद्याना देऊन दादा व बापू परत दक्षिणेस आले.

### ९ नजीबाच्या उपेक्षेची जबाबदारी होळकर यांवेवर पडते:— ★

बापूंच्या व दादांच्या पत्राप्रमाणें दत्ताजीराव शिंदे नजीबखानावर गेला असता. पण मल्हारबांनीं त्याला कानमंत्र दिला कीं "नजीबखानाचे सहाय्यानें भागीरथीस पूल बांधून अयोध्येचें राज्य जिंकावें. नजीबखान

राखावा. त्याचें पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून रामेश्वरापर्यंत जासुदा-हाती पैसा आणून एकछत्री राज्य करतील." हा सल्ला शिंदे यास पटला. दादा व बापू परत आल्यानंतर त्यांनीं नानासाहेबांना कळविलें कीं नजीबखानाची वाट लाविल्याविना मराठ्यांचा पाय उत्तरेंत स्थिर होणार नाहीं. नानासाहेबांनींही दत्ताजीरावास तसा तगादा केला. पण शिंदे नजीबावर गेला नाहीं! दादा स्वतः पारिपत्य करावयास गेले असतां मल्हाररावांनीं त्यांस पाठीशीं घालून वांचविलें. शिंदे यांचेवर ती कामगिरी सोंपविली त्यावेळीं त्याला राष्ट्रघातकी बुद्धिवाद सांगून नजीबाला वाचवलें. आणि याच नजीबानें पानपतची आपत्ती मराठ्यांच्यावर आणिली. म्हणून नजीबखान वांचला याची सर्वस्वी जबाबदारी होळकर यांचेवरच पडते.

१० नजीबाच्या उपेक्षेची फलश्रुतिः— ★

होळकरांच्या सल्ल्याप्रमाणें दत्ताजीरावास सुजावर हल्ला करावयाचा होता व त्यासाठीं त्याला गंगेचा पूल हवा होता. हा पूल देतों देतों करीत नजीबानें बरेच दिवस टोलविले आणि "आशाम् कालवतीम् कुर्यात् । कालम् विघ्नेन योजयेत्" । या कणिकनीतीचा अवलंब करून आंतून अबदल्लीस पाचारण केलें. त्या प्रमाणें अबदल्ली पंजाबांत आला असें कळ-तांच, दत्ताजीरावास नजीबच्या कारस्थानाची कल्पना आली व अबदल्ली व नजीब यांची गांठ पडण्याच्या आंत अबदल्लीस थोपवून धरावा म्हणून दत्ताजीराव आडवा आला. बंदावूच्या घाटावर त्याची व अबदल्लीची लढाई होऊन त्यांत दत्ताजी ठार झाला व शिंद्यांच्या फौजेची वाताहात झाली. नंतर दक्षिणेकडून फौज येईपर्यंत गनिमी काव्यानें अबदल्लीस जेर करावा म्हणून शिंदे व होळकर यांनीं प्रयत्न केला. पण त्यांच्या संयुक्त सैन्याचाही पराभव झाला. नजीबखानाला वांचवल्याची ही फलश्रुति मल्हाररावास मिळाली.

११ दादाच्या अटकेच्या मोहिमेपर्यंत कर्ज कां झालें ? :— ★

अटकेच्या स्वारींत ऐवज वगैरे न मिळतां ८० लक्ष कर्ज पेशव्यांना झालें. हें कर्ज कां झालें याचा विचार करूं. मराठ्यांच्या स्वाऱ्या मुलुख-

व धास्ती वाटत होती असें स्पष्ट दिसतें. मल्हारराव होळकरांनीं नानासाहेबांना असें कळवलें असण्याचा संभव आहे कीं दादा-बापू यांना इतक्या शिबंदीनिशीं पंजाबांत ठेवलें तर ते कदाचित स्वतंत्र होतील आणि नानासाहेबांना भारी होतील. याच ठशाचा सल्ला गोपिकाबाईनींही दिला असण्याचा संभव आहे. पानिपतच्या वेळीं अशा प्रकारची शंका त्यांनीं भाऊसाहेबाबद्दल व्यक्त केली होती व म्हणून विश्वासरावांना स्वारीवर पाठवलें गेलें होतें. अशा प्रकारें कोणाकडूनहि नानासाहेबांना सल्ला दिला गेला असेल तर त्यांच्या संशयी मनाला तो पटणें स्वाभाविक होतें. राघोबाच्या मनांत तसें आलें असतें तर स्वतंत्र राज्य स्थापणें शक्य आहे असें मानण्यासारखी परिस्थिति होती. अशा प्रकारची शंका नानासाहेबांना वाटली असावी म्हणून त्यांनीं दादा व बापू यांना मागें खेचलें असावें. याशिवाय दुसरें सयुक्तिक अनुमान या बाबतींत निघू शकत नाहीं.

८ बापूंची पंजाबची निरवानिरव :— ★

पंजाबची व्यवस्था जेवढी लावणें शक्य होते तेवढी लावली. जयनगरकडे असलेल्या जनकोजी शिंदे यास दिल्लीस जाऊन आधीं नजीबखानाची वाट लावण्यास तांतडीचें पत्र पाठवलें. त्यांत राघोबा लिहितो " करोड रुपये शिबंदी वाढली तरी पुरवेल. एवढी जोड आम्हांस द्यावी. आम्हींच पारिपत्य केलें असतें. परंतु मल्हाररावांनीं धर्मपुत्र म्हणून अगत्य धरून आपलें तर्फेनें अंतर्वेद प्रांत कुरुक्षेत्रापासून कुंजपुरा देखील चोवीस लाखांची मामलत त्याचे स्वधीन केली. माधवसिंग जयनगरकर, विजेसिंग मारवाडी वगैरे बहुत धर्मपुत्र मल्हारबास आहेत. या धर्मपुत्रांचा फलादेशहि भोगीत आले." अशा प्रकारें नजीबखानाचा शेवट करण्याविषयीं कळकळीचा निरोप शिंद्यांना देऊन दादा व बापू परत दक्षिणेस आले.

९ नजीबाच्या उपेक्षेची जबाबदारी होळकर यांवेवर पडते:— ★

बापूंच्या व दादांच्या पत्राप्रमाणें दत्ताजीराव शिंदे नजीबखानावर गेला असता. पण मल्हारबांनीं त्याला कानमंत्र दिला कीं " नजीबखानाचे सहाय्यानें भागीरथीस पूल बांधून अयोध्येचें राज्य जिंकावें. नजीबखान

राखावा. त्याचें पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून रामेश्वरापर्यंत जासुदाहाती पैसा आणून एकछत्री राज्य करतील. " हा सल्ला शिंदे यास पटला. दादा व बापू परत आल्यानंतर त्यांनीं नानासाहेबांना कळविलें कीं नजीबखानाची वाट लाविल्याविना मराठ्यांचा पाय उत्तरेंत स्थिर होणार नाहीं. नानासाहेबांनींही दत्ताजीरावास तसा तगादा केला. पण शिंदे नजीबावर गेला नाहीं ! दादा स्वतः पारिपत्य करावयास गेले असतां मल्हाररावांनीं त्यांस पाठीशीं घालून वांचविलें. शिंदे यांचेवर ती कामगिरी सोंपविली त्यावेळीं त्याला राष्ट्रघातकी बुद्धिवाद सांगून नजीबाला वाचवलें. आणि याच नजीबानें पानपतची आपत्ती मराठ्यांच्यावर आणिली. म्हणून नजीबखान वांचला याची सर्वस्वी जबाबदारी होळकर यांचेवरच पडते.

१० नजीबाच्या उपेक्षेची फलश्रुतिः— ★

होळकरांच्या सल्ल्याप्रमाणें दत्ताजीरावास सुजावर हल्ला करावयाचा होता व त्यासाठीं त्याला गंगेचा पूल हवा होता. हा पूल देतों देतों करीत नजीबानें बरेच दिवस टोलविले आणि " आशाम् कालवतीम् कुर्यात् । कालम् विघ्नेन योजयेत् " । या कणिकनीतीचा अवलंब करून आंतून अबदल्लीस पाचारण केलें. त्या प्रमाणें अबदल्ली पंजाबांत आला असें कळतांच, दत्ताजीरावास नजीबच्या कारस्थानाची कल्पना आली व अबदल्ली व नजीब यांची गांठ पडण्याच्या आंत अबदल्लीस थोपवून धरावा म्हणून दत्ताजीराव आडवा आला. बंदावूच्या घाटावर त्याची व अबदल्लीची लढाई होऊन त्यांत दत्ताजी ठार झाला व शिंद्यांच्या फौजेची वाताहात झाली. नंतर दक्षिणेकडून फौज येईपर्यंत गनिमी काव्यानें अबदल्लीस जेर करावा म्हणून शिंदे व होळकर यांनीं प्रयत्न केला. पण त्यांच्या संयुक्त सैन्याचाही पराभव झाला. नजीबखानाला वांचवल्याची ही फलश्रुति मल्हाररावास मिळाली.

११ दादाच्या अटकेच्या मोहिमेपर्यंत कर्ज कां झालें ? :— ★

अटकेच्या स्वारींत ऐवज वगैरे न मिळतां ८० लक्ष कर्ज पेशव्यांना झालें. हें कर्ज कां झालें याचा विचार करूं. मराठ्यांच्या स्वाऱ्या मुलुख-

गिरीच्या उद्देशानेंच होत असल्यामुळें मुलूख जिंकला कीं पैसा मिळवला पाहिजे, अशी नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांची समजूत होती. " मुलूखगिरीवरून यावयाचें तें कर्ज करून यावें हा धंदा कोठला ? " असें भाऊंनीं राघोबास विचारलें होतें. या स्वारींत पैसा मिळणें शक्य होतें किंवा नाहीं आणि मिळणें शक्य असूनहि बापूंनीं खटपट केली किंवा नाहीं एवढेच प्रश्न शिल्लक रहातात. कोणताही प्रांत जिंकल्यानंतर त्यांतून पैसे मिळविण्याचे दोनच मार्ग असतात. १ तेथील धनिक राजाकडून खंडणी घेणें. २ रयतेची लूट करणें. अंतर्वेदीच्या स्वारींत बापूंनीं रोहिल्यांचा पराभव करून त्यांच्यापासून खंडणी घेतली. वजीराकरवींच अबदल्लीला हाकून लाविलें असल्यामुळें वजीराकडून फारशी रक्कम मागतां येण्यासारखी नव्हती. रोहिल्यांचा पराभव करण्याच्या कामीं बापूंना सुजाशीं संधान बांधावें लागलें होतें. त्यामुळें त्याच्याकडून पैसा मिळणें शक्य नव्हतें. या कामीं राघोबानें बापूंस बोल दिला: " रुपये न घेतां सुजाच्या मदतीस जावें यांत किफायत कोणती ? – जिकडे रुपये मिळतील तिकडे जावें, हरतऱ्हेनें पैसा मेळवावा. " या स्वारींत पैसा मिळाला नाहीं यांत बापूंची कांहींच चूक नव्हती. तीन शत्रू एक झाले असते तर मराठ्यांचा निभाव लागणार नव्हता. या तिघांचा मिलाफ होऊं न देतां त्यांचा पराभव करणें जरूर होतें. म्हणून बापूंनीं एकाला आपला करून घेतलें, दुसऱ्याचा पराभव केला व तिसऱ्याला उपकार केल्याचें दाखवून आपला कार्यभाग साधला. या व्यवहारांत आर्थिक दृष्ट्या प्रत्यक्ष असा ज़री लाभ झाला नाहीं तरी पुढें पैसा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला होता. रयतेला लुटून पैसा मिळण्यासारखी श्रीमंत रयत या भागांत फारशी नव्हती आणि राघोबा व बापू रयतेला लुटण्यास तयार नसत. यामुळें नानासाहेब व भाऊ यांच्या हिशेबी बापू व दादा हे अव्यवहारी ठरले. अंतर्वेदीच्या स्वारीनंतर बापू व दादा सरहद्दकडे गेले. तेथें अबदल्लीच्या मुलाचा पराभव करून शक्य ती लूट मिळवली. बापूंनीं सर्व शत्रूंचा पराभव केला. पण या यशाचें चीज करण्यासाठीं व मराठ्यांचा अंमल पंजाबप्रांतीं पूर्णपणें बसविण्यासाठीं बापूंना पंजाबांत राहूं देण्याचें धोरण नानासाहेबांनीं दाखवलें नाहीं. आम्हीं मार्गें

नों. न.

म्हटल्याप्रमाणें साशंक वृत्तीनें त्यांनीं बापूंना व दादांना परत बोलावलें. यामुळें पेशव्यांचा अंमलहि बसला नाहीं व पैसाहि मिळाला नाहीं. मोठ्या सामन्यासाठीं उभारलेली प्रचंड शिबंदीही महत्वाची कामगिरी करून घेण्याच्या आधीं सोडून द्यावी लागली. त्यामुळें हा खर्च अंगावर आला. तांतडीनें परत यावें लागल्यामुळें रस्त्यांत खंडणी वगैरे कांहीं मिळणें शक्य नव्हतें. परत येण्यास दोन महिने लागले. या काळाचा शिबंदीचा खर्च अंगावर आला, यामुळें हें ८० लक्ष रुपयांचें कर्ज झालें. मिळालेल्या प्रांतांत आपला अंमल बसला असतां तर खंडणी येतच होती. पण अकालीं परतण्याचा तगादा करून नानासाहेबांनीं हा खर्च अंगावर ओढून घेतला असेंच म्हणावें लागतें.

## १२ बापूंवरील आरोप व त्यास उत्तर:-

श्री. खरे यांनीं आपल्या लेख-संग्रहांत म्हटलें आहे कीं " कारभारी बापू यास नानासाहेबांनीं कर्जाबद्दल जाब विचारला असतां " रघुनाथराव धनी. ते करतील तें प्रमाण. मी चाकर, हुकूमाचा ताबेदार " असें उडवा-उडवीचें उत्तर बापूंनीं दिलें. " या खरे यांच्या आरोपास आधार काय तो एका पत्राचा आहे. तें पत्र त्रिंबक मामा यांनीं मागाहून पुष्कळ वर्षांनीं उरलीच्या तहानंतर लिहिलेलें आहे. तें पत्रच देतों:- " सखारामपंत शिकवल्याप्रमाणें दादासाहेब बोलतात. सखारामास एवढें दिवाणगिरीचें पद आलें आहे तें नकोसें आहे कीं काय ? कृतृमें करून तो नको म्हणतो. दादासाहेबांचा खर्च ६०-७० लक्षांचा किंबहुना ८० लक्षांचा साळसंबंधें आहे. नानासाहेब महाराज गरीब नव्हते म्हणून तितकेही चालवीत होते. आयत्या पिठावर पोट भरून दाहावीस लाख कर्ज करून येत होते. सखारामपंत दरसाल १०-५ लाख मिळवून आणीत होते. नानासाहेब पुसत, कर्ज कां ? तेव्हां सांगत कीं दादासाहेब धनी, ते जें करतील तें प्रमाण, आम्हीं काय करावें ? असा जाब साल करीत. " हे पत्र वाचतांच कोणाच्याही लक्षांत येईल की बापू व दादा यांच्यावर आग पाखडणाऱ्या माणसानें खोडसाळपणें हें पत्र लिहिलें आहे. त्यांतील मजकूर मुळींच खरा नाहीं. दादा आयत्या

पिठावर पोट भरून राहाणारा नादान माणूस होता कीं काय ? हा आरोप दादावर करणारा कर्तबगारीचा मूर्तिमंत पुतळा सबंध पेशवाईंत त्रिंबकरावमामाच काय तो निघाला ! बापू दहापांच लाख मिळवून आणीत होते, म्हणजे लांच खात होते असा दुसरा आरोप आहे. नानासाहेब हे अत्यंत हिशेबी मुरब्बी कारकून होते. बापूंनीं अशी लांच खाल्ली असती तर ती गोष्ट त्रिंबकमामांच्या आधीं नानासाहेबांना समजली असती आणि त्यांनीं बापूंची केव्हांच उचलबांगडी केली असती. याउलट नानासाहेबांनीं बापूंच्या मुलुखगिरीच्या प्रत्येक कामगिरीबद्दल खूष होऊन बापूंचा तनखा वाढवला होता. अर्थात् हा आरोप साफ खोटा होता हें स्पष्ट दिसतें. पत्रांतील शेवटाचा मजकूरच उघड खोटा दिसण्यासारखा आहे. " दादासाहेब धनी, ते करतील तें प्रमाण, आम्हीं काय करावें " असें उत्तर बापू नानासाहेबांस देऊं शकले असते काय ? बापू मोहिमेचे कारभारी होते. त्यांच्यावर जबाबदारी होती. अशा उडवाउडवीच्या उत्तरानें नानासाहेब मुळींच स्वस्थ बसले नसते. दादा व बापू यांची गांठ घालून जाब विचारला असता. असें त्यांनीं केल्याचा कोठेंही दाखला नाहीं. याच्याउलट पानपतच्या वेळीं भाऊंनीं कारभारी म्हणून बापूंची निवड केली पण दादांनीं बापूस दिलें नाहीं असा पुरावा आहे. या सर्व परिस्थितीवरून वरील आरोप ज्या पत्राच्या आधारें केला आहे तें पत्रच खोटें ठरत असल्यामुळें तो आरोपहि आपोआपच लटका पडतो.

**९३ कर्ज कां झालें याबद्दल नानासाहेबांची खात्री:—** ★

स्वारीचें काम संपवून आल्यानंतर भाऊंनीं कर्ज केल्याबद्दल जिकीर काढली होती असें दिसतें. पण त्याला समर्पक उत्तर बापूंनीं दिलें व नानासाहेबांचें समाधान झालें. त्यावेळीं पेशवाईंतील कोणाही इसमानें बापू अगर दादा यांना कर्ज केल्याबद्दल अगर पंजाबमधील कामगिरी अर्धवट टाकून आल्याबद्दल दोष दिल्याचें दिसत नाहीं. पैशाच्या अडचणींत सैन्य आले तर शत्रूला नामोहरम करण्याचें सामर्थ्य त्यांना राहात नाहीं. पानपतच्या मोहिमेवर जागोजाग पैसे मिळवीत जावें

अशी आंखणी भाऊंची असल्यामुळें स्वारींतच पैशाची तरतूद करीत भाऊंना जावें लागलें; आणि तसें करतांना इतरांना दुखवावें लागलें आणि पैशाच्या अडचणींत सांपडून शेवटीं पानपतमध्यें पराभूत व्हावें लागलें. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां बापूंच्या मोहिमेंत त्या परिस्थितींत कर्ज होणें अपरिहार्य होतें हेंच ठरतें. त्याची जबाबदारी दादावर अगर बापूंवर टाकतां येणार नाहीं.

---

## प्रकरण ३ रें

# उरळीचा तह

**१ पानपतनंतरची परिस्थितिः—** ★

बापू व राघोबा मुलुखगिरीवरून कर्ज करून येतात असें भाऊस वाटत होतें. वाटेंत पैसा जमवीत जमवीत मोहीम करावयाची अशी आंखणी होती. ती दादास मान्य नसल्यामुळें पानपतच्या स्वारीवर भाऊंची नेमणूक झाली. पण आर्थिक अडचणीशीं तोंड देतां देतां जेरीस येऊन भाऊंना बऱ्याच अप्रिय गोष्टी कराव्या लागल्या आणि त्याचा परिणाम म्हणजे मराठ्यांना हरएक बाजूंनीं प्रतिकूलता उत्पन्न होऊन शेवटीं पानपत येथें मराठ्यांचा भयंकर पराभव झाला. सदर पराभवाची बरींच कारणें दाखवलीं जातात. पण त्यांची यादी या ठिकाणीं देण्याचें कारण नाहीं. त्याबाबत भाऊंना जो दोष दिला जातो तो मात्र योग्य नाहीं. ऐन वेळेस बऱ्याच गोष्टी प्रतिकूल घडत जातात आणि त्याचा परिणाम लढाईवर होतो. सम्राट नेपोलियननें रशियावरील स्वारीपूर्वी अत्यंत मोठी तयारी केली होती. पण आयत्या वेळीं २ महिने बर्फ

आधीं पडूं लागल्यामुळें त्याचा पराभव झाला. तसेंच भाऊंचें झालें. पैशाची आगाऊ तरतूद न करतां स्वारींतून पैसा गोळा करीत जाण्याची भाऊंची कल्पना धोक्याची होती, हें सत्य असलें तरी ती कल्पना त्यांनीं जवळ जवळ यशस्वी करून दाखवली होती. शिवाय त्या आंखणीस सर्वांनीं मान्यता दिली होती. म्हणून पराभवाची जबाबदारी एकट्या भाऊवर टाकणें योग्य होणार नाहीं. असो. सदर पराभवानें नानासाहेबांस जबर धक्का बसला व थोड्याच दिवसांत ते दिवंगत झाले. मृत्यूपूर्वी त्यांनी राघोबादादास माधवरावाचा पालनकर्ता नेमून बापूस कारभारी नेमिलें व त्या दोघांना जवळ बोलावून माधवरावाला त्यांच्या हवाली करून "राज्य राखा" असें सांगितलें. त्यावेळची मराठी राज्याची व पेशव्यांच्या घरची परिस्थिति सर्व बाजूंनीं अडचणीची झाली होती. मराठ्यांची एक पिढी पानपत येथें कापली गेली होती. नामवंत असे बरेच सरदार मारले गेले होते. मराठ्यांचा दरारा साफ नष्ट झाला होता. मराठ्यांचे शत्रू मराठ्यांची सत्ता झुगारून देण्याची खटपट करीत होते. कर्त्या माणसांची वाण भासत होती. उत्तरेकडे मोंगल व दक्षिणेकडे हैदर टपून बसले होते. पेशव्यांचें सैन्य कमी झालें होतें. नवें सैन्य उभारण्यास पैसा नव्हता. सर्व बाजूंनीं उठलेल्या शत्रूंस तोंड देण्याची ताकद पेशव्यांपाशीं नव्हती. पेशव्यांना बरेंच कर्ज झालें होतें. नवीन कर्ज देण्यास लोक तयार नव्हते. अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं परिस्थिति बिकट झाली होती.

**२ पेशव्यांच्या घरांतील दुही :—** ★

माधवराव त्यावेळीं फक्त १६ वर्षांचे असल्यामुळें घरी राघोबादादा हेच वडील कर्ते होते. माधवरावांची आई गोपिकाबाई यांचें राजकारणांत बरेंच लक्ष होतें. त्यांना राघोबादादांनीं वडीलपणा करावा हें पसंत नव्हतें. माधवरावानें सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा असें त्यांना वाटत होतें. राघोबाच्या हातांत कारभार गेल्यास माधवराव निर्माल्यवत् होईल अशी भीति त्यांना वाटत होती. बापू यांना कार-

भारी नेमण्यांत आलें होतें. बापू दादांचा उजवा हात असल्यानें या दोघांच्या हातीं सत्ता असणें माधवरावांच्या हिताच्या दृष्टीनें गोपिकाबाईनां इष्ट वाटत नव्हतें. माधवराव लहान असल्यानें आईच्या या मताचा पगडा त्यांच्या कोंवळ्या मनावर बसला होता. पटवर्धन सरदार व बापू यांचें नानासाहेबांच्या वेळेपासूनच बरें नव्हतें. नानासाहेबांनीं स्वत: “ तुम्हीं बापूबद्दलची अढी सोडली पाहिजे ” असें पटवर्धनसरदारांना सांगितलें होतें. तरी पण त्यांनीं आपली तेढ सोडली नव्हती. यावेळीं नानाफडणवीस यांचें प्रस्थ पेशव्यांच्या घरीं बरेंच बसलें होतें. ते पेशव्यांचे आप्त होते. शिवाय राजकारणांत वावरत होते. नाना महत्वाकांक्षी कर्तबगार व कारस्थानी असल्यामुळें राज्यकारभारांत आपला हात असावा असें त्यांना वाटत होतें. दादाच्या हातीं कारभार आल्याबरोबर त्यांनीं नानांना कामावरून दूर केलें होतें. त्रिंबकरावमामा हेही पेशव्यांचे आप्त असून बापूंचा व दादांचा द्वेष करणारे होते. ही मंडळी व गोपिकाबाई असा एक कंपू बापू व दादा यांच्याविरुद्ध तयार झाला. बापू व दादा यांच्या प्रत्येक कृत्याचा विपर्यस्त अर्थ करून या मंडळीनीं गोपिकाबाईला सांगावा. तिनें चिडून बापू व दादा यांना अपशब्द वापरावेत. असा प्रकार सुरूं झाला. साहजिकच या गोष्टीचा माधवरावाच्या कोंवळ्या मनावर परिणाम होऊं लागला.

**३ निजामावर स्वारी:—** ★

वर सांगितल्याप्रमाणें आंतून व बाहेरून पोंखरलेल्या परिस्थितींत दादा व बापू यांचा कारभार सुरूं झाला, आणि निजामाला तोंड देण्याचें काम ताबडतोब त्यांना हातीं घ्यावें लागलें. उदगीरच्या लढाईत निजामाचा भयंकर पराभव होऊन त्याचा बराच मुलूख पेशव्यांच्या हातीं आला होता. तो परत घेण्याची गडबड निजामाला झाली होती. भाऊ पानिपतला गेले तरी मागें निजामावर दाब ठेवण्यासाठीं बापू व दादा २०–२५ हजार फौजेनिशीं राहिले होते. त्यामुळें निजाम स्वस्थ होता. पण नानासाहेबांच्या मृत्यूनंतर दादा व बापू परत पुण्यास गेले, या संधीचा फायदा घेऊन, लाला ब्रिजदास याच्या हाताखालीं सैन्य देऊन

निजामानें पेशव्यांच्या मुलखांत लुटालूट सुरू केली. आळंद, गुंजोटी अशीं ठाणीं घेऊन बोरगांवांतून ४० हजार रुपये घेतले. यानंतर निजामहि त्याच्या मदतीस आला. त्यानें अक्कलकोटच्या भोंसल्यावर हल्ला करून त्याचा पराभव केला व थेट पुण्यावर चाल केली. रस्त्यांतील पवित्र क्षेत्रांची लुटालूट केली. बापू व दादा यांनीं गोपाळराव पटवर्धनास निजामावर पुढें पाठवून आपणहि त्यांच्या मदतीस आले व निजामाला सर्व बाजूंनीं कोंडून त्याचा पराभव केला. व निजामाशी तह केला. तो " उरळीचा तह " या नांवानें प्रसिद्ध आहे. या तहांतूनच दादा व माधवराव यांच्या वितुष्टाचें बीज उत्पन्न झालें.

## ४ उरळीच्या तहाची झडती :— ★

ग्रँटडफ या तहाबद्दल म्हणतो " निजामाला २७ लक्षाचा मुलूख देऊन त्याच्याशीं तह करून स्नेह जोडला. " या विधानाच्या जोरावर थोडी कल्पना चालवून खरेशास्त्री म्हणतात " माधवराव हा स्वतंत्र बुद्धीचा असल्यामुळें पुढें मागें आपणांस त्रास भोगावा लागेल, तेव्हां निजामाचें बुजगावणें आपल्या लगामीं असावें एवढ्याचसाठीं त्यास मुलूख देऊन अंतस्थ रीतीनें राघोबा व माधवराव यांच्यांत कांही तंटा उपस्थित झाल्यास निजामानें राघोबास मदत करावी अशा अर्थाचें वचन बापूनें निजामाकडून घेतलें. " चंद्रचूड दप्तराच्या प्रस्तावनेंत दत्तोपंत आपटे म्हणतात " सखारामबापू व राघोबा यांनीं बेकीचा प्रश्न उपस्थित केला असून निजामास २७ लक्षांचा मुलूख देऊन गुप्त तह केला असण्याचा संभव आहे. " आणि एवढ्या माहितीवर रा. सहस्रबुद्धे यांनीं थोरले माधवराव पेशवे यांचे चरित्रांत भरमसाट विधानें केली आहेत. या सर्वांचा या ठिकाणीं व्यवस्थेशीर समाचार घेणें प्राप्त आहे. या सर्व विधानांचा पाया म्हणजे ग्रँटडफची माहिती. ती बरोबर आहे का, हें आपण पाहूं. या तहाबद्दल नारोशंकर लिहितो " तहामध्यें एकमेकांनीं एकमेकांचा मुलूख परत द्यावा, जादा कोणीं कोणास कांहीं

देऊं नये " ( भारत वर्ष ) " अल्पस्वल्प मुलूख देऊन निजामासीं तह केलिया बदनक्षी " असा उल्लेख पेशवे दप्तरांत या तहासंबंधीं सांपडतो. माधवराव पेशवे एका पत्रांत लिहितात " " जाघवरावाची ४० लाखाची जहागीर निजामानें पेशव्यांस देऊन त्यांच्याशीं तडजोड केली " ( राजवाडे खंड १०. २ व चं. द. ले. १३९ ) या बाबतींत रा. आपटे आपल्या प्रस्थावनेंत लिहितात: ( सहस्त्रबद्धेकृत थोरले माधवराव पेशवे चरित्र पान १० ) " सखाराम बापूविरुद्ध हाकाटी करण्यास सुरवात झाली ती उरळीच्या तहांतील कलमामुळें, " याबाबतींत निजामापासून मुलूख घेण्याऐवजीं उलट त्यालाच २७ लाखाचा मुलूख देऊन विजयी मराठयांनीं निजामाशीं तह करणें असा विषयोपन्यास रा. सहस्त्रबुध्दे यांनीं केला आहे. कै. खरे यांनीं हा मजकूर लिहिल्यानंतर राजवाडे यांचा १० वा खंड प्रसिद्ध झाला व त्यांत लेखांक २ मध्यें माधवराव बल्लाळ यांचें पत्र छापलें असून त्यांत मोंगलापासून मुलूख घेऊन तह केला असे-स्पष्ट म्हटलें आहे. व चंद्रचूड दप्तरांतील एका पत्रांतहि या विधानाचें प्रत्यंतर मिळतें. त्यावर कै खरेशास्त्री यांना समक्ष भेटून या मुद्याची चर्चा केली. ग्रँटडफवर विश्वास ठेवून मीं हें विधान केलें होतें. पण खुद्द माधवरा-वांच्याच पत्रांत विरुद्ध मजकूर आहे तर तोच प्रमाण मानला पाहिजे " असें त्यांनीं मला सांगितलें त्याप्रमाणें मी चंद्रचूड दप्तराच्या प्रस्तावनेंत हा भाग लिहिला. ' यावरून कै. खरेशास्त्रि यांनीं आपलें वरील विधान चुकीचें आहे असें कबूल केलें होतें हे स्पष्ट आहे. आणि या विधानाच्या पायावर श्री. सहस्त्रबुद्धयांनीं रचलेली इमारत कशी टिकते ? उलट सदर सहस्त्र-बुद्धे यांच्या पुस्तकांस श्री. अपटयांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे त्यांत " अलीकडे पुढें आलेला पुरावा लक्षांत घेतला असतां या बाबतींत मला मत बदलण्याची आवश्यकता वाटते, तिचें कारण असें सांगतां येईल " अशी सुरवात करून दादा व माधवराव यांच्या मध्यें एकी घडवून आणण्यासाठीं बापू झटत होता असें दाखवलें आहे. या सर्व विवेचनावरून हें सिद्ध होतें कीं उरळीच्या तहांतील

कलमें पेशव्यांना अनुकूलच होतीं व बापूंनीं त्यांत कसलाच डाव केलेला नव्हता.

**५ बापूंवरील मत्सरी आरोपः—** ★

उरळीच्या तहाच्या बाबतींत श्री. सहस्रबुद्धे म्हणतात "ही वेळ वास्तविक पाहिली असतां निजामाचा कांटा समूळ उपटून काढून मराठ्यांच्या राशीस लागलेल्या या ग्रहाला कायमची मूठमाती देण्यास फार उत्तम होती. सैन्यामध्यें जोर होता. निजामाची बाजू खालावत चालली होती, आणि बहुतेक सर्व सरदारांचें मतहि निजामास कायमाचा जमीनदोस्त करावा असें होते. परंतु मराठ्यांच्या दुर्दैवानें या वेळीं सर्व कारभार दादासाहेबांच्या हातीं होता.... राघोबा हा शूर व महत्वाकांक्षी पुरुष होता. परंतु तो हलक्या कानाचा असल्यामुळें आजूबाजूचे लोक सांगतील त्याप्रमाणें तो वागे व सखारामबापुशिवाय त्याचा दुसऱ्या कोणावर विश्वास नव्हता. सखारामबापू हा फार कावेबाज मुत्सद्दी होता. माधवरावाचे गुण सखारामबापूच्या प्रत्ययास येऊं लागले होते, व दिवसे दिवस सत्ता माधवरावांच्यां हातीं जाऊं लागली म्हणजे राघोबालाच कोणी विचारीनासें होईल व पर्यायानें आपणहि निर्माल्यवत् होऊं म्हणून माधवरावाला वरचढ न होऊं देणें सखारामबापूला योग्य वाटलें. निजामाचा बींमोड करून माधवरावाला सर्व रान मोकळें झालें म्हणजे माधवराव आपणांस गुंडाळून ठेवील म्हणून वेळ प्रसंगीं निजामाचा आपणांस उपयोग होण्याचा संभव आहे, अशी राष्ट्रघातक विचारसरणी सखारामबापूनें दादाच्या मनांत भरऊन दिली व भोळ्या राघोबाला अशा विचारसरणीमुळें निजामासारख्या जळत्या निखाऱ्याला आपल्या अस्तनींत ठेऊन घेतल्यामुळें आपण आपल्या राज्यावर व लौकिकावर केवढें संकट ओढवून घेत आहों याची जाणीव न राहून सखारामबापूचा हा कानमंत्र पटला व त्याप्रमाणें निजामाशीं गुळमुळीत तह करून मराठ्यांच्या राज्यावर वारंवार उलटून पडणाऱ्या या घोरपडीला कायमचें ठिकाणा-

वर बसवण्याची ही सोन्यासारखी संधी सखारामबापूच्या स्वार्थीस्वभावामुळें फुकट गेली. "

**६ उरळीच्या तहाची छाननी :--** ★

वर उल्लेखिलेल्या विधानापासून खालील मुद्दे निर्णयासाठीं निघतात:-

(१) निजामाचा कायमचा कांटा काढून टाकणें मराठ्यांना शक्य होतें काय? (२) शक्य होतें असें मानल्यास बापूनें जाणून बुजून त्याचा नायनाट केला नाहीं हे खरें आहे काय? (३) दादा व माधवराव याच्या मध्यें दुही निर्माण झाल्यास निजामाची मदत दादाला व्हावी म्हणून हा गुळमुळीत तह केला काय? या तीनही मुद्यांचा क्रमशः विचार करूंया.

मुद्दा नं. (१) **मराठ्यांना निजामाचा कांटा काढून टाकणें शक्य होतें का ?**

या वेळीं मराठी साम्राज्यावर चारी बाजूंनीं आक्रमण सुरू होतें. उत्तरेकडे जाट, रोहिले व सुजा वगैरे मराठ्यांचे शत्रू झाले होते. रजपूतहि मराठ्यांची सत्ता मानीनासे झाले होते. पानीपतमुळे मराठ्यांची ताकद खचल्याचें सर्व शत्रू जाणत होते. निजाम उदगीरचा सूड उगविण्याची संधी पहात होता. इंग्रजांचे डावपेच चालूं होते. हैदरहि टपून बसला होता. सरदारांवरचा पेशव्यांचा दाब व आब नाहींसा झाला होता. अशा परिस्थितींत बापू व दादा यांना निजामाशीं लढाई द्यावी लागली होती. या लढाईंत निजामाविरुद्ध मराठ्यांनीं एक लक्ष सैन्य आणलें होतें. यावरून निजामाच्या सामर्थ्याची कल्पना येते. एवढ्या सैन्यानेंहि भागणार नव्हतें. म्हणून बापूनें रामचंद्र जाधव व मीर मोंगल या दोघांना निजामापासून फोडून आपल्या बाजूस वळविलें आणि निजामाला अशा तऱ्हेनें पंगू करून त्याचा पराभव केला. यावरून निजाम पेशव्यांना तुल्यबळ होता हें स्पष्टच दिसतें. निजामाशीं लढाई फार दिवस चालूं राहिली असती तर दक्षिणेंतून हैदरनें व उत्तरेंतून जाट, रोहिले व सुजा यांनीं पेशव्यांना चेपून टाकलें असतें. तात्पर्य यावेळीं तयारी करण्यासाठीं म्हणून पेशव्यांना शांततेचीं अत्यंत गरज होती, हें राजकीय-स्थितीचा खोल विचार करणाऱ्याला पटण्यासारखें आहे. याच्या

उलट पुरावा सहस्रबुध्यांना दिसला तो म्हणजे गोपाळरावानें लढाई करून. आपल्या वडिलांना लिहिलेलें पत्र हा होय. तो म्हणतो "काल मोंगल लेणीवरून चांभार गोंद्यास चालला, तेव्हां आमच्या फौजा तमाम पिछाडी-पासोन सभोंवत्या उभ्या राहिल्या होत्या. चांभारगोंदे १॥ कोस उरलें, उपर ऐन मोंगल माळावर व्हावयासी आणि आमच्या तोफा पिछाडीस लागू व्हावया गांठ पडली. तोफांचा मार पिछाडीवर भारी झाला आघाडीस सरकारची फौज उठली, तिनें पुढील म्होरप अगदीं माघार फिरविली. आम्ही उजवे बाजूस खडे धरून केवळ जवळ गोळीच्या माऱ्यांत जाऊन उभे राहिलों. तेथून बाणाचांही मोठा मार दिला. चोहोंकडून असा ताणून मोंगल उभा केला संध्याकाळच्या प्रहर दिवसापासून एक घटका रात्रपर्यंत आगीनें मोंगल भाजून काढला. असा मोंगलावर कधीं मार झाला नाहीं. मोंगलास पाणी नाहीं ताणून उभा केला. मग त्यास कोसभर चांभारगोंदें उरलें पण आटपेना. तेव्हां उजवे बाजूस पाण्यासाठीं बाणाचा टप्पा सरून जाऊन उतरला. तेंव्हां दोन घटका रात्र झाली. आमच्या तोफाजवळच लागू झाल्या होत्या. त्याजवर उलटेल म्हणून साऱ्या फौजा जपून होत्या. परंतु काल कांहीं त्यांस आवाखा झाला नाहीं. कालच्याप्रमाणें मोंगलास कधी मार बसला नाही. मोंगलहि गार झाला. पाण्यासाठींही हैराण. आमच्या गोळयांनीं व बाणांनीं त्याची फौज बुणगें सारे हालविले. आम्हांस ढासणें चांगलीं सापडलीं. जवळ फारच होतीं. परंतु आमच्या सर्वांचा बचाव झाला. विसाजी नारायण याजकडील ४ घोडे २ माणुस व आम्हांकडील दोन तीन घोडे ठार व दहापांच जखमी याप्रमाणें आहेत. इश्वरें आम्हांस ढासणें चांगली दिली; त्यामुळें खैर झाली. गारद्यांनीं दोहोंकडील फारच चांदरात केली. हुजुरातेंतील व चोंहोंकडील फौजेची खैर झाली. मोंगलास असा मार कधीं झाला नाहीं. गार जाहला." (खरे ले. ४९) या पत्रावरून निजामाचें सैन्य मराठ्यांच्या माऱ्यांत चोहोंबाजूंनीं सांपडलें होतें हें जरी दिसतें तरी मराठ्यांच्या तोफा फार जवळ लागू होत्या, त्यावर मोंगल उलटेल म्हणून सर्व सैन्य जपून होतें अशी ती नाजूक जागा होती. वरील पत्रांत मराठ्यांचें सैन्य निजामाला चीत करण्यास

समर्थ होतेंच असा एकहि शब्द नाहीं. उलट पत्रांतील आनंद पाहातां आपल्याला हें यश चुकून मिळालें असाच लेखकाचा मानस दिसतो. लढाईच्या एकाद्या चकमकींत चांगला मार बसला म्हणजे त्याचा संपूर्ण पराभव झाला असें होत नाहीं, किंवा त्याचा पुढें खात्रीनें पराभव करतां येईल असेंहि नव्हे. एकाद्या लढाईत कोणाचें सामर्थ्य अधिक आहे हें एकाद्या चकमकीतल्या पराभवावरून अजमावतां येत नाहीं. युद्धशास्त्र दृष्टच्या त्याचा अंदाज बांधावा लागतो. सम्राट नेपोलियनचा यालूच्या लढाईंत पराभव झाला व त्याला मागें पळ काढावा लागला. पुढें दोन दिवसांतच त्यानें फरेड लँडची लढाई दिली आणि शत्रूला नामोहरम करून टाकलें. त्याचेंच दुसरेंहि उदाहरण पाहाण्यासारखें आहे. नेपोलियन रशियांतून पराभूत होऊन परत आला. शत्रूंनीं यावेळीं त्याच्याविरुद्ध प्रचंड सेना उभारली. नेपोलीयननें नवीन सैन्य उभारून " लटझेन " येथें शत्रूचा पराभव केला. पुनः दोन दिवसांनीं शत्रूंनीं एकत्र येऊन ब्यूटझेन येथें लढाई दिली. त्यांत नेपोलियनने शत्रूचा प्रचंड पराभव केला. शत्रू सैन्य वाट फुटेल तिकडे पळालें. असें असलें तरी पुढें हा विजयी वीर मागें हटूं लागला आणि हटतां हटतां लीपसीक येथें पराभूत झाला. यावरून असें दिसून येतें कीं एकाद्या पराभवामुळें सामर्थ्य खचतेंच असें नाहीं या सर्व गोष्टींचा विचार करून बापूंनीं ही लढाई ताबडतोब संपावी अशा हेतूनें तह केला ही गोष्ट त्या परिस्थितींत पेशवाईच्या हिताचीच होती त्यांत घर फोडण्याचा डाव मुळींच नव्हता. उरळीच्या तहाच्यापूर्वीं मराठ्यांनीं निजामाचा अनेकवेळां भयंकर पराभव केला होता. उदगीरचा पराभव तर सर्वांत मोठा मानला जातो. त्यावेळीं निजामाचा कायमचा कांटा कां काढला नव्हता ? भाऊंनीं निजामाशीं तह कां केला ? उदगीरच्या वेळीं भाऊंना तसें सामर्थ्य नव्हतें आणि तें मराठ्यांच्या पडत्या काळांत उरळी तहाचे वेळीं बापूमध्यें होतें असें कोणत्याही इतिहासाच्या अभ्यासकाला वाटणार नाहीं. यानंतरहि नाना फडणवीसांच्या कारकीर्दींतहि निजामचा खडर्याच्या लढाईंत पूर्ण पराभव केला. पण निजामाचा कायमचा कांटा न काढतां तहच केला यावेळींहि मराठ्यांची ताकद उरळीच्या तहाच्या वेळच्या ताकदीपेक्षां कमीच

होती असे मानायचें कीं काय ? वरील एकंदर विवेचनावरून असें सिद्ध होतें कीं बापूंनीं उरळीचा तह कोणत्याही वाईट बुद्धीनें केला नव्हता. त्यावेळच्या परिस्थितीला योग्य तोच निर्णय त्यांनीं घतला. या बाबतींतील श्री. सहस्रबुद्धे यांची टीका अयोग्य व असमतोलपणाची आहे. त्याला आधारहि नाहीं. केवळ बापूंना दोष देणें एवढाच त्यांत उद्देश आहे ; तथ्यांश कांहीं नाहीं.

मुद्दा नं. २ :— **बापूंनें निजामाचा कांटा मुद्दामच काढला नाही का ?**

या बाबतींत श्री. सहस्रबुद्धे म्हणतात " बापूंच्या मनांतून दादा व माधवराव यांच्यामध्यें दुही उत्पन्न करावयाची होती आणि म्हणून त्यांनीं निजामाला राखलें " असा तर्क केला आहे. निजामाला २७ लाखांचा मुलूख देऊन तह केला या गोष्टीवर आधारून हें सर्व तर्क केले गेले आहेत. निजामाकडून मुलूख घेऊन हा तह केला असें ठरलेलें असलेनें आतां या म्हणण्यांत कांहींच हंशील रहात नाहीं. पटवर्धन सरदारांचें व बापूचें वांकडें होतें. त्यामुळें त्यांनीं " बापूनें घर बुडवलें, " " बापूंनें दुही केली तो " सोदा, " " कपटी, " " विश्वासघातकी " वगैरे सर्व दुर्गुणांचें माहेरघर होता असे आरोप केले आहेत. पेशवाईंतील इतर मंडळींच्या मतें बापू राघोबाचा पक्षपाती होता असें आहे. एवढ्यावरून हे सर्व आरोप खरे ठरूं शकत नाहींत. बापू अशा दुर्गुणांचें माहेरघर असता तर बापूचें वजन पेशवाईंत प्रजेवर राहिलें असतें का ? लोकांच्या मतें बापू अत्यंत प्रामाणिक, कर्तबगार व विश्वासू होते. तेंव्हा पटवर्धनांच्या आरोपावरून कांहींच ठरवतां येणार नाहीं.

मुद्दा नं. ३:— **बापूंनीं दादा व माधवराव यांच्यामध्यें दुही झाली तर दादाला निजामाची मदत व्हावी म्हणून गुळमुळीत तह केला काय ?**

यावेळीं राजकारणांत प्रामुख्यानें वावरणारी मंडळी म्हणजे राघोबा, बापू, गोपिकाबाई, नाना फडणवीस, शिंदे, होळकर, त्रिंबकमामा व पटवर्धन सरदार, अशी होतीं. नाना फडणवीस त्रिंबकरावमामा व गोपिकाबाई यांचा एक गट होता. तो दादा व बापू यांच्या विरुद्ध होता. या बाबतीत खरेशास्त्री म्हणतात " कोंकणस्थ मुत्सद्दी व सरदार यांना सखारामबापू कारभारांत नको होता. व दादासाहेबाच्या हुकमतींत सारे राज्य चालावें. व आपला

पुत्र माधवराव यानें गादीचा मालक असून निर्माल्यवत् रहावें ही गोष्ट गोपिकाबाईस आवडण्यासारखी नव्हती हें उघड आहे. तिनें कोंकणस्थ सरदार व मुत्सद्दी यांचे नादीं लागून दादासाहेब व सखारामबापू यांचें महत्व नाहींसें करण्याचा प्रयत्न आरंभिला. " श्री. खरेशास्त्री यांचें हें विधान सर्वस्वी बरोबर आहे. या कारणानें बापू व दादा यांचेविरुद्ध वरील मंडळीचा एक विरोधी गट बनला, आणि मुद्दाम उरळीच्या तहाबाबत खोटया कंडया पिकवून या गटानें बापूविरुद्ध हाकाटी करावयास सुरवात केली. कोल्हापूरकरांना दत्तक घेण्यास दादानें परवानगी दिली हें ऐकून " आपल्या मुलाच्या हातांत हे नरोटी देतील " असें गोपिकाबाई ओरडूं लागली; व बापू, दादा व माधवराव यांच्यामध्यें दुही उत्पन्न करण्यासाठीं धडपडतो आहे अशी ओरड या गटानें करावयास सुरवात केली. वास्तविक रीत्या दादा व माधवराव यांच्यामध्यें ऐक्य व्हावें अशीच खटपट बापूनें केल्याचें उघड दिसतें. याबाबत विस्तृत विवेचन पुढें येणार आहे. येथें हें नमूद करणें प्राप्त आहे कीं नानासाहेबांनीं मरणसमयीं पेशवाईचा कारभार दादा व बापू यांच्याकडे दिला होता. विरोधी गटाला-- त्याला आपण यापुढें " नानाकंपू " असें म्हणूं– त्यांच्या कारभारास खीळ घालण्याचा अधिकार मुळींच नव्हता. हें नानाकंपूचें वर्तन स्पष्टपणें राजद्रोहाचें होतें. उरळीच्या तहाच्या बाबतींत श्री. सहस्रबुद्धे यांची बापूवरील टीका अगदीं निराधार आहे. खरेशास्त्र्यांचा आधार घेऊन हीं विधानें त्यांनीं केलीं. खरेशास्त्री स्वतःच म्हणतात कीं " आपलें विधान चुकीचें आहे आणि खुद्द माधवरावाचें पत्रच प्रमाण मानलें पाहिजे. " तरीही श्री. सहस्रबुद्धे पुरंदऱ्यांना उत्तर म्हणून लिहिलेल्या केसरींतील लेखांत म्हणतात कीं निजामाला २७ लाखाचा मुलूख देऊन तह केला हें म्हणणें वादग्रस्तच आहे. हा त्यांचा हटवादीपणा आहे. बापूवर टीका करावयाचीच अशा पूर्वग्रहदूषित मनानेंच त्यांनीं लिखाण केलें आहे. तेंव्हां त्याला कांहींच महत्व येत नाहीं. वरील सर्व विवेचनावरून उरळीचा तह योग्य रीतीनेंच झाला होता असेंच ठरतें.

## प्रकरण ४ थें

# " बापू आणि बोकीचा प्रश्न "

दुहीची प्रस्तावना :— ★

मागील प्रकरणीं दाखविल्याप्रमाणें गोपिकाबाईच्या नेतृत्वाखाली दादा व बापू यांच्याविरुद्ध जो एक गट स्थापन करण्यांत आला होता त्याचें सूत्र चालक कोण होते हें पाहूं. या गटास नानाफडणीस यांचें डोकें व पटवर्धन सरदार यांची समशेर यांचें अधिष्ठान होतें. नानाफडणवीस हा डोकेबाज, कावेबाज, पाताळयंत्री, कारस्थानी आणि अत्यंत महत्वाकांक्षी होता. पेशवाईच्या कारभारांत आपलें वर्चस्व असावें असें त्याला वाटत असे. सखारामबापू कारभारांत असे तोपर्यंत इतर कोणाचेंहि वजन पडण्यासारखें नव्हतें, हें नाना व नानाकंपू पूर्ण जाणून होते. बापूच्या कर्तबगारीबद्दल अगर मुत्सद्दीपणाबद्दल त्याच्या विरोधी गटाला देखील कांहीं तक्रार करतां येण्यासारखी नव्हती. त्यामुळें बापूंची कारभारांतून उचलबांगडी करण्यासाठीं दुसरीच कांहीं कुरापत शोधून काढणें या गटास भाग होतें. बापूविरुद्ध दादांना कांहीं सांगून त्यांस कारभारांतून दूर करवणें अशक्य होतें. कारण बापू दादांचे पूर्ण विश्वासांतील होते. माधवरावांचे हातीं कारभारच नव्हता. तेव्हां त्यांच्याकडूनहि ही गोष्ट करवितां येत नव्हती. म्हणून या नाना कंपूनें दादांच्या हातांतून कारभार माधवरावांच्या हातीं यावा व नंतर माधवरावाकडून बापूंना कारभारांतून अर्धचंद्र द्यावा असा व्यूह रचला. या व्यूहाला नानाकंपूच्या अपेक्षेप्रमाणें भरपूर साहाय्य गोपिकाबाईनीं दिलें.

२ देशस्थ कोंकणस्थवाद :— ★

या कंपूनें आपली शक्ति वाढविण्यासाठीं व बापूंची शक्ति कमी

करण्यासाठीं "देशस्थ, कोंकणस्थ" वाद उत्पन्न केला. "सर्व कोंकणस्थ ज्ञाति धुळीला मिळवावी असें बापूच्या मनांत आहे असा प्रचार नानाकंपूनें कंठरवानें करण्यास सुरवात केली. याचा थोडासा परिणाम झालाहि. बहुतेक कोंकणस्थ सरदार या कंपूंत सामील झालेले दिसतात. बापूंच्या वर्तनांत असा भेद कोठेंच दिसत नाहीं. बापूंनीं कोंकणस्थ ज्ञातीवर कोणताही अन्याय केल्याचा इतिहासांत दाखला नाहीं. दादा व बापूंच्या कारभारांत सर्व जमातीचे लोक होते. आणि नानाकंपूमध्यें मात्र फक्त कोंकणस्थ होते, हें पाहाण्यासारखें आहे. बापूविरुद्ध ही देशस्थ कोंकणस्थ ओरड सुरू झाली. पण बापूचा मालक दादा हा कोंकणस्थ असल्यामुळें व बापू त्याच्याशीं अत्यंत प्रेमानें वागत असल्यामुळें या ओरडीचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. म्हणून नानाकंपूनें बापू माधवरावाच्या विरुद्ध दादाशीं संगनमत करतो आहे, अशी भूमका उठविली व तसें गोपिकाबाई व माधवराव यांना पटवून देण्याच्या मार्गास तो लागला. उरळीच्या तहा विरुद्ध या कंपूनें जी ओरड सुरू केली होती, ती वास्तविक निजामाला २० लक्षाचा मुलूख दिला म्हणून नव्हती; निजामाला मेहेरबानी दाखवून त्याला न मारतां जें बापूंनीं ठेवलें तें कांहीं अंतस्थ—म्हणजे दादाला मदत व्हावी या हेतूनेंच—अशा अर्थाची असली पाहिजे. सर्व कोंकणस्थ एकीकडे झाले व बापूंना त्यांनीं पेंचात आणलें. आपल्याला हे लोक फशी पाडतील असें बापूंनाहि वाटूं लागलें. नानाकंपू गोपिकाबाई व माधवराव या सर्वांना आपण कारभार करावा असें वाटत नाही हें दादांनाही दिसत होतें म्हणून दादांनीं कारभार आपणास नको म्हणण्यास सुरवात केली आणि बापूनें तर कारभारीपदाचा राजीनामा दिला. बापूंनीं राजीनामा दिला याचीं कारणें निरनिराळीं सांगण्यांत येतात. आपण कारभार सोडला तर तो कसा चालतो पाहूंया अशा घमेंडीनें बापूंनीं राजीनामा दिला असें कांहीं लोक म्हणतात. विरोधीगटाचें सामर्थ्य वाढलेलें पाहून त्यांनीं कारभार सोडला असें कांहींचें मत. आपल्या कारभाराबाबत इतकी ओरड होत आहे तर आपण तो सोडलेला बरा असें वाटून बापूनें कारभार सोडला

असें दुसऱ्याचें मत होतें. माधवराव गोपिकाबाईस लिहितात "तीर्थरूप दादासाहेब यांच्या विचारें स्नानसंध्या करावी. एका कारभाऱ्यावर अखत्यार सांगावा हा विचार मेहेनत होत नाहीं म्हणून मनःपूर्वक आहे. सखारामपंतानेंहि अंग काढून घेतलें आहे. कारभार करीत नाहीं म्हणतात अंतःकरणपूर्वक नाहीं. पेचामुळें म्हणतात. सारे कोंकणस्थ एकीकडे होऊन फशी पाडतील यास्तव अंगानिराळें टाकितात." यावरून अनेक गोष्टी सिद्ध होतात. पहिली म्हणजे कारभारांत बापूंना बराच विरोध होत असून दुसरे कांहीं लोक त्यांत लुडबुड करीत होते म्हणून दादा म्हणतात "अखत्यार एका कारभाऱ्यावर सांगावा." दुसरी गोष्ट नानाकंपूनें बापूनीं कारभार सोडावा असा त्यांच्यावर पेच टाकला होता. तिसरी गोष्ट सर्व कोंकणस्थ एकीकडे होऊन आपल्याला फशी पाडतील असें बापूंना वाटत होतें; आणि शेवटची गोष्ट म्हणजे बापूंचा कारभार करण्याबाबत कांहीं हट्ट नव्हता. सर्व कोंकणस्थ एका बाजूला झाले होते. देशस्थाविरुद्ध कोंकणस्थ असा दुजाभाव पेशवाईंत निर्माण करण्याचें पुण्य नानाकंपूनें आपल्या पदरांत घेतलें.

३ दुहीचें मूळ :— ★

नानाकंपूला बापूही नको होते आणि दादाहि नको होते. पण एकाचवेळीं दोघांच्या विरुद्ध शिंग फुंकणें त्यांना धोक्याचें वाटलें म्हणून त्यांनीं प्रथम बापूविरुद्ध गिल्ला केला. बापूंना कारभारांतून काढून टाकल्यानंतर दादांना इतरांच्याशीं जमणें शक्य नाहीं, आणि दादा आपोआपच कारभारांतून निवृत्त होतील याची नानाकंपूला खात्री होती. आणि दादा व बापू कारभाराबाहेर गेल्यानंतर माधवराव पेशवा होणार व पेशवाईचा कारभार नानाकंपूकडे येणार याची खात्री या कंपूला होती. पेशवाईचा कारभार आपल्या हाती यावा हाच काय तो मुख्य हेतू या कंपूचा होता आणि त्यास अनुसरून त्यांनीं हा दादा व माधवराव यांच्यांत दुही उत्पन्न करण्याचा डाव यशस्वी रीतीनें खेळण्यास सुरवात केली. बापूंच्या कारभारावर

सं. नं. ........

बापूच्या कारभारावर नानाकंपूची सतत टीका होऊं लागल्यामुळें बापू कारभारांत उदासीन झाले. व कारभार आपणाकडे नको असें म्हणूं लागले. बापूंनीं कारभार सोडल्यास त्या जागीं येण्यास लायख असा मनुष्य पेशवाईंत त्यावेळीं नव्हता, असें दादास वाटलें. नानाकंपूनें नांवें सुचवावींत व तीं दादास पसंत पडूं नयेत असें होऊं लागलें. पण पेशवाईचा कारभार आपल्या हातीं यावा म्हणून अत्यंत धडपडणाऱ्या नानाकंपूला धीर निघेना आणि त्यांनीं माधवराव व गोपिकाबाई यांच्या मागें सारखें टुमणें लावलें कीं " सखारामास काढून दुसऱ्यास कारभार सांगावा. " एवढयानेंहि काम लवकर होईना हें पाहून या कंपूनें " सखाराम कारभारांत असेल तर आपण चाकरी करीत नाहीं " अशी धमकी देण्यास सुरवात केली. याबाबत त्रिंबकरावमामाचें एक पत्र तेवढें नमुन्यादाखल म्हणून येथें देतों, म्हणजे सर्व गोष्टी स्पष्ट दिसूं लागतील. " आम्हीं कारभारी नव्हो. बहुता दिवसाचे सेवक कर्ते होते ते गेले. सरकारी दौलत मातब्बर. वेढणार मायेचा आदि कर्ता पाहिजे. दादासाहेब सर्वांस वरिष्ठ. आज सात महिने झाले. त्यांची कर्तेपणाची स्थिति कळली पाहिजे कळोन गेली ! आतां कोठें थांग लागेला. सवाक्रोड दीडक्रोड मागील या दौलतीवर कर्ज पुढेंहि होतच आहे. घरांत दहाविसाचे सोनें होतें. खर्चोन गेलें. परचक्र आलें तें श्रीमंत माधवराव यांच्या प्रारब्धें करून पराभव पावलें. आमच्यानें कारभार होत नाहीं. तुम्हीं करा. बाबूराव यास अख्त्यारी देतो. करा म्हणतात. परंतु कोणास विश्वास पुरत नाहीं. त्यामुळें करणार मागें पुढें घेतो. राव थोर असते तरी कांहीं चिंता नव्हती. त्याचें वय लहान. त्यांचें भय कोणास वाटत नाहीं. दादासाहेब आपल्याच्यानें होत नाहीं म्हणतात. तें चित्तापासून नाहीं. समुद्रवलयांकित पृथ्वीचें वडिलपण अनायासें आलें तें कोणास सोडवेल कीं काय ? सखारापंतानें शिकवल्याप्रमाणें बोलतात. सखारामास एवढें दिवाणगिरीचें पद आलें आहे, तें नको आहे कीं काय ? कृत्रिमेकरून तो नको म्हणतो. बापूजी नाईक वगैरे यांचें

मत सखाराम कारभारी असला तर आपण चाकरीत नाहीं. या गोष्टीमुळें म्हणतात कीं तुमच्या चित्तास येईल तो कारभारी करा. चौघांनीं बाबुरावांचें नांव घेतलें. परंतु या विषयीं दादासाहेबास संतोष नाहीं. बाबुराव परमनिष्ठ. दादासाहेबांचा खर्च ६०–७० लाखाचा. किंबहुना ८० लक्षांचा सालसंबंधीं आहे. नानासाहेब महाराज गरीब नव्हते म्हणोन कळोन तितकेंहि चालवीत होते. आतांचा प्रकार कसा घडेल ? नानासाहेबामागें पंधरा दिवसांत हरणें पाखरें वगैरे तमाम दूर करून आपण संसार करणार असें दाखवलें. परंतु आपला खर्च काय हा कशास पाहिजे हें ध्यानांत येत नाहीं. आयत्या पिठावर पोट भरून दहावीस लाख कर्ज करून येत होते. सखारामपंत दाहापांच लाख मिळवून आणीत होते. नानासाहेब पुसत कर्ज कां ? तेव्हां सांगत कीं " दादासाहेब धनी. ते जें करतील तें प्रमाण. आम्हीं काय करावें ? " असा जाबसाल करीत तेव्हां उगेच राहात. बटीकराख आवडती झाली म्हणून तिला धन्याचा संसार नीट करावा, सोयरी आप्त याजवर कृपा करावी हें तिला अगत्य नाहीं. चार आपले बटीक दास मिळवून नाश केला. बुडाले तरी तिचें काय गेलें ? धन्याचे मायेची एकादी हिताची गोष्ट सांगूं लागले तर भलतेंच धन्यास समजावून त्याजवर रागें भरवावें ऐसा सखारामाचा मजकूर. गरत धनीण नावडती झाली ! तिजवर धन्यानें अखत्यारी दिली तर ती धन्याचें हीत करील. तुम्ही धनी. एकाशीं वाईट होऊन दौलत राखावी. निश्चय दाखवूं नये. कारभारी करून तो बरें करो वाईट करो असा तुम्हीं विश्वास करावा तें तुम्ही करीत नाहीं. दोन्ही दरडीवर हात ठेवून तमाशा पाहातां. परंतु परिणामी कळेल. दादासाहेब वडील. लोक काय म्हणतील म्हणून भिऊन राहाल तर दौलत बुडते. दादासाहेब कर्ते असते आणि तुम्हासी विरुद्धाचरण करते तरी चिंता नव्हती. आतां परिच्छिन्न बाबुराव यासच कारभारी करणें मनापासून तर चित्त कठोर करून दादासाहेबांचें भय न धरतां सखारामास चार दिवस एकीकडे ठेवावा

व सखाराम कारभारी करणे मनापासून तरी दादासाहेब जाणोत, दौलत जाणो, सखाराम जाणो. रावसाहेबास आपणापाशीं आणावें. मनापासून रावसाहेब व सखाराम यांचें मन शुद्ध नाहीं. तो एकादे प्रसंगीं दगा करील. आमचा हेतू कीं तुमचें कल्याण व्हावें. त्यामुळें लिहिलें म्हणून राग नसावा. सुचवावें म्हणून लिहिलें. ऐंशी हजार फौज, मुलखाचा नाश झाला, डोळे झांकून आंधळें होऊन आडांत पडूं नये. त्वरेनें दोहोंतील एक करणें. लष्करांत आमच्या बिऱ्हाडीं सारे बसले आहेत. हे विज्ञापना. ' ( खरे. ले. ५५ ),

### ४ दुहीच्या उभारणीचें रहस्यः- ★

वरील पत्रावरून बापूंना कारभारांतून काढण्याचा गोपिकाबाईचा निश्चय होत नव्हता असें दिसते. बापूंना कारभारांतून काढावें असा मामाचा आग्रह दिसतो. तसें न केल्यास आपण नोकरींत राहाणार नाहीं अशी धमकीहि त्यांनीं दिली आहे. दादांच्या नाकर्तेपणामुळें व ऐतखाऊपणामुळें पेशव्यांच्या घरचे दागिने गेले व कर्ज झालें असें सांगून गोपिकाबाईच्या स्त्रीहृदयाचा चिमटा घेतला आहे. सखाराम वर्षाकाठीं १०-५ लाखाची कमाई ( लाच ) करीत होते, असा खोटा आरोप केला आहे. शेवटी सखाराम माधवरावाला दगा करील असा इषारा देऊन तिचें मन पूर्णपणें बापूविरुद्ध कलुषित व्हावें अशी व्यवस्था करून ठेवली आहे. पत्राचा एकूण सूर मस्तवालपणाचा आहे. गोपिकाबाईसारख्या राजमातेला मामासारख्यांनीं अशा शब्दांत पत्र लिहिणें हें अत्यंत मगरुरीचें होतें. कोणी या ठिकाणीं म्हणतील, त्रिंबकमामा स्पष्ट वक्ता होता म्हणून, त्यानें गोपिकाबाईस अशा स्पष्ट, अप्रिय पण सत्य शब्दांत पत्र लिहिलें असेल. पण हेंहि खरें नाहीं हें त्यांनीं राघोबास लिहिलेल्या पत्रावरून निर्विवादपणें ठरतें. तें पत्र असें:-- स्वामी ईश्वरांश. स्वामीस स्मरण कोण देणार ? स्वामी सर्वज्ञ. ज्याकाळीं ज्या गोष्टी उचित सेवकलोकांचें स्वरूप पाहून उत्साहभंग न होता स्वामीकार्यास उपयोगी पडो स्वामीचें कृपेंत, ममतेंत, वचनांत अंतर न दिसे तें करावें. मी तर अज्ञानरूपेंच वर्तेन ही निशा स्वामीस. परंतु मजलाही मुख्य विनंती कर्तव्य ते जाते समयीं केली आहे कीं सर्व प्रकारें रा. बाबुराव यास

उमेदवार करून त्यांची निशा पाडून ते उपयोगी पडत ते जरूर करावें. स्वामींनीं ही गोष्ट मान्य केली. प्रस्तुत मनसुभ्याचे डौलास मुख्यत्वें करून ऐकणें जरूर रा. मल्हारबा याचें. त्यास प्रथमच त्याचें बोलणें ऐकणें खलबत करणें निराळे घरांतून बाबूराव यासी निराळे झाल्यास भेद पडत पडत पडेल. यास्तव बाबूराव मल्हारबा पहिलेच एक करावे. मनसुभा घडणें वा मोडणें तो उभयतांवर भार ठेऊन त्यांनींच बोलून येंऊन निश्चयरूप विनंती करणें ती करावी. याप्रमाणें झालिया हिंदुस्थानचे मनसुभ्यास सोय निघणें ती निघेल. वरकड सर्व मजकुराचा अखत्यार बाबूरावावर स्वामींनीं दिलाच आहे. आम्ही एकनिष्ठपणानें स्वामीचेंच हित करीत असतां आम्हांस ईश्वर संकट पाडणार नाहीं. स्वामीचे चित्तांत कोणत्याहि काळीं अन्यभाव उत्पन्न होणारच नाहीं. मग ईश्वरेच्छा न कळे. सूर्यापुढें आम्ही खद्योत. काय म्हणून विनंती लिहावी." ( खरे. ले. ६६ ) या दोन्ही पत्रांच्या भाषेंतील अंतर पाहाण्यासारखें आहे. गोपिकाबाईस लिहिलेल्या पत्रांत दादा सर्वस्वी नाकर्ते व नालायख आहेत असें म्हटलें आहे. दादाला लिहिलेल्या पत्रांत राघोबा 'ईश्वरांश,' 'सर्वज्ञ' 'सूर्य' वगैरे आहेत असें म्हटलें असून आपण दादांचेंच हित करीत आहोंत व दादांच्या मनांत आपल्याबद्दल अन्यभाव केव्हांही उत्पन्न होणार नाहीं वगैरे लिहिले आहे. अर्थात दोन्ही पत्रांतील मजकूर खोटा असून कार्यसाधूपणाचा आहे हें उघड दिसतें. गोपिकाबाईस लिहिलेल्या पत्रांतील भाषा नोकरानें मालकास लिहिल्यासारखी नाहीं. त्यांत गोपिकाबाईस दम भरला आहे. वास्तविक कोणास कारभारी करणें हें ठरवण्याचें काम पेशव्यांचें पेशवे ज्याला कारभारी नेमतील त्याच्या हुकमतींत नाना कंपूनें नोकरी करणें भाग होतें. असें असतां हा नाना कंपू मालकास दम देतो कीं "तुम्ही सखारामास दूर करा नाहीं तर आम्ही नोकरी करीत नाहीं." हें म्हणे इमानी आणि बापू विश्वासघातकी ! या नाना कंपूला एका बापूंना दूर करून तरी समाधान होतें का ? तेंहि नाहीं. सर्व जागांवर आपले लोक हवेत असा त्यांचा आग्रह होता. म्हणून प्रथम बापूंना दूर करणें, नंतर

दादाची वाट लावणें, आणि शेवटीं माधवरावाला खिशांत घालून सर्व सूत्रें आपल्या हातीं ठेवणें अशी दूरवरची आंखणी त्यांची होती. सर्व साधारण आक्षेप घेऊनहि बापूंना कारभारांतून काढून टाकण्याची छाती गोपिकाबाईना होईना म्हणून मामांनी शेवटचें अस्त्र म्हणून " सखाराम रावांना दगा करील " असा खोटा व निंद्य आरोप या पत्रांत करून ठेविला आहे. असा संशय एकदा गोपिकाबाईच्या मातृहृदयांत स्थान करून राहिला तर आपलें काम त्वरित होईल अशी खात्री या कंपूला होती; आणि पुढें थोडयाच दिवसांत बापू कारभार सोडून गेले. अशा तऱ्हेनें माधवरावाच्या हिताची कळकळ दाखवून गोपिकाबाईस कंपूवाल्यांनीं आपल्या बगलेंत मारलें. व माधवरावांना आपण त्यांचे हितकर्ते आहोंत व दादा त्यांचे शत्रू आहेत ही गोष्ट माधवरावांच्या मनावर प्रथम बिंबवून बापू कारभारांत राहिले तर ते दादांचेंच हित करणार असा कानमंत्र दिला. या कारवाईमुळें माधवराव व गोपिकाबाई यांना बापू कारभारांत नकोतच असें वाटूं लागलें. इतकी भूमिका तयार झाल्यानंतर बापूंनीं आपण होऊन कारभार सोडावा अशा प्रकारचा पेंच या कंपूवाल्यांनीं निर्माण केला आणि कारस्थानानें आपण अधिकारारूढ झाले.

**६ कंपूवाल्यांनीं आपला कावा साधला :—** ★

मामांचें पत्र गोपिकाबाईस आल्यानंतर त्याप्रमाणें वर्तावें असा निरोप त्यांनीं माधवरावास पाठवला, त्याचें उत्तर माधवरावांनीं दिलें आहे तें असें— " पांडूबरोबर आज्ञा आली. कारभारी यास सर्व प्रकारें विश्वास देऊन त्यांची निशा पुरवून त्यासच कारभारास लावून काम चालवावें म्हणून आज्ञा. त्यास लिहिलें हें उत्तम. परंतु त्यास विरोध या प्रमाणें पडतो. उभयता कारभारी म्हणत आहेत कीं आम्हांस कर्ज घ्यावें लागतें तरी दादासाहेब यांचा विश्वास नाहीं तरी तुम्ही शपथ-पूर्वक निश्चय करावा की जर दादासाहेब यासही विरोध प्राप्त झाला तरी कबूल करूं ; पण तुमच्या पक्षांत येणार आहोंत. याप्रमाणें शपथपूर्वक विश्वास

द्या म्हणून अट घातली. त्यांस आम्ही बोलिलों कीं तीर्थस्वरूप मातोश्रीस निवेदन करून दोन तीन दिवसांत त्याचें उत्तर देऊं. त्यासी त्यांनीं धीर न धरितां बाबूराव गेले व मामाहि न पुसतां गेले. ऐसी यास या प्रमाणें शपथ दिधलियावरी कारभारी यांसी व तीर्थस्वरूप यासी कांहीं एक निमित्तामुळें विरोध प्राप्त होईल व त्यानंतर घरांतच कलह जो पूर्वी झाला नाहीं तो होईल. यास्तव शपथ करणें उचित नाहीं. जरी असें केले नाहीं तरी कारभारी करीत नाहींत. बंदोबस्त होत नाहीं. लटकें बोलावें हें उचित नसें यास्तव तीर्थरूपाकडे जावें तेथेंच त्यांच्या मर्जीला येईल याप्रमाणें करावें असें मनांत आणून मजल दरमजल जातों आणि कारभारी यांचे मध्यस्थ यासी बोलतों कीं तीर्थरूप स्वच्छ अंतःकरण स्फटिका वत् आहेत. संगदोषे करून मात्र बुद्धिचांचल्य होते. यास्तव विचारें करून दुःसंग दूर करावा म्हणजे उत्तम होईल असें बोलतों कळलें पाहिजे. त्यास याविषयीं कसें करावें हे आज्ञा व्हावी. मजकूर कोणास विदित न होय तें करावें." ( खरे ले. ५९ ) नानाकंपूनें माधवरावांच्या-अल्पवयीपणाचा फायदा घेऊन आपला कार्यभाग उरकण्याचा घातलेला डाव माधवरावांच्या या पत्रानें जिरला. माधवरावाकडून कंपूवाल्यांनीं मागितलेल्या शपथेचा खरा अर्थ व परिणाम माधवरावाच्या लक्षांत आल्यामुळें त्यानें आपण दादांच्या इच्छेप्रमाणें वागण्याचा निश्चय दाखवला. यामुळें कंपूवाले पुनः गडबडले. कार्यनाश होण्याची पाळी आली म्हणून ते गोपिकाबाईपाशीं गेले व थोडी माघार घेऊन कांहीं अटी मान्य करून कारभाराची सूत्रें आपल्या हातीं घेऊन आले. या बाबतींत गोपिकाबाई लिहितात—
"राजश्री त्रिंबकराव येथें आले होते, दादासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें कारभार करतों असें मान्य करून आपणाकडे गेले. आम्ही त्यास चार गोष्टी सांगितल्या त्या त्यांनी मान्य केल्या. त्यांची यादी येणेंप्रमाणें:– चि. राजेश्री दादासाहेबांची मर्जी राखून कारभार करावा. एकनिष्ठपणें व इतबारानें करावा. देशस्थ लोक असोत वा कोकणस्थ. विनाअन्याय पेचांत आणूं नये. रा. त्रिंबकरावाजवळ आम्ही मान्य केलें जें उभयता चिरंजीव तुम्ही जी मसलत सांगाल व सरकारच्या बंदोबस्ताकरतां जो जो मजकूर सांगाल तो तो ते ऐकतील. कोणे विषयी संशय न धरतां कारभार करावा. येणेंप्रमाणें

मान्य करून गेले आहेत. आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे." ( खरे ले ६१ ) या दोन्ही पत्रावरून बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात. नानाकंपूनें बापू-विरुद्ध बंडावा उठवून त्याला पेचांत आणून कारभार सोडणें भाग पाडलें. नंतर आपल्या हातीं कारभार आल्याबरोबर माधवरावाना दादाविरुद्ध शपथ घेण्याची अट घातली. ती मान्य केल्याविना ते राज्याची व्यवस्था पाहि-नात. म्हणजे माधवरावालाहि असा पेंच टाकून त्याच्याकडून दादाविरुद्ध शपथ घेण्याचा डाव कंपूवाल्यांनीं टाकला होता. हा डाव माधवरावाला समजला. याच्या परिणामाचेंहि पूर्ण आकलन त्याला झाले म्हणून तो पूर्ण बिथरला व दादाच्या मताप्रमाणें वागण्याचा निश्चय त्याने दाखवला. आपली आई कंपूवाल्यांना सामील आहे याचीहि जाणीव माधवरावाला होती म्हणून आपला मानस त्यानें आईला स्पष्ट शब्दांत कळवला. बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा हे त्या परिस्थितीशीं तोंड देण्यास लायख आहेत असें दादांना वाटत नव्हतें. शिवाय कंपूवाले आपल्या विरुद्ध आहे. हें तो जाणत होता. त्याचप्रमाणें कंपूवाले देशस्थाचे विरुद्ध होते हेंहि स्पष्ट दिसत होतें. दादांच्या पक्षात बरेच देशस्थ लोक होते. कारभार नानाकंपूच्या हातीं गेला तर सर्व देशस्थानांना पेचांत आणतील असें भय दादांना वाटत होते. दादा सरळ व भोळा होता. तेव्हां गोपिकाबाईनीं माधवराव व दादा या दोघांचेंहि समाधान होईल अशा अटी घालून त्या मामांच्याकडून मान्य करून घेत-त्याचें कळवलें. दादांच्या इच्छेप्रमाणें कारभार व्हावा अशी माधवराची इच्छा होती म्हणून पत्रांत पहिलेंच वाक्य तें लिहिलें आहे. दादालाहि यामुळे असें वाटणें साहाजिकच होतें कीं आपला मान व वडिलकी हे सर्व-जण राखायला तयार आहेत. त्याना बापू तेवढे नको आहेत. कोणाहि देश-स्थाला विनाअन्याय पेचांत आणूं नये. अशीहि एक अट यांत मान्य केली गेली होती. यामुळें दादाच्या मनांतील तीही शंका नाहीशी व्हावी. या सर्वाचा व्हावा तो परिणाम झाला. या अटी माधावराव व दादा यांनाहि पसंत पडला व त्रिंबकरावमामांना दादांनीं कारभारी नेमलें.

## ६ गृहकलहाचा आद्य प्रवर्तक कोण ? ✱

कंपूवाले हे उघडपणें देशस्थांचा द्वेष करणारे होते. त्यांनीं बापूसारख्या धूर्त माणसाला देखील पेचांत आणलें. इतकें कीं आपल्याला हे लोक फशी पाडतील म्हणून त्यांनीं कारभारीपदाचा राजीनामा दिला. बापूसारख्या कर्तबगार माणसाला इतकें भय वाटलें तर इतर देशस्थांची किती केविलवाणी परिस्थिति असली पाहिजे याची कल्पनाच केलेली बरी. बापू व दादा या दोघांना एकदम चीत करण्याचा कंपूवाल्यांचा डाव फसला तरी बापू कारभारांतून बाहेर पडल्यानंतर कारभार जेव्हां कंपूवाल्यांच्या हातीं गेला तेव्हांच दादांची बाजू त्याला नकळत लंगडी पडली. आणि बापूंच्या सल्याच्या अभावीं आतां कंपूवाल्यांचे प्रयोग दादावर होऊं लागले. याचा तपशील पुढें येणारच आहे. कंपूवाले कारभारी व दादा यांच्या भूमिका मनोमन विरोधी स्वरूपाच्या असल्यानें बापूंना कारभारांतून दूर करून दादाच्या विरोधी भूमिकेच्या कंपूवाल्यांना कारभारी नेमल्यामुळें दादा व माधवराव यांचे मध्यें तेढ उत्पन्न होण्याचीं बीजें पेरलीं गेलीं. यानंतर कोणीं कोणाचे कान फुंकले हें पाहाणें प्राप्त आहे. बापूची कांहींच चूक नसता त्यांच्या विरुद्ध नानाकंपूनें विनाकारण चढाई केली यामुळें दादांचें मन स्वाभाविकपणेंच दुखवलें गेलें. माधवरावाकडून दादाविरुद्ध शपथ मागितली. ती दिल्यास दादा व आपण यांच्यामध्यें दुही पडेल असें खुद्द माधरावालाच वाटलें. हा राष्ट्रघातकी प्रयत्न प्रथम कंपूवाल्यांनीं केला हें सिद्ध आहे. दादाविरुद्ध वागण्याची पहिली चिथावणी माधवरावाला कंपूवाल्यांनीं दिली; आणि त्यांनींच दुहीचीं बीजें पेरलीं असें असतां बापूवर तो आरोप हे कंपूवाले करतात ! यालाच म्हणतात चोराच्या उलटचा * * कंपूवाल्यांनीं यावेळीं दादा व बापू यांना कारभारच्युत करण्याची खटपट कां करावी ? कारभारी या नात्यानें हे बापूपेक्षां लायख अगर प्रामाणिक होते कीं काय ? दादाचें अंतःकरण स्फटिकवत् असल्याचें शिफारसपत्र माधवरावाचेंच आहे. या दोघांपेक्षां त्रिंबक-

९२४६८९ ३०१३५५३

राव मामा अगर कंपूवाले अधिक प्रामाणिक व अधिक योग्यतेचे असते तर नानासाहेबांनीं मरणसमयीं कारभार दादा व बापू यांचे हातीं कां दिला असता ? दादा व बापू यांची पारख नानासाहेबांना नव्हती असें मानावयाचें कीं काय ? नानासाहेबांनीं मरणसमयीं दादा व बापू यांना माधवरावांचे विश्वस्त नेमिले या व्यवस्थेविरुद्ध कंपूवाल्यांना बंड करण्याचा काय अधिकार होता? कंपूवाल्यांना पेशवाईबद्दल नानासाहेबांपेक्षां अधिक आस्था खास नव्हती. याच ठिकाणीं तुलनेच्या दृष्टीनें माधवरावांनीं आपल्या मरणसमयीं काय व्यवस्था केली हें पाहाणें वाजवी होणार आहे. नाना कंपूनें माधवरावांची बाजू घेऊन दादांना कैदेंत टाकण्यापर्यंत मजल आणली होती. पण मरणसमयीं नानासाहेबाप्रमाणेंच माधवरावानेंही घरी हरि हरि म्हणत बसलेल्या बापूस जवळ केलें व दादांना बंधमुक्त करून आणून या दोघांच्या हातीं नारायणराव व पेशवाई दिली. नानाकंपूकडे दिली नाहीं. यावरून माधवरावांना शेवटच्या क्षणीं नारायणरावाचें व पेशवाईचें संरक्षण करण्यास दादा व बापू हेच योग्य दिसले. कंपूवाले लायख वाटले नाहींत. यावरून या कंपूनें दादा व बापू विरुद्ध जें शिंग फुंकलें होतें तें स्वार्थाचें व अन्यायाचें होतें असें स्पष्ट ठरतें.

### ७ दुहीचें बीज व बापूंची भूमिकाः— ★

दुहीचें हें बीज पेरण्याचें पुण्य नाना कंपूनें आपल्या पदरांत पाडून घेतल्यानंतर तें वाढीस लावण्याची योग्य तजवीज कंपूवाल्यांनीं केली. त्रिंबकराव व बाबूराव कारभारी झालेनंतर त्यांनीं अर्थात दादाला बाजूस ठेवूनच कारभाराची आंखणी केली. अधिकार ग्रहणाच्या आधीं ज्यांनीं दादाविरुद्ध शपथ मागितली त्यांची मनोभूमिका दादाच्या बाबतींत कशी होती याची कल्पना येण्यासारखी आहे. अशा पद्धतीनें जरी कारभार सुरू झाला तरी दादानें तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. कारण लक्ष घालावयाचें म्हणजे तंटा करावयाचा हें त्यांनाहि दिसतच होतें. बापूचाहि आपण कारभारांत असावें असा हट्ट होता असें वाटत

नाहीं. यावेळीं माधवरावाचें राज्य आपण लुबाडावें असा दादाचा मानस होता असा कोणाचाच दावा नाहीं. आरोप होता तो असा कीं दादाला वडीलकी हवी होती व बापूला कारभार हवा होता आणि माधवराव हुषार असल्यानें तो शिरजोर होऊं नये असा दादा व बापूचा प्रयत्न होता. हा देखील आरोप खोटा आहे. कारभारांतून बापूला काढावयाला दादा तयार नव्हता. दादांना बाजूस सारून कंपूवाल्यांच्या हातांत कारभार द्यायला माधवराव सिद्ध नव्हता. अशा परिस्थितींत कारभारावरून बापूंना कोणी दूर केलें असें नव्हे तर त्यांनींच आपण होऊन कारभार सोडला. "न भीतो मरणादस्मि केवलम् दूषितम् यशः।" अशी त्यांची मनोरचना असल्यानें आपला कारभार पेशवाईच्या हिताचा होत नाहीं अशी ओरड कंपूवाले करीत आहेत. कंपूवाले पेशव्यांचे आप्त असल्यानें तेच आपले हितकर्ते आहेत असे गोपिकाबाईस वाटते. माधवरावांनाहि कंपूवाल्यांच्या म्हणण्यांत तथ्यांश आहे असें वाटतें. अशा परिस्थितींत आपण कारभारांत राहिलों तर पेशव्यांच्या घरीं बेकी निर्माण होईल असा दूरवर विचार करून आपण एकटे दूर झाल्यानें पेशवाईचा राज्यकाभार सुरळीत चालत असेल तर आपण घरीं बसणें योग्य असा सरळ विचार करून बापू कारभारांतून बाहेर पडले हें अगदी स्पष्ट दिसतें.

**८ घोड नदीच्या लढाईला कंपूवालेच जबाबदारः—**

★

कंपूवाल्यांनीं थोडीशी माघार घेऊन कारभारांत चंचुप्रवेश करून घेतला आणि हळू हळू आपले पाय पसरण्यास सुरवात केली. बाहेरून दादांच्या सल्यानेंच आपण वागतो असें दाखवून आतून आपलें म्हणणेंच खरें करावयाचें असा प्रकार नाना कंपूनें सुरु केला. दादाच्या प्रेमांतील लोकांना हळुं हळू आपल्या बाजूस युक्तीनें वळवून घेण्यास त्यांनीं सुरवात केली. यावेळीं मल्हारराव होळकर पुण्यास येणार होता. मल्हारराव कसल्या प्रवृत्तीचा मनुष्य होता याची दादाला नजीबखानाच्या प्रकरणापासून खात्री झालीच होती. ती पानीपत मधील त्याच्या

वर्तनावरून दृढ झाली होती. मल्हारराव होळकर म्हणजे पेशवाईंतील एक बडें धेंड. मल्हारराव सर्वांत वडील होते. त्यामुळें त्यांचा मान सर्वजण ( राघोबासकट ) राखीत होते. मल्हाररावास आपल्यांत दुही आहे हें कळतां कामा नये. आपण व माधवराव आणि कारभारी एक दिलानेंच वागतों आहों. आमच्यांत फुटीर वृत्ति नाहीं असेंच मल्हाररावास दिसावें असें दादास वाटलें. नानाकंपूलाहि मल्हाररावाची भीति वाटली. कारण मनांत आलें तर गोपिकाबाईंना व माधवरावांना अधिकार वाणीनें कांहीं समजूत सांगून दादाच्या बाजूनें तो निकाल देईल व आपण आजपर्यंत कारवाई करून पेशव्यांचें कारभारीपद मिळवलेलें फुकट जाईल असें कंपूवाल्यांना वाटत होतें. म्हणून मामानें दादास आम्हीं मागें दिलेलें पत्र लिहिलें आणि गोडगोड शब्दांत विनविलें की मल्हारराव व बाबूराव (कारभारी) एक करावे. एवढ्यावरच कंपूवाले स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं मल्हाररावाला आपल्या बाजूस वळवून घेण्यासाठीं त्याच्या भिडेचीं माणसें मध्यस्थीस घालून त्याला फितविण्याचा घाट घातला. त्रिंबकराव बाबूरावास लिहितो " ज्येष्ठ श्रीमंतांचा स्वभाव क्षणिक. संगतीचे दोषें करून त्यास मुख्यत्वें युक्तीनें हिऱ्याची रीम काढली आणि निघाली तरच कारागीरी. तुम्ही मुख्यत्वें करून ज्येष्ट श्रीमंतांशीं थोडी झीज सोसून युक्तीनें आपल्या पल्यावर आणून एखादे गोष्टींत थोडेसें रगडूनहि याजप्रमाणें परिच्छिन्न केलेंच पाहिजे. वर्ष सहा महिने निभावल्यानें कुचोद्य फजीत पावून सर्वहि उत्तमच होईलसें दिसतें. वचनें करून सर्व गोष्टी श्रीमंतें आमच्या जवळ कबूल केल्याच आहेत. पण प्रकृत एक प्रकारची यास्तव बाहेर तर वजन दाखवून अंतस्थ आपलेच कलें शेवटास न्यावें. या गोष्टीस मातबर पेंच पाहातां एक मल्हारबाचा, तो प्रकार आपण बोललों होतों कीं विष्णुपंताचे हातें जसा पाहिजे तसा अनुकूल घेऊन कसे करतो पाहा. " या सर्व परिस्थितीचा विचार करून राघोबानेंहि या वेळीं माघार घेतली व कारभारी व दादा यांच्यामध्यें वेळो वेळीं खटके उडण्याचे जे प्रसंग येत ते कसे का होईना टाळावे म्हणून बऱ्याच वाटाघाटी, आणा शपथा होऊन

मामा व बाबूराव यांना पूर्ण आखत्यारी देण्यांत आली, व दादा नाममात्र वडील राहिले. या बाबतींत खालील पत्र महत्वाचें आहे. 'मामांनीं व तुम्हीं कारभार करावा. मजला सुचेल तें मी सांगेन. माझे शागीर्द आहेत तेवढ्याचा मी कारभार करीन. आबा व नाना पुरंदरे व सखाराम यांचे सरंजामाची घालमेल करूं नये. चालवावे " सर्व कारभार कंपूवाल्यांनीं आपल्या इच्छेप्रमाणें करावयाचा. दादानीं आपल्याला कांहीं सुचल्यास कारभाऱ्यांना सुचवायचें या पलीकडे दादाला अधिकार नव्हता. त्यानें आपले शागीर्द यांच्या पुरता कारभार करावयाचा म्हणजे त्यांचा खासगी कडील कारभार त्यांनीं पाहायचा. या कराराप्रमाणें दादा नामधारी बनला व नानाकंपू सर्वाधिकारी झाला! दादानें हा अधिकार संन्यास का घेतला असावा ? कारवाया करणाऱ्या कंपूवाल्यांना तुरंगांत डांबून दादाला कारभार करणें अशक्य नव्हतें. पेशवाईच्या हिताकडे न पाहतां फक्त आपल्या हातांत कारभार कसा येईल एवढीच विवंचना दादाला असती तर त्यांना यावेळीं असा अधिकारसंन्यास घेण्याची कांहींच जरूरी नव्हती. दादाला पेशवाईचें संरक्षण करणें, माधवरावाचें अनहित न करणें या बाबी अधिकारापेक्षां अधिक जवळच्या वाटत होत्या. म्हणून मल्हाररावासारख्या धूर्त माणसासमोर आपल्या घरांत एकी नाहीं हें दृश्य दाखवूं नये म्हणून दादांनीं असा विचार केला कीं माधवराव लहान असेतोंपर्यंत कंपूवाले काय कारभार करतात तो करोत. फारच वाहयात् वागूं लागले तर त्यांना हात दाखवतां येईल. सध्यां तरी गृहकलह टाळावा या हेतूनेंच त्यांनीं अधिकारसंन्यास घेतला असला पाहिजे असेंच म्हणावें लागतें.

नाना कंपूनें प्रथम बापूंचा काटा काढाला व नंतर थोड्याच दिवसांत राघोबाला नामधारी बनवलें; फोडा व जोडा ही नीति अमलांत आणून त्यांनीं सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली. दादांच्या हातून सत्ता काढून घेण्यास पूर्वीपासून उत्सुक असणाऱ्या कंपूवाल्यांना वर दिल्याप्रमाणें ठराव झाल्यानंतर दादांना नाममात्र बनवणें काय अवघड होतें ? दादांची त्यावेळीं

समजूत होती कीं असें ठरवल्यानें कारभारी आपला सर्व मान काढून घेण्याची अगर आपल्याला पूर्णपणें धाब्यावर बसवण्याची छाती करणार नाहींत. ते आपला योग्य तो मान ठेवतील व कारभार आपल्या सल्ल्या-नेंच करतील. पण अधिकार लालसेनें अंध बनलेल्या कंपूवाल्याना दादांची पुरी रग जिरवल्याशिवाय समाधान वाटणें शक्य नव्हतें. आंतून ते दादा-बद्दल द्वेषानें भरलेले होते. दादा जरी कारभार-संन्यास घेऊन बसले तरी केव्हांही ते आपल्याला भारीच आहेत व मनांत येईल त्यावेळीं तें कारभार आपल्या हातांत घेऊं शकतील याची धास्ती नानाकंपूला वाटत होती. दादाची शक्ती कमी करून ते आपल्या वाटेला केव्हांही जाऊं शकणार नाहींत अशी व्यवस्था करणें कंपूवाल्यांना त्यांच्या हिताच्या दृष्टीनें जरूरीचें होतें. त्यामुळें कंपूवाल्यांनीं दादांना सर्व बाजूंनीं पेंचांत आण-ण्यास सुरवात केली. त्यांचा सल्ला मुळींच न घेतां कारभार होऊं लागला. त्यांचा वरवर देखील मान कारभारी ठेवीनासे झाले. कंपूवाल्यांनीं सैन्य जमवण्यास सुरवात केली. या सर्व अपमानाच्या परिस्थितीची जाणीव होताच दादा चिडला. नानासाहेबांचा सख्खा भाऊ. नाना-साहेबांनीं मरणसमयीं त्याच्यावर माधवरावाची व पेशवाईची जबाबदारी टाकली होती. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें तर दादा नानासाहेबांनीं नेमलेला 'विश्वस्त' होता. कांहींही चूक नसतांना कंपूवाल्यांनीं बापूविरुद्ध गिल्ला करून त्याला कारभारांतून दूर करविलें आणि शेवटी आपणालाहि निर्माल्यावत करूं पाहातात. या गोष्टीची दादाला खंत वाटणें मनुष्य स्वभावास धरूनच होतें. आणखी कांही दिवस असेंच जाऊं दिल्यास कंपूवाले आपल्याला कैदहि करतील असें दादास वाटले. या मनस्थितींत कारभाऱ्यांच्या वर्तनावर संतापून दादा पुण्याबाहेर पडले ते वडगांवपर्यंत गेले. दादा संतापून गेले. तर कंपूवाल्यांना त्याचें काय होतें ? काय करतो पाहूं होऊन जाऊंद्या एकदा अशी आव्हानवृत्ति कंपूवाल्यांची होती. कंपूवाल्यांतील पटवर्धन मंडळींना समशेरीची घमेंड होतीच. त्यांनीं दादांना कैद करण्यासाठीं सैन्याची जमवाजमव केली. कंपूवाल्यांना बापूची केव्हांही भीति वाटत

होती. मुत्सद्देगिरी, शौर्य व सन्मान या सर्व बाबींत बापूंना पेशवाईंतील जनतेंत फार मोठें स्थान होतें. तेव्हा बापूंना कैद करावें अथवा दगा करून मारून टाकावें असा घाट कंपूवाल्यांनीं घातला होता. गोविंद हरी लिहितोः– " दादासाहेबाकडील प्रकार लिहिला. तो विस्तारें कळला. ते राज्य बुडवावे या अर्थांत आहेत. बहुतेक गतवर्षापासून सांगत आलों तेवढा एक (सखाराम बापू) अटकेंत असता तर दादासाहेब उगेच असते. परंतु त्याच्या निमित्तें करून उत्तर प्रांताची फौज दौलत लयास गेली. आणखी किती नाश होणार तो कसा चुकेल ? शकुनी आहे. कार्य आणि त्यास तरतूज करणें नाही. रात्रीचा शे-दोनशें माणसांनीं उचलून किल्यावर नेऊन घालावा अगर एखाद्या राजकारणास म्हणून गांवा-बाहेर कोस दोन कोस नेऊन तेथून उडवावा. ही तरतूज करावयास चुकूं नये. एक "सकार नामक हस्तगत झाला म्हणजे गुंज मोडली." अशा तऱ्हेनें कंपूवाल्यांच्या लष्करी हालचाली सुरूं होतांच दादांनींही सैन्य जमवण्यास सुरवात केली. शेवटीं कंपूवाल्यांची आणि दादाची घोडनदीवर गांठ पडून त्या लढाईत कंपूवाल्यांचा संपूर्णपणें पराभव झाला ! या लढाईला दादा जबाबदार होते कीं कंपूवाले ? पेशवाईचें नानासाहेब मालक होते. त्यांच्या पश्चात माधवराव हे मालक झाले. माधव-रावांच्या अल्पवयांत पेशवाईचीं सर्व सूत्रें दादाच्या हातीं असावींत अशी नानासाहेबांची व्यवस्था होती. घोडनदीच्या लढाईपर्यंत राज्याचा अपहार करावा असें दादाच्या मनांत होतें असा त्यांचेवर कोणाचाहि आरोप नाहीं. माधवरावाविरुद्ध आपसांत दुही पाडण्याचा कोणताही प्रयत्न दादा अगर बापू यांनीं केल्याचें दाखवतां येण्यासारखें नव्हतें. माधवरावाच्याहि मनांत दादाशीं कलह करावा असें नव्हतें. दादांचें अंतःकरण माधवरावाविषयीं स्फटिकवत् होतें असें माधवरावाचेंच म्हणणें होतें. अशा परिस्थितींत बापूना कारभारांतून काढून टाकावें असा आग्रह करणारा हा नाना कंपू कोण ? दादांच्या हातांतून कारभाराचीं सूत्रें काढून घेण्याची खटपट करण्याचा कंपूवाल्यांना काय अधिकार होता ? दादांच्या इच्छेविरुद्ध बापूना कारभाराबाहेर पडावें लागलें.

त्या वेळच्या परिस्थितींत बापूसारखा हरहुन्नरी व कर्तबगार कारभारीच पेशवाईला हवा होता हें दादांना दिसत होतें. त्यामुळें बापू कारभाराबाहेर गेल्याबद्दल त्यांना स्वाभाविकपणेंच वाईट वाटलें. एवढ्यानेंहि समाधान न पावतां नानाकंपूनें दादांनाही निर्माल्यवत् करून ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. अशा सर्व बाजूंनीं दादांचा अपमान करून कंपूवाल्यांनीं दादांना दुखवलें. आपल्याकडून कसलीही चूक झालेली नाहीं, माधवरावाबद्दल आपल्या मनांत कसलाही किंतु नाहीं. आपण माधवरावाच्या अगर पेशवाईच्या हिताविरुद्ध कांहींही केलेलें नाहीं, असें असतां कंपूवाल्यांनीं आपल्याविरुद्ध शिंग फुंकलें आणि माधवराव अगर गोपिकाबाई यापैकीं कोणीही त्याला विरोध करीत नाहीं या गोष्टीचें दादांना मनस्वी वाईट वाटलें. त्याचा परिणाम असा झाला कीं कंपूवाल्यांच्या या कृत्यास माधवराव व गोपिकाबाई यांचा पाठिंबा असला पाहिजे असें दादास वाटलें आणि तो संतापला तर त्यांत त्याचा काय दोष होता? दादाला कैद करण्यासाठीं सैन्य जमवणें, बापूला घातानें बंदींत टाकणें, अगर मारणें अशा कारवाया कंपूवाल्यांनीं कां कराव्यात? आणि अशा कारवायांना उत्तर म्हणून दादानें आत्मसंरक्षणादाखल सैन्य जमविलें तर त्याला कसा दोष लावतां येईल? दादा बरोबर समरांगणावर चार हात करून दादाला नामोहरम करून टाकण्याची कंपूवाल्यांना खुमखुमी होती आणि त्यांच्या या अशा स्वार्थी व राष्ट्रघातकी वर्तनामुळेंच घोडनदीचा प्रसंग उद्भवला असेंच ठरतें.

**९ घोडनदीच्या लढाईचें पर्यवसान:—**

घोडनदीच्या लढाईंत नाना कंपूचा चांगलाच पराभव झाला व पटवर्धनांच्या समशेरीची रग जिरली. माधवरावाला आपली चूक कळून आली. दादांचें शुद्ध अंतःकरण माधवराव जाणत होता म्हणून तो दादांना शरण गेला. दादांचें माधवरावावर प्रेम होतें आणि कंपूवाल्यांच्या कारवाईला

बळी पडूनच त्यानें आपल्याविरुद्ध वर्तन केलें असें पटल्यामुळें माधवरावाचे सर्व अपराध पोटांत घालून राज्याची धुरा त्यांनीं पुनः आपल्या शिरावर घेतली. घोडनदीच्या लढाईला बहुतांशीं कारण पटवर्धन मंडळी होती, म्हणून त्यांना धडा देण्यासाठीं दादांनीं मिरजेवर हल्ला केला व त्यांना जेरीस आणलें. याबाबत दादांनीं आपल्याविरुद्ध मदत केलेल्या सर्वांवर सूड उगविला असें भरमसाट विधान कांहीं इतिहासकार करतात पण तें खरें नाहीं. पटवर्धनाखेरीज दादांनीं दुसऱ्या कोणावरही हल्ला केल्याचे मुळींच दाखले नाहींत. माधवराव व दादा यांच्यामध्यें बेकीचें बीज पेरण्याच्या कामीं पटवर्धनच मुख्य होते अशी दादाला खात्री होती आणि पेशव्यांच्या घरांत दुही निर्माण करण्याचा घातकी प्रयत्न केल्याबद्दल दादांनीं पटवर्धनांना धडा दिला. यामुळें गोपाळराव पटवर्धन निजामाला मिळाला व घरांतील सर्व भेद त्याला देऊन त्याच्याकडून पुणेंशहर लुटविलें. गोपाळरावाच्या या वर्तनाचें समर्थन करीत श्री. सहस्त्रबुद्धे म्हणतात (माधवराव चरित्र पान ५६) " माधवरावाच्या पक्षांतील लोकांवर सूड उगविण्यांतच राष्ट्राचें बरेंच बळ खर्ची पडून राष्ट्रहिताचे दुसरे अनेक उद्योग बाजूस राहिले. अर्थात आपापलीं इनामें जप्त झाल्यामुळें तीं परत मिळविण्याच्या हेतूनें बरेच सरदार आतां निजामास जाऊन मिळाले. त्यामुळें पुढें लवकरच मराठ्यांवर मोंगलाच्या स्वारीचें जें अरिष्ट कोसळलें त्याची जबाबदारी मोंगलांना फितूर होणाऱ्या मराठे सरदारापेक्षां दादावरच जास्त पडते असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं." गोपाळराव पटवर्धन अगर नाना कंपूंतील इतर लोक माधवरावाची बाजू घेऊन भांडत होते. दादाकडून पेशवाईचा कारभार योग्य रीतीतें होत नाहीं. पेशवाईबद्दल व माधवरावाबद्दल आम्हांला फार प्रेम व कळकळ आहे म्हणून आम्ही एवढे तळमळतों आहों अशी त्यांची दाखवावयाची भूमिका होती. पण वास्तविक हे सर्व लोक स्वार्थांध होते. पेशवाईची काळजी यांना मुळींच नव्हती. आपला स्वार्थ साधण्यासाठीं पेशवाईचा बळी देखील द्यावयाला यांची तयारी होती. पटवर्धनांना दादावर सूड उगवावयाचा होता असें मानलें तरी

निजामाला सामील होऊन पेशव्याचा पराभव केला तर पेशवाई बुडेल हें कंपूवाल्यांना समजत नव्हतें काय? पेशव्यांच्या नाजूक परिस्थितींत निजामाला मदत देऊन पेशवाईवर गंडांतर आणणें रास्त होतें काय? ही वृत्ती नादानपणाची होती हें कोणाही सरळ मनुष्यास मान्य करणें भाग आहे. कंपूवाल्यांची ही वृत्ती पहा आणि दादांच्या पक्षांतील लोकांची वृत्तीही पहा. माधवरावांनीं व नंतर नाना फडणविसांनीं दादांच्या पक्षांतील लोकांचा अतोनात छळ केला. पण ते मोंगलांना जाऊन मिळाले नाहींत. सखाराम हरीला नानानें छळून मारिला पण "मेलों तरी माझीं हाडें रघुनाथराव म्हणतील" असा रोखठोक स्वामीभक्तिपूर्ण जबाब देऊन त्यांनीं देह ठेवला. मानाजी शिंदे ( ज्याला 'फाकडा' अशी अभिमानाची पदवी मिळाली होती ) ग्वाल्हेरच्या गादीचा वारस. पण नानाकंपूनें ती गादी दासीपुत्र महादजीस दिली आणि जन्मभर मानाजी फाकड्यास रगडून काढिला. विना अपराध बापूंना कारभारावरून दूर केलें. त्यांनीं निजामाला सामील होण्याची इछा दर्शविली असती तर निजामानें त्यांना आपल्या कारभारांत खास घेतलें असतें. बापूंना अगदीं निर्माल्यवत् करून टाकलें तेव्हां मोंगलांना मिळणें त्यांना कठीण होतें काय? पण दादांचीं हीं माणसें खरीखुरी राष्ट्राभिमानी होतीं. त्यांना पेशवाईची काळजी होती. राष्ट्रघातकी व स्वार्थी बुद्धि त्यांची नव्हती. मग गोपाळरावांनीं मोंगलांना मिळणें राष्ट्रघातकी कां नव्हतें? ज्याच्या विरुद्ध थोडासा अन्याय होतो, त्यानें शत्रूला मिळणें योग्य होतें असें मानणें न्यायाचें होईल काय? मराठे शाहींत बऱ्याच लोकांवर अन्याय झाल्याची अनेक उदाहरणें आहेत. पण त्यामुळें शत्रूला सामील होण्याचा राष्ट्रघातकी मान फक्त नानाकंपूंतील पटवर्धन आदि मंडळींनींच मिळविला! या बाबतींत पटवर्धनांच्या वर्तनाचें समर्थन करणें म्हणजे "सैतानाची वकीली करणें" होय असेंच म्हणावें लागतें.

## १० स्वार्थांध नाना कंपू:—

नाना कंपूतील मंडळींची वृत्ती मुळींच राष्ट्रीय स्वरूपाची नव्हती. त्यांना आपल्या स्वार्थापुढें पेशवाईची मुळींच दिक्कत वाटत नव्हती.

त्यांनीं आपला स्वार्थ साधण्यासाठींच दादा व बापू यांच्या कारभाराविरुद्ध खोटी ओरड सुरू केली होती. दादांचा कारभार शहाणपणाचा व न्यायी होता. पण कंपूवाल्यांनीं त्याविरुद्ध ओरड करून गोपिकाबाईच्या मदतीनें माधवराव व दादा यांच्यामध्यें वैमनस्य उत्पन्न करून दादांच्या हातून सर्व सत्ता काढून घेतली. याबाबत इंग्रजांचा वकील डब्ल्यू. टेलर वारन् हेस्टिंग्सला लिहितो " The wise and just administration of Raghoba would have totally defeated the views those bad men ( money making Brahmins ) had formed by benefiting themselves by the minority of Madhavrao. They therefore exerted every artifice and intrigue, to deprive Raghoba of power. Gopikabai the widow of Nana was a woman deeply given to intrigues of every kind, and her scandalous licentiouness justly attracted the reproach of one so nearly concerned in the honour of the family as her husband's brother. Hence arose the bitter hatred of Gopikabai to Raghoba. The ministers availed themselves of this circumstance and of her influence with her young son to breed a coldness between the uncle and nephew, which ended in a declared breach, the total deprivation of power and at length, in some degree, in the confinement of Raghoba " ( Forest. Selections, Maratha Series V 250 ) " माधवरावाच्या अल्पवयीपणाचा फायदा घेऊन त्या वाईट लोकांनीं ( पैसे खाऊ ब्राम्हणांनीं ) राघोबाविरुद्ध उठविलेल्या कंड्या त्याच्या न्यायी व शाहाणपणाच्या कारभारामुळें नामशेष झाल्या असत्या. म्हणून या लोकांनीं राघोबाच्या हातून सत्ता काढून घेण्यासाठीं सर्व प्रकारचे डाव व कारस्थानें करण्याची शिकस्त केली. नानासाहेबांची पत्नी गोपिकाबाई ही महाकारस्थानी होती. तिच्या रंगेल वर्तनाबद्दल घराण्याची चाड असणाऱ्या तिच्या सख्या दिरानें ( राघोबानें ) तिची खरडपट्टी काढली होती. यामुळें गोपिकाबाई राघोबाचा अत्यंत द्वेष करू लागली. या तिच्या द्वेषाचा व तरुण माधवरावावरील तिच्या दाबाचा फायदा घेऊन मुत्सद्यांनीं ( नाना कंपूनें ) चुलता पुतण्यांत तीक्ष्ण वैमनस्य

६६८३ दा. क.

उत्पन्न केलें आणि याचें पर्यवसान ( क्रमानें ) उघड वैमनस्य, दादांच्या हातून सर्व सत्ता काढून घेणें आणि शेवटीं त्यांना बंदींत टाकणें यांत झालें "

११ निजामाशीं युद्धः— ★

मागें सांगितल्याप्रमाणें पटवर्धनआदि करून मंडळी निजामाला मिळाल्यामुळें या घरभेद्यांच्या सहाय्यानें त्यानें थेट पुण्यावर मोर्चा वळवला. या वेळीं निजामानें प्रचंड सैन्य जमवलें. आजपर्यंत पेशव्यांनीं आपला पराभव अनेक लढायांतून केला होता. त्या सर्वांचा सूड उगविण्याचा घाट त्यांनी घातला. मराठ्यांची शक्ति या फितुरीमुळें क्षीण झाली होती. अशा अडचणीच्या प्रसंगीं निजामाला उघड्या मैदानावर तोंड देणें मराठ्यांना शक्य नव्हतें. पेशवाईवरील हा प्रसंग अत्यंत आणीबाणीचा होता. अर्थात या प्रसंगीं बापू लढाईचे कर्णधार होते. मल्हाररावाकडे माधवरावांना पाठवून महत्प्रयासानें त्याची मदत बापूंनीं मिळविली तरी पण उघडी लढाई देणें कठिण होतें. म्हणून गनिमी काव्याची लढाई बापूंनीं सुरू केली. पेशवाईवरील संकटाकडे लक्ष देऊन बापूंनीं स्वतःचा मानपान दृष्टीआड केला व पटवर्धन आदि राष्ट्रघातकी फितूर लोकांचें मन वळवून त्यांना मोठ्या शिताफीनें परत आपल्या बाजूस ओढलें. बापूंचे हे सर्व प्रयत्न फळाला येईपर्यंत निजामानें पुणें गांठलें व शहर लुटून घेतलें. पण तोंपर्यंत बापूंनीं निजामाची शक्ति बरीच कमी केली होती व आपली वाढविली होती. शेवटीं निजामाची व मराठ्यांची राक्षसभुवन येथें गांठ पडून त्यांत बापू व दादा यांनीं निजामाचा पूर्ण पराभव केला. या लढाईच्या बाबत श्री. सहस्रबुद्धे यांनीं बापूंना प्रशस्तिपत्र देऊन म्हटलें आहे कीं " या संकटांतून पार पडण्यासाठीं सखाराम बापूनें जिवापाड मेहनत केली " तेच सहस्त्रबुद्धे केसरींतील आपल्या लेखांत लिहितात " या शहाण्या माणसाच्या गनीमी काव्याचा फायदा म्हणजे निजाम पुण्यास आला आणि त्यानें शहर लुटून जाळून फस्त केलें. " यावेळीं गनीमी काव्याची लढाई न देतां उघडी लढाई बापूंनीं द्यावयास पाहिजे होती

असें त्यांचें मत दिसतें. उघडया मैदानावर लढा देण्याचें सामर्थ्य असतांना गनीमी काव्यानें लढाई देण्याइतपत बापू भित्रेहि नव्हते व मूर्खहि नव्हते. उघडया मैदानावर लढाया देऊन त्यांनीं मोंगलांना अटकेपार पळवून लाविलें होतें. त्यांना पेशवाईंतील एक संपूर्ण शहाणा समजत असत. मल्हाररावासारख्या कसलेल्या आणि मुरलेल्या योद्धयाला देखील हा मार्ग पटला होता. बापूंचा जन्मभर द्वेष करणाऱ्या नाना कंपूनेंही बापूंच्या गनीमी काव्याच्या धोरणाबाबत टीका केलेली नाहीं. तसेंच तत्कालीन लोकांपैकीं कोणींही नापसंती व्यक्त केलेली दिसत नाहीं. कोणीं इतिहासकारांनींही तशी टीका केलेली नाहीं. तेव्हां श्री. सहस्रबुद्धे यांच्या या आक्षेपाला कांहींच महत्व उरत नाहीं. बापूवर टीका करावयाची अशा भूमिकेवरून टीका करणाऱ्याला उत्तर देण्याचें कारण उरत नाहीं. मराठ्यांनीं अनेक वेळा शत्रूंचीं शहरें उध्वस्त केलीं होतीं, त्याप्रमाणें यावेळीं मराठ्यांची ताकद कमी पडतांच निजामानें त्याचा फायदा घेऊन पुणे शहर लुटलें ! त्याला बापू कसे जबाबदार आहेत ? याबाबत दोष कोणाला द्यावयाचाच असेल तर तो नानाकंपूंतील निजामाला फितूर झालेल्या पटवर्धनादि सरदारांनाच देणें योग्य होईल.

**१२ दादा व बापू स्वार्थी नव्हते:—**

लढाईची माधवरावांना माहिती व्हावी म्हणून या लढाईत त्यांना दादांनीं आपल्या बरोबर नेलें होतें. त्यांच्या हवाली कांहीं सैन्य देऊन एका जवळच्या टेकडावर लढाईची हालचाल पहात राहण्याबद्दल सांगितलें होतें. लढाईच्या ऐन मोक्याच्या प्रसंगीं दादा शत्रूकडून चारी बाजूंनीं घेरले गेलेले माधवरावांना दिसलें. आतां घात होणार हें जाणून, प्रसंगावधान राखून ते दादाच्या मदतीला धांवले. रस्त्यांत मल्हारराव होळकर आपल्या सैन्यासह लढाईंतून पळ काढीत असलेले दिसले. त्यांनीं माधवरावाला परत फिरण्याचा सल्ला दिला. तें ऐकून माधवरावांना अत्यंत संताप आला व वाईट बाटलें. त्यांनीं धारिष्टानें मल्हाररावास सडकलें “ पानपतमध्यें तुम्हीं दगा दिला असें ऐकलें होतें, आज त्याची मला खात्री पटली.”

हा घाव मल्हाररावाला फार वर्मी लागला. तो म्हणाला "चल बाळा, आणि पाहा माझ्या तलवारीचें पाणी " या माधवरावाच्या मदतीनें धोका टळून मराठ्यांनीं लढाई जिंकली. या लढाईनंतर माधवरावाचें अंगचें शौर्य, समयसूचकता व घराण्याचा अभिमान हे गुण पाहून दादा खूष झाले व त्यांनीं आपण होऊन पेशवाईचा कारभार माधवरावाच्या हवाली केला व त्याच्या शहाणपणाबद्दल गोपिकाबाईकडें खूप स्तुति केली. या दादांच्या वर्तनांत अधिकारलालसा अगर स्वार्थ मुळींच दिसत नाहीं. दादाला पेशवाई राखावयाची होती. ती राखावयाला माधवराव समर्थ झाला अशी खात्री पटतांच, त्यांनीं पेशवाई त्याच्या हवालीं केली. यावरून दादा मुळींच स्वार्थी नव्हते असेंच ठरतें. माधवरावांच्या हातीं कारभार दिला म्हणजे नाना कंपू अधिकारारूढ होणार हें बापू जाणून होते. यांना कारभारी पदाची हांव असती अगर चुलता-पुतण्यांत दुही उत्पन्न करावयाची असती तर त्यांनीं दादाला कारभार माधवरावाकडे देऊं नका असाच सल्ला दिला असता. पण माधवराव हे मालक होते. ते जाणते आणि कर्तबगार झाल्यानंतर त्यांच्या हातीं कारभार जाणेंच योग्य असें बापूंना वाटलें म्हणून बापूंनीं कारभार माधवरावांना देऊं नका असा सल्ला दिला नाहीं. यावरून त्याच्यावर याबाबत केलेले आरोप निराधार ठरतात.

**१३ नानाकंपूची पुनः उचलः—** ★

या नंतर २–३ वर्षें कारभार बापूकडेच होता. त्यानंतर पुनः नाना कंपूनें उचल खाल्ली व आपला पगडा माधवरावावर बसवणेस सुरवात केली. त्यांनीं पुनः दादा व बापू यांच्या विरुद्ध माधवरावाचे कान फुंकणेस सुरवात केली. नाना कंपूनें सर्वच ह्मणणें माधवरावाला पटत होतें असें नाहीं. पण घोडनदीच्या पराभवाचें शल्य त्याच्या मानीमनाला डांचत होतें. दादा व बापू एक होऊन आपणाला कैद करतील कीं काय असाहि संशय त्याच्या मनाला चाटून जाई. राक्षस भुवनच्या यशानंतर दोन तीन वर्षांचा काळ लोटला गेला आणि या अवधींत बापूंनीं सर्व बाजूंनीं परिस्थिति पूर्णपणें आवाक्यांत आणिली

होती व मराठ्यांचा पुनः पूर्वीप्रमाणें दरारा बसविला होता. माधवरावाला मोठेपणाची फार हांव होती. तो अत्यंत मानी होता. आपण एकट्यानेंच सर्व यशाचा मालक असावें असें माधवरावास वाटे. समशेरबहाद्दर दादा समरांगणांत असेपर्यंत माधवरावाचें पराक्रमाचें तेज पडणें शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें बापूसारख्या हुषार मुत्सद्याला कारभारांत ठेवून यशाची भागिदारी होऊ देणेंहि त्याला आतां बरें वाटेनासें झालें. या माधवरावाच्या अंतर्यामीच्या तळमळींत कंपूवाल्यांच्या विषारी चाहडीची भर पडून माधवरावानें हळुंहळूं बापूंना कारभारातून दूर केलें. आणि पुनः नानाकंपू अधिकारारूढ झाला. नानाकंपू अधिकारावर आल्यानंतर दादाचा सर्व प्रकारें अपमान होणें क्रमप्राप्तच होतें. शिवाय दादा व बापू यांच्याबद्दल खोट्या कंड्या पिकवणें, त्यांच्या विरुद्ध वाटेल तो कानमंत्र देणें वगैरे गोष्टी चालू झाल्यामुळें माधवरावाचें मन दादाविषयीं संशयी बनूं लागलें. माधवराव जसा दादाबद्दल संशयी वृत्तीनें वागूं लागला तसा दादा संतापू लागला. नाना–कंपूच्या कारवाया घोडनदीच्या वेळीं पूर्णपणें माधवरावाला पटल्या असतांना माधवरावानें पुनः त्यांच्या म्हणण्यावर कां विश्वास ठेवावा असें दादाला वाटे. बापूंच्या प्रभावी कारभारामुळें मराठ्यांची सर्व बाजूंनीं परिस्थिति उत्तम प्रकारें सुधारली असतांना कंपूवाल्यांचे ऐकून बापूंना अधिकारावरून काढण्याचा कंपूवाल्यांचा सल्ला माधवरावानें कां ऐकावा असें दादास वाटे. आपण खुल्या दिलानें माधवरावाच्या हितासाठीं झटत असतां त्यानें आपल्याबद्दल संशयी वृत्ती कां ठेवावी ? याचा दादाला विषाद वाटे. असें होता होता दादा व माधवराव यांच्यामध्यें पुनः लढाई होण्यापर्यंत गोष्टी आल्या.

**१४ दादांनीं अर्धें राज्य मागितलें म्हणेः—**

अशी दोघांच्यामध्यें घासाघीस सुरूं होती. याबाबत पटवर्धनांचा कारकून गोविंद हरीस लिहितो “श्रीमंत उभयतां पुण्यास आले. आठदिवस झालेवर थोरले श्रीमंतांनीं बोली घातली कीं ‘निमें राज्य वांटून

स. नं. ९३ स्थळ प्रत



द्यावें.' धाकटे श्रीमंतांनीं उत्तर केलें कीं राज्य कोणाचें ? आम्ही वाटणार कोण ? आमच्यानें वाटवत नाहीं. सर्व राज्य तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसे तुम्हां जवळ असो. सर्व तुम्हींच करणें.' याप्रमाणें जाबसाल झाले. तमाम परगणेकरी आले. कोणाचा हिशेब पहात नाहीं. कोणी रसदेची गोष्ट बोलत नाहीं. घरामध्यें दुही लागली आहे. आज पांच रोज शिक्के होत नाहींत. कारभारी नाहीं. सर्व मंडळी थोरल्याकडील आहेत. त्यांचीच भर भर ? आमचे यातीचे ( कोंकस्थाचे ) कोणी दरबारांत देखील जात नाहीं. पहिली धास्त त्यास लागली आहे. शिवगण ( दादांचे ) शंभर मंडळी आहे. उगेच जाऊन नाना प्रकारें सांगतात. राज्याचा तो ताल गेला. सर्व लोक दिलगीर. पुनरपि पुण्याची गत काय होईल न कळें म्हणोन लोक बोलो लागले ( खरे., लेख. नं. ५७४ ) या पत्रांतील मजकूर खरा असें मानलें तर दादांची ही मागणी न्याय्य होती कीं नाहीं हें पाहूं. थोरले बाजीराव पेशवे असतांना त्यांचा लहान भाऊ चिमाजीअप्पा हे पेशव्यांचे कारभारी होते. नानासाहेब पेशवे झाले तेव्हां कारभाऱ्याचीं वस्त्रें सदाशिवरावभाऊंना दिलीं. पानपतवर भाऊ गेले तेव्हां कारभारी म्हणून दादाची नेमणूक झाली. अशा तऱ्हेनें वडील भावाकडे पेशवेपद तर लहान भावाकडे कारभारीपद असा शिरस्ता छत्रपतीनीं घालून दिला होता. नानासाहेबांनीं दादांचें हें कारभारीपण मरणसमयीं कायम केलें होते. माधवरावाच्या अल्पवयीपणामध्यें पेशव्यांचेहि अधिकार दादाकडे आले होते. ते माधवराव कर्ते झाल्याबरोबर त्यांचेकडे गेले. पण दादांच्या कडचा कारभारी-पणाचा हक्क काढून घेणें न्यायाचें नव्हतें. दादांचा हा हक्क वंशपरं-परेचा झाला होता. शाहू महाराज व संभाजी राजे यांच्यामध्यें ता. १३ माहे ४ सन १७३१ रोजीं कृष्णा वारणेच्या तहानें छत्रपतींच्या राज्याची वांटणी झाली होती. ( मोंगल मर्दिनी ताराबाई पा. २५४ ) छत्रपतीच्या राज्याची वांटणी होऊं शकली तर त्यांच्या नोकराच्या म्हणजे पेशव्यांच्या राज्याची वाटणी होणें कां अशक्य असावें ? " राज्य कोणाचें ? आम्ही वाटणार कोण ? आमच्यानें वाटवत नाहीं ' हें माधवरावाचें उत्तर

न्यायाचें होतें असें म्हणता येणार नाहीं. शिवाय जन्मभर दादांनी पेशवाईसाठीं रक्त आटवलें होतें. प्रामाणिकपणानें ते वागतहि होते. असें असतांना अन्यायानें त्याला सर्वस्वी कारभाराबाहेर ठेवण्याचा अट्टाहास माधवरावानें कां करावा ? हें माधवरावाचें वर्तन न्यायाचें होतें का ? अन्यायाचा प्रतिकार अन्यायानें केला तर उगीच कां ओरडावें ? दादा सतत कष्ट करणारा होता. त्याच्यावर हरिहरि म्हणत बसण्याची पाळी आणली. त्यांच्या जिवाला जीव देणारी व पेशवाईसाठी हाडाचीं काडें करणारीं सर्व मंडळी त्यांच्या डोळ्यादेखत निर्माल्यवत् करण्यांत आली. दादाची पैशाच्या बाबतींत ओढाताण होऊं लागली. सर्व बाजूंनीं मानहानी होऊं लागल्यामुळें वैतागानें दादांनीं अर्धे राज्य मागितलें तर त्याबद्दल या परिस्थितीत तरी त्यांना कांहीं दोष लावतां येणार नाही.

### १५ नाना फडणीसांची महत्वाकांक्षाः— ★

ही दुही पेटवून नाना फडणीसांना आपण स्वतः पेशवाईचे सूत्रधार बनावयाचें होतें. कारण दादा व बापू कारभारांत असेपर्यंत नानाकंपूची कांहींच डाळ शिजण्यासारखी नव्हती. म्हणून प्रथम बापूंना बाहेर घातलें. नंतर दादांना दूर करण्याच्या प्रयत्नास ते लागले. त्यांना पेशव्यांचा पेशवा व्हावयाची इच्छा होती. एवढेंच नव्हे तर नानासाहेबांनीं जसा आपल्या धन्याला नामधारी बनवून राज्यकारभार आपल्या हातांत घेतला त्याप्रमाणें पेशव्यांना नामधारी करून आपण खरा पेशवा होण्याची मनीषा नानांना होती. नानांच्या या हेतूचा माधवरावाला सुगावाहि नव्हता. तो त्यांच्या चिथावणीला बळी पडला व दादा व बापू यांना कारभाराबाहेर काढलें.

### १६ बापूंनीं तह घडवून आणला पण नानाकंपूनें तो मोडलाः— ★

दादांनीं गुजरात प्रांत मागितला होता असें माधवरावांचेंहि एक पत्र आहे. माधवरावांच्या मनांत अर्धे राज्य अगर गुजरात अगर कांहींच दादांना द्यावयाचें नव्हतें. दादांचा स्वभाव तो ओळखून होता. राज्य सूत्रें

आपल्या हातीं राहावींत आणि दादांना तर कांहीं देऊं नये असे दोन पक्षी माधवरावानें एका दगडानें मारले. " राज्य सर्व आपलेंच आहे; आपणच त्याचा सर्व कारभार पाहा. आम्ही साध्या नोकराप्रमाणें राहातों ' असा सवाल केलेनंतर पेशवा माधवराव असतांना " मीच सर्व पाहातों' तूं सर्वसाधारण माणसाप्रमाणें राज्यांत राहा " असें म्हणणें दादांना शक्य नव्हतें. आणि कोणीही तें मान्य केलें नसतें. तेव्हां " तुझा तूंच कारभार पाहा " असेंच दादांनीं म्हटलें. आणि दादाच्या पोटापाण्याचा व दर्जाचा सांभाळ योग्य प्रकारें करणें पेशव्यांना भागच होतें, हें माधवरावांना पटवून देऊन बापूंनीं अत्यंत परिश्रमानें दादा व माधवराव यांच्यामध्यें तह घडवून आणला. माधवरावाच्या मनांत दादांना कैद करावयाचें होतें. पण तसा प्रकार होऊं नये म्हणूनच बापूंनीं आपली शिकस्त करून त्यांचा तंटा मिटवला. मॉस्टीन लिहितो " गोपिकाबाईच्या चिथावणीनें राघोबास समक्ष भेटींत कैद करण्याचा माधवरावाचा विचार होता. पण सखारामबापूच्या मध्यस्थीनें चुलत्या पुतण्याचा तूर्तातूर्त तह ठरला. पेशव्यानें रघुनाथरावास नासिक त्रिंबकचे आसपास तेरा लाखाचा मुलूख व कांहीं किल्ले द्यावे. पंचवीस लाखापर्यंत राघोबाच्या फौजेची थकलेली बाकी देण्याबद्दलची जामिनकी पेशव्यानें द्यावी व राघोबानें कारभारांत ढवळाढवळ करूं नये " ( मराठे व इंग्रज पान ४७ ) अशा प्रकारें दादाला पूर्णपणें पोटगीदार ठरवलें गेलें ! या तहाच्या सर्व अटी दादा पाळावयाला तयार होता. पण माधवरावाकडून त्या न पाळल्या गेल्यामुळें पुनः घासाघीस सुरू झाली. गोपिकाबाई या वेळीं गंगापुरास राहात होत्या. हा गांव या तहाप्रमाणें दादांना दिलेल्या जहागिरींत येत होता. दादाच्या राज्यांत आपल्याला राहण्याचा प्रसंग येतो हें त्यांना खपण्यासारखें नव्हतें. त्यांनीं नानाकंपूमार्फत हा तह रद्द व्हावा अशी उपाययोजना केली. दादांच्या सैन्याची थकबाकी रु. २५ लाखाची देणेंहि पेशव्यांना कठिण होतें.. म्हणून माधवराव विवंचनेंतच होता. याचा फायदा घेऊन नानाकंपूनें यांत तोड सुचविली कीं " दादांच्या तहाच्या अटीप्रमाणें १३ लाखाचा मुलूख द्यावयाचा म्हणजे मातोश्रीचा कोप होणार. शिवाय २५ लाखाचें कर्ज द्यावयाचें तर पैसा नाहीं.

त्यापेक्षां दादांना कैदच केलें तर मुलूख द्यावयाला नको आणि मातोश्रीहि खूष राहातील. " माधवरावाला ही सूचना पटली आणि आनंदवल्लोला असलेल्या दादांना कैद करावयाचीं कारस्थानें घाटूं लागलीं. बापूंनीं घडवून आणलेला तह मातीमोल झाला.

**१७ दादा विश्वासघातानें कैद झाले:—** ★

आपणाला कैद करणार याची बातमी दादाला लागली. पण तो पैशाच्या आणि अधिकाराच्या अभावीं हतबल झाला होता. त्यानें नाशकास पळ काढला व नंतर होळकराकडे गेला. पण दादांना कैद करण्याच्या बाबतींत होळकर सामील होते हें त्याला काय माहीत ? होळकर माधवरावास लिहितो " बोललों त्यांत बालाग्र अंतर नाहीं. धन्यांनीं सैन्यासह येऊन नाशकास मुक्काम करावा. आम्ही त्रिवर्ग कूच करूं लागलों कीं स्वामींनीं आमच्यावर चाल करावी. आपण आलात असें कळतांच राघोबास लुटून घेतों.' याप्रमाणें माधवराव येतांच होळकर दादावर उलटला. दादा धोडपच्या किल्ल्यांत शिरला, पण किल्लेदारानें त्याला माधवरावाच्या स्वाधीन केलें !

**१८ दादाना कां कैद केलें ?:—** ★

दादा व माधवराव यांच्यांत दुही नानाफडणिसांनेंच निर्माण केली होती. माधवरावाला सर्वसत्ताधीश बनावयाचें होतें. त्याला कर्तबगारींत भागीदार नको होता. शिवाय घोडनदीच्या लढाईच्या पराभवाचें शल्य माधवरावाच्या मनास बोंचत होतें. त्यांत नाना फडणिसांच्या चिथावणीची भर होती. अशा प्रकारें दादाला कैद केल्यास आपणाला कोणापासूनहि धोका नाहीं असें माधवरावास वाटलें म्हणून त्यांनीं दादाला कैद केलें. दादाला कैद करण्याबाबत माधवरावाचा अन्याय झाला असेंच म्हणावें लागतें. पेशव्यांच्या घराण्यांतील अत्यंत शूर, अटकेपार मराठ्यांचा झेंडा फडकविणाऱ्या दादाला अन्यायानें कैद करण्यांत माधवरावांनीं पेशवाईंत

अत्यंत वाईट प्रथा पाडली. या पूर्वी कोणाला विनाकारण कैद करून डांवण्याची पद्धत अंमलांत नव्हती. ही जी प्रथा माधवरावांनीं पाडली ती पेशवाईच्या अंतापर्यंत टिकली एवढेंच नव्हे तर पेशवाईच्या अंताशहि थोडयाफार प्रमाणांत कारणीभूत झाली असें दुःखानें म्हणावें लागतें.

**१९ बापूबद्दल माधवरावांना काय वाटत होतें ?:—** ★

बापू व माधवराव यांच्यामध्यें मनोमनीं कांही तेढ होती असें वाटत नाहीं. दादाच्या बाजूच्या सर्व लोकांना माधवरावानें कडक शासनें केलीं पण बापूंना मुळींच दुखवलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांचा सर्व सरंजाम पूर्वीप्रमाणेंच चालूं होता. बापू कारभारांत नसतांना देखील माधवराव त्यांचा सल्ला कठिण प्रसंगीं घेत असत व बापूहि तो मोकळया मनानें देत असत. माधवराव शेवटच्या दुखण्यांत आजारी असतांना बापू अहोरात्र त्यांच्या शुश्रुषेला होते. औषध पाणी ते स्वतः आपल्या हातानें देत असत. अशी सेवा बापू कांहीं महिने करीत होते. त्यावेळीं बापू कारभारांत नव्हते. यावरून बापू व माधवराव यांना एकमेकांबद्दल प्रेम व आदर होता असेंच दिसतें. माधवरावालाहि बापू हवा होता. पण त्यानें दादाला सोडून आपल्याला मिळावें असें माधवरावाला वाटे. दादांची कांहींच चूक नसतांना दादांच्या विरुद्ध माधवरावांना मिळण्याची बापूंची वृत्ति नसल्यामुळें बापूला मनांतून वाईट वाटे. तो त्या दोघांचा समझोता करण्याचा प्रयत्न करी. पण बापू दादाविरुद्ध आपल्या बाजूला येत नाहीं असें पाहून दादाबरोबर बापू अशी माळ माधवरावाला बांधावी लागली. शिवाय बापू किंवा कंपूवाले यांच्यापैकीं कोणातरी एकालाच धरणें माधवरावाला शक्य होतें. म्हणून त्यानें कंपूवाल्यांना धरलें व बापूंना दूर केलें ! कंपूवाल्यांचा गट त्यावेळीं अस्तित्वांत आला नसता, तर बापू माधवरावांचा आजीव कारभारी राहिला असता. माधवरावांनीं आपल्या मरण समयीं मात्र दादाला कैदेतून सोडवून आणलें व त्याच्याकडे पेशवाईंचीं सूत्रें देऊन बापूस त्याचा कारभारी नेमिलें. यावरून माधवरावाचे बापूबद्दल फारच चांगलें मत होतें, असें स्पष्ट दिसतें.

**२० पेशवाईचें रक्षण करण्यास दादा व बापू हेच लायख होतेः-** ★

माधवरावानें जन्मभर दादाशीं वैर केलें. त्याला कैदेंत डांबले. बापूंना 'हरिहरि' म्हणत स्वस्थ बसविले. कंपूवाले माधवरावाला वाटेल ती जबाबदारी घ्यावयाला तयार असल्याचें दाखवीत होते. पण माधवरावानें आपल्या आजपर्यंतच्या वागणुकीचा पूर्ण विचार आपल्या आजारांत केला असावा व दादा आणि बापू यांच्या उलट आपण कंपूवाल्यांना हाताशीं धरण्यांत फार मोठी चूक केली असें वाटलें असावें म्हणून त्यांनीं शेवटच्या क्षणी दादांना कैदेंतून मुक्त करून आणविलें व राज्याची सर्व जबाबदारी व नारायणरावाचा हात दादा व बापू यांच्या हातीं देऊन "यांचे संरक्षण करूं" असें या दोघांकडून वचन घेतलें. नानासाहेबांनीं देखील आपल्या मरणसमयीं माधवराव व राज्याची सर्व सूत्रें याच दोन व्यक्तीच्या हवाली केली होती. नानासाहेब व माधवराव यांच्यासारख्या अत्यंत हुषार व कर्तबगार अशा दोन पेशव्यांनीं ज्याअर्थी दादा व बापू यांना आपल्या मरण समयीं विश्वस्त नेमून त्यांच्या हातीं राज्य आणि अल्पवयी राजांना दिलें, त्या अर्थी बापू व दादा हे तसे विश्वासाला पात्र, कारभाराला लायख व जबाबदारी पाहाण्याला समर्थ असे असलेच पाहिजेत असेंच ठरतें. कंपूवाल्यांच्या बाबतींत माधवरावाला तसा विश्वास वाटला नाहीं. कमकुवत राजाला बाजूला सारून हे कारभार आपल्या हातीं घेतील असें माधवरावास वाटलें कीं काय न कळे.

---

## प्रकरण ६ वें

# नारायणरावाची कारकीर्द

**१ माधवरावांनीं दादा व बापू यांना विश्वस्त नेमिल्यामुळें कंपूवाल्यांना चीडः—** ★

माधवराव वारल्यानंतर त्याचा भाऊ नारायणराव हा वेगळा

झाला. विश्वस्त नात्यानें दादा आखत्यार पाहूं लागला व बापू कारभार करूं लागला. यामुळें कंपूवाल्या गटास असा विषाद वाटूं लागला, असें शल्य बोंचूं लागलें कीं दादा व बापू यांना नामोहरम करून माधवरावाला सर्व सत्ताधीश बनवण्याच्या कामीं आपण जिवापाड मेहनत केली, नाना तऱ्हेच्या कारवाया आणि कारस्थानें करून दादाला कैदेत डांबलें व बापूला 'हरि हरि' म्हणत बसावयाला लाविलें. पण कष्टार्जित विजय माधवरावानें आपल्या मरणसमयीं दादा व बापू यांच्या पदरांत टाकला! हा आपला अपमान झाला असें कंपूवाल्यांना वाटलें व त्याचें परिमार्जन करण्याची ईर्षा त्यांनीं धरली.

**२ नारायणरावाची कारकीर्द कंपूवाल्यांना अधिक अनुकूल:—** ★

वर सांगितल्याप्रमाणें कंपूवाल्यांनीं प्रयत्न सुरू करतांच गोपिकाबाईची त्यांना साथ मिळाली. कंपूवाल्यांच्या प्रयत्नास यश येण्याच्या दृष्टीनें माधवरावापेक्षां नारायणरावाची कारकीर्द अधिक अनुकूल होती. माधवराव शाहाणा व विचारी होता, त्याचप्रमाणें तो निश्चयी आणि कडक होता. त्याला माणसाची पारख होती, राजकीय परिस्थितीचें चांगलें आकलन होतें. त्यामुळें कंपूवाल्यांची सर्वच शिकवण तो ऐकत होता असें नाहीं. तर सर्व परिस्थितीचा विचार करून आपल्यावर उलट परिणाम होणार नाहीं, याची खात्री असेल तीच गोष्ट तो करी. कंपूवाल्यांना कांहीं वेळां त्याच्यापुढें मूग गिळून गप्प बसावें लागें. पण नारायणरावाची परिस्थिति अगदीं याच्या उलट होती. तो अविचारी, अव्यवहारी, हेकट, भ्याड व पोरकट होता. असल्या माणसाच्या मनांत दादा व बापूबद्दल द्वेष उत्पन्न करणें कंपूवाल्यांना फार सोपें होतें. शिवाय नारायणरावाचा दस्त सर करण्यास कंपूवाल्यांपाशीं गोपिकाबाईचा हुकुमाचा एक्का सदैव होताच.

**३ दादा व बापू यांना कारभार अडचणीचा होता:—** ★

नारायणरावासारख्या मालकाच्या हाताखाली काम करणें दादा व

बापू यांना फार त्रासाचें व कठिण होतें. नारायणराव स्वतः विक्षिप्त. कंपूवाले त्यांचे कान फुंकण्यास सदैव सज्ज. त्यांना सर्व प्रकारची मदत गोपिकाबाईची ! यामुळें कारभार करणें म्हणजे दादा व बापूंना तारेवर कसरत करण्यासारखें होतें. राज्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीनें जरूर असलेल्या गोष्टी नारायणरावाला पटवून देऊन नंतर अमलांत आणाव्या लागत. त्यामुळें त्याच्या लहरीप्रमाणें बेताबातानेंच तें साधावें लागें. त्यामुळें विलंब झाला व कांहीं वाईट परिणाम झाला तर कंपूवाले त्यावर गिल्ला करावयाला टपून बसलेले होते. त्यामुळें दादा व बापू यांचा कारभार फारच नाजूक होऊन बसला होता.

**४ दादाच्या मुलीचें लग्न व त्याचा नारायणरावावर झालेला परिणामः—**

नारायणराव गादीवर आल्यानंतर थोड्याच दिवसांत दादांच्या मुलीचें लग्न झालें. पेशव्यांच्या घराण्यांत ही एकच मुलगी होती. राघोबाच्या हातीं कारभार होता. अर्थात इभ्रतीला साजेशा थाटांत हें लग्न झालें. खर्चहि बराच झाला. नारायणरावानें उत्साहानें या लग्नांत भाग घेतला होता. या लग्नाला अगर त्यापाई झालेल्या खर्चाला नारायणरावाचा विरोध मुळीच नव्हता. पण नारायणरावाच्या कानांत विष ओतण्यास अधीर असलेल्या गोपिकाबाईस व कंपूवाल्यांना हें लग्न हें एक उत्तम साधन झालें. माधवरावांच्या मरण समयीं पेशवाईला कर्ज होतें. तें निवारण करण्याचें माधवरावांनीं दादा व व बापू कडून वचन घेतलें होतें. या गोष्टीचा फायदा घेऊन गोपिकाबाईंनीं व कंपूवाल्यांनीं नारायणरावाला कानमंत्र दिला कीं “ राज्याला आधींच एवढें प्रचंड कर्ज असतांना तें फेडण्याबाबत माधवरावांनीं मरण समयीं आस्था दाखवली असतांना हा प्रचंड खर्च करून थाटानें लग्न करण्याचें काय कारण होतें ? हा खर्च करण्यापूर्वीं तुमचें मत कां घेतलें नाहीं ? दादा स्वतःलाच मालक समजतो. ” अविचारी आणि भावनाप्रधान नारायणरावाला हें खरें वाटलें व त्यानें कारभारांत दादा व बापू यांना विरोध करावयास सुरवात केली.

५ हैदरवरील स्वारीस नारायणरावाचा विरोध-- ★

माधवरावांनीं आपल्या मरणापूर्वीं हैदरवर स्वारी करण्यासाठीं कूच केलें होतें व ती स्वारी त्याच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें तशीच अर्धवट राहिली होती. हैदरचें पारिपत्य करीन असें दादाकडून माधवरावानें वचन घेतलें होतें. लग्नाची गडबड संपतांच तो प्रश्न दादानें हातीं घेतला. शत्रूला जेरीला आणण्यासाठीं दादा नेहमीच उतावळा असे. त्यांत त्यानें माधवरावाला वचन दिलें होतें. त्यामुळें त्या स्वारीसाठीं दादा फार उतावळा झाला होता. दरबार भरवून दादानें तो प्रश्न मांडला. हैदरचा पुरा मोड करणें प्राप्त होतें, हें सर्वांना पटतच होतें. पण कंपूवाल्यांना मात्र ही स्वारी होणें अनिष्ट आहे असें वाटत होतें. दादा स्वारीवर गेले तर यश घेऊनच येणार आणि या यशामुळें अननुभवी नारायणराव त्याच्या कह्यांत गेला तर दादा अधिकारांत रहाणार व आपली कांहीं डाळ शिजणार नाहीं, असें कंपूवाल्यांना वाटलें. पण माधवरावांनीं मरणसमयीं तशी इच्छा प्रदर्शित केली असल्यामुळें कंपूवाल्यांना तसा उघड विरोध करणें शक्य नव्हतें. त्यांनीं निरनिराळ्या प्रकारें नारायणरावाला बिथरविण्याची खटपट सुरू केली. दादा स्वारीवर गेले तर तुम्हांला बरोबर घेऊन जाणार असें सांगून त्याला भिवविलें. गोपिकाबाईनीं मुलीच्या लग्नांत दादानें पैसा उधळला असें नारायणरावाच्या मनावर बिंबवलेंच होतें. आतां पुन: स्वारीचें प्रचंड कर्ज होणार असें त्याला पटविण्यांत आलें. "पानिपतमध्यें लाख लोक मेले, त्यामुळें त्यांच्या बायका विधवा झाल्या. त्याचें पाप पेशव्यांना लागलें. म्हणून माधवराव अकालीं निवर्तले. आतां पुनः हैदरच्या स्वारींत ४०-५० हजार लोक मरणार त्याचें पाप पदरांत घेण्यापेक्षां हैदरशीं तह करणेंच योग्य" असा युक्तिवाद बाबर्वे नांवाच्या नारायणरावाच्या विश्वासांतील माणसाकडून नारायणरावाला सांगविला. अर्थात तो त्याला पटला. या सर्व कारणामुळें हैदरवरील मोहीम हातीं घेण्याच्या विरुद्ध मनोभूमिका घेऊन नारायणराव बसला व मोहीम होऊं द्यावयाची नाहीं असें त्यानें ठरविलें.

### ६ हैदरवरील मोहिम दादांना तहकूब करावी लागली— ★

ठरल्याप्रमाणें हैदरवरील मोहिमेचा प्रश्न दादांनीं दरबारांत मांडला. नारायणरावानें त्याला ठरल्याप्रमाणें विरोध केला ! या बाबत बापू व नारायणराव यांचा खटका उडाला. नारायणरावाच्या कारकीर्दीतील हा पहिलाच दरबार असल्यानें नारायणरावाचा अपमान करणें बरें नव्हे म्हणून दादा व बापूंनीं हा प्रश्न जास्त धसाला लावला नाहीं. पण माधवरावांना मरणसमयीं दिलेलें वचन आपण पाळूं शकत नाहीं याची रुखरुख दादा व बापू यांना लागली. दोघेहि वचनाचे सच्चे होते. दिलेलें वचन पाळतां आलें नाहीं म्हणजे काय यातना होतात हें वचनिक लोकांनाच कळतें इतरांना कळूं शकत नाहीं.

### ७ दादांना कैद केलें हें धाडस नारायणरावाचें नव्हे :— ★

नारायणरावाशिवाय इतरत्र सैन्य आपल्या जबाबदारीवर जमवून ही स्वारी करावी या प्रयत्नास दादा लागले असतां नारायणरावांनीं दादांस कैद केलें! नारायणरावानें दादांना कैद केलें असेंच सर्व इतिहासकारांचें म्हणणें आहे. याबाबत इतिहासभास्कर रानडे म्हणतात "नारायणरावांनीं राघोबाला कैद केलें ही गोष्ट लोकांच्या कानावर गेली. त्यावेळीं लोकांच्या कानावर गेलेल्या गोष्टीप्रमाणें पत्रव्यवहार झाले. बखरकारांनीं तीच माहिती बखरींत नमूद केली. इतिहासकारांनींहि त्याचीच री ओढली. परन्तु ही महत्वाची गोष्ट अशा प्रकारें हातावेगळी करण्याइतकी फोल टरफलाप्रमाणें हलकी कां वाटली हें समजत नाहीं. राघोबादादांना कैद करणें ही एवढी महत्वाची गोष्ट होती कीं त्या गोष्टीच्या उलगडयानें पुढील नानांच्या सर्व कारस्थानावर उजेड पडणार आहे. अन्याय कोणाचा ? खरे बंडखोर कोण ? गृहकलहास कारणीभूत कोण ? स्वार्थी कोण ? राज्यतृष्णा कोणास होती ? पेशव्यांचें राज्य बुडविण्यास कोण कारणीभूत झाला ? या सर्वांचें मूळ या एका गोष्टीशीं आहे. ही गोष्ट इतकी महत्वाची असतां आजपर्यंत इतिहासकारांचें या गोष्टीकडे जावें तसें लक्ष न गेल्यामुळें त्यांनीं चोराला सोडून संन्याशाला सुळीं देण्याचें पाप केलें आहे." हें त्यांचें म्हणणें बरोबर दिसतें. कारण

राघोबाला एकदम कैद करण्याइतका नारायणराव समर्थहि नव्हता किंवा शहाणाहि नव्हता. दादाच्या हातीं कारभार होता. कारभारी बापू दादांचे दोस्त होते. राघोबा अत्यंत लोकप्रिय होता. त्याच्या शौर्याचा दरारा सर्वत्र होता. याच्या उलट नारायणराव बाळ, अननुभवी, भ्याड, व अधूर्त होता. त्यामुळें राघोबाला कैद करण्याची साधारणपणें नारायणरावांची छाती होणें शक्य नव्हतें. त्याच्या पाठीशीं तसाच कोणी जबरदस्त शक्तीचा, अचाट युक्तीचा आणि अगम्य क्लृप्तीचा माणूस असला पाहिजे हें स्पष्ट आहे. तो कोण असावा हें आपण पाहाणें इष्ट व जरूरीचें आहे.

**८ दादाचा काय दोष होता ? :—** ★

या वेळची परिस्थिति पाहतां दादावर लादतां येण्यासारखा दोष अगर गुन्हा कोणाला शोधूनहि मिळण्यासारखा नाहीं. कंपूवाल्यांनाही दादाच्या माथीं मारण्यासारखा गुन्हा सुचला नाहीं. आनंदीबाईचें पटत नव्हतें अशी शिळी सबब पुढें मांडली जाते. त्यांत मुळींच तथ्यांश नाहीं. कारण त्या दोघी यावेळीं केव्हांच एकत्र आल्या नाहींत. त्यांच्यांत नेहमींच शें दोनशे मैलांचें अंतर होतें. " कांहीं कीर्ती वडिलांमागें कराल कीं चुलत्यामागें पोट भरून राहाल " असें गोपिकाबाई नारायणरावांना म्हणाल्या म्हणून नारायणरावानें दादांना कैद केलें ! हें खरें मानलें तरी त्यांत दादांचा कांहीं दोष नव्हता असेंच ठरतें. दादांना पकडण्यांत माधवरावाची इच्छा झुगारून दिली गेली. नारायणरावाला न्यायाच्या दृष्टीनें दादाला पकडण्याचा अधिकार नव्हता. हा दादावर अन्याय झाला असें म्हणणें प्राप्त आहे.

**९ दादांना पकडण्याच्या मागें कोण असावें ?** ★

" नारायण बाळ आहे. त्याचा तुम्ही सांभाळ करा " असें माधवरावानें दादांना सांगितलें होतें. माधवरावासारख्या हुषार माणसाला देखील नारायणराव मूर्ख व राज्य चालविण्याला नालायख दिसला. तो एका रात्रींतून लायख बनून दादांना कैद करतो असें म्हणणें योग्य होणार नाहीं.

नारायण भ्याड होता. राघोबासारख्या सर्वसत्ताधारी नरसिंह माणसाला स्वतःच्या मतानें कैद करण्याची त्याची हिंमत नव्हती. नारायणरावाला दादाला कैद करण्यासारखें कांहीं कारणहि घडलें नव्हतें. दादांना कैद करण्याची कल्पना व ती अमलांत आणण्याची करामत नारायण-रावांची नव्हती. नानासाहेब मरण पावल्यानंतर दादाच्या हातीं कारभार येतांच त्यांनीं नाना फडणवीस याला कामावरून दूर केलें होतें. माधवरा-वांनीं पुनः नानाला कामावर घेणेंचें ठरवितांच दादांनीं दिकल्या (अडचणी) घातल्या होत्या. दादा व बापू विरुद्ध जो गट स्थापन झाला होता त्याचा म्होरक्या नाना होता. माधवरावाच्या कारकीर्दीत दादा व बापू यांना कार-भारांतून दूर केल्यानंतर अधिकार नानाकडे होता तो माधवरावाच्या पश्चात् काढून घेण्यात आला व पुनः बापूकडे गेला. त्यामुळें आपल्या हातीं सत्ता द्यावी म्हणून ही कारवाई नानांनीं नारायणरावाकरवीं करविली. नानांचें तरी एवढें सामर्थ्य त्यावेळीं होतें का ? असा प्रश्न उभा राहातो. माधवरावाच्या कारकीर्दीत आपला पक्ष बळकट करून ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न नानांनीं केला होता. शिंद्याच्या वारसाचा प्रश्न उभा राहिल्यावेळीं दादाचा मोहरा मानाजीराव फाकडा तर नानांचा माहादाजी शिंदा. मानाजी गादीचा सरळ वारस असतांना महादाजी सारख्या दासीपुत्राला गादी देण्यांत आली. त्या उपकाराच्या ओझ्याखालीं महादाजी नानाचा सदैव ऋणी राहिला. असाच प्रकार होळकर, गायकवाड व नागपूरकर भोसले यांच्या बाब-तींत घडला. दादांचा मोहरा कायदेशीर तर नानांचा अनधिकारी असा-वयाचा. अनधिकारी लोकांना गाद्या दिल्यानें ते आपल्या शब्दांत जन्मभर वागतील आणि दादांचे मोहरें गादीवर बसवलें तर ते आपल्या कह्यांत वागणार नाहींत असा कानमंत्र माधवरावाला देऊन नानांनीं आपले पित्ते शिंदे, होळकर, गायकवाड व नागपूरकर भोसले या उत्तरेतील सर्व मोठ्या सरदारांच्या गादीवर बसवून त्यांचें साहाय्य आपल्याला मध्या-न्हरात्रीं मिळेल अशी व्यवस्था करून ठेविली होती. पटवर्धन, प्रति-निधि प्रभृती मंडळी तर नानाच्या नाकांतील बाल होते. शिवाय गोपिकाबाईचा नानाला पूर्ण पाठिंबा होता. वरील विवेचनावरून दिसून

[stamp]

येईल कीं दादांना कैद करण्याइतकी सूडबुद्धी असणारा व त्यांना कैद करण्याचें सामर्थ्य असलेला सर्व पेशवाईंत नाना शिवाय दुसरा नव्हता. म्हणून आमचें असें स्पष्ट मत आहे कीं दादाना कैद करण्याची करामत नानांनींच केली. दादा कैद झाल्यानंतर कारभार नानांच्या हातीं आला. नानांचा पाठिंबा या कैदेस नसता तर त्यांनीं असें न करण्याचा सल्ला दिला असता. आपण कारभारी बनले नसते. दादांना सक्त पहाऱ्यांत ठेवण्यांत आले होतें. तसा सक्त पाहारा न ठेवावा असा सल्ला नानांनीं कां दिला नाहीं ? उलट दादाला जाणाऱ्या चिठ्या चपाट्या नाना कां पकडवीत होते ? नानांनीं दादाला नारायण-रावाकरवीं कैद केलें व आपण नामानिराळे राहिले.

## १० बापूंनीं दादांना कां सोडवलें नाहीं ? ★

माधवरावांच्या हयातींतच पेशवाईंतील प्रमुख व बलिष्ठ सरदारांना नानांनीं कसें उपकृत करून आपले लगामी आणिले होतें हें आम्हीं वर सांगि-तलेंच आहे. दादा खुद्द कारभारांत असतांना त्यांच्या विरुद्ध बंड करण्या-इतपत या सरदारांची अद्याप तयारी झाली नव्हती. पण दादांना कैद झाल्यानंतर त्यांच्याबद्दल उपेक्षा करणें त्यांना कांहीं अवघड नव्हते. अशा परिस्थितींत दादा कैदेंत असतांना बापूंना त्यांच्या मुक्ततेबद्दल कांहीं इलाज उघडपणें करणें शक्य नव्हतें. नानांच्या मदतीशिवाय दादांना बंधमुक्त कर-ण्यास तो यावेळीं असमर्थ होता.

## ११ दादांचें नैतिक बळ नाहीसें करणें भाग होतें— ★

दादा व बापू यांचे विरुद्ध नानाकंपूनें कितीहि आरडाओरड केली तरी त्यांच्या वरचें लोकांचे प्रेम कमी झालें नव्हतें. त्यांच्यावरचा विश्वास रेसभरहि ढळला नव्हता. दादांना कायमचा गाडावयाचा तर ते लोकांच्या मनांतून उतरतील असें करणें जरूरीचें होतें. दादांचें नैतिक पाठबळ नाहीसें करणें भाग होतें. दादांना कैदेंतून सोडविण्याचा प्रयत्न बापू जरूर करतील, तो साधला नाहीं तर कांहीं तरी व्यूह रचतील, असा धूर्त नानांचा अंदाज होता. दादा वचनाचे सच्चे असल्यानें हैदरला नामोहरम कर-

ण्याचें माधवरावाला दिलेलें वचन पूर्ण करण्याची खटपट दादा करणार च आणि अशी खटपट करण्याच्या गडबडींत दादा एखाद्या बाबतींत आपल्या हातीं सांपडतील असें नानांना वाटलें होतें. नाना हैदरच्या मोहिमेस तयार होईनात हें पाहून दादांनीं हैदरला जेरीस आणण्याचा निराळाच डाव टाकला. अंतस्थ रीतीनें त्यांनीं सैन्य जमवलें. हैदरचा वकील पुण्यास होता त्याला कळविलें कीं, नारायणरावानें मला कैद केलें आहे. आपण पुण्यावर स्वारी करावी. मीही सैन्य जमवलें आहे. त्यानिशीं मदत करीन. आपण मला सोडवावें.' यांत दादाचा डाव असा होता कीं हैदर पुण्यावर आलाच तर पेशव्यांच्या सर्व सैन्यानिशी त्याला गांठून रगडून काढावा. याप्रमाणें हैदर पुण्यास येण्याचा संभवहि होता. माधवरावापासून दादा कैदेंत होता. नारायणराव शहाणा नसल्यानें दादाला तुरुंगांतूनहि त्याच्याविरुद्ध कांहीं कारस्थान करणें शक्य आहे असें वाटण्यासारखे होतें. आणि या भांडणांत आपला पेशवाईत शिरकाव करून घेऊन त्यांचे विषारी दांत तोडतां आले तर तें त्याला हवेंच होतें. हैदर पुण्यांत आला असतां तर, दादांनीं त्याची नांगी खास तोडली असती. पण सदरच्या प्रमाणें चिठी घेऊन जाणाऱ्या इसमाला नानांनीं पकडलें आणि पत्रासह नारायणरावाच्या समोर उभें केलें. नारायणराव अर्थात संतापला व त्यानें हैदरच्या वकीलाला फांशी दिलें आणि दादांची कैद सक्त केली. या गोष्टीचा सर्वत्र पुकारा करून नाना कंपूनें दादाच्या नैतिक बळाला चांगलाच धक्का दिला. दादावर फितूरीचा व राज्यतृष्णेचा आरोप आला! वरवर पाहाणाऱ्याला तसें दिसण्यासारखें होतेहि. त्यामुळें कंपूवाल्यांना दादांना बदनाम करण्यांत चांगलेंच यश मिळालें.

### १२ नारायणरावाचा पोरकटपणा:—

★

बापू दादांच्या पक्षाचे असल्यामुळें नारायणरावांचे व त्यांचे सारखे खटके उडूं लागले. नारायणरावाची खरी भिस्त नानावर होती. नानाहि त्याच्यावर वजन मारून होते. नानांना पहिल्यांदा

वाटलें कीं आपण नारायणरावावर छाप ठेवून कारभार करूं. पण नारायणराव नानांचें तरी कुठें ऐकायला तयार होता? तो दरबारांत इतर लोकांच्या पुढें कांहीं तरी अचरटपणा करून नानांचा अपमान करूं लागला. एकदां तर त्यानें भर दरबारांत नानांची पगडी उडवली. नाना खूप संतापले व " मी कारभारी माणूस. पगडी उडवली तर दुसरी ठेवीन. पण आपण मात्र आपली पगडी सांभाळावी.' पण नारायणराव पोरकट व मूर्ख असल्यामुळें तो सर्व मुत्सद्यांची आचरटपणें थट्टा करून त्यांचा अपमान करूं लागला. त्याचे सर्व स्नेही हलक्या दर्जाचे होते. ते सांगतील त्याप्रमाणें हा वागे. त्याच्या अशा वागणुकीमुळें माधवरावांनीं संतापून एकदा म्हटलें होतें कीं "याच्या नशीबीं राज्य नाहीं." अशा नारायणरावाची कारकीर्द सुरू झाल्यामुळें दरबारांत व कारभारांत भारदस्तपणा कुठेंच राहिला नाहीं. दरबारी मंडळींचा अपमान घडोघडी होऊं लागल्यामुळें ते बिथरूं लागले. राज्याचा तोल नाहींसा झाला. शत्रूंनीं चारी बाजूंनीं जोर करण्यास सुरवात केली. हैदरनेंहि लढाईची तयारी केली. कोंकणस्थ विरुद्ध इतर असे दोन तट कंपूवाल्यांनीं पाडले होते. त्या दोन्ही तटाच्या लोकांना नारायणरावाचा विश्वास वाटेना. सर्वांना आपल्या लगामीं राबवण्याचें सामर्थ्य नारायणरावाच्या अंगीं असतें तर पेशवाई या वेळीं संकटांतून तरूनहि गेली असती. पण नारायणराव अकर्तृत्ववान व मूर्ख असल्यामुळें अवघ्या ४-६ महिन्यांतच कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं अशी पुणें दरबारची परिस्थिती झाली. यावेळीं कोणीतरी सामर्थ्यवान पुरुष गादीवर आल्याखेरीज परिस्थिती आटोक्यांत येण्यासारखी नव्हती. म्हणून राजकारणांत वावरणाऱ्या सर्व मुत्सद्यांना दादांना मुक्त करून कारभारांत आणल्याशिवाय पेशवाई आतां टिकणार नाहीं असे वाटूं लागलें.

**१३. कट व त्याचें पर्यवसान --** ★

दादांना सोडवावें हा विचार जरी ठरला तरी कसें सोडवावें हा पेंच मुत्सद्यांपुढें होताच. कारण मुत्सद्यांना आपला हात त्यांत

होता असें दाखवावयाचें नव्हतें. म्हणून त्यांनीं असा घाट घातला कीं नारायणरावाच्या विक्षिप्त वागणुकीमुळें सैन्यांतून कमी केला गेलेला सुमेरसिंग गारदी याच्याशीं दादांनी करार करावयाचा. त्यांत अटी अशाः–१ गारद्यानें नारायणरावाला धरावें व दादाला बंधमुक्त करावें. २ गारद्यांना चार लक्ष रुपये द्यावेत. या करारा प्रमाणें गारद्यांनीं शनवार वाड्यांत घुसून नारायणरावाला पकडावयाचें व दादांना बंधमुक्त करावयाचें. याप्रमाणें सर्व कारस्थान शिजून गारदी लोक वाड्यांत घुसले व त्यांनीं नारायणरावाला पकडण्याचा प्रयत्न केला. पण या धांदलींत तो मारला गेला (ता. ३० ऑगस्ट १७७३ ). आणि नारायणरावाची ही इतिहासप्रसिद्ध कारकीर्द अशा रीतीनें संपली.

---

## प्रकरण ७ वें

# कटाचें स्वरूप व परिणाम

**१ कटांत कोण कोण सामील होतेः–** ★

या कटांत पेशवाईतील त्यावेळचे सर्व मुत्सद्दी सामील होते असें आमचें मत आहे. या कटांत बापू सामील होते असें मान्य केलें जाते पण नाना व त्यांचे साथीदार या कटांत सामील नव्हते असें मानण्यांत येते. यामुळे आमचें या बाबींतील विवेचन थोड्या विस्तारानें मांडणें जरूरीचें आहे.

**२ नारायणरावाच्या खुनाची रूढ हकीकतः–** ★

गारदी लोकांचें व नारायणरावाचें पगाराच्या बाबतींत बिनसलें होते. याचा फायदा घेऊन दादांनीं गारद्यांचा म्होरक्या सुमेरसिंग याच्याशीं

नारायणरावाला धरण्याचा कट केला. सुमेरसिंगानें दादाकडून लेखी हुकुम मिळाल्याशिवाय हें काम करण्याचें नाकारलें. दादांनीं नारायणरावाला "धरावें" असा हुकुम दिला. पण दादाची पत्नी आनंदीबाई ही एक कृत्या होती. तिनें त्या धरावेंतील 'ध' चा "मा" केला व त्याच्या आधारावर गारद्यांनीं नारायणरावाला मारलें. नारायणरावाच्या पाठीशीं गारदी लागले असतां तो "काका मला वांचवा" म्हणून दादाच्या गळीं पडला. दादांनींही त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला पण लेखी हुकुमाच्या जोरावर दादाचेंहि न ऐकतां गारद्यांनीं नारायणरावाला दादाच्या समोर मारलें! त्याच्या देहाचे तुकडे केले!!

**३ कट एकट्या दादांनीं केला नाहीं:-** ★

वरील रूढ हकीकतींत मुत्सद्दी लोकांचा या प्रकरणांत कांहीं संबंध असल्याचें दिसत नाहीं. दादानेंच स्वतः हा कट घडवून आणला असें मत दिसतें. दादा कैदेंत होते. त्यांची कैद सक्त करण्यांत आली होती. त्यांची अंधार कोठडींत रवानगी करण्यांत आली होती. दादा अनुष्ठानें करी. त्यावेळीं सूर्यदर्शन घडल्याविना तो अन्नग्रहण करीत नसे. पण सूर्यदर्शन घेण्यापुरतेंही दादाला बाहेर काढण्यांत येत नसे व त्यामुळें त्याला चार चार दिवस उपवास घडत. अशा सक्त कैदेंत दादा असतांना त्याची व गारद्यांची कशी गांठ पडणें शक्य होते? हरिपंत फडक्यांच्या हाताखालीं पांच हजाराची खडी फौज केवळ पेशव्यांच्या रक्षणासाठीं सदैव वाड्यांत सिद्ध असतां नारायणराला कैद करण्याची कामगिरी मूठभर गारद्यांच्या कडून पार पडेल असा विश्वास बाळगण्या इतका मूर्ख दादा खास नव्हता. पेशव्यांना त्यांच्या राहत्या घरांत पकडणें ही कांहीं मामुली गोष्ट नव्हती. शे दोनशेहे गारद्यांना ती साधतां येण्यासारखी खास नव्हती. सुमेरसिंगाला या सर्व परिस्थितीची पूर्ण माहिती होती. नानाच्या गुप्तहेराच्या जाळयाची ख्याती सर्वत्र होती. हरिपंताशीं चार हात करून अगर नानांच्या हेराच्या जाळ्या-वर मात करून आपल्याला नारायणरावाला पकडणें अशक्य आहे हें

गारद्यांनाही समजण्यासारखें होते. लेखी करार होण्याआधीं प्रत्यक्ष वाटाघाट होणें अवश्य होते. दादाची कैद सक्त असतां त्याची व गारद्यांची कशी व कुठें गांठ पडावयाची? दादांनीं हा करार कुठें व कसा लिहून घ्यावयाचा? तो गारद्यांना कसा दाखवावयाचा? सुमेरसिंगाला वाड्यांत पाऊल टाकणें अशक्य होतें. त्याचप्रमाणें सक्त कैदेंतून दादाला बाहेर जाणें अशक्य होतें. अर्थात ही वाटाघाट व व्यवहार तिसऱ्या इसमामार्फत झाला असला पाहिजे. या व्यवहारांत गार्द्यांना नऊ लक्ष रुपये द्यावयाचे असल्यानें तेवढ्या मोठ्या रकमेस जामीन धरतां येईल इतक्या लायखीचा माणूसच मध्यस्थीला असला पाहिजे. दादांचा पक्षपाती व प्रामाणिक आणि लायख असा बापू एकटाच असल्यानें ही वाटाघाट त्याच्या मार्फतच झाली असावी असें म्हणतां येईल.

**४ कटांत नाना सामील होते कीं नाहीं:—** ★

नाना या कटांत सामील नव्हते असें मानलें तर बऱ्याच अड-चणी डोळ्यापुढें राहातात. १ बापू व नाना यांचें मनोमन बरें नव्हतें. हें सुमेरसिंगाला तरी खास माहीत होतें. हैदर बरोबर संधान बांध-ण्यांत बापू होते, पण नानांनीं तें उघडकीला आणल्याचें सर्वश्रुत होतें. त्यामुळें बापूवर पूर्ण विश्वास ठेवून हें काम पतकरणें सुमेरसिंगाला अत्यंत धोक्याचें होतें आणि तसें तो कबूल करणेंहि शक्य नव्हतें. २ हरिपंत फडके हा नानाचा पित्या असल्यामुळें तो नानांच्या हुकुमाशिवाय बापूंचाहि हुकुम मानणार नाहीं हें गारदी जाणत होते. (३) हरिपंत या कटांत सामील झाल्या शिवाय शें दोन शेहे गारद्यांसह शनिवार वाड्यांत घुसण्याची बिशात नव्हती. (४) त्यामुळें नाना या प्रकरणांत सामील असल्याशिवाय हें काम पतकर-ण्याची सुमेरसिंगाची छाती होणें शक्य नव्हतें. ५ इंग्रजांच्या घरांत काय चाललें आहे याची बित्तंबातमी हेरामार्फत काढणाऱ्या नानांना आपल्या वाड्याच्या समोरच असलेल्या शनिवार वाड्यांत खुद्द पेश-

त्यांना पकडण्याची मसलत चालली असतां त्याचा सुगावा लागला नाहीं असें मानणें म्हणजे नानांच्या बुद्धिमत्तेचा अपमान करण्यासारखें आहे. (६) नारायणराव मारला गेला त्याच दिवशीं सकाळीं खुद्द नारायणरावानें हरिपंताला इशारा दिला होता कीं "वाड्यावर गारद्यांची कांहीं गडबड दिसते तर बंदोबस्त ठेवा." असें असतां हरिपंत गाफील राहातो, हें कसें ? (७) वाड्यांत गारदी घुसले आणि आरडाओरडा झाला तरी एकहि सैनिक अगर खासगी शिपायी नारायणरावाला वाचवावयास पुढें येत नाहीं हें कसें ? या सर्व प्रश्नांना उत्तर असें आहे कीं सैनिक अगर शिपायी प्यादे यांनीं आडवें येऊं नये असा संकेत होता. अर्थात तो हरिपंतांनींच दिला असला पाहिजे. म्हणजे त्याला नानांची संमति अवश्य हवीच. वरील सर्व विवेचनावरून नाना या कटांत असल्याखेरीज हा कट अस्तित्वांत येणें शक्य नव्हतें असेंच ठरतें.

**५. कट कां अस्तित्वांत आला ?:—** ★

नारायणरावाची वागणूक फारच अचरटपणाची होऊं लागली. सर्व सरदारामध्यें त्याबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला. याच वेळीं प्रभु प्रकरण उत्पन्न झालें. त्यांत नारायणरावांनीं प्रभु मंडळींचा अमानुषपणें छळ केला. ती मंडळी अर्थात् फारच रुष्ट झाली. दिल्लीकडील सर्व सैन्य नारायणरावानें परत बोलावल्यामुळें उत्तर हिंदुस्थानांतील शत्रूंना रान मोकळें झालें. नागपूरकर भोसले यांच्या घरांत भांडण सुरू झाल्यामुळें त्यांची पेशव्यांना कांहीं मदत होईना. या सर्व गोष्टी त्याच्या वकीलाच्या मार्फत कळत होत्या. तो पेशव्यांच्या मुलखावर स्वारी करण्याच्या तयारीला लागला. हैदरच्या स्वारीचा प्रतिकार करण्याची कुवत नारायणरावाच्या अंगी नव्हती. हैदरच्या प्रतिकाराचा प्रश्न फार मोठा व जोखमीचा असल्यानें व त्यावेळची पेशवाईची एकंदर परिस्थिति फार नाजूक झाली असल्यानें या सर्वांस धैर्यानें व यशस्वीपणें तोंड देण्यासाठीं रणझुंजार दादाच पाहिजेत असे त्या

सर्व मुत्सद्यांना वाटूं लागले म्हणून त्यांची सुटका करण्याचा निर्णय मुत्सद्यांनीं घेतला व हा कट अस्तित्वांत झाला.

### ६ कटाचा खरा हेतू-- ★

परिस्थितीची जाणीव करून देऊन दादांना मोकळे करण्याची कल्पना नारायणरावाला पटवून देणें अशक्य होतें. म्हणून मुत्सद्यांनीं अशी कल्पना काढली कीं दादांनींच नारायणरावाला पकडलें असें सर्वांना--निदान नारायणरावाला तरी--भासवावें व नारायणरावाला पकडून दादांनीं कांहीं दिवस कारभार करून राज्याची घडी नीट बसवावी. तोंपर्यंत नारायणराव घमेंडीच्या शिखरावरून थोडा खालीं येईल आणि मग त्याला मोकळा करून पूर्ववत् कारभार सुरू करावा. नारायणराव लवकर शहाणा झाला नाहीं तर त्याला शहाणपण येईपर्यंत तुरुंगाची हवा दाखवावी आणि पेशवाईचें संरक्षण करावें हा हेतू पुढें ठेवून या कटाची आंखणी झाली.

### ७ नानांची भूमिका-- ★

इतिहासभास्कर रानडे यांचा आशय असा आहे कीं नानांना दादाहि नको होता व नारायणरावहि नको होता. त्यांनीं कोणालाहि सुगावा लागू न देतां अंतस्थ रीतीनें नारायणरावाला मारण्याचा कट केला होता. नारायणरावानें आत्महत्या केली नसली तरी तो कटवाल्याकडून खास मारला गेला असता. नानांनीं असा कट केला होता किंवा नाहीं, नारायणराव मारला गेला कीं त्यानें आत्महत्या केली, याचा विचार करण्याची ही जागा नव्हे. नारायणरावाच्या खुनाशीं बापूचा कोणीहि संबंध जोडीत नाहीं. त्यामुळें या वादांत आम्ही शिरत नाहीं.

८ "ध" चा "मा" आनंदीबाईनें केला नाहीं-- ★

आजपर्यंतची रूढ कल्पना आनंदीबाईनें आपल्या डोळ्यांतील काजळानें 'ध' चा 'मा' केला अशी आहे. आनंदीबाईची दिनचर्या प्रसिद्ध झाल्यापासून आनंदीबाई कृत्या नव्हती हें स्पष्टपणें सिद्ध झालें आहे. आनंदीबाईला तिची सवत कैद पाहातां 'ध' चा 'मा' करणें कुठें व कसें शक्य होतें ? याबाबत इतिहासभास्कर रानडे म्हणतात 'मोडींत 'ध' हें अक्षर 'मा' पासून अगदीं भिन्न आहे. 'ध' ची गांठ आंत असते तर 'मा' ची बाहेर असते. 'ध' अक्षराचा 'मा' तयार होणें शक्य नाहीं. तें अक्षर पुरें पुसून काढूनच त्या ठिकाणी 'मा' हें अक्षर लिहावयास पाहिजे. तसें साधन आनंदीबाईजवळ ती सक्त कैदेत असतांना कसें असणार ? ' हें त्यांचें म्हणणें बाजवी आहे. आनंदीबाईनें डोळ्यांतील काजळानें 'ध' चा 'मा' केला हें म्हणणें तर हास्यास्पद आहे. कारण त्या कागदावरील 'मा' हें अक्षर शाईनेंच लिहिलें होतें, काजळानें लिहिलें नव्हतें. अर्थात 'ध' हें अक्षर पुरें पुसून काढून त्या ठिकाणीं बनावट अक्षर लिहिण्यांत तरबेज अशा एखाद्या माणसानेंच हें काम केलें असलें पाहिजे. कारण लेखकाच्या अक्षरांत तें पूर्णपणें व बेमालूमपणें मिसळलें पाहिजे होतें.

९ सुमेरसिंगानें 'ध' चा 'मा' केला नाहीं:— ★

नारायणरावाला धरावें असा करार असतांना आपण त्याला मारलें हा दोष झांकणेसाठीं सुमेरसिंगानें हा उपद्व्याप केला असावा असा संशय येतो. पण विचाराअंती तो टिकूं शकत नाहीं. कारण 'धरावें' असा कागद मुत्सद्यामार्फतच सुमेरसिंगाच्या हातीं गेला असल्यानें 'ध' चा 'मा' कसा झाला असा जाब मुत्सद्यांनीं त्याला विचारला असता आणि गुन्हेगार म्हणून त्याला ताबडतोब

तुरुंगांत डांबलें असतें. याबाबत सुमेरसिंगावर कसलाच आरोप कोणीं ठेवलेला नाहीं.

१० 'ध' चा 'मा' नानांनींच करविला:— ★

नारायणरावाच्या खुनाचा आरोप दादावर मारण्यांत आला व दादाला खुनी ठरवण्यांत आलें. आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं दादांचें नैतिक पाठबळ नाहींसें व्हावें म्हणून नाना वाट पाहात होते. 'धरावें' असा दादाच्या सहीचा कागद होताच. नारायणराव मारला गेला होता. अर्थात् नारायणरावाच्या मृत्यूचा संबंध दादाच्या सहीच्या कागदाशीं जोडतां आला तर नानाचें दादाला बदनाम करण्याचें काम आपोआपच साधण्यासारखें होतें. अर्थात् असा संबंध 'ध' चा 'मा' केल्याखेरीज जोडतां येण्यासारखा नव्हता. तेव्हां आधीं हा कागद हस्तगत करणें नानाला अवश्य होतें. "धरावें' असें लिहिलें असतां नारायणराव मारला गेला. तेव्हां "हें तुला जाचणार, मला तो कागद देशील तर तुला या प्रकरणांतून मी सोडवीन" असें सुमेरसिंगाला सांगून नानांनीं तो हस्तगत केला व एकाद्या सराइत बनावट कागद तयार करणाऱ्या मुरब्बी माणसाकडून 'ध' चा 'मा' करवून घेतला असें म्हटलें तर तें सत्याला सोडून होणार नाहीं. सुमेरसिंगाला दिलेला हा दादाच्या सहीचा कागद नारायणरावाच्या मृत्यूनंतर सहा आठवडयांनीं प्रथम प्रकाशांत आला. हा कागद देण्याचा तगादा नानांनीं सुमेरसिंगाला लावला नसता काय? कागद न दाखवला असता तर सुमेरसिंगाला तुरुंगांत डांबून नानांनीं याचा प्रथम उलगडा केला असता. सुमेरसिंगानें तोंडी सांगितलें कीं मला मारण्याचा हुकुम दादांनीं लेखीत दिला आहे. त्याच्या सांगण्यावरून तसा आरोप दादावर ठेवला जातो. व त्याबद्दल दादांना न्यायी रामशास्त्र्याकडून पुराव्याचा हा कागद पुढें नसतांहि देहांत शासन फर्मावण्यांत येतें. हा उपक्रम अभिनव होता. पण हे न्यायी लोक तो कागद कां पुढें आणवीत नव्हते असा आचंबा वाटण्यासारखा आहे. याचें एकच उत्तर कीं 'ध' चा "मा" बेमालूमपणें होण्याला सहा

आठवड्याचा अवधी लागला म्हणून त्या आधीं तोंपर्यंत हा कागद मागतां येण्यासारखा नव्हता. या सर्व कारणामुळें 'ध' चा 'मा' करण्याची ऐतिहासिक करामत करणें नानांनाच काय तें शक्य होतें असेंच ठरते.

**११ नारायणरावाच्या खुनाचा मुत्सद्यांवर भिन्नभिन्न परिणाम— ★**

राघोबादादा या घटनेमुळें भांबावून गेला. बापूंना हें वृत्त कळतांच मूढ बनून तो उघड्यानें ५-६ मैल बेभानपणें गेला व नंतर आपण भटकत आल्याचें लक्षांत येऊन तो घरीं परत आला. कटाचें धुरीणत्व बापूकडे होतें. आपण 'धरावें' असा कट केला असतां नारायणराव मारला गेला हें आपल्या मुत्सद्दीपणाला लांछनास्पद आहे असें त्यांना वाटलें. हरिपंत शांतपणानें ४ तासानंतर सहजपणानें चौकशी करीत आले. नानांच्यावर कसलाच परिणाम झाला नाहीं. इतर मुत्सद्यांना आश्चर्य व खेद झाला. नानांच्या या मनस्थितीबद्दल लोकांना आचंबा वाटत होता.

**१२ बापूंना दादाविरुद्ध नानांनीं बिथरविलें:— ★**

त्या वेळीं पेशवाईंत बापूंची फार कीर्ति. बापू वचनाचे सच्चे होते. ते आपल्या कीर्तीला फार जपत असत. आपल्या आजपर्यंतच्या कर्तबगारीवर नारायणरावाच्या खुनामुळें पाणी पडलें असें बापूंना वाटलें. बापूंची मनस्थिति यावेळीं कमकुवत बनली होती. बापूंची दादावर निष्ठा होती ती दादाच्या उदार आणि सात्विक व्यक्तिमत्वामुळें होती. दादाचें व्यक्तिमत्व जोंपर्यंत उज्वल होतें तोंपर्यंत बापूंना दादाविरुद्ध बिथरविणें अशक्य होतें. दादांचें व्यक्तिमत्व एकदां का हिणकस ठरलें तर मात्र बापू दादाशीं प्रेमानें वागणें शक्य नव्हतें. अशी बापूंच्या मनाची ताकद व कमजोरी नाना पूर्णपणें ओळखून होते. नारायणरावाच्या खुनाचा आरोप दादावर लादतां आला व तो बापूंना पटला तर दादांच्या विरुद्ध बापूंना बिथरविणें अगदीं सोपें होतें. बापूंना पटवून द्यावयाचें म्हणजे तसाच एखादा भक्कम पुरावा उभारणें भाग

होतें. नानांनीं सुमेरसिंगाला दादाच्या सहीचा कागद दिला होता तो पैदा करून त्यांत 'ध' चा 'मा' करून नंतर तो बापूला दाखविला व म्हटलें आम्हीं 'धरावें' असा कागद दिला असतांना राज्यतृष्णे-मुळें दादानें 'मारावें' असा गुप्त करार सुमेरसिंगाशीं केला व नारायणरावाला मारवलें. बापूंची मनस्थिति कमकुवत झाली अस-ल्यानें बापूंना हें खरें दिसू लागलें. दादाच्या बाजूचा त्यांचा ओढा कमी होऊं लागला. आपण नारायणरावांचें संरक्षण करूं शकलों नाहीं याची त्यांना शरम वाटूं लागली. "आपणांस मरण येईल तर बरें" असे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघूं लागले. या त्यांच्या मनस्थितीचें वर्णन करतांना खरेशास्त्री म्हणतात "बापूजवळ कारुण्य, वात्सल्य धन्याबद्दल आपलेपणा इत्यादि गुण होते." दादांनीं कारभारीपणा घेण्या-बाबत बापूंना पुष्कळ वेळां आग्रह केला, पण बापूंनीं कारभारीपणा पतकरला नाहीं. याचें कारण त्यांना दादाबद्दल आतां सहानुभूति वाटेनाशी झाली होती. दादा खरोखरींच गुन्हेगार आहेत का अशी शंका त्यांना येऊं लागली होती.

### १३ दादाची बाजू लंगडी पडली— ★

सखारामबापू फार मोठा मुत्सद्दी होता. तो अत्यंत कारस्थानीहि होता. पण त्याबरोबरच तो भावनाप्रधानहि होता. नारायणराव मारला गेला, या गोष्टीमुळें त्याचें हृदय भरून आलें. मनुष्य भावनेच्या आहारीं गेला म्हणजे त्याची विचारशक्ति कोती बनते. या परिस्थितींत सांपडल्यामुळें हा पेशवाईंतील पुरा शहाणा अर्ध्या शहाण्याच्या कार-स्थानाला बळी पडला! बापूंचा दादांना पाठिंबा न मिळाल्यामुळें दादाची बाजू लंगडी पडली. बापू म्हणजे दादाच्या पक्षाचें डोकें असल्यामुळें बुद्धिमत्तेची दादापक्षाला यापुढें वाण पडली. नेहमींप्रमाणें बापूचा दादाला यावेळीं पाठिंबा मिळाला असता तर मराठ्यांचा इतिहास निराळा झाला असता.

### १४ नारायणरावाच्या वधाचा दूरगामी परिणाम— ★

पेशवाईची घडी नीट बसवावी म्हणून उभारण्यांत आलेल्या या

कटांत नारायणराव मारला गेला! त्याच्या खुनाचा आरोप दादावर आला. खून करण्याचा कोणाचा इरादा होता असें मुळींच दिसत नाहीं. नारायणरावाचा मृत्यू ही एक अपघाती घटना होती. पण त्यामुळें पेशवाईंत अत्यंत तीव्र अशी दुही निर्माण झाली. एका बाजूला दादा व दुसऱ्या बाजूला मुत्सद्दी अशा या ओढाताणीच्या लढ्यांत पेशवाईची सर्वं दृष्टींनीं चिरफाड झाली. सरदारांच्यामध्यें तट पाडून आपल्या बाजूस वळवून घेण्याच्या खटपटींत सर्व सरदारांची दानत आपणच नाहींशी करतों आहोंत याची कल्पना दादा किंवा मुत्सद्दी यांना आली नाहीं. इंग्रजांना अनुकूल करून घेण्यासाठीं दादांनीं आणि निजामाला पाठीशीं घालण्यासाठीं मुत्सद्यांनीं प्रांतांची खैरात केली. खाजगी द्वेषाला राजकीय स्वरूप आलें. पक्षाभिमान अत्यंत बळावला व त्यापुढें राष्ट्रहित दिसेनासें झालें. पेशव्यांच्या राज्यांतील प्रजा व सरदार यांची राष्ट्रीय दानत जी यावेळीं एकदां नाहींशी झाली ती शेवटपर्यंत परत उगवूं शकली नाहीं. आणि राष्ट्रप्रेमाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या पायावर उभारलेली शिवसम्राटांची हिंदूपदपातशाही या अराष्ट्रीय मनस्थितीमुळें घसरगुंडीला लागली व शेवटीं कोलमडून गेली.

---

## प्रकरण ८ वें

# बारभाईचें कारस्थान

**१ दादा व बापू यांच्या मैत्रीचा दुवा:—** ★

बारभाईच्या कारस्थानाची उभारणी बापूच्या विमनस्क मनस्थितींतून झाली हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. पण बापू आणि नाना एक कसे झाले व दादाला पदच्युत करण्याला बापू कसा तयार झाला हा महत्वाचा प्रश्न आहे. दादा व बापू यांची गट्टी त्या दोघांच्या स्वभावांतील प्रामाणिकपणा, सात्विकपणा व राष्ट्रीय वृत्ती यांवर

आधारलेली होती. स्वभावसाद्धर्म्याशिवाय चांगला स्नेह निर्माण होऊं शकत नाहीं. हा दुवा कोणत्याही कारणानें तुटला तर ती मैत्रीही तुटते. हैदरला फितूर झाल्याची अफवा उठवून दादांना लोकांत बदनाम करण्यात आलें होतें. नारायणरावाच्या खुनाचा आरोपहि त्यांच्यावर लादण्यांत आला होता. दादा खुनी आहेत असें बापूंना पटलें तर ते दादाविरुद्ध जातील हें नानांनीं अजमावलें होतें.

**२ बापू दादाविरुद्ध बिथरले:--** ★

नानांनीं 'ध' चा 'मा' केलेला कागद बापूंना दाखवला व दादा कसा भकला आहे याची खात्री पहा असा सवाल टाकला. दादानें गारद्यांना इनामें दिलीं. दादा दोषी नसता तर त्यानें गारद्यांना शिक्षा केली असती. इनामें दिलीं त्या अर्थी दादा दोषी असावा असें वाटण्यासारखें होतें. नारायणरावाला संभाळण्याचें आपण माधवरावांना दिलेलें वचन आपणाला पाळतां आलें नाहीं याचा बापूंना विषाद वाटत होता. तसाच त्या वचनाच्या आड आलेल्या दादांचा त्यांना राग येऊं लागला. एकदां या दिशेनें विचाराचें चक्र सुरूं झाल्यानंतर त्याचा प्रवाह उलटवणें फार कठिण असतें. दादाला कैदेंतून सोडवून त्याच्या इच्छेप्रमाणें राज्यकारभार करावा म्हणून आपण कट केला आणि त्याच कटाचा फायदा घेऊन दादानें नारायणरावाला मारलें या गोष्टीची बापूंना चीड येऊं लागली. पाण्यांत जाळें असतें. पोहणाऱ्याचा पाय त्यांत अडकतो. तो सोडविण्याची पोहणारा जशी खटपट करतो तसा त्याचा पाय त्यांत अधिक अडकतो व शेवटीं तो मनुष्य त्यांतच बळी पडतो. तशी यावेळीं बापूंची स्थिति झाली व दादा दोषी आहे असें त्यांच्या मनाला वाटूं लागलें.

**३ पेंचांत धरून बापूंना बारभाईत खेंचलें:--** ★

दादा दोषी आहे असें बापूंना वाटलें असलें तरी तेवढ्यानें बारभाईंत बापू सामील झालेच असते असें नाहीं. बापूंना नाहीं

म्हणतांच येऊं नये असा बिनतोड पेंच नानांनीं बापूंना टाकला असणें शक्य आहे. तो असा—" धरावेच्या कटाचे तुम्ही म्होरके आहा. नारायणराव मारला गेला. दादा खुनी आहे असा समज सर्वांचा झालाच आहे. नारायणरावाच्या खुनाच्या बाबतींत तुम्ही साथीदार होता असा पुकारा करावयाचा अवकाश, सर्व लोक दादाबरोबर तुम्हीहि खुनी आहा असें म्हणूं लागतील. तेव्हां आमच्या कारस्थानांत सामील व्हा नाहीं तर दादाबरोबर खुनी म्हणून तुमचें नांव अजरामर करून ठेवतों. आम्ही करीत असलेलें कारस्थान न्यायाचें आहे. दादा अन्यायी आहे. त्याला राज्य मिळूं नये अशी आमची खटपट आहे. नारायणरावाचें संरक्षण करण्याचें वचन आपण माधवरावाला दिलें होतें, तें तुम्हांला पाळतां आलें नाहीं. त्यामुळें आपल्या मनाला लागलेली तळमळ आपण आमच्या कारस्थानांत सामील होऊन नारायणरावाच्या वारसाला राज्य मिळवून देऊन धुवून काढा. या सवालानें बापू चीत झाला. दादा खुनी असल्याचा संशय बापूला येत होताच. त्यामुळें त्याला राज्य मिळूं नये हें बापूला पटण्यासारखें होतें. नारायणरावाचें संरक्षण आपण करूं शकलों नाहीं याची बापूला आत्यंतिक खंत वाटत होती. ती नारायण-रावाच्या मुलाला राज्य मिळवून देऊन घालवतां येईल याचें त्याला समाधान वाटण्यासारखें होतें. नानाच्या कटांत सामील न झाल्यास मात्र खुनी म्हणून बदनाम होऊन डोंगरी किल्यांत बसावें लागणार होतें. अर्थात् याचा परिणाम स्वाभाविकपणेंच बापू बारभाईंत सामील होण्यांत झाला !

**४ बापूशिवाय बारभाईचें कारस्थान यशस्वी झालेंच नसतें-- ★**

नारायणरावाच्या मृत्यूनंतर दादा राज्यावर आल्याबरोबर त्यांनीं निजामाशी लढाई देऊन त्याची हड्डी नरम केली. व त्यानंतर ताबडतोब तो हैदरच्या स्वारीवर निघाला. यावरून मैदानावरील दादाच्या सामर्थ्याची कल्पना येते. दादाच्या विरुद्ध कारस्थान यशस्वी करावयाचें म्हणजे त्याच्याशीं चार हात केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. म्हणून तसें सामर्थ्यवान सैन्य व सेनानायक हवे होते. लढाईचें व नानाचें

विशेष सख्य नसल्यानें बापूसारख्या लढवय्याची अत्यंत गरज होती. दादाच्या सैन्यांतील सर्व सरदार बापूंचे दोस्त असल्यानें त्यांच्या मार्फत त्या सरदारांना फोडून दादांची बाजू लंगडी पाडणें सोपें होतें. दादाच्या सरदारांपैकी कोणीहि नानाच्या लगामीं येणें शक्य नव्हतें. दादाच्या सैन्यांतून कांहीं मंडळी फोडून घेतल्याशिवाय बारभाईंना दादाविरुद्ध यश मिळवणें शक्य नव्हतें. दादाच्या सैन्यांत फितूर झाला नसता आणि बापू दादाच्या बाजूस उभा राहिला असता तर दादानें या बारभाईंना सहज चिरडून टाकलें असतें. बारभाईंचें राज्य ही कल्पना त्यावेळीं लोकांना नवी होती. राजा कसलाहि असला आणि कारभाऱ्यानें सर्व कारभार केला तरी लोकांना त्याबद्दल कांहीं वाटण्याचें कारण नव्हतें. पण राजा कोणी नाहीं. कदाचित तो जन्माला आला तर राज्यावर बसणार होता. तोंपर्यंत कारभारीच राज्याचा सर्व कारभार राजाच्या अधिकारासह करणार होते. तेव्हां राजाच्या जागीं कारभाऱ्यांना लोकांनीं मानावयाला हवें होतें. लोकमत ज्याच्याबद्दल अत्यंत अनुकूल, लोकांचा ज्याच्यावर अत्यंत विश्वास असा माणूस बारभाईमध्यें प्रमुख असणें प्राप्त होतें. नानाबद्दल कोणत्याही काळीं लोकमत चांगलें असल्याचा दाखला नाहीं. लोक नानाला वचकून असत, भीत असत. पण नानाबद्दल लोकांना प्रेम अगर विश्वास वाटत नव्हता. बापूबद्दल मात्र लोकांत, स्वराज्यांत व परराज्यांतहि प्रेम, आदर व त्याच्या प्रामाणिकपणाबद्दलची खात्री सदैव वसत असल्याचें दिसून येतें. त्यामुळें लोकांचा विश्वास संपादण्याच्या दृष्टीनें बापू बारभाईंचे घटक असणें जरूर होतें. तिसरी गोष्ट अशी होती कीं दादा खुनी आहे असें नानानें कंठरवानें जरी सांगितलें असतें तरी त्याचा परिणाम लोकमताच्या दृष्टीनें विशेषसा झाला नसता. कारण नाना दादाचा शत्रु होता ही गोष्ट जगजाहीर होती. बापू दादांचा मित्र होता. त्याच्या शब्दाला वजन होतें. त्याच्या प्रामाणिकपणावर लोकांचा विश्वास होता. त्याच्या शहाणपणाची लोकांना खात्री होती. तेव्हां बापूंनीं ‘दादा खुनी आहे’

असें म्हणून बारभाईना मदत केली तर त्याचा अत्यंत अनुकूल परिणाम होणार होता. या सर्व कारणामुळें नानाचें बापूशिवाय भागणार नव्हतें. बापू बारभाईंत सामील झाला नसता तर कदाचित हें कारस्थान निर्माण करण्याची नानाची छाती झाली नसती.

**५ दादाची मनस्थितिः—** ★

बापूंचा कल नानाच्या बाजूस झुकलेला पहातांच दादाच्या मनावर त्याचा भयंकर परिणाम झाला. नारायणराव कसा मेला याबद्दल इतरांना कांहीं शंका वाटल्या असल्या तरी ती गोष्ट दादाच्या डोळ्यासमोर घडली असल्यानें गारद्यांनीं त्याला मारलें नाहीं, तो अपघातानें मेला हें नक्की काय तें दादालाच माहीत होतें. नारायणरावाचा खून कोणींच केलेला नव्हता. त्यामुळें गारद्यांना त्यांचीं ठरलेलीं इनामें देणें दादाला भाग होतें. पण दादावर आलेल्या आरोपाच्या दृष्टीनें या गोष्टीचा विचार केला असता दादाचें हें कृत्य निंद्य दिसत होतें. वस्तुस्थिती काय होती याची कल्पना दादाला असल्यामुळें आपल्याला लोकांनीं गुन्हेगार म्हणावें याचा दादाला सात्विक संताप येणें स्वाभाविक होतें. त्यांत बापूहि सामील झाल्यामुळें दादा बापूला 'बेइमान' 'फितूरी' अशी विशेषणें लावूं लागला. दादाच्या भूमिकेवरून पाहिलें असतां त्याला असें वाटणें स्वाभाविकच होतें. यामुळें बापू व दादा यांच्यामध्यें पुरा बेबनाव निर्माण झाला.

**६ बारभाईच्या कारस्थानाचा उगम—** ★

या कारस्थानाची मूळ कल्पना बापूच्या डोक्यांतून निघाली असें य. गो. कानेटकर यांचें मत दिसतें. ते म्हणतात "राघोबानें महमद युसफ व सुमेरासिंग यांची भेट घेऊन त्यांना बरीच रक्कम भेट दिली ही गोष्ट जेव्हां लोकांस कळली तेव्हां राघोबा सर्वांच्या मनांतून उतरला. नारायणरावाचा खून करण्यांत त्याची संमती होती असें सर्वांस वाटलें. प्रमुख प्रमुख मुत्सद्यांची या वेळेस अक्कल गुंग होऊन राघोबाबद्दल त्यांचीं मनें विटून गेलीं. बापूच्या चित्तवृत्तीचाहि क्षोभ झाला होता.

कांहीं दिवस विचार करून अनुकूल प्रतिकूल गोष्टीचा अजमास पाहून नवीन कारस्थान करण्याचें त्यांचें मनानें घेतलें. " आमचें मत भिन्न आहे. ही कल्पना नानाच्या डोक्यांतून निघाली, आणि सर्व बाजूंनीं विचार करून बापूंनीं ती मान्य केली एवढेंच.

**७ दादापुढील राजकीय प्रश्नांची निकड—** ★

नारायणरावाच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या शत्रूंनीं चारी बाजूंनीं उठाव केला. हैदरनें मराठ्यांचा मुलूख खायला सुरवात केली. अर्काटच्या नबाबानें इंग्रजांच्या साहाय्यानें तंजावरचें राज्य जिंकले. मुधोजी भोसले व त्याचा भाऊ साबाजी यांचा तंटा सुरू झाला. साबाजीला निजामाची मदत होती. मुधोजी दादाचा स्नेही होता. मुधोजीला साहाय्य करून साबाजी व निजाम यांची खोड मोडणें दादाला भाग होतें. या स्वरूपाचे अनेक निकडीचे प्रश्न त्यावेळीं दादापुढें उभे होते.

**८ दादाच्या सैन्यांतून मुत्सद्यांनीं पाय काढला—** ★

निजामावर प्रथम स्वारी करून त्याचा मोड करावा व नंतर हैदरचा समाचार घ्यावा व हैदरचा पाडाव करून त्याची मदत घेऊन अर्काटच्या नबाबाचा व त्याबरोबर इंग्रजांचा समाचार घ्यावा, अशी आंखणी करून दादा स्वारीवर निघाला. या वेळीं दादाबरोबर बापू, नाना, रामचंद्र गणेश, त्रिंबकराव, भवानराव, परशरामभाऊ वगैरे सर्व प्रमुख मंडळी होती. कांहींतरी निमित्त काढून एकेकांनीं स्वारींतून परत यावयाचें असें या सर्वांमध्यें ठरलें होतें. चिरंजीवाच्या मुंजीचें निमित्त सांगून बापूंनीं दादाचा निरोप घेतला व ते सासवडास आले. जाण्यापूर्वीं त्यांनीं दादाला अशी सूचना केली कीं "हरिपंत, नाना वगैरे वरकांती तुम्हांस मिळालेल्या लोकांना सैन्यांत ठेवणें धोक्याचें आहे." त्यामुळें मोरोबा व हरिपंत यांनीं एकेकांनीं आजारीपणाचें निमित्त करून दादाजवळ जाण्याची परवानगी मागतांच दादानें ती दिली! (म. रु. २-१०३)

**९ गंगाबाईच्या नांवानें राज्यकारभार करण्याची मसलत--** ★

दादांनीं निजामाचा पराभव करून त्याच्याशीं तह केला, आणि साबाजीच्या पारिपत्यासाठीं त्रिंबकराव रास्ते यांना पाठवून त्यांनीं कर्नाटकाकडे कूच केलें. नाना, हरिपंत व मोरोबा ही मंडळी पुण्यास आली. बापूहि सासवडहून पुण्यास आले, आणि या सर्वांनीं मिळून गंगाबाईच्या नांवानें कारभार करावा अशी मसलत ठरवली. त्रिंबकराव-मामाहि त्यांत सामील झाले. त्रिंबकराव व साबाजी एक झाले आणि त्यांनीं दादाविरुद्ध बंड पुकारलें. (पे. द. ५ प्रस्तावना १) मामा व बापू यांचा पत्रव्यवहार सुरू होता. "वरकड कित्येक साधनांचे प्रकार केल्याची" माहिती देऊन शक्य असल्यास मामांनीं शनिवारीं आपणांस भेटावें असें बापू मामास लिहितो. (पे. द. ५. ४)

**१० कारस्थानाच्या उगमाचा काळ--** ★

हें कारस्थान केव्हां रचलें गेलें याबाबत वेगवेगळ्या इतिहासकारांचे वेगवेगळे उल्लेख आढळतात. या कारस्थानाचें पुढारीपण मात्र सर्वांच्या मतें बापूकडेच होतें असें आहे. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या माणसाबरोबर मसलत करून बापूनें कारस्थान केलें असे उल्लेख आहेत. अर्थात ती सर्व मंडळी कारस्थानांत सामील होती याबद्दलहि कोणाचें दुमत नाहीं. श्री. खरे व बखरकार यांचें म्हणणें कीं बारभाईच्या कारस्थानाची उभारणी दादा मोहिमेवर जाण्यापूर्वीं गुप्तपणें झाली. श्री. कानेटकर यांचें वर लिहिल्या पत्राप्रमाणें म्हणणें कीं दादा मोहिमेवर गेल्यानंतर हें कारस्थान झालें. आमच्या मतें खरे यांचेंच म्हणणें बरोबर आहे. कारस्थानाची कल्पना आधीं निघाली होती. म्हणूनच ही मंडळी दादाच्या सैन्यांतून एकामागून एक ठरल्याप्रमाणें आली. कारस्थानाची मांडणी नंतर तयार झाली असेल. त्याची कल्पना व रूपरेखा आधींच आंखली गेली पाहिजे हें उघड दिसतें.

**११ पार्वतीबाईस मुत्सद्यांनीं आपल्या बाजूस वळवलें:--** ★

कारस्थानाचा मुख्य आधार गंगाबाई व तिचा वंश असलेनें

गंगाबाईच्या सुरक्षिततेवर सर्व अवलंबून होतें. तिला कुठेंतरी सुरक्षित ठिकाणीं ठेवणें त्यांना जरूरीचें होतें. त्याचप्रमाणें सदाशिवरावभाऊंची पत्नी पार्वतीबाई हिलाहि आपल्या बाजूस वळवून घेणें मुत्सद्यांना अगत्याचें होतें. कारण पार्वतीबाई बरोबर असल्यानें गंगाबाईस धीर येणार होता. ती सत्वशील व लोकप्रिय असल्यानें ती मुत्सद्यांना मिळाल्यानें लोकांना बारभाईची बाजू न्यायाची वाटणार होती. पार्वतीबाईला इतर कोणत्याही गोष्टीचें आमिष लावून वळवून घेण्याची शक्यता नव्हती. त्या वेळीं दौलताबादच्या किल्ल्यांत तोतया म्हणून ठेवलेला इसम सदाशिवराव भाऊच होता, तोतया नव्हता अशी बऱ्याच लोकांना विशेषतः पार्वतीबाईला खात्री होती. सदाशिवरावाची सुटका ही एकच बाब त्या साध्वीला अनुकूल करून घेण्याला उपयोगी होती. ह्मणून या मुत्सद्यांनीं सदाशिवरावाला आपण मुक्त करतों असा उघड दिसण्याइतपत बाहाणा केला व पार्वतीबाईस आपल्या कटांत सामील करून घेतलें. मुत्सद्यांना राघोबा नको होता तसाच सदाशिवरावभाऊ नको होता. किंबहुना सदाशिवराव अधिक तीव्रतेनें नको होता. कारण दादा आखत्यार पाहूं लागला तरी त्याला कोणीतरी कारभारी लागत असे. त्यामुळें बापू अगर नाना यापैकीं कोणाची तरी वर्णी लागणें जरूर असे. पण सदाशिवरावभाऊ हा कारभारीच असल्यानें त्याच्यापुढें यांना गौणत्वच प्राप्त होणार होतें. शिवाय पेशव्याच्या घराण्यांतील कर्तबगार माणूस कारभारांत असल्यानंतर मुत्सद्यांना पूर्ण अखत्यार कधींच प्राप्त होणें शक्य नव्हतें. म्हणून मुत्सद्यांनीं भाऊला सोडविण्याचें आमीष दाखवून गंगाबाईला वळवून घेतलें. पण सदाशिवरावाला मात्र केव्हांच मुक्त केलें नाहीं. याबाबत इंग्रजांचा वकील मॉस्टीन पुण्यास होता, त्यानें आपल्या डायरींत तीन दिवशीं तीन नोंदी करून ठेविल्या आहेत, त्या पाहण्यासारख्या आहेत:—

Friday 28th January 1774-- " .... ..... I am also assured it was last night determined by the ministers to

सं. नं. ५८

release Sadobah out of Daulatabad and bring him to Poona. There have been some time whispers of this being intended, but I do not give entire credit to it" ( Page 309)

शुक्रवार ता. २८ जानेवारी १७७४ इसवी.—दौलताबादच्या किल्यांतून सदोबाला मुक्त करून पुण्यास आणावयाचें मुत्सद्यांनीं ठरवलें आहे असें मला काल रात्रीं खात्रीलायख रीत्या सांगण्यात आलें. असें करण्याचा मुत्सद्यांचा विचार असल्याची कुणकुण बरेच दिवस ऐकतों. पण माझा त्यावर पूर्ण विश्वास बसत नाहीं. ( पान ३०९ )

2 Sunday 30th January 1774.

"....... however I was there ( at Shanwarwada ) appearances from the behaviour of all the fort officers from town, and orders being issued by Morobha in Gungabay's name and Narayanrao's Sicca to all the forts, and placing choykeys on all those in Raghoba's interest, I was convinced that the ministers had no thought of taking out Sadobah but meant to seize the Government themselves under cloak of Gungabay and her issue; this surmise has beenn confirmed, and by what I have since heard, the people were actually sent to Daulatabad to bring him ( Sadobah ), but it seems it was all an artifice of the ministers to blind his wife Parwatibay, induce her to go with them to which she was at first averse."

[ Page 311 ]

रविवार ता ३० जानेवारी १७७४ " ....पण मी शनिवारवाड्यावर गेलों असतांना पुण्यांतील किल्यावरील अधिकाऱ्यांच्या हालचालीवरून पाहातां मोरोबानें गंगाबाईच्या नांवानें हुकुम सोडले, सर्व किल्यांना नारायणरावाचा शिक्का दिला: राघोबाच्या हितसंबधांचे किल्यावर पाहारे बसवले. यावरून मुत्सद्यांच्या मनांत सदोबाला मुक्त करण्याचें नसून गंगाबाई व तिचें अपत्य यांच्या नांवाखालीं राज्यसत्ता

आपल्या हातांत बळकवावयाची आहे अशी माझी खात्री पटली. याला दुजोराहि मिळाला. पण सदोबाला आणण्यासाठीं दौलताबादला माणूस देखील पाठवला आहे असेंहि मला कळलें आहे. पण मला वाटतें पार्वतीबाई मुत्सद्यांच्या बेताला पाठिंवा द्यावयाला कबूल नव्हती. तिला हें आमिष दाखवून फसवून आपल्या बाजूस वळवून घेण्याचा हा मुत्सद्यांचा डाव होता. '' ( पान. ३११ )

3 Mondy 31st January 1774.

" I am credibly informed that the releasing of Sadobah was all a cheat to deceive his wife and no such thing ever intended." ( Page 315 )

**सोमवार ता. ३१ जानेवारी १७७४--** केवळ पार्वतीबाईला फसवण्याकरतां सदोबाला मुक्त करण्याची हूल उठवण्यांत आली होती. त्याला मुक्त करण्याचा मुत्सद्यांचा मुळींच विचार नव्हता असें खात्रीलायख रीत्या समजलें आहे. ( पान ३१५ )

**१२ गंगाबाईची पुरंदरास रवानगी--** ★

मुत्सद्यांनीं सर्व बाजूंनीं आपला पक्ष बळकट केल्यानंतर गंगाबाईला कुठें ठेवावें याचा विचार त्यांना पडला. कारण पुण्याचा कोतवाल नारो अप्पाजी हा दादाचा मनुष्य असलेनें गंगाबाईला पुण्यांत ठेवणें धोक्याचें होतें. म्हणून तिला पुरंदरास हलविण्यांत आलें. याबाबत सातारच्या अधिकाऱ्यास नाना लिहितो "आम्हीं श्री. सौ. पार्वतीबाई व गंगाबाई यांस घेऊन रा. सखारामबापूसह किल्ले पुरंदरास आलों ( ३०-१-१७७४ ). तुम्ही राजेश्रीस (सातारचे छत्रपतीस ) जलदी करून किल्यावर नेणें. एक घडीचाहि विलंब न लावणें तुमच्या भरवंशावर केलें आहे.'' ( पा. सं. नं ७७ पे. द. ५ )

**१३ दादाला कारस्थानाचा पत्ता नव्हता:—** ★

राघोबा स्वारीवर असल्यानें त्याला यांच्या कारस्थानाचा पत्ता नव्हता. स्वारीच्या कामावर नेहमींप्रमाणें आपल्यापाशीं बापू असावा

असें त्याला या वेळीं वाटलें. बापू आपल्याविरुद्ध बारभाईंत सामील झाला होता याची दादाला कल्पना नव्हती. त्यानें बापूला स्वारीवर येण्यासाठीं पत्र पाठविलें. "सांप्रत बहुत दिवस घरीं आहा. औषध उपाय करून आरोग्य झाला असाल. यास्तव लवकर चांगला दिवस पाहून येणें. तुम्ही मातबर शाहाणे जवळ असावें हें आमचें मानस तुम्हांस उचित तरी लवकर यावें." (५-२-१७७४) (पे. द. ५-८)-

**१४ दादाच्या लष्करांत फितूरः--** ★

आपल्या लष्करांतहि फितूरी झाली आहे याची जाणीव बरेच दिवस दादाला नव्हती. त्यानें रामदुर्ग व कल्याणदुर्ग हे किल्ले जिंकले व बेदनूरास वेढा दिला. एके दिवशीं त्याच्या कानावर आलें कीं भवानराव फितूर आहे. याच वेळीं हैंदरनें दादास त्याच्या सैन्यांत फितूर आहे त्यांनीं सावध असावें असा निरोप पाठवला. भवानरावाच्या बेमुर्वतखोर वर्तनामुळें दादाची तशी खात्री झाली. (पे. द. ५ ४०) दादानें भवानरावास त्याच्या सैन्यासह निरोप देण्यास कळवलें. पण त्यांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. दादानें मुराररावास त्याचेवर हल्ला करण्याचा हुकुम दिला. त्यांनीं स्वकीयावर आपली समशेर आपण चालविणार नाहीं असें उत्तर दिलें. इतरांनाहि दादानें हुकुम देऊन पाहिलें. पण त्यांच्याकडूनहि तसेंच उत्तर मिळालें. कारण त्यांचें तसें ठरलेंच होतें. "सर्वांनीं एकत्र होऊन मुख्यास (राघोबास) विश्वरूप दाखवावें." आपलें कोणीच ऐकत नाहीं असें पाहून दादानें स्वतःच्या पथकानिशीं भवानरावावर हल्ला केला. (खरे. २१०९ पे. द. ५-४०) भवानराव निकरानें लढण्यास तयार झाला. परशराम रामचंद्र त्याच्या मदतीस धांवला. हा प्रसंग ओळखून सेनापतींनीं मध्यस्थी करून हें प्रकरण संपवलें. (पे. द. ५-४०)

**१५ नाइलाजानें दादानें हैदरशीं तह केलाः--** ★

याचवेळीं बारभाईच्या कारस्थानाची दादाला पूर्ण माहिती मिळाली. मुत्सद्यांनीं आपणाला पदच्युत केलें आहे असें दादाला समजल्यामुळें

दादानें हैदरशीं मुकाटयानें तह केला. अर्थात हा तह बहुमानाचा असणें शक्यच नव्हतें. माधवरावानें हैदरपासून जिंकलेला सर्व प्रांत त्याला परत द्यावा लागला एवढेंच नव्हे तर रास्ते, पटवर्धन व नरगुंदकर यांचा कर्नाटकांतील जहागिरीचा मुलुखहि हैदरला द्यावा लागला. हैदरनें दादाला पेशवे म्हणून कबूल केलें. व बारभाईंना मानीत नसल्याचें जाहीर केलें. दादाला हैदरनें ६ लक्ष खंडणी द्यावयाचें कबूल केलें.

**१६ फितुरी लोकांना दादाकडून शासनः—** ★

हैदरशीं जुंपलेली लढाई संपल्याबरोबर फितुरी लोकांना शासन करण्याच्या उद्योगाला दादा लागला. त्यानें मुराराराव व वामनराव पटवर्धन यांना ऐवज आणण्यासाठीं हैदरकडे पाठवलें व आपण त्यांचा मुलूख लुटावयाला निघाला. हें कळतांच मुराराराव त्याच्या पक्षास येऊन मळाला. भवानराव व रामचंद्र गणेश यांना दादानें अटकेंत ठेवलें व नंतर तो रास्त्यांच्या जाहागिरींत शिरला. तालीकोट व बागलकोट यामधील मुलूख त्यांनीं जाळून फस्त केला. त्यानंतर दादा पटवर्धनाच्या मुलखांत शिरला. त्रिंबकराव मामा व साबाजी एक होऊन दादाच्या वाटेवर बसले. पण मामाची मदत लवकर न आल्यामुळें दादानें सर्वांना त्राहि भगवान करून सोडलें.

**१७ बारभाईचें कारस्थान म्हणजे बंड होतें:—** ★

सत्याच्या निकषावर घासलें असतां बारभाईचें कारस्थान फारच हिणकस ठरतें. एवढेंच नव्हे तर कायदेशीर राजाविरुद्ध स्वार्थी व मतलबी लोकांनीं केलेलें तें एक बंड होतें असेंच म्हणावें लागेल. या बाबतींत मुत्सद्यांनीं वैयक्तिक द्वेषाला महत्व दिलें; राष्ट्रहिताकडे लक्ष दिलें नाहीं असेंच म्हणावें लागतें. राघोबा पेशवा झाला असता तर राज्ययंत्राच्या दृष्टीनें व प्रजेच्या दृष्टीनें काय बिघडणार होतें? गंगाबाईला मुलगा झाला असता तर त्याला गादी देणार नाहीं असें दादाचें म्हणणें नव्हतें. गंगाबाईला मुलगा झाला तर तो गादीचा

१२५५८
३७३१५७



वारस होईल असें दादानें मान्य केल्याचें एक पत्रहि उपलब्ध आहे. गंगाबाईला मुलगा झाल्यास त्याला राज्यावर बसवावें, नाहीं तर तुम्हीं पेशवा व्हावें अशी दादावर अट घालून गंगाबाई प्रसूत होईपर्यंत तिचा विश्वस्त म्हणून दादानें कारभार करावा; तिला मुलगा झाला तर त्याच विश्वस्त म्हणून कारभार करावा व मुलगा नाहीं झाला तर दादानें पेशवा व्हावें असा दादाशीं करार करून हें प्रकरण मिटवणें शहाणपणाचें होतें. दादाला राज्यलोभ नव्हता असें ठरत असल्यामुळें व नारायणरावाला मारण्याच्या बाबतीत तो निरपराधी असल्यामुळें या बाबतींत मुत्सद्यांनीं त्याच्याविरुद्ध निर्माण केलेले कारस्थान बंडखोर-वृत्तीचें होतें, असेंच कोणाही निःपक्षपाती माणसाला म्हणावें लागेल.

### १८ कारस्थानांत सामील होण्यांत बापूची अक्षम्य चूक-- ★

नानाच्या कारस्थानाच्या जाळ्यांत अडकून भावनाप्रधानतेनें बापू यांत सामील झाला हें खरें असलें तरी नानानें त्याला चकवलें आणि हा मनुष्य नानापुढें हरला ही गोष्ट बापूच्या मुत्सद्दीगिरीला कमीपणा आणणारी आहे. पण दादा खुनी होता असें मानलें तरी दादाविरुद्ध हें कारस्थान करून पेशवाईंत दुही निर्माण केली तर त्याचा परिणाम काय होईल याचा विचार बापूसारख्या राष्ट्रभक्त माणसानें करावयास हवा होता. यावेळीं महाराष्ट्रावर सर्व बाजूंनीं शत्रूंचे हल्ले सुरू असतांना सर्व मराठ्यांनीं एकवटून राज्याचें रक्षण करण्याऐवजीं आपापसांत दुही पाडून शत्रूंना रान मोकळें करून दिलें. माधवरावाच्या कारकीर्दींत मराठ्यांचा दाब बसला होता तो ढिला झाला. वाटेल त्या बलाढ्य शत्रूला नामोहरम करण्याची धमक असलेला व ज्याच्याबद्दल सर्व शत्रूंना नेहमी धास्ती वाटत होती असा हा त्यावेळीं हयात असलेला एकच पेशवा या दुहीमुळें नरम झाला. दादाशीं मांडलेल्या भांडणाचा पेशवाईवर काय परिणाम होईल, पेशवाईच्या शत्रूंच्या हातीं दादा गेला तर त्याला साहाय्य करण्याच्या नांवाखालीं ते पेशवाईंत शिरून किती मुलूख गिळंकृत करतील या सर्व गोष्टींचा विचार

बापूसारख्या शाहाण्या मुत्सद्यानें करणें जरूरीचें होतें. तसा राष्ट्रीय दृष्टीनें बापूनें विचार केला नाहीं व नानाच्या विचारसरणींत बापू वाहून गेला ही त्यानें अक्षम्य चूक केली असेंच म्हणावें लागतें. बापूला अंतःकरण होतें हा त्याच्या स्वभावांतील नाजूक भाग ओळखून नानांनीं नेमका त्यावर घाव घातला व हा शहाणा मुत्सद्दी त्यांत फसला. बारभाईंच्या कारस्थानामुळें पेशवाईंत कायमची चिरफाड झाली व त्यानंतर केव्हांही मराठे एकोप्यानें लढूं शकले नाहींत. मराठ्यांची शक्ति कायम क्षीण राहिली !

**१९ नानांनीं हें कारस्थान अधिकारलालसेने रचिलें—** ★

बापूंचा जसा दोष तसाच किंवा त्याहूनहि अधिक दोष नानाच्या पदरीं येतो. पेशवाई बुडूं पहात होती. ती वाचवण्यासाठीं हें कारस्थान केलें असा कांहीं भाग नाहीं. दादावर नानाचा नेहमीं राग होता. कोणत्या ना कोणत्या कारणानें माधवरावाच्या वेळेपासून दादाला अधिकारांतून हांकून देण्याची खटपट नाना करीत होता हें आम्हीं मागें दिलेंच आहे. नारायणरावाच्या मृत्यूचा पुरा फायदा घेऊन नानानें दादास खुनी ठरवलें हें कृत्य चांगलें झालें असें कोणीहि म्हणणार नाहीं. नारायणराव मारला गेल्यामुळें नानाच्या दुर्दैवानें दादा पेशवा होणार होता. अर्थात एकदां दादा पेशवा म्हणून गादीवर बसल्यावर नानाचें पेशवाईंतून कायमचेंच उच्चाटन होणार होतें. त्यामुळें कांहीं युक्ति करून दादाला पेशवा होऊं न देणें शक्य आहे काय असा विचार नानाच्या डोक्यांत आला. त्याला गरोदर गंगाबाई दिसली. त्याबरोबर केवळ दादाला शह देण्याच्याच हेतूनें प्रेरित होऊन नानानें हें कारस्थान केलें असल्यानें व तें साधण्याच्या कामीं वाटेल तीं कुटिल कारस्थानें नानानें केलीं असल्यानें बारभाईच्या कारस्थानाच्या स्थापनेमुळें जो भयंकर व दूरगामी असा परिणाम पेशवाईवर झाला असें आम्हीं वर म्हटलें आहे, त्यास बापूपेक्षां नाना अधिक जबाबदार आहे असें स्पष्ट होतें. बरें नानानें हें कारस्थान प्रामाणिकपणानें पेशवाईच्या हितासाठीं केलेलें असतें तर परिणामाचें त्यांना आकलन झालें

नाहीं, पण त्यांचा हेतू चांगला होता असें झालें असतें. दादाला शह देण्यासाठीं हें कारस्थान आणि दादा नाहीं म्हणजे सर्व सत्ता आपल्या हातीं असें नानांचें साधें कोष्टक होतें. माधवरावाच्या कारकीर्दींत पेशवाईचा कारभार आपल्याकडे ठेवण्याची धडपड करणारा नाना नारायणरावाच्या मृत्यूनंतर पेशव्यांचे अधिकार आपल्या हातीं ठेवण्याची महत्वाकांक्षा बाळगून त्या दृष्टीनें राजकारणांतील मोहरी या बारभाईच्या कारस्थानांत पुढें टाकूं लागला. वर वर दिसावयाला बापू मुख्य दिसे पण खरें सामर्थ्य नानाचेंच होतें असें बारभाईच्या कारभाराकडे पाहिलें असतां स्पष्ट दिसतें. पेशव्यांची सत्ता आपल्या हातीं घेण्याच्याच हेतूनें नानानें हें कारस्थान केलें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

**२० नानानें काय काय साधलें:—** ★

नानानें या कारस्थानानें बऱ्याच गोष्टी साधल्या. बापू लोकांच्या मतानें फार शहाणा व प्रामाणिक होता म्हणून त्यालाच म्होरक्या बनवून लोकमत अनुकूल करून घेतलें बापूला फोडल्यामुळें दादापक्षाचा मेंदूच नाहींसा झाला व दादा चवताळल्याप्रमाणें वागूं लागला व त्यामुळें त्याचा नाश करणें बारभाईंना सोपें झालें. बापू नानापक्षांत सामील झाल्यामुळें चुकून दुसऱ्या कळपांत गेलेल्या मेंढरासारखी त्याची केविलवाणी स्थिति झाली. कारण त्याला नानापक्षाच्या उलट वागण्याची मुभा व शक्यताच नव्हती. स्वतःच्या मतानें कोणतीहि गोष्ट करावयाला बापू मोकळा नव्हता. त्याला नानाच्या मताबरोबर मिळतें घेणें प्राप्त होतें. त्यामुळें या कारभारांत नानाचा चरचष्मा असून बापूला प्रत्यक्षांत दुय्यम स्थान होतें. म्हणजे बापूवर सत्ता-प्राप्तीच्या बाबतींत त्यानें मात केली. जन्माला येणाऱ्या पेशव्याच्या नांवाखाली सत्ता हातीं घेतली व तो पेशवा मोठा होईपर्यंत ती आपल्या हातांत राहील अशी शाश्वती करून ठेवली. दादाला कलंकित करून मणी काढून घेतलेल्या अश्वत्थाम्यासारखी त्याची केविलवाणी अवस्था केली आणि बापूला आपल्या बाजूस वळवून

घेऊन दादाला त्यांनीं सर्वं बाजूंनीं चीत केलें. आपल्याविरुद्ध पक्षाची अशा रीतीनें त्यांनीं कंबरच मोडून टाकली.

## २१ बारभाईच्या कारभाराची व्यवस्थाः— ★

बारभाईच्या कारभाराची व्यवस्था खालील प्रमाणें होतीः—

१ या कारस्थानांतील सर्वांनीं नानासाहेबाच्या वंशजाखेरीज इतर कोणासहि नमस्कार करावयाचा नाहीं अशा शपथा घेतल्या होत्या.
२ सध्यां गंगाबाईच्या नावानें ग्वाही फिरवावयाची. तिला पुत्र झाला तर त्याच्या नांवानें व पुत्र न झाल्यास तिच्या मांडीवर दत्तक देऊन पेशवाई चालवावयाची.
३ सखारामबापूंना वडीलकीचा मान असावयाचा.
४ नानांना त्याचा दुय्यम म्हणून मान असणेचा.
५ त्रिंबकराव सेनापति असावयाचे.

अशी या कारभाराची रूपरेखा होती. पेशव्यांचे अधिकार बापूकडे. कारभाऱ्याचे अधिकार नानाकडे अशी आंखणी दिसते.

## २२ बारभाई म्हणजे कायः— ★

बारभाई हें नांव अनेक लोकांच्या हातीं असलेली सत्ता अशा अर्थी वापरलें होतें. तरीपण त्याला लोकनियुक्त सरकारची उपमा देतां येणार नाहीं. मुत्सद्दी म्हणजे मंत्रि होते. त्यांच्या हातीं निरनिराळीं खातीं होतीं. संयुक्त जबाबदारीहि होती. पण या मंत्र्यांना लोकांनीं निवडून दिलेलेंहि नव्हतें व त्यांना काढून टाकण्याचाहि लोकांना अधिकार अगर सामर्थ्य नव्हतें. बारभाईंनीं सत्ता बळकावली होती व ती जबरदस्तीनें सैन्याच्या बळावर आपल्या हातीं ठेवली होती. पेशवे चांगले नाहींत तेव्हा चांगल्या लोकांनीं राज्य टिकवण्यासाठीं हातीं घ्यावें अशा तत्वानें जर या बारभाईंची स्थापना झाली असती तर त्यांतील लोक अभिनंदनाला पात्र झाले असते. मुत्सद्दी हा शब्द बहुमानार्थी वापरीत तर दादा त्याचा अर्थ निंदाव्यंजक रीतीनें करी. अशा रीतीनें इतिहासांतील प्रसिद्ध–प्रसिद्ध कसलें–कुप्रसिद्ध कारस्थान निर्माण झालें.

———




**श्रीमंत रघुनाथराव उर्फ राघोबादादा पेशवे**

यांनीं पूर्वायुष्यांत मराठी साम्राज्याचा झेंडा अटकेपार लावला पण उत्तर आयुष्यांत सूडबुद्धीनें नाना फडणवीसांनीं यांची पारध केली !

## प्रकरण ९ वें

# बापूंचें नेतृत्व

### १ बापूंनाच सर्वाधिकारी नेमिलें:-- ★

बारभाईंचे कारस्थानाची उभारणी झाल्यानंतर त्यांतील मुत्सद्यांनीं आपला म्होरक्या निवडणें जरूरीचें होतें. बापूखेरीज सर्व लोक नानाकंपूंतीलच होते. सर्व सत्ता हातीं असावी असें नानाला सदैव वाटत होतें. पण कारस्थानाची उभारणी झाल्यावर निर्माण झालेल्या परिस्थितीशीं तोंड देण्याचें शौर्य व धैर्य नानापाशीं नव्हतें. अनुकूल काळांत नाना कारस्थानें निर्माण करणारे नाना प्रतिकूल काळांत पाय गाळून बसत हा नानांचा दोष नानाच्या साथीदारांना माहीत होता. म्हणून त्रिंबकरावमामा नानाला लिहितो "पुढें एक खावंद शास्ता पोस्ता कर्ता असावा. कोणाचें कोणीं न ऐकावें असें होऊं नये. सर्वांगीं एकावर भार द्यावा. राजेश्री बापू सर्वांस वडील केलेले पुरुष त्यांनीं अवघे डोईवर घेऊन करावें, आम्हीं तुम्हीं सर्व त्यास अनुकूल व्हावें. दोहों-कडील सरदार मंडळीस त्यांनीं ममता, शासन भयपूर्वक उचित उप-योगी जो जसा असेल त्याचें तसें समाधान रक्षून वागवावें हाच पका एक मताचा विचार" (पे. द. ५-३३). असा सर्वांचा विचार ठरून बापूंना सर्वाधिकारी नेमण्यांत आलें.

### २ दादाशीं प्रसंग फार बिकट होता:-- ★

परिस्थितीचा सर्व भार वाहून बारभाईच्या कारभाराची नौका पैलतिरी पोंचवण्याचें काम फारच भारी जोखमीचें व तितकेंच बिकट होतें. नानाकंपूनें दादाची बदनामी नेहमींच केली होती तरी त्याची योग्यता व कर्तृत्व ते ओळखून होते. बापूंना तर दादाशीं प्रसंग म्हणजे काय याची पूर्ण कल्पना होती. दादा दौलतीचे धनी होते.

त्यांच्या पदरीं मोठमोठे मातबर सरदार अद्याप होते. याबाबत त्रिंबकराव मामा लिहितात. "श्रीमंताजवळ नामी सरदार व पागा. तोफखाना तिकडे, गारदी तिकडे, फौजहि तिकडे. केवळ ब्राम्हण मंडळी इकडे, यैसें झाल्यास कसें सोईचें पडेल. यास्तव या गोष्टीचा विचार तुम्हीं केलाच पाहिजे. ( पे. द. ५-१९ ) यावरून लढाईचें सामर्थ्य देखील दादाचें सरस होतें. दादा सेनानायक म्हणून सैन्यांत नेहमीं प्रिय असे. त्याच्या शौर्याबद्दल बोलावयाचें कारणच नव्हतें. त्यामुळें दादाचा पराभव करून बारभाईचें आसन स्थिर करण्याचें काम फारच बिकट होतें.

### ३ पुरंदरचा बंदोबस्त-- ★

दादाशीं लढाई देण्याच्यापूर्वी बापूंना बऱ्याच गोष्टी करणें भाग होतें. त्यापैकीं मुख्य म्हणजे पुरंदरचा बंदोबस्त ही होय. गंगाबाईवर बारभाईंची सर्व मदार होती. गंगाबाई पुरंदरास होती. त्यामुळें पुरंदरचा बंदोबस्त केल्याशिवाय बापूंना तेथून हालतां येत नव्हतें. यासाठीं अत्यंत विश्वासू व लायख माणूस शोधून त्याला त्या ठिकाणीं ठेवणें अवश्य होतें. बापूंनीं पुरुषोत्तम दाजी पटवर्धन यास बोलावून आणून त्याच्याकडे ही कामगिरी सोंपविली. गंगाबाईस घातपात होईल अशी नानाला भीति वाटत होती. पण पुरुषोत्तम दाजीनें ही जोखीम पतकरल्यानंतर हा प्रश्न सुटला.

### ४ निजाम बारभाईंना मिळाला-- ★

यानंतर मोठमोठे मातबर लोक आपल्या बाजूस वळवून घेण्याची अत्यंत जरूरीची कामगिरी बापूनें हातीं घेतली. बापूचे सावकार व शिलेदार या लोकांवर जसें जबरदस्त वजन होतें, तसेंच निजाम, हैदर, करवीर दरबार व नागपूरकर भोसले यांच्याकडेहि त्यांच्या शब्दाला भारी वजन असे. बापूंनीं कृष्णाजी नारायण जोशी यांना निजामाकडे पाठवून रुकनुद्दौलामार्फत निजामाला बारभाईच्या पक्षास

ओढलें. निजामाची फौज बारभाईंना मदत करण्यासाठीं तुळजापूरपर्यंत आली.

### ५ बापूंनीं बरेच सरदार आपल्या बाजूस ओढले-- ★

( १ ) भोसल्यांचा दिवाण दिवाकरपंत चोरघोडे यालाहि बापूंनीं आपल्याकडे वळविलें. त्यामुळें तो मुधोजीला सोडून साबाजीला मिळाला. जानोजीची बायको दर्याबाई इजला साबाजीच्या बाजूस वळविलें. अशा तऱ्हेनें भोसल्यांची सर्व बाजूंनीं बारभाईला मदत होईल अशी व्यवस्था केली. ( २ ) बापूजी नाईक बारामतीकर हे खुद्द राघोबांचे व्याही, पण त्यांचें कर्ज निवारण्याची हमी घेऊन त्यांचे मुलानें बारभाईच्या सैन्यांत यावें असें बापूनें कबूल करून घेतलें. ( ३ ) गायकवाडांच्या राज्यांत भाऊबंदी तंटा होता. पैकीं फत्तेसिंग हा पूर्वींपासूनच बारभाईच्या बाजूचा होता. त्याच्याविरुद्ध बाजूचा गोविंदराव गायकवाड याच्याकडे संधान बांधून बारभाईच्या विरुद्ध जाणार नाहीं अशी त्याचेकडून हमी घेतली. ( ४ ) माहादाजी गुरुजी यांना शिंदे होळकराशीं संधान बांधण्यासाठीं बापूंनीं पाठवलें. पैकीं तुकोजीराव होळकरानें "येथील विचार आपल्या खेरीज नाहीं" असें पत्र पाठवलें. अशा प्रकारें बरेच लोकांचें पाठबळ बापूंनीं बारभाईस मिळवून दिलें.

### ६ शिद्यांचें मुत्सद्दी धोरण— ★

बापूंचें शिद्याकडेहि संधान सुरू झालें. पण माहादाजी पक्का धूर्त असल्यानें बारभाईचा जम बसतो कीं नाहीं याची खात्री पटेपर्यंत बारभाईंना मदत करण्याचें वचन देणें शक्य नव्हतें. त्यानें बापूंना कळवलें "उभयतां धणी, कोणाशीं झुंजावें ? जोंपर्यंत झुंजता एक धणी सबळ त्याजकडे सहजच जाणें पडेल. दोन्ही थकतील आणि सलुखावर येतील तर आपण दरम्यान पडोन सलूख करून द्यावा." (पे. द. ३६-५८ ) म्हणजे जो जिंकेल त्याच्या बाजूस आपणांस जावें लागेल असाच त्याचा आशय होता. पण दादाचें व माहादाजीचें बरें नसल्यानें तो दादांना मदत करणार नाहीं याची बापूंना खात्री होती.

### ७ बापूंनीं आपला पक्ष बळकट केला— ★

अशा रीतीनें बापूंनीं शक्य त्या लोकांना आपल्या बाजूस वळवून घेतलें व जे येण्यासारखे नव्हते त्यांनीं दादाच्या बाजूस जाऊं नये अशी व्यवस्था करून ठेविली. नंतर त्यांनीं लष्करीं दृष्टीनें आपल्या सैन्यांतील कमीपणा काय होता याचा विचार करून त्या दृष्टीनेंहि त्यांनीं आपलें सैन्य वळकट करून ठेवलें. यामुळें त्यांच्या पक्षांत विश्वास निर्माण झाला. अशा नाजूक प्रसंगीं विश्वास डळमळला तर पक्षच हादरतो हें तत्व बापू जाणून होते. म्हणून लोकांचा विश्वास संपादन करण्याची बारीक सारीक गोष्ट देखील त्यांनीं करावयाची सोडली नाहीं.

### ८ बापूंनीं स्वतःच्या नांवें कर्जरोखे देऊन पैसा उभारला— ★

दुसरा अत्यंत अवघड पण निकडीचा प्रश्न म्हणजे पैशाचा होता. नानासाहेब वारल्यावेळीं पेशव्यांना फार मोठें कर्ज होतें. माधवरावाच्या कारकीर्दींत सुरवातीस दादाला पैशाच्या अडचणीशीं झुंजतां झुंजतां नाकीं नव आले. कर्जाऊ देखील पैसा मिळेनासा झाला. म्हणून घरांतील सोनेचांदी दादाला विकावी लागली. ही पैशाची अडचण माधवरावाच्या हयातींत केव्हांच सुटली नाहीं. मरणसमयीं त्याला याबद्दल फार काळजी वाटत होती. अर्थात हा भार फारच मोठा होता यांत संशय नाहीं. माधवरावानंतर हें कर्ज कमी होण्याऐवजीं वाढत गेलें होतें. कर्ज फेडण्याला शांतता लाभलीच नव्हती. अशा या प्रसगीं पेशव्यांना कर्ज मिळणें जिथें अडचणीचे झालें होतें तिथें बारभाईंना कोण विचारणार ! यांचा राज्यावर काय हक्क होता ? यांचा पराभव झाला तर कर्ज कोण परत करणार होते ? यांना मदत केली तर दादा शासन करील त्याची वाट काय ? असे अनेक प्रश्न सावकारांना भेडसावीत होते. पण बापूंनीं आपलें काम सरळपणाचें व न्यायाला धरून आहे असा विश्वास त्यांच्यामध्यें उत्पन्न केला. बारभाईचें कारस्थान यशस्वी होणारच अशी त्यांची

खात्री पटवून दिली. त्यामुळें व हें सर्व फसलें तरी बापूंची खासगी मिळकत व दानत आपण देत असलेल्या कर्जाची फेड करण्यास पुरेशी आहे असें पुण्याच्या सावकारांना वाटलें आणि त्यांनीं बापूंच्या नांवाचीं खतें घेऊन लागेल तितका पैसा देण्याचें कबूल केलें. बार-भाईंना अशा त्यांच्या अधांत्री स्थितींतहि बापूच्या नांवावर लोकांनीं कर्ज दिलें हा बापूच्या व्यक्तिमत्वाचा उज्वल विजय होता.

### ९ लोकांकडून कामें करून घेण्याची बापूची हातोटीः-- ★

पैशाची व्यवस्था झाल्यानंतर दादाला कुणाचीहि मदत होऊं नये अशी तजवीज बापूनीं केली. कोणी मदत केलीच तर त्याची बातमी बापूला लागे व त्याला शक्य तें शासन करण्यांत येई. लोकांकडून ठरलेलीं कामें करवून घेण्याबाबत बापूचा अंमल करडा होता. पण प्रसंग पाहून केव्हां अंजारून गोंजारून, केव्हां ' जवाहीर पोशाख, कितेंकास लौकिकास आणणें वाढविणें पदारूढ करणें सर्वांची उमेद खुशाली राखून प्रसंगीं हुकुम राखोन त्याजपासून चाकरी करून घेणें '' ( पे. द. ५-१९ ) अशा प्रकारें हरहुन्नर करून यथा-स्थित कामें करून घेण्याची बापूची ही राजकारणी पद्धत मोठी मजेदार व परिणामकारक होती.

### १० दादांचा मैदानावर पराभव करणें जरूर होतेंः— ★

सर्व तयारी पुरी झाली होती. आतां दादाचा मैदानावर परा-भव केल्यावांचून बारभाईंचें आसन स्थिर होणार नव्हतें. त्यांचा अंमल बसणार नव्हता. त्याच्या हाताखाली सैन्य होतें. तो रणकुशल सेनापती होता. त्याच्याशीं लढा देणें व पराभव करणें ही कांहीं सोपी बाब नव्हती. म्हणून या लढाईत बापूला आपलें शक्तिसर्वस्व एकवटणें भाग होतें. म्हणून बापूंनीं लढाईची सर्वांगीण तयारी केली.

### ११ दादांच्या सातान्यांतील कारस्थानाचा बंदोबस्तः-- ★

सैन्यांत त्यांनीं स्वतः येऊन दबाव बसणें प्राप्त प्राप्त आहे

असा त्रिंबकरावमामांचा तगादा बापूमागें होता. साताऱ्चा बापूंनीं बंदोबस्त केला होता. पण साताऱ्यास दादाचे हेर जात येत होते. दादाकडील हेर आल्यास त्याला पकडून ठेवण्याचा किल्लेदाराला हरिपंतांनीं हुकुम दिला होता. हेराकडून माहिती काढण्यासंबंधीं बापूंनीं हरिपंतास कळविलेल्या सूचना वाचनीय आहेत. "लष्करांतून जासूद आले असल्यास त्यास पुसावें कीं तुम्ही कोणे मुक्कामेहून आलेत? श्रीमंतबाई पुरंदरास घेऊन आलों हें वर्तमान कधीं कळलें? फौज किती आहे? लष्कर गलबेल आहे का हुषार आहे? कांहीं फौज निराळी आली आहे किंवा काय? वगैरे बारीक सारीक वर्तमान पुसावें." या सर्व व्यवस्थेनेंहि काम भागेना म्हणून बापू स्वतः साताऱ्यास गेले. तेथील नीट बंदोबस्त त्यांनीं लावला.

## १२ कासेगांवच्या लढाईंत दादांचा विजय— ★

राघोबा कृष्णेच्या पाण्यानें वर येत होता. त्याचा साताऱ्याला वेढा द्यावयाचा बेत होता. हें वर्तमान कळल्याबरोबर बापूंनीं साताऱ्याचा कडेकोट बंदोबस्त केला. दादाला ही बातमी लागतांच त्यानें साताऱ्याऐवजीं आपला मोर्चा विजापूरकडे वळवला. मामा व पटवर्धन हे त्याच्या पाठीवर गेले. दादानें निजामाशीं संधान बांधण्याची खटपट केली. पण बापूंनीं त्याच्याशीं आधींच संधान बांधलें होतें व त्याच्याकडून वचन घेतलें होतें. त्यामुळें दादाची कांहीं डाळ शिजली नाहीं. त्रिंबकराव व हरिपंत यांच्या संयुक्त फौजेशीं आपल्याला तोंड देणें शक्य नाहीं हें पाहून दादा पंढरपूरकडे वळला. दादा आपल्या हातांतून सुटला असें वाटून मामांनीं जलदी करून सडे होऊन पाठलाग केला (पे. द. ५-४३) हरिपंत, साबाजी व निजाम यांच्या फौजा मागें राहिल्या. सर्व सैन्याचा मिलाफ होण्याची वाट न पाहातां लांब लांब मजला टाकून मामांनीं कासेगांवनजीक दादाला गांठलें. मुधोजी दादाबरोबर होता. मामाची फौज जवळ येतांच दादाची फौज लढाईच्या पवित्र्यांत उभी राहिली. लढाईला सुरवात होणार इतक्यांत मुधोजीनें मामांना चिठी पाठवली कीं "लढाई करूं नये. इकडून

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७६८३


बोलणार येणार आहेत." त्याचा जबाब देण्यांत मामा गुंतले असतां त्याच्या फौजेवर दादाच्या फौजेनें अचानक हल्ला केला. मामाची गाळण उडाली व माघार घेऊन पळूं लागला. या धांदलींत मामा जखमी झाला व दादाच्या हातीं सांपडला. दादाबरोबर उडालेल्या पहिल्याच चकमकींत बारभाईच्या सैन्याचा धुव्वा उडाला व त्यांचा सेनापती कैद झाला!

**१३ पराभवाची बातमी ऐकून नानांचे पाय गेले:--** ★

ही बातमी घेऊन जासूद धांवत पुरंदरकडे गेला. जासूद धांवत आलेला पाहातांच बापूनें ताडलें कीं कांहीं अनिष्ट प्रकार झाला. जासूदांनीं घडलेली हकीगत सविस्तर सांगितली. बातमी ऐकतांच नानाचा धीर सुटला व त्यांनीं हातपाय गाळले. "पराभव झाला! मामा पकडले गेले! आतां आपली वाट काय"? असा घबराट त्याच्या मनाचा झाला. स्वतःवर जबाबदारी असतांना अशा अडचणीच्या परिस्थितीला तोंड देण्याची नानाची कुवत नव्हती. बापूंनीं जासुदाला पहिला प्रश्न विचारला "हरिपंत सुखरूप आहे ना"? आहे असें कळतांच त्यांनीं नानाला धीर दिला व म्हटलें, "ही तर नुसती सुरवात आहे. हरिपंताच्या हाताखालील सैन्य शाबूत आहे. ते आपली बाजू खात्रीनें सावरून धरतील." आणि नानांना जेवावयास उठवलें. (खून कीं आत्महत्या पान ३६१)

**१४ हरिपंत बाजू सावरतील असा बापूंना विश्वास:--** ★

मामांचा पराभव झाला व ते पकडले गेले यांत युद्धशास्त्रदृष्ट्या बारभाईचें थोडें नुकसान झालें होतें. पण त्यांचें सर्व सैन्य कांहीं पराभूत झालें नव्हतें. बारभाईच्या सैन्याचे अद्याप दोन भाग होते. त्या दोन्ही भागांचा मिलाफ करून घेणें अत्यंत जरूरीचें होतें. मामांनीं घाई करून लगट केल्यामुळें हा प्रसंग ओढवला होता. दादा राहिलेल्या सैन्यालाही एकेकटें गांठून त्या दोन्ही सैन्याचा मिलाफ होण्याआधीं त्यांचा धुव्वा उडवण्याचा प्रयत्न करणार हें निश्चित होतें. म्हणून त्या दोन्ही सैन्यांचा लष्करी दृष्ट्या मिलाफ करून संरक्षणाची भक्कम फळी उभारणें तांतडीचें होतें. हरिपंत तसा धैर्याचा व व चाणाक्ष सेनानायक होता म्हणून बापूला

खात्री वाटली कीं ही व्यवस्था हरिपंत जरूर करील. बापूच्या अंदाजाप्रमाणें हरिपंतांनीं सैन्याची घडी नीट बसवली.

**१५ दादा पुण्यावर चाल करणार अशी कंडी:—** ★

दादा पुण्यावरच चाल करून येणार अशी कंडी पिकली. लोक हवालदिल झाले व गांव सोडून पळूं लागले. पराभव होऊं लागला म्हणजे एकेक मदतनीस पळूं लागतात असा सामान्य सिद्धांत आहे. त्यामुळें या पराभवाचा आपल्या मदतनिसावर काय परिणाम होईल हा एक काळजीचा प्रश्न बापूपुढें होता. दादा अशा नाजूक प्रसंगीं जर पुण्याला आला असता तर पुणें त्याच्या स्वाधीन होणें फार सोपें होतें. आणि पुणें शहर त्याच्या स्वाधीन झाले तर बारभाईच्या आसनालाच धक्का बसण्याचा संभव होता. पण बारभाईच्या नशीबानें दादानें पुण्यावर चाल केली नाहीं म्हणून बारभाईचा कारभार जिवंत राहिला. दादा पुण्यावर आले असते तर काय झालें असतें हें सांगतां येणार नाहीं. तें एक ऐतिहासिक गूढ आहे.

**१६ दादाची समेटाची भाषा:—** ★

कासेगांवच्या लढाईत यश आलें तरी बारभाईचें बळ कमी झालेलें नव्हतें, हें दादाला समजत होतें. बारभाईशीं सामना चालू राहिला तर त्याचे परिणाम स्वःतावर व पेशवाईवर बरे होणार नाहीत, हें न समजण्याइतका दादा निर्बुद्ध नव्हता. त्यानें विजयाच्या उन्मादांत न राहातां तावडतोब सामोपचाराचें बोलणें लावलें. त्याच्या तहाच्या अटी खालीलप्रमाणें होत्याः– १ दादासाहेबांचा धनीपणा राखून (कारभाऱ्यांनीं) सर्वहि कारभार करावा. २ नाहींतर पहिली जाहागीर व किल्ले रावसाहेबांनीं दिले होते त्याप्रमाणें द्यावे. वरीलप्रमाणें अटी बापूजी नाईक बारामतीकर यांनीं ता. १३-४-१७७४ रोजीं पुण्यास बापू व नाना या उभयतां कारभाऱ्यांना कळवल्या. पण या सरळ अटी कारभाऱ्यांनीं बेमुवर्तखोरपणें फेंटाळून लावल्या. ( सुंठणकरकृत राघो भरारी पृ. १६९ ) यानंतर दादानें चिंतो विठ्ठल व विसाजी

केशव यांचेबरोबर बापूंनीं निरोप पाठवला, "परलोक स्मरून विवेक केल्यास इहलोकीं उत्तम आहे. रयतेचेंहि कल्याण आहे. राज्यहि बाकी राहिलें तें वाचेल. यांत उत्तम दिसेल तें कराल. आम्हांकडून गैर वाजवी ओढकपणा होणार नाहीं." या निरोपालाहि मुत्सद्यांनीं दाद दिली नाहीं. नंतर ता. १७-४-१७७४ रोजीं दादानें बापूला पत्र पाठवलें: "चिंतो विठ्ठल व विसाजी केशव पिंपरीचे मुक्कामाहून तुम्हाकडे पाठवले आहेत. जबानीवरून कळलेंच असेल. सारांश दौलत बहुतां दिसांनीं वडिलांनीं मेळविली, ती तुमच्या आमच्या कजियानें बुडवावी हें तुम्हांस उचित नाहीं. चि. गंगाबाईस पुत्र व्हावा. पुढें थोर झाल्यानंतर दौलतहि करील, येविशीं आमचेच मनास अनुकूल आहे. तुम्हीं लटकेंच तर्ककुतर्क घेऊन कजिया वाढवून मोंगलाचें घरांत दौलत घालतां हें या लोकीं व परलोकीं बरें कीं काय? सर्व कारभार आम्हींच करावा असाहि आग्रह नाहीं. अतःपर तुम्हांस उचित दिसेल तें कराल. नेमिलें असेल तें होईल."

### १७ दादाच्या अटी मुत्सद्यांनीं कां फेटाळल्याः-- ★

वर दिलेलें दादाचें पत्र आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं गंगाबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्यामुळें मुत्सद्यांना जोर चढून दादाच्या पारिपत्याशिवाय त्यांना दुसरें कांहीं दिसेना असें झालें. म्हणून या भरांत त्यांनीं दादाच्या अटी फेटाळल्या आणि त्याचा पाठलाग करण्यास सुरवात केली.

### १८ मुत्सद्यांनीं लढाईचें शिंग कां फुंकलें-- ★

यावेळीं नानाकंपूखेरीज इतरांना दादाबरोबर समेट करावा असेंच वाटत होतें. शिंदे, होळकर, मुराररराव, बापू व मोरोबा फडणीस या सर्वांचा मानस समेटास अनुकूल होता. पण कारभारांत नानाकंपूचें वर्चस्व अधिक असल्यानें इतरांचें चाललें नाहीं. या बाबतींत रियासतकार म्हणतात कीं याच सुमारास "मुराररराव घोरपडे बारभाईस लिहितो, 'आपण स्मरण करून हरएक बंदोबस्त करण्यास लिहाल या

अर्थे फौज गारदी वगैरे सहित यथास्थित राहिलों पण आपण आमचें स्मरण न केलें. आपणांस आमची निखालसता सांगितलीच आहे. आमचा सर्व भार बापूकडे. त्यास आवश्यक तेंच आम्हांस अन्य विचार नाहीं. दादाशीं वाकडें सर्वथा योजूं नये. माधवरावांनीं पूर्वी करार केल्या-प्रमाणें त्यांस मुलूख द्यावा. नारायण त्रिंबकराव या उभयतांस मारल्याची कीर्ती त्यांची त्याजकडे असो द्यावी. वरकड फौज एकंदर फुटूं न देतां चार-साहा महिने बंदोबस्त करून नतर हिंदुस्थान कर्नाटकां-तील मनसबा योजावा. आमच्या ध्यानांत आलेला अर्थ सुचवला आहे."
हा सल्ला अत्यंत पोक्तपणाचा असून सूड घेण्याच्या इच्छेनें दादास उगाच डिवचूं नये, त्याची सुव्यवस्था लावून व त्यास अभय देऊन स्थिर करावें, अशी मुराररावाची सूचना आहे. शिंदे होळकरांची भावनाहि अशीच दिसते. आनंदीबाईनें तर पुढें तेंच सुचविलें. सखारामबापू व मोरोबा फडणीस यांचाहि कल अशाच स्वरूपाचा होता. परंतु पटवर्धन व नाना फडणीस वगैरे मंडळीचे विचार अगदीं उलट दिशेस वाहात होते. आणि त्यांचेंच कारभारांत पुढें प्राबल्य झाल्या-मुळें अनेक प्रकरणें विकोपास गेलीं व अखेर राज्यास बाधक झालीं. मोरोबा व बापू कैदेंत जाण्यास हीच सूडाची भावना कारणीभूत झाली.'' बापू, शिंदे, होळकर, मुरारराव वगैरेंचें मत समेटास अनुकूल असतांहि नानांचा त्याला विरोध झाल्यामुळें समेट होऊं शकला नाहीं. नानाला दादावर सूड घ्यावयाचा होता, म्हणून दादाविरुद्ध रणशिंग फुंकलें गेलें असाच रियासतकारांचा आशय आहे; आणि हें त्यांचें म्हणणें अगदीं खरें आहे.

## १९ पत्रव्यवहारावर नानांचें नियंत्रणः—

★

वर दिलेलें दादाचें पत्र बापूंना पोंचलेंच नाहीं. कारण नानानें तें दाबून ठेवलें. या सरळ पत्राचा बापूवर अनुकूल परिणाम होण्याचा संभव होता. या बाबत श्री. य. गो. कानेटकर म्हणतात "हें पत्र ता. १७-४-१७७४ चें असून पैवस्ती नानाच्या हातची ता. १८-५-१७७४ ची आहे. यावरून नाना फडणीसानें हें पत्र दडपून ठेवलें

मराठी ग्रंथ संग्रहालय सं. क्र.

असावें. परंतु हें पत्र नानाच्या हातांत कसें गेलें ? " ( स. च. पा. १३२ ) वरील पत्र नानानें दडपून ठेवलें असावें हें श्री. कानेट-करांचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. हें पत्र नानाच्या हातीं कसें गेलें असा त्यांना पेंच पडला आहे. नानांनीं बापूंचीं सर्व पत्रें आपल्या हातीं यावींत अशी तजवीज करून ठेवली होती, म्हणून हें पत्र ठर-ल्याप्रमाणें नानाच्या हातांत गेलें. याला आणखीहि एक दुजोरा मिळतो तो असा:— आनंदीबाईनें बापूंना लिहिलेल्या एका पत्रांत ती म्हणते " पूर्वीं तुम्हांस दोन पत्रें पाठवलीं त्यांचें उत्तर नाहीं. पत्रें पोंचलीं कीं नाहीं न कळे. " यावरून बापूंना आलेलीं बरींच पत्रें त्यांना मिळत नव्हतीं असें दिसतें. आणि याचें कारण आम्हीं वर दिलें आहे त्याहून दुसरें कांहीं संभवनीय दिसत नाहीं.

**२० मुत्सद्दी व दादा यांच्या भांडणाला अटीतटीचें स्वरूप आलें—**

वर सांगितल्याप्रमाणें दादाच्या सामोपचाराच्या सर्व अटी मुत्स-द्यांनीं सूडबुद्धीनें फेटाळून लावल्या व दादाचा पाठलाग बारभाईंनीं सुरू केला. त्यांची ईर्षा होती कीं दादांना कैद करावयाचें. त्याउलट कांहींही झालें तरी मुत्सद्यांच्या हातीं लागायचें नाहीं असा दादाचा निर्धार होता. एका बाजूला सूडबुद्धी तर दुसऱ्या बाजूला निर्धार असें अटीतटीचें स्वरूप या सामन्याला प्राप्त झालें. त्यामुळें राजकीय हिताहिताच्या दृष्टीनें दोन्हीहि बाजूचा तोल सुटला आणि परिणामीं पेशवाईचें अपरिमित नुकसान झालें ! याबाबत मॉस्टीनच्या डायरीच्या आधारें डॉ. जेम्स गेन्से व बनाजी म्हणतात:– " It should be borne in mind that the contest, which broke out after Narayanrao's murder, Raghoba was rather less prepared to make teritorial concessions to the English than the ministerial party, of which Nana Faranwis was the soul, were ready to win over the Naizam by promises of forts and Jahagirs. " ( नारायणरावाच्या खुनानंतर सुरू झालेल्या भांडणांत बारभाईनीं—ज्याचा नाना फडणवीस प्राण होता—निजामाला

आपल्या बाजूस वळवून घेण्यासाठीं ज्याप्रमाणें सैल हातानें किल्ले व जाहागिरी देऊं केल्या तसे राघोबानें इंग्रजांना प्रांत देऊं केले नाहींत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. )

### २१ दादानें लढाई टाळून पळ काढला-- ★

कासेगांवच्या लढाईंत विजयी झाल्यानंतर दादानें समेटाचें बोलणें लावलें होतें पण मुत्सद्यांनीं तें फेंटाळून लावलें. हरिपंत फडक्यांनीं बारभाईच्यां सैन्याचें सर्व विभाग एकत्रित करून निजामाच्या सैन्याशीं त्याचा मिलाफ करून घेतला. हें संयुक्त सैन्य दादाच्या सैन्याला भारी होतें. म्हणून दादानें आपला मोर्चा बदलून तुळजापुराकडे वळवला. मोंगलांच्या सैन्यासह हरिपंत त्याचा पाठलाग करूं लागला. दादानें सहा महिने सतत हरिपंताला झुकांड्या दिल्या. त्याच्या सैन्यांत फितूर करण्याचें काम अद्याप सुरूंच होतें. त्याप्रमाणें भवानराव प्रतिनिधि फुटून बारभाईकडे आला. दादानें खानदेश व बऱ्हाणपूर नंतर तेथून इंदूर असें कूच केलें. तुकोजी होळकराची व त्याची भेट झाली.

### २२ दादा होळकराकडे गेल्यामुळें मुत्सद्यांना धोका-- ★

दादाबरोबर समेट करावा अशा मताचेच शिंदे, होळकर व गायकवाड होते. त्यामुळें दादा आतां त्या सर्वांची भेट घेणार व मदत मागणार हें दिसत होतें. त्यांचा कलहि दादाकडे असल्यामुळें त्यांची दादाला मदत मिळण्याचाही संभव होता. माहादाजीसारखा कारस्थानी माणूस या चालून आलेल्या संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करणार हेंही मुत्सद्यांना दिसत होतें. शिंदे, होळकर व गायकवाड यांची दादाला मदत मिळाली, तर आपली धडगत नाहीं हेंहि मुत्सद्यांना स्पष्ट दिसत होतें. यांचा कोणाचाहि दादाला आश्रय मिळूं नये, अशी व्यवस्था करणें मुत्सद्यांना भाग होतें.

### २३ परिस्थितीचा पेंच— ★

दादांना आश्रय देऊं नये अशीं बापूंचीं पत्रें माहादाजीला आलीं. नानाच्या मदतीनें माहादाजीला राज्य मिळालें होतें हें त्याला विसरतां

येत नव्हतें, शिवाय दादानें त्याच्याविरुद्ध मानाजीरावाच्या वतीनें प्रयत्न केला होता. तेव्हां दादाबद्दल तसा कांहीं प्रेमाचा पुळका माहादाजीला असणें शक्य नव्हतें. दादाचें सैन्यबलहि नाहीसें झालें होतें. त्याचा नैतिक पाठिंबा नष्ट झाला होता. याहि दृष्टीनें अशा अपयशी घोड्याचा पाठपुरावा माहादाजीसारखा माणूस करणार नव्हता. याशिवाय तसें केल्यास पुण्यांतील सर्व मुत्सद्यांशीं वैर पतकरावें लागणार होतें. मुत्सद्दी व निजाम एक झाले असल्यामुळें त्यांची फौजहि मोठी होती आणि त्यांच्याशीं लढाई देऊन दादाला हाताशीं धरण्यांत त्याला कांहीं फायदा नव्हता. पण दादाला मदत न केल्यासहि त्याच्यावर पेंचप्रसंग येण्याचा मोठा धोका होता. वजीर, नजीबखान व इंग्रज हे सर्व शिंद्यांचे व मराठ्यांचे शत्रू होते. ते सर्व एक झाले आणि दादा त्याला सामील झाला तर शिंदे, होळकर व गायकवाड यांची कठीण परिस्थिती होणार होती. म्हणून मुत्सद्यांना मदत तर करावयाची, पण दादाला आपल्या कक्षेबाहेर जाऊं द्यावयाचें नाहीं. असें दुटप्पी धोरण त्यांनीं आंखलें व बापूंना कळवलें कीं "आमचें लक्ष आपणा वेगळें नाहीं."

★

## २४ महादाजीचें दुटप्पी संधान:—

बारभाईंना दुखवावयाचें नाहीं आणि दादाला आपल्या हातचा बाहेर जाऊं द्यावयाचा नाहीं असें शिंद्यानें ठरवलें व त्यास अनुसरून दोन्ही बाजूकडे संधान ठेवून राजकारण खेळण्यास सुरवात केली. दादांना "आपण मुत्सद्यांशीं आपला समेट करून देतों," या आशेवर झुलवलें व मुत्सद्यांनाहि समेटाच्या बोलण्यावारी टांगून ठेवलें. दादाबरोबर बोलणें लावून अनेक प्रकारे बोध करून मर्जी ठिकाणीं आणण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. शेवटीं मुत्सद्यांच्या व दादाच्या म्हणण्याचा विचार करून त्यांनीं खालील अटी दादापुढें मांडल्या:—

१ सैन्याचा पगार देण्यासाठीं दादांना ६ लक्ष रुपये द्यावेत.

२ नोकर व इतर लवाजमा यासाठीं १ लाख रुपये मंजूर करावेत.

३ नारायणरावाचा खून करण्यामध्यें जे सामील होते, त्यांना शिक्षा करावी. केवळ संशयावरून अटक केल्यास सोडावें.

४ राघोबानें ५०० लोकांनिशीं पुण्यास राहावें.

## २५ शिंद्याच्या समेटाला दादा मान्यता देईना:-- ★

या अटी दादाला मान्य होण्यासारख्या नव्हत्या. कारण दादानें सामान्य माणसाप्रमाणें पुण्यास राहावयाचें म्हणजे अत्यंत मानहानीचें होतें. कारण त्यांना मुत्सद्यांच्या हुकमतींत रहावें लागणार होतें. शिवाय बारभाईमधील नानाकंपूचें वर्चस्व, त्यांच्या मनांत आपल्याबद्दल वसत असलेली सूडाची भावना याची पूर्ण जाणीव असल्यानें पुण्यास आपण असें हतबल होऊन राहिलों तर नाना-कंपू आपल्याला डोंगरी किल्याची हवा दाखविल्याशिवाय राहाणार नाहीं, याची दादाला खात्री वाटत होती. दादाच्या बाजूचे सदाशिव चिमणाजी, मालोजी घोरपडे, सखाराम हरी, मानाजी फाकडे वगैरेंच्या बायका मुलांना देखील पकडून, त्यांचे हाल नानानें केले होते, हें उदाहरण दिसत होतें. दादाला नानाचा विश्वास वाटत नसावा असा महादाजीला संशय आल्यामुळें तहाची मनोभूमिका निर्माण करण्याच्या दृष्टीनें वरील लोकांच्या बायकामुलांना ताबडतोब बंधमुक्त करण्याबद्दल व समेटाच्या वाटघाटीला नानांनीं फौजेसह येण्याबद्दल माहादाजीनें नानाला पत्र लिहिलें.

## २६ पुरंदरास समेटाचें पुनः बोलणें— ★

समेट करण्यास दादाहि आतुर होता. दादाच्या तर्फे विष्णू महादेव गद्रे, होळकरातर्फे नारो गणेश व शिंद्यातर्फे बाळाराव गोविंद असे तिघेजण पुरंदरास ता. १०-१०-१७७४ रोजीं आले. त्यांच्यामध्यें व नानाकंपूमध्यें बरीच भवती न भवति झाली पण सलोखा झाला नाहीं. शिंद्यांनीं सलोखा करून देण्यासाठीं म्हणून लाख पन्नास हजार रुपये व शिदखेड वगैरे गांवें मुत्सद्यांकडून उचललीं आणि समेट घडवून न आणतां "पत्रोपत्रीं कालक्षेप होतो, तर कारभाऱ्यांनीं बऱ्हाणपुरास समक्ष यावें" असें त्यांनीं कारभाऱ्यांना कळवलें.

## २७ कारभारी फौजेंत दाखल झाले:— ★

मध्यंतरीं बराच कालक्षेप झाल्यामुळें हरिपंताच्या फौजेंतही कुचराई व्हावयास लागली होती. साबाजी मुधोजीला तोंड देण्याचें निमित्त करून निघून गेला. अनेक सबबी सांगून निजाम हरिपंताच्या फौजेच्या मागें मागें राहूं लागला. यामुळें हरिपंताला कांहीं करतां येईना असें झालें होतें. तेव्हां फौजेंत दबाव बसवण्यासाठीं व त्यांच्यांत जोर निर्माण करण्यासाठीं बापूनें स्वत: फौजेंत यावें असा हरिपंताचा आग्रह होता म्हणून नाना व बापू यांनीं बऱ्हाणपुरास जाण्याचें ठरवलें. त्याप्रमाणें नाना व बापू औरंगाबादेवरून टोंक्यास आले व शिंदे होळकर दादांना घेऊन मालेगांवापर्यंत आले. नाना आपणास कैद करणार म्हणून दादा पुढें येण्यास तयार होईना. तेव्हां फार दिवसाचा दादावर सूड उगविण्यासाठीं आतुर झालेल्या नानाला अत्यंत चीड आली व त्यानें शिंद्यांना निरोप पाठवला कीं "तुम्ही आजपर्यंत जें जें मागत आलात तें तें आम्हीं तुम्हांस व राघोबास देत आलों. इतकें असूनही कराराप्रमाणें श्रीमंतास वागावयास लावण्याचें तुमच्यानें होत नसल्यास त्यास खुशाल वाटेल तें करूं द्यावें."

## २८ मुत्सद्यांच्या हातांतून दादा निसटला:— ★

वरीलप्रमाणें निरोप पाठवतांच शिंदे होळकर बिथरले. याचा फायदा घेऊन दादा शिंद्यांच्या हातून निसटला. शिंदे होळकरही आपल्या मुलुखास निघाले. दादा पुढें, त्याच्या मागें शिंदे, होळकर, त्यांच्यामागें हरिपंत व त्यांच्याही मागें कारभारी व मोंगल अशी ही रांग लागली. या बाबतींत पेशवे दप्तरांत खालील उल्लेख सांपडतो:-- "शिंदे होळकरांनीं आरोप लावून किल्यावरून उभयतांस काढून ( नाना व बापू ) दादाशीं बिघाड करून मसलत लांबवून खर्चाखाली आणलें व शेवटीं दादास कढून दिलें ( पळवलें )," ( पे. द. ५-६६ ). तेथून दादानें धारचा किल्ला गांठला. यावेळीं आनंदीबाई गरोदर होती. तिला धारच्या किल्ल्यांत ठेऊन दादा बडोद्यास गेला आणि तेथून दादा अहमदाबादेकडे इंग्रजांच्या आश्रयासाठीं म्हणून गेला.

### २९ दादाच्या सैन्याची दाणादाण:— ★

बडोद्याच्या गायकवाडाची दादाला कसलीच मदत झाली नाहीं. शेवटीं हरिपंताच्या सैन्याची आणि दादाची महानदीजवळ गांठ पडून दादाच्या सैन्याची दाणादाण उडाली, ( ता. १७-२-१७७५ ). यानंतर दादांनीं आपल्या फौजेचे दोन भाग केले. आपण थोडें सैन्य घेऊन खबायत-कडे गेले. आणि त्यांचे शूर सरदार आपल्या अवशिष्ट सैन्यासह नडियाद-कडे गेले. हरिपंतांनीहि आपल्या सैन्याचे दोन विभाग करून एक भाग दादावर व दुसरा त्याच्या सरदारांवर पाठवला. दादाला खंबायतेस संरक्षण न मिळाल्यानें त्यानें इंग्रजांचा आश्रय घेतला !

### ३० आनंदीबाईचीं बापू व नाना यांना पत्रें:— ★

" बुंदेलखंडात इंग्रजांचे दोन कंपू आले आहेत. हुजूरांचीं पत्रें जाऊन हे कंपू आले. जबरदस्त आहेत. त्यांचें यास ( राघोबास ) बोलणें कीं आपणांस दौलतीवर बसवणें. आम्हांस राहावयास जागा द्या व दहा हाजार पर्यंत आमची फौज ठेवा. ही गोष्ट हुजुरास कठीण वाटली. परंतु रानो-माळ हिंडावें, त्यापेक्षां त्यांहीं श्रमें करून कबूल केलें. असें इंग्रज घरांत येऊं पाहातात. तमाम अंमल आपले बसवतात आम्ही निमित्त मात्र पण तेच दौलतेस गिऱ्हाईक होतात. लखनौचे शुजाउद्दौले व अर्काटचे महंमद-अल्ली यांच्या घरांत प्रथम हे इंग्रज नम्रतेनें पायरव करून आले आतां उभयतांस पोटापुरतें देऊन आपण धनी झाले, तसेच आमच्या घरांत होईल. सर्व गोष्टी तुम्हांस माहीत असोन हल्लीं या तऱ्हा दिसतात. हुजूरची मर्जी कोणत्या तऱ्हेनें समजावल्यानें नीट राहतें कोणत्या तऱ्हेनें बिघडतें यास तुम्ही माहीत आहां. काळच विपरीत आले. परंतु आम्हांस हाच भरंवसा आहे कीं तुम्हीं काळचक्रासही फिरवाल. म्हणून तुम्हांस पत्र लिहिलें आहे. तरी ब्राम्हणी दौलत नीट राखून बऱ्या होतील त्या गोष्टी कराव्या, नाहीं तर जन्मभर चांगलें केलें आणि म्हातारपणीं इंग्रजांच्या घरांत दौलत घातली हें अपेश येई तो अर्थ न करावा. हुजूर ऐकत नाहींत असें म्हणाल, तर त्यांचे तुम्ही प्राण घेता

किंवा पेंचांत आणतां त्यापक्षीं काय होईल तें होवो तुमचे हातीं नच लागावें हा निश्चय आहे. कोणासहि पेंच सोसत नाहीं. विशेष लिहावें तर तुमचे दशांसहि आम्हांस समजत नाहीं. यशापयशाचे धनी तुम्ही. आम्ही लिहून विशेष तो नाहीं. तुम्ही मोजीतहि नाहीं. परंतु अंदाज दिसत चालला यास्तव सूचना लिहिली आहे."

नानास लिहिलेलें पत्र असें आहे: "तुम्हीं तीन पिढ्यांतील दौलतींतील फडणीस असोन हल्ली फितूरांनीं ब्राम्हणी दौलत यवनाक्रांत होऊं पाहते. तुमच्या चित्तांतील उगीच आटी जात नाहीं. याचा बारीक मोठा विचार तुम्हींच करणें. आम्ही तेथें तुमच्या स्वाधीन. पावणे दोन वर्षें झालीं. तुमची कार्यसिद्धी कांहींच न झाली. तुमची फौज गुंतून आमचा धन्याचे पायांशीं वियोग हें उभयपक्षी नुकसान. आम्हांस मुंबईस पोंचविणें."

## ३१ राघोबा इंग्रजाकडे जाण्यास नानाच जबाबदार— ★

दादाशीं समझोता करण्यास तत्कालीन सर्व बडे लोक अनुकूल असतांना नाना व त्याचे साथीदार यांनीं दादाला सूडबुद्धीनें पाठलाग करून त्राही भगवान करून सोडलें. नाना आपणाला ठार मारील किंवा डोंगरी किल्ल्यात डांबून ठेवील याची दादाला खात्री होती. त्यामुळें परिस्थितीच्या फेऱ्यांत दादा आडकला व पहिल्यांदां सर्व मराठे सरदारांच्या आश्रयास जाण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण एकाहि मराठा अगर देशी सरदारानें दादाला मदत केली नाहीं. त्यामुळें नानाच्या हातीं लागून हाल सोसण्यापेक्षां इंग्रजाकडे जाऊन नानाची खोड मोडण्याच्या मार्गाला दादा लागला. इंग्रजांच्या छत्राखालीं दादा गेला याबद्दल बऱ्याच इतिहासकारांनीं दादाला दोष दिला आहे. कोणत्याही परिस्थितींत इंग्रजांचा आश्रय करून राष्ट्रघात करूं नये हें त्यांच्या लक्षांत यावयास पाहिजे होतें. इतकी राष्ट्रीयता त्यांच्याजवळ नव्हती असें फार तर म्हणतां येईल. पण सर्व प्रकारें हें प्रकरण आपसांत मिटविण्याची बहुतेक लोकांची इच्छा असतां व दादाच्या अटी सर्वथैव

सोलापूर



योग्य असतां त्या सूडबुद्धीनें फेंटाळून पेशवाईंतील ही अत्यंत हीन दुही संपविण्याची सुसंधी हातीं असतां ती मुद्दाम दवडून दादाची पारध करण्यांत नाना फडणीसांनीं नुसता अन्यायच नव्हे तर अत्यंत मोठा राष्ट्रघात केला म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाहीं. दादाची पारध करण्यासाठी नानानें त्याचा पाठलाग केला व जीव वाचवण्यासाठीं पळतां पळतां दादा इंग्रजांच्या जाळ्यांत अडकला. याबाबत डॉ. जेम्स गेन्से व बनाजी म्हणतातः– "It is not true to fact to say that Raghoba was unpatriotic and the victim of Anglophide leanings. Mostyn's Diary of 1767 and 1772 make it clear that Raghoba distrusted the English. The truth seems to be that the political opponents drove him into the hands of the English." (Mostyn's Diary, Appendix 9 Page 382) "राघोबा देशद्रोही व इंग्रजानुकूल होता हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून नाहीं. मॉस्टीनच्या १७६७ व १७७२ च्या डायरीवरून राघोबाचा इंग्रजावर मुळींच विश्वास नव्हता असें स्पष्ट दिसतें. खरी गोष्ट अशी दिसते कीं त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनीं राघोबाला इंग्रजांच्या हातीं लोटलें."

### ३२ इकडे शत्रूंना फावलें:— ★

कारभारी राघोबाचा पाठपुरावा करण्यांत गुंतल्याचा फायदा घेऊन मराठ्यांच्या शत्रूंनीं सर्व बाजूंनीं उपद्रव मांडला. इंग्रजांनीं साष्टी व आसपासचा प्रदेश बळकावला. यामुळें कारभाऱ्यांना दादाचा पाठलाग तूर्त बाजूस ठेवून सर्व बाजूचा बंदोबस्त करणें भाग होते. इंग्रजांना बोर घाटांत पायबंद घालणें अत्यंत जरूरीचें होतें. त्यासाठीं साष्टी बेट शक्य तितक्या लवकर हस्तगत करणें भाग होतें म्हणून बापूनें इंग्रजाचा समाचार घेण्याचें ठरविलें.

———

मराठी ... नों. क्र. ३९३०५

## प्रकरण १० वें

# बापू आणि इंग्रज

### १ साष्टीवर इंग्रजांचा १७६९ पासून डोळाः— ★

साष्टी आणि वसई हीं कोंकणपट्टीवरील ठाणीं असून अत्यंत मोक्याचीं आहेत. या ठाण्यांवरून सर्व कोंकणपट्टीवर अंमल बसवतां येतो. लष्करी दृष्टचा हीं ठाणीं अत्यंत महत्वाचीं होतीं. इंग्रजांचा या ठाण्यांवर फार दिवसांपासून डोळा होता. मुंबईच्या गव्हर्नरनें स. १७६९ सालीं आपल्या मिनिट बुकांत लिहून ठेविलें होतें कीं, "मराठ्यांची वाढती सत्ता ही आपणांस दुःखाची व धोक्याची सूचना आहे. मद्रास व बंगाल सरकार त्याच्याकडे फार बारकाईनें लक्ष देत आहेत. आपणांस तूर्तातूर्त साष्टी कशा प्रकारें हस्तगत करतां येईल, याकडे डोळचांत तेल घालून पहात बसलें पाहिजे." इंग्रजांचा साष्टीवर १७६९ पासूनच डोळा होता असें स्पष्ट दिसतें.

### २ दादाच्या भांडणांत इंग्रजांना साधलें:— ★

फारा दिवसांपासून इंग्रजांचा साष्टी घेण्याबाबत मनसबा होता. पण पेशव्यांच्या बरोबर लढाई देऊन साष्टी जिंकण्याची इंग्रजांची ताकद नव्हती. म्हणून ते तशा संधीची वाट पहात होते. ती संधी त्यांना दादा व मुत्सद्दी यांच्या भांडणांत मिळाली. मुत्सद्दी दादाचा पाठलाग करीत बरेच दूर गेले व त्यांचें सैन्यहि गुंतून राहिलें. परिस्थितीहि मराठ्यांना प्रतिकूल आली. या सर्वांचा फायदा घेऊन इंग्रजांनीं साष्टीवर चढाई सुरू केली. इंग्रजांच्या हालचालीवर बापूंचें पूर्ण लक्ष होतें. त्यांनीं साष्टीच्या लढ्याची उत्तम तयारी केली. विसाजी कृष्ण बिनीवाले यास ३ हजार फौज देऊन मदतीस पाठवलें. वसईस मदत करण्याबद्दल शाहाजी भोंसल्यास बापूंनीं पत्र पाठवलें. मराठी आरमाराचे अधिपति आनंदराव धुळप व रघुजी आंग्रे यांना इंग्रजांच्या

आरमाराशीं लढा देऊन तें गुंतवून ठेवण्याबद्दल हुकुम पाठवले. त्याचप्रमाणें इंग्रजांच्या बंदराशीं कोणीही व्यवहार करूं नये व त्यांना माल पुरवूं नये असे सक्तीचे हुकुम सर्वत्र पाठवले.

### ३ इंग्रजांशीं तोंड देण्याचे बापूचे चतुराईचे मार्ग:— ★

वरीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत बापूची चांगलीच चतुराई दिसून येते. आपल्या सैन्यास मदत करणें; शत्रूची मदत बंद पाडणे, इंग्रजांच्या आरमारास इतरत्र गुंतवून ठेवून त्याचा उपद्रव मराठ्यांना होऊं नये अशी व्यवस्था करणें अशी युद्धदृष्ट्या आंखणी करून बापू थांबला नाहीं. इंग्रजाशीं कोणी व्यवहार करूं नये असा वटहुकुम काढण्यांत बापूला इंग्रजांची नाडी माहीत झाली होती असे दिसतें. बापूच्या हुकुमानें इंग्रजाविरुद्ध सम्राट नेपोलियननें काढलेल्या "बर्लिन डिक्री'ची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं.

### ४ नानासाहेबांनीं आरमार नष्ट केलें होतें:— ★

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याचें संरक्षण करावयाचें म्हणजे आपणांपाशीं चांगलें आरमार हवें हें श्री शिवाजी माहाराजांनीं पूर्णपणें ओळखलें होतें. हिंदुस्थानांत आरमारी लढाईंत सामील होण्यास त्यावेळीं कोंकणपट्टींतील विवक्षित जमातीच्या थोड्या लोकांखेरीज इतर कोणी फारसे तयार नसत. त्यामुळें आरमार मोठ्या प्रमाणांत तयार करणें फार कठिण होतें. श्री शिवाजी महाराजांनीं त्या लोकांना जादा सवलती व प्रोत्साहन देऊन मोठ्या कष्टानें आपलें चांगलें आरमार तयार केलें होतें. त्यांनीं खांदेरी उंदेरी येथें इंग्रजांशी आरमारी लढाई देऊन त्यांचा पराभव केला होता. अशाप्रकारें आपलें आरमार पश्चिम किनाऱ्यावर बळकटसें त्यांनीं करून ठेविलें होतें. नानासाहेब पेशवा झाल्यानंतर आंग्रे व त्यांच्यामध्यें कांहीं बेबनाव झाल्यामुळें नानासाहेबांनीं इंग्रजांचें साहाय्य घेऊन आंग्र्यांचा मोड केला. पण आपल्या आरमाराची अशा प्रकारें खच्ची करून पश्चिम किनारा आपण परकीय लोकांना मोकळा करून देतो

आहों याची नानासाहेबांस त्या वेळीं कल्पना आली नाहीं. आरमारी सामर्थ्य इंग्रजांचें मोठें असल्यामुळें व मराठ्यांचें होतें तेंहि खच्ची झालें असल्यामुळें साष्टीच्या लढाईंत बापूनें सर्व प्रकारची दक्षता घेतली असूनहि इंग्रजांच्या पुढें मराठ्यांचा निभाव लागला नाहीं आणि साष्टी मराठ्यांच्या हातून गेली.

### ५ साष्टी गेल्यामुळें बापूंना फार वाईट वाटलें:— ★

साष्टीचें महत्व बापूहि जाणत होता. म्हणून साष्टी गेल्यामुळें त्याला फार वाईट वाटलें. इंग्रज आतां पश्चिम किनारा आपल्या हुकमतींत ठेवणार हें स्पष्ट होतें. त्या वेळची बारभाईची बिकट परिस्थिति, पेशवाईच्या शत्रूंच्या हालचाली, दादांच्या बरोबर युद्ध, शिंदे-होळकरांचें मतलबी वर्तन, या सर्व अडचणींशीं बापूला आधीं तोंड देणें प्राप्त होतें. या वेळीं इंग्रजांशीं लढाई देऊन साष्टी परत मिळवणें मुष्किलीचें होतें हें बापूला दिसत होतें. इंग्रजांशीं साष्टीसाठीं लढा द्यावयाचा म्हटलें तर आपलें शक्तिसर्वस्व एकवटून भयंकर खर्च करून निकराचा लढा लढल्याशिवाय इंग्रज साष्टी सोडणार नाहींत हें बापूला दिसत होतें. त्यामुळें बापूला साष्टी गेल्याबद्दल फार वाईट वाटलें.

### ६ सुरतेचा तह:— ★

दादा बारभाईंचा पाठलाग चुकवून सुरतेस इंग्रजांच्या आश्रयाला गेले व नंतर त्यांनीं मुंबईकर इंग्रजांशीं तह केला. हा तह "सुरतेचा तह" म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. या तहाच्या अटी खालील प्रमाणें होत्या:—

१ इंग्रजांनीं २५०० स्वारानिशीं राघोबास मदत करून पुण्याची गादी मिळवून द्यावी.

२ राघोबानें साष्टी, वसई, भडोच व सुरत हे प्रांत इंग्रजांना द्यावे.

३ राघोबानें इंग्रजांच्या सैन्याचा खर्च द्यावा.

**७ बारभाई व इंग्रज यांची चकमकः—** ★

या तहाच्या अटीप्रमाणें कर्नल कीटिंग हा दादाच्या मदतीस आला. हरिपंतानें हा वेळपर्यंत फत्तेसिंग गायकवाड याला आपल्या बाजूस ओढून घेतलें होतें. इंग्रज व हरिपंत यांच्यामध्यें नापार व नाविलगाडा येथें निकराच्या लढाया झाल्या. पण त्यांत केव्हां इंग्रजांना तर केव्हां हरिपंताला यश येत होतें; आणि त्यामुळें निर्णायक असें कांहींच झालें नाहीं. पावसाळा आला म्हणून इंग्रज भडोचला गेले आणि हरिपंत खानदेशास गेले.

**८ निजाम बिथरलाः—** ★

या वेळीं बापूनें सर्व ठिकाणीं कमावीसदार नेमून " जाग जागा सावधता धरावी " असें कळविलें होतें. अशा नाजूक स्थितींत निजामाचा दिवाण रुखनुद्दौला मरण पावला. रुखनुद्दौलावर बापूचें फार वजन होतें. तेव्हां तो बारभाईच्या उलट जाणें शक्य नव्हतें. पण तो मरण पावतांच परिस्थिति पालटली. निजामानें सवाई माधवरावास पेशवा म्हणून मान्यता देण्याचें नाकारलें. दादाशीं त्याचें संधान सुरू झालें. या वेळीं निजामाला विरोधी गटांत जाऊं दिलें तर आपली शंभर वर्षे भरलींच याची बापूला जाणीव होती. म्हणून निजामाला १८ लक्षाचा मुलूख देऊन त्याची समजूत काढावी लागली.

**८ दादाशीं तह करण्याचा बापूचा मानसः—** ★

ही बारभाईच्या कारकीर्दींतील अत्यंत कठीण अशी वेळ होती. इंग्रज ही काय चीज आहे याची बापूला कल्पना होती. त्यांचा पेशवाईंत शिरकाव होऊं देणें इष्ट नव्हतें हें बापू जाणत होता. त्याचा पेशवाईंत हस्तक्षेप होऊं न देण्यासाठीं दादाशींच समेट करून प्रकरण मिटवावें असें बापूनें ठरवलें व त्याप्रमाणें नानाला त्यानें कळविलें. " भिकाजीपंतास दादाकडे बोलून पाठवावें व त्यांणीं त्यासी सलूखाच्या स्नेहाच्याच गोष्टी गोडगोड बोलावें तोडूं नये. असे रीतीनें केल्यास बरें आहे. " सर्व परिस्थितीचा पूर्ण विचार

केल्यानंतर दादाशीं नरमाईनें वागून समेट करावा असा बापूचा मानस होता. १३ लाखाची जाहागिर दादानें मागितली होती ती मुत्सद्यांनीं नाकारली आणि केवळ एका निजामाची समजूत काढण्यासाठीं १८ लाखाचा मुलूख द्यावा लागला होता. शिवाय बाकीच्या सरदारांचेंहि धोरण बारभाईंची अडचण पाहून मुलूख उपटण्याकडेच होतें. म्हणजे पेशवाईंतील बराच मुलूख दुसऱ्याला देऊन आपलें आसन स्थिर करण्याचा प्रयत्न बारभाईंना करावा लागत होता. शिवाय इंग्रजांचा हस्तक्षेप चालू होता. इंग्रजाबरोबर लढाई देऊन दादाचा व इंग्रजांचा पराभव करण्यास भगीरथ प्रयत्न करावे लागणार हें उघड दिसत होतें,; आणि निजाम अगर इतर सरदारांनीं पुन: मुलूख मागण्याचा सपाटा सुरूं केला तर काय करावयाचें हा प्रश्न होता. म्हणून बापूंनीं हा अभिप्राय व्यक्त केला होता आणि तो बरोबर होता. पण त्यांच्यां मताला नाना भीक घालीत नव्हता. दादाशीं समेट करण्याच्या भाषेचें नानाला वावडें होतें. अर्थात समेटाचा प्रयत्न करण्यांत आला नाहीं.

**९ इंग्रजांची बातमी काढण्याची बापूची युक्ती:—** ★

हरिपंत लांब गेलासें पाहून इंग्रजांनीं सर्व गुजराथ व्यापिली आणि फत्तेसिंगाशीं तह करून टाकला. बापूला असा अंदाज होता म्हणून इंग्रजाकडील बित्तंबातमी मिळावी असा बापूंनीं वंदोबस्त केला होता. पुण्याचे सावकारांचीं इंग्रजांना पत्रें जात येत असतील त्यांच्यामार्फत बातमी काढावी असें बापू सुचवितात. याबाबत श्री. कानेटकर म्हणतात "सावकारांच्या कडून मॅास्टीनची बातमी काढण्याची बापूंची क्लृप्ती त्यांच्या कार्यकुशल कल्पकतेची द्योतक आहे. इंग्रज हे सावकार, तेव्हां सावकारांच्या बातम्या सावकारास ठाऊक या दृष्टीनें हा बाण नेमकाच लागणार होता." हें त्यांचें म्हणणें अगदीं खरें आहे.

**१० बापूंनीं कलकत्यास संधान बांधलें:—** ★

सध्यां इंग्रजांशीं तहाचें बोलणें लावावें व पावसाळा काढावा

आणि नंतर हरिपंतानें पुन: गुजराथेकडे जाऊन गनिमीकाव्यानें इंग्रजांना जेर करावें असा डाव बापूंनीं योजला, व इंग्रजांशीं तहाचें बोलणें करण्यासाठीं जिवाजीपंत काळे यांना मुंबईस पाठवले. बापूंच्या अटी अशा होत्याः—(१) दादानें १५ लक्ष रुपये व दोन किल्ले घेऊन स्वस्थ बसावें. (२) २० लक्ष रुपये घेऊन इंग्रजांनीं साष्टी परत द्यावी. इंग्रजांना या अटी मान्य नव्हत्या. दादासाठीं १० लक्षाची जाहागीर इंग्रज मागत होते. त्याला बापूंचें उत्तर असें होतें "पूर्वी देत होतों त्या प्रमाणें द्यावें तर खराबी काय झाली? आतां जहागीर कोठून द्यावी?" या प्रमाणें वाटाघाटी करून बापूनें पावसाळा काढला पण तह झाला नाहीं. आणि दरम्यान बापूंनीं कलकत्त्यास बांधलेलें संधान साधलें. हरिपंतांची मोहीम इंग्रजांविरुद्ध सुरूं होणार तोंच कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंग्स यानें मुंबईकरांना लढाई बंद करण्यास हुकुम पाठवला व बापूंनाहि त्यानें खालील आशयाचें पत्र पाठवलें. मुंबईकर इंग्रज हे आमच्या हाताखालील असून आम्हांस न विचारतां त्यांनीं दादासाहेबांचा पक्ष स्वीकारून तुम्हांशीं लढाई आरंभिली आहे. सबब आम्हीं मना केली आहे. तुम्हींहि लढाई मना करावी. तहाचे करारमदार करण्याकरितां तुम्हांकडे वकील पाठवतों."

**११ बापूंचें हेस्टिंग्सला उत्तरः—** ★

बापूलाहि हेंच हवें होतें. त्यानें तात्काळ हें बोलणें मान्य केलें व वारन हेस्टिंग्सला खालील पत्र पाठवलें. "तुमचें शाहाणपण, धूर्तता व बुद्धिमत्ता यांचीं अनेक उदाहरणें माझ्या ऐकण्यांत आल्यावरून तुमच्याशीं स्नेह जोडावा अशी माझी फार दिवसांपासून मनीषा होती. परंतु अद्याप योग आला नव्हता. कोणतीही गोष्ट तिची वेळ आल्याशिवाय घडून येत नाहीं. असो. ईश्वर कृपेनें याच प्रसंगीं माझ्या इच्छेनुरूप आपलें पत्रहि आल्यामुळें हा योग जुळून आला आहे. आपलें पत्र वाचून आपल्या स्नेहाविषयीं खात्री झाली व संतोष वाटला सदर पत्रामध्यें तुम्हीं मुंबईचे सरदारास राघोबास मदत न देण्या विषयीं लिहिलें तसेंच कंपनीच्या हुकुमावाचून त्याला दिलेली

कुमक परत घ्यावी व श्रीमत् रावाच्या राज्यास उपद्रव देऊं नये असा हुकुम पाठवला असेंहि लिहिलेलें वाचून संतोष झाला. .... .... .... पूर्वापार संबंध असा आहे कीं मुंबईचे सरदार व पेशवे यांच्या मध्यें स्नेह असून तो स्नेह अनेक तह-करारांनीं बळकट झालेला होता. इतक्यांत दुर्दैवानें श्रीमंत नारायणराव यास रघुनाथरावानें ठार मारलें. ही हकीगत जगजाहीरच आहे. तथापि त्यांना पुत्र झाला असून त्याच्या आश्रयाखालीं आम्ही राहात आहों. हा पुत्र झाल्यापासून सर्वांस उल्हास व उमेद आली व त्याला सनदशीर स्थापन करण्यांत आलें. .... .... कैलासवासी रावांच्या वेळीं मी व नाना कारभार पाहात होतों व त्याच प्रमाणें आतांसुद्धा गादीची मनःपूर्वक चाकरी करीत आहो, व करण्यास तयार आहों. याबद्दल एकंदर आबालवृद्ध संतोषित आहेत. त्याच प्रमाणें नबाब उलमुल्क यांचीही आम्हाबरोबर पूर्वींप्रमाणें दोस्ती आहे. ............ ही हकीगत होतांच रघुनाथराव हिंदुस्थानकडे पळाले व त्यांच्या पाठीवर सरकारची फौज गेली. इतक्यांत मुंबईचे सरदारांनीं या सरकार बरोबर असलेला पुरातन स्नेह एकीकडे ठेवून लबाडीनें या सरकारच्या साष्टी वगैरे जागा घेतल्या व सरकारच्या फौजेवर लढाई करीत परागंदा झालेल्या रघुनाथरावाबरोबर तह केला. तुमच्या देशांत तहनामे पाळण्या विषयीं कडक नियम आहेत. ज्यांच्यामध्यें तह ठरतात ते त्या विरुद्ध मरेपर्यंत वागत नाहींत. असें असतां मुंबई सरकारनीं स्नेहाचा संबंध तोडून असें वर्तन चालवलेलें पाहून मला फार आश्चर्य वाटलें ! या वर्तनाबद्दल त्यांचा बंदोबस्त करणें जरूर पडल्यावरून आमची फौज-मोठ्या तयारीनिशीं त्यांच्यावर पाठविली आहे......... माझा हेतू आमच्या-धन्याचा अधिकार बळकट करावा, प्रजेचें कल्याण करावें, तिला सुख द्यावें आणि मातबर लोकांतील तंटे मोडून ऐक्य करावें असा आहे. त्याच प्रमाणें तुमचीहि इच्छा आहे. ........... बाळाजीपंतांनीं आपल्यास वेगळें लिहिलें आहे. पत्राचें उत्तर पाठवून दोस्ती कायम ठेवावी ''

**१२ पत्रांतून बापूची मुत्सद्देगिरी स्पष्ट होतेः—** ★

या पत्रांतील एकंदर मजकूर बापूच्या मुत्सद्देगिरीला साजेसाच आहे. आपल्याला आपल्या प्रजेचा पाठिंबा आहे. दादा खुनी आहेत, ही गोष्ट जगजाहीर आहे. निजाम आपल्याला अनुकूल आहे. इंग्रजांशीं लढण्यासाठीं प्रचंड तयारीनिशीं आपलें सैन्य पाठविलें आहे. प्रजेचा आपल्याला पूर्ण पाठिंबा आहे, वगैरे अनेक गोष्टींची जाणीव बापूनें ओघांत करून दिली आहे. पत्रांत आपण तहनाम्यासाठीं उत्सुक आहोंत अगर यशाबद्दल साशंक आहोंत असें वाटण्यासारखा एकहि शब्द नाहीं. लढाई झालीच तर आपल्याला यशच मिळेल असा सूर त्या भाषेंतून निघतो. मस्तवालपणा अगर घमेंड मुळींच नाहीं. तसेंच मऊपणाहि दाखवला नाहीं. स्नेहानें वागाल तर स्नेहानें वागूं. अंगावर याल तर शिंगावर घेऊं अशा प्रकारची भाषा बापूंनीं वापरली आहे. परकीय सत्तेशी कसें बोलावें यांत बापू चांगलेच तरबेज होते हें या पत्रावरून सिद्ध होतें.

**१३ इंग्रजाबरोबर तहाच्या वाटाघाटी:—** ★

वर सांगितल्याप्रमाणें तहाच्या वाटाघाटी सुरूं होऊन लढाई थांबली ही गोष्ट मराठे व इंग्रज या दोघांनाही हिताचीच झाली. कारण या वेळीं दोघांनाही यशापयशाबद्दल शंकाच वाटत होती. हेस्टिंग्सच्या पत्राप्रमाणें कर्नल अॅप्टन तहाच्या वाटाघाटी करण्यासाठीं पुरंदरास आला. पेशव्याच्या मुलखांतून अॅप्टन येत असतां ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना त्याची वाटेंत उत्तम प्रकारची बरदास्त ठेवण्याविषयीं बापूनें पत्रें पाठविलीं होतीं. त्याप्रमाणें सरबराई घेत घेत अॅप्टन ता. २८-१२-१७७५ रोजीं पुरंदरास आला. त्याच्या स्वागतासाठीं गडाच्या पायथ्याशीं शामियाना उभारला होता. त्यांत नाना व बापू यांनीं त्यांचें स्वागत केलें. अॅप्टन पुण्यास आला. तरी मुंबई सरकारनें युद्ध थांबवलें नव्हतें. बापूनें हेस्टिंग्स यास पत्र पाठवलें "मुंबई सरकारनें गव्हर्नर जनरलचा हुकुम अमलांत आणल्याचें दिसत नाहीं

राघोबाच्या मदतीस दिलेली फौज परत बोलावण्यांत आलेली नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं मराठ्यांचीं जिंकलेलीं ठाणीं परत देण्यांत आलेलीं नाहींत. मराठी सैन्य मात्र युद्ध थांबवून परत फिरलें आहे. तेव्हां जनरलांनीं तेवढे हुकुम ताबडतोब द्यावे." (प. कॅ. ४-३५६७) या पत्राचा परिणाम झाला व किटिंग युद्ध थांबवून परत सुरतेस गेला.

**१४ वाटाघाटी फिसकटल्याः—** ★

पुरंदराच्या पायथ्याशीं ता. १-१-१७७६ रोजीं वाटाघाटीस सुरवात झाली. इंग्रज वकीलांनीं आपली भूमिका स्पष्ट केली. "आम्हीं राघोबाचा पक्ष धरला तो वाजवी अगर गैरवाजवी असो, आम्ही सावकार नफा तोटा पहाणार. आम्हांला साष्टी व वसई हीं ठिकाणें आणि भडोच व सुरत हे महाल दिले पाहिजेत." बापूचें यावर म्हणणें असें कीं, जी लढाई तुम्हीं अन्यायानें सुरू केली असें कबूल करतां त्याबद्दल मुलूख मागता हा कुठला न्याय ? रघुनाथरावास आमच्या स्वाधीन करावें आणि परस्परांनीं परस्परांचा घेतलेला मुलूख परत द्यावा. या अटीवर तह होऊं शकेल. नाहीं पेक्षां तहाचें बोलणें बंद ठेवावें लागेल. पण या अटीस अॅप्टन कबूल होईना व बापूहि आपलें म्हणणें सोडीनात. शेवटीं अॅप्टननें परत जाण्यास हुकूम मागितला व बापूनें तो दिला. अॅप्टननें कलकत्यास सलुख मोडला असें कळवलें. त्याबरोबर हेस्टिंग्सनें मुंबईकरांना कळवलें, 'अॅप्टनचें मराठे ऐकत नाहींत तर लढाईचा सरंजाम करणें. इथून मदत पाठवितों.' कर्नल किटिंग यानें पुनः गुजराथेंत मराठ्यांशीं लढाई सुरू केली. हरिपंत अद्याप गुजराथेंत होता. त्यामुळें बापूंना कांहीं भीति नव्हती. पण परिस्थिति कशी काय पालटेल हें कळेनासें झालें. इंग्रजांनीं शिंदे, होळकर, निजाम यांच्याशीं संधान सुरू केलें. मद्रास व अयोध्या भागांतील आपल्या सरकारास मराठ्यांना त्या त्या ठिकाणीं उपद्रव देण्यास हुकुम पाठविले.

### १५ पुरंदरचा तह:— ★

शिंदे-होळकर हे सरकार कामाविषयीं उदासीन होते. जिकडे तिकडे दंगे सुरूं होते. सरंजामाचा पैसा येत नव्हता. शिबंदी पोंचत नव्हती. कर्ज मिळत नव्हतें. या परिस्थितींतून पार पडणें म्हणजे इंग्रजावरोबर तह करणें हा एकच मार्ग शिल्लक होता. म्हणून बापूनें इंग्रजाशीं तह करण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणें अ‍ॅप्टनास त्यांनीं कळवलें. अ‍ॅप्टननें हेस्टिंग्सला कळवलें व पुरंदर येथें ता. १-३-१७७६ रोजीं मराठे व इंग्रज यांच्यांत तह झाला. त्याच्या अटी अशा होत्या:—

१ गव्हर्नर जनरल तयार असतील तर पेशव्यांनीं इंग्रजांना साष्टी-बद्दल ३ लक्ष रुपयाचा मुलूख द्यावा नाहीं तर साष्टी इंग्रजा-कडेच राहावी.

२ भडोच शहराजवळचा मुलूख व १२ लक्ष रुपये लढाईचा खर्च इंग्रजांस द्यावा.

३ राघोबानें सैन्यास एक महिन्यांत रजा द्यावी व पंचवीस हजार पेन्शन व एक हजार स्वार व कांहीं नोकर यांसह गोदावरी तीरीं राहावें.

४ इंग्रजांनीं, दादा किंवा त्यांच्या तर्फे कोणी बंड केल्यास त्यांना मदत करूं नये.

यापैकीं पहिली अट बापूस कबूल नव्हती. कसेंहि करून ग. ज. नें ती परत घ्यावी असा त्यांचा आग्रह होता असें दिसतें. ( प. कॅ. ५-२३ ) हा तह पुरंदरचा तह या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

### १६ पुरंदरच्या तहाबाबत कानेटकरांचें मत:— ★

हा तह बापूनें घडवून आणला. त्याबाबत श्री. य. गो. कानेट-कर म्हणतात "पुरंदरचा तह म्हणजे बापूच्या उपयुक्त सार्वजनिक कार्याची कमाल मर्यादा होय. बापूच्या अक्कलहुषारीनें

बारभाईचें तारूं संकटाच्या भोंवऱ्याचा भेद करून शीरसलामत बाहेर पडलें. शिंदे-होळकरांची मदत नसतांहि बापूनें इंग्रजांशीं टक्कर देण्याचें काम इतक्या धडाडीनें व धोरणानें पार पाडलें. इंग्रजांनाहि पेशव्यांशीं दोस्ती करणें जरूर वाटलें. बारभाईचें कारस्थान उभारल्यानंतर एकुलत्या एक पुत्राचा मृत्यू घडून आला तरी सखाराम बापूंनीं सर्व दुःख गिळून कार्यांत आळस केला नाहीं. यावरून त्यांची कर्तव्यनिष्ठा व चिकाटी चांगलीच दिसून येते. तसेंच तह घडवून आणण्यामध्येंहि कोठें पड घ्यावी, कोठें ओढून धरावें वगैरे परराष्ट्र मंत्र्याच्या अंगीं आवश्यक असणाऱ्या गुणांचीं अत्युत्कटता बापूंनीं पुनः एकवार सर्वांच्या प्रत्ययास आणून दिली. सारांश बारभाईचें कारस्थान उभारल्यापासून पुरंदरच्या तहावर सही होईपर्यंतची बापूची कामगिरी अलौकिक, भरीव, राष्ट्रहितकारक व नाणावलेल्या मुत्सद्यास साजेशी आहे यांत शंका नाहीं." ( सखारामबापू चरित्र पा. १६१ ) श्री कानेटकरांचें वरील मत पुष्कळ अंशी खरें आहे. बारभाईच्या कारस्थानाच्या दृष्टीनें विचार केला तर बापूंची ही कामगिरी फारच भरीव होती. पण राष्ट्रहितकारक होती हें म्हणणें मात्र बरोबर नाहीं. दादाविरुद्ध आपलें स्थान टिकवण्यासाठीं प्रांत व लाखो रुपये इंग्रजांना देऊन त्यांना पुष्ट करणें ही गोष्ट राष्ट्रहिताची नसून बाधक होती. पण त्यावेळीं बापूनें या दृष्टीनें विचार केलेला दिसत नाहीं. किंवा नानापुढें त्याचें कांहीं चाललें नसावें, असें म्हणावें लागतें.

## १७ पुरंदरचा तह मोडला:— ★

पुरंदरचा तह झाला पण तो टिकेल कीं नाहीं याबद्दल दोघांनाही शंका वाटत होती. बापू इंग्रजांच्या धोरणावर बारीक लक्ष ठेवून आपल्या अंतर्गत कारभारांत सुव्यवस्था लावण्याच्या कामास लागला. राघोबानें कलकत्त्यास वकील पाठवून या तहाच्या वेळीं आपला विचार घेतला नाहीं. इंग्रजांच्या भरंवशावर निजामाचें साहाय्य आपण घेतलें नाहीं आणि इंग्रजांनीं असा मध्येंच हात सोडल्यानें

आपलें भारी नुकसान झालें आहे हें सविस्तर कळवलें व त्याप्रमाणें इंग्लंडच्या बादशाहासहि पत्र पाठवलें कीं " करारमदार तहनामे पाळण्याबद्दल इंग्रजांची ख्याति आहे. तेव्हां कलकत्त्याचे गव्हर्नर जनरल व मुंबई सरकार यांना तहाच्या अटीप्रमाणें राज्य मिळवून देण्याच्या कामीं आपणास मदत करण्याबद्दल बादशाहांनीं हुकुम द्यावा. " ( Forrest P. 282 ) या पत्राचा परिणाम होऊन इंग्लंडहून कलकत्त्यास व मुंबईस लिहून आलें कीं " सुरतेचा तह मान्य आहे आणि पुरंदरचा तह नापसंत आहे. राघोबापासून मुलूख ठेऊन घ्यावा व त्याचें रक्षण करावें. " मुंबईकरांना हेंच हवें होतें. त्यांनीं ताबडतोब पुरंदरचा तह बाजूस ठेवून दादांना मुंबईस आणून ठेऊन घेतलें.

## १८ इंग्रजांना बापूचें सडेतोड उत्तरः— ★

इंग्रजांच्या या कृत्याबद्दल बापूनें हेस्टिंग्सला पत्र पाठवलें: " मराठे व इंग्रज यांच्यांत तह घडून आल्यामुळें कायमचा स्नेहसंबंध जडेल अशी आशा वाटत होती. परंतु दुःखाची गोष्ट अशी कीं तहांतील अटीप्रमाणें मुंबई सरकारची वागणूक होत नाहीं. यावरून इंग्रज लोकांमध्यें प्रामाणिकपणा, निखालसता फार कमी आहे असें वाटूं लागतें. साष्टी फार वर्षें पेशव्यांचे ताब्यांत होती. ती इंग्रजांनीं दगाबाजी करून घेतली. तो प्रश्न अजून अनिर्णितच आहे. इंग्रजांनीं गायकवाडापासून कांहीं भाग लावून घेतले. कर्नल अॅप्टन भडोच मागतोच. अर्काटचा नबाब महंमद अल्लीखान यानें तंजावर, रामनाथपूर वगैरे ठिकाणें घेतलीं असून चौथ सरदेशमुखीचा ऐवज आज कैक वर्षें पेशव्यास दिला नाहीं. या सर्व कृत्यांस इंग्रजांची मदत व फूस आहे हें स्पस्ट दिसून आलेलें आहे. याचे परिणाम फार भयंकर होतील " ( प. कॅ. ५१६-२६ ). याला हेस्टिंग्सनें दोन्ही दरडीवर हात ठेवून गुळमुळीत उत्तर पाठविलें कीं " तह झाला आहे आतां तक्रार करणें बरोबर नाहीं. आपलें शहाणपण, कर्तृत्व, व न्यायनिष्ठा हीं प्रसिद्ध आहेत. तेव्हां आपण व इतर मराठे सरदार तहांतील करारमदार मोडणार

नाहींच. आम्हीहि शक्य तों पाळण्याचा प्रयत्न करूं."

### १९ साष्टीबाबत बापूंचा पत्रव्यवहारः— ★

साष्टी देण्याबाबत बापूंचा हेस्टिंग्सकडे सारखा तगादा सुरू झाला. साष्टीबाबात बापूंची अद्याप कुरकुर असावी याबद्दल हेस्टिंग्सनें आश्चर्य दर्शविलें. बापूनें अत्यंत जोरदार शब्दांत त्यांना कळवलें कीं "गेलीं पन्नास वर्षें साष्टी पेशव्यांच्या ताब्यांत असतां इंग्रजांनीं ती अन्यायानें घेतली व या कृत्यास ग. ज. सारख्या गृहस्थांनीं देखील पाठिंबा द्यावा हें आश्चर्य आहे. या कृत्याचा आम्ही कसून विचार करीत आहों आणि याचे परिणाम भयंकर होतील." या पत्रव्यवहाराबाबत श्री. कानेटकर म्हणतात "सखारामबापूंची या प्रकरणांतील पत्रें युरोपांतील कोणत्याही कर्त्या मुत्सद्दी पुरुषास शोभण्यासारखीं आहेत. मुत्सद्दी तहाची, त्यांतील शब्दार्थाची कशी ओढाताण आपल्या फायद्यासाठीं करीत असतात हें हीं पत्रें वाचून चांगलें कळून येतें."

### २० तोतयाशीं संधान दादानें बांधलें:— ★

सखाराम बापूंच्या कडक पत्राचा थोडाफार परिणाम होऊन हेस्टिंग्सनें बापूला थंड करण्यासाठीं म्हणून तंजावर प्रकरणीं हुकुम पाठवून तंजावर तुळाजीस देण्याबाबत लिहिलें. पण दादाला मदत देण्याचें मुंबईकरांनीं बंद केलें नाहीं. उलट त्यांनीं व दादांनीं कोल्हापूरकरांना बारभाईविरुद्ध उठविलें. तोतया म्हणून कैदेंत असलेल्या सदाशिवरावभाऊस दादानें व इंग्रजांनीं पैशाची आणि सैन्याची मदत पाठविली.

### २१ तोतया खरा कीं खोटाः— ★

तोतया म्हणून तुरुंगांत डांबलेला इसम तोतया होता कीं सदाशिवरावभाऊच होता याची चर्चा करण्याचें हें स्थान नव्हे. इतिहासभास्कर रानडे यांचें मत असें कीं तो खुद्द सदाशिवरावभाऊच होता. पण नानानें स्वार्थानें त्याला तोतया ठरवून शेवटीं उपवास

घडवून मारलें. त्याच प्रमाणें " जुळे तोतये " या पुस्तकांत श्री. वाकसकरांनींहि असेंच सिद्ध केलें आहे. पार्वतीबाईस तोतयाचें केव्हांच दर्शन दिलें नाहीं. त्याचप्रमाणें सदाशिवराव भाऊचें पालन पोषण करणारी इचलकरंजीची त्याची आत्या तोतयाला आपणांस एकदां दाखवा म्हणून सारखा तगादा करीत होती, तरी तिला तोतया केव्हांच दाखवला गेला नाहीं. तोतयाला १२ वर्षें तुरुंगांत ठेवलें. ताबडतोब मारून टाकलें नाहीं. ज्या किल्ल्यांत तोतयास ठेवावें तो किल्लेदार तोतयास सामील होत असे. पण त्याला नाना शिक्षा करीत नसे. रत्नागिरीला तर तोतयाची परीक्षा घेऊन पेशव्यांच्या सर्व आप्तइष्टांनीं तो भाऊ आहे असें ठरविलें. मॉस्टीन डायरी-वरून तो सदाशिवरावभाऊ आहे असाच सर्वांचा समज त्या वेळीं होता असें दिसतें. ही सर्व परिस्थिती पाहिली तर तो भाऊच होता तोतया नव्हता हेंच खरें दिसतें. पण भाऊला तोतया ठरवण्याच्या कामीं अगर त्याचे हाल करण्याच्या कामीं बापूचा हात कोठेंच दिसत नाहीं. हीं सूत्रें नानाच हालवीत होता.

## २२ तहाच्या अटी पाळण्याबाबत इंग्रजांशीं घासाघीस:— ★

तोतयाला इंग्रज मदत करीत आहेत अशीहि तक्रार बापूनें हेस्टिंग्सकडे केली व चौकशी करतों असें मोघम उत्तर त्यांना मिळालें. तहाच्या अटीविरुद्ध वर्तन इंग्रजांनीं केलें होतें. तरी तहाप्रमाणें १२ लक्ष रुपये व ३ लक्षाचा मुलूख याची मागणी इंग्रज करीतच होते. याबाबत नानानें मॅकफर्सन याला ठासून उत्तरें पाठविल्याबद्दल बापूनें त्याची पाठ थोपटली असा उल्लेख आहे. ( पा. सं. नं. २१ ) महाल जंबूसर इंग्रजांनीं सोडावें असा करार असतां त्यांनीं तो सोडला नाहीं. तेव्हां रुपये कोठून द्यावे अशी तक्रार बापूनीं सुरू केली. तीन लाखाचा मुलूख देणेचा तो केव्हांही एकदां दप्तरीं तीन लाखाचा असला तर बस म्हणून गुजराथेंतील आमोद व आसपा-सचा ओसाड मुलूख इंग्रजांनीं घ्यावा असें बापूंचें म्हणणें होतें.

## २३ बापूनें इंग्रजांना चकवलें:— ★

वरीलप्रमाणें तह पाळण्याच्या बाबतींत घासाघीस करीत बापूंनीं दोन वर्षे काढलीं व या कालावधींत त्यांनीं फ्रेंचाशीं संधान बांधलें. "आशां कालवतीं कुर्यात् । कालं विघ्नेन योजयेत्" ॥ हें कणिक नीतीमधील तत्व बापूनें अमलांत आणलें. फ्रेंचाशीं संधान बांधण्याची बापूची युक्ति मात्र रामबाण ठरली आणि याचा परिणाम होऊन इंग्रजांनीं बापूशीं तह केला. बापूनें इंग्रजांना चकवलें व तह करण्यास भाग पाडलें. पण इंग्रजांनीं साष्टीच्या बाबतींत बापूंना फसवलें. लढाईचा प्रसंग टाळून इंग्रजांनीं साष्टी व वसई हीं ठाणीं पचवलीं व बापूंना तीं पचूं द्यावीं लागलीं.

## २४ बापूंचा सर्वत्र वचक:— ★

बापूनें शिंदे होळकरांच्या साहाय्याशिवाय इंग्रजांशी लढा दिला व त्यांना तह करण्यास भाग पाडलें हें पाहून शिंदे व होळकरांना चांगलाच वचक बसला व आतां अधिक ताणण्यांत हंशील नाहीं अशी शिंदे व होळकर यांना खात्री पटली, व त्यांनीं पेशव्यांची कामगिरी करण्याचें कबूल केलें. शिंदे व होळकर या दोघांवरहि बाकी होती. बापूनें होळकरांची बाकी सूट दिली पण शिंद्याची दिली नाहीं. कारण शिंद्यांनीं कारवाई केली होती त्याची आठवण बापूला होती. यामुळें शिंदे आगदीं चिडून गेला. त्यानें भोंसल्यास लिहिलें "मुत्सद्दी केवळ लबाडी करूं लागले. तुम्ही आम्ही त्यांचें पारिपत्य करूं. राज्य तुमचेंच आहे." महादाजीचें वर्तन नेहमींच स्वार्थी व दुटप्पी असे. त्यामुळें बापूंचें व त्यांचें मनोमन कधीच जमलें नाहीं. महादाजीनीं बरीच धडपड केली. पण बापूपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं बापूच्या म्हणण्याप्रमाणें त्याला वागणें भाग पडलें. शिंदे व होळकर नरम झाल्याचें पाहून इतर सर्व सरदार आपोआपच बापूच्या लगामीं आले व बापूचा सर्वत्र वचक बसला.

**२५ बापूंच्या आयुष्याचा उच्चांकः—** ★

बापूंनीं सर्व सरदारांना आपल्या लगामीं आणलें. इंग्रजांना शह देऊन बारभाईंना तारलें. अतस्थ बंडाळी मोडून काढली. ही गोष्ट साधी नव्हती. बापूंचें वय, त्यांची अशक्त झालेली प्रकृती व एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूमुळें दुःखित झालेली मनस्थिति पाहतां सर्व बाजूनीं प्रतिकूलता उत्पन्न झालेली असतांनाहि शांत मनानें त्या सर्वांस तोंड देऊन या सर्व संकटांतून शिरसलामत बाहेर पडण्यांत त्यांनीं दाखवलेली चिकाटी व चातुर्य अवर्णनीय आहे. या वेळीं बापूंना परदरबारांत, सरदारांत व प्रजेच्या अंतःकरणांत अत्यंत मानाचें स्थान मिळालें होतें. बापूच्या आयुष्यांतील यश व कीर्तीचा हा उच्चांक होता. या वेळच्या बापूच्या स्थानाचा कोणालाहि हेवा वाटण्यासारखा होता. आणि बापूच्या या यशांतच नाना व बापू यांच्या वैमनस्याचीं बीजें पेरलीं गेलीं.

---

## प्रकरण ११ वें

# नाना व बापू यांच्यामध्यें वैमनस्य

**१ बापूचा मान व नानास वैषम्यः—** ★

बापूंची कर्तबगारी, लोकप्रियता व शहाणपण कसास लागून ते शंभर नंबरी ठरले होते. शिंद्यांनीं होळकरामार्फत बापूंना विचारलें होतें कीं आम्हीं तुम्हास मदत करूं पण आम्हांला काय द्याल ? याबाबत बापूंनीं त्यांना चापलें कीं दौलतीच्या सरदारांनीं वेळोवेळीं अडवून न धरतां दौलतीची स्वार्थनिरपेक्ष रीतीनें सेवा केली पाहिजे. तुम्ही वेळोवेळीं जहागीर किंवा मुलूख मागतां याचा अर्थ काय ? बापूंनीं आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखविली असल्यानें आतां आपण

अधिक गडबड केल्यास आपल्याला थप्पड मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं, असें शिंदे व होळकरांना वाटल्यामुळें ते बापूंच्या आज्ञा मुकाट्यानें पाळूं लागले. फौजेवर बापूची जरब बसली. प्रजेवर दाब व आब उत्पन्न झाला. माधवरावाच्या वेळेपासून पेशवाईचा कारभार आपल्या हातीं घेण्याची खटपट नाना करीत होता. पण या वेळीं ती त्याची महत्वाकांक्षा फळाला येण्याचा रंग दिसत असतां बापूंच्या लोकप्रियतेमुळें त्यास पायबंद बसूं लागला. नानाला पेशवाईचा सुलतान बनण्याची आतां महत्वाकांक्षा उत्पन्न झाली होती. बापूंना मिळालेली ही लोकप्रियता त्यांना बोंचूं लागली व बापूला हाणून पाडलें पाहिजे असें नानास वाटूं लागलें.

## २ शिंदे म्हणजे नानाचा हुकमी एक्का:— ★

मानाजीला गादी मिळावी म्हणून बापू व दादा यांनीं महादाजी विरुद्ध प्रयत्न केला होता. त्यामुळें महादाजीचें मन बापूबद्दल साफ नव्हतें. स्वतःच्या भातावर तूप ओढून घेणारा मनुष्य या नात्यानें बापू शिंद्यावर फारसा भरंवसा ठेवीत नसे व त्याला बापूकडून कोणत्याही बाबतींत सवलत मिळत नसे. बारभाईच्या कारस्थानाच्या सुरवातीपासून प्रत्येक वेळीं महादाजीनें पेशव्याकडून कांहींतरी मलिदा मिळाल्याखेरीज कोणतेंहि काम करावयाचें नाहीं असें धोरण ठेवलें होतें. यामुळें बापूंचा महादाजीवर फार राग होता. महादाजीही हें पूर्ण जाणून होता. पूर्वीपासून महादाजी हें घोडें नानाचें असल्यानें नाना व महादाजी यांचें चांगलें सूत होतें. बापूविरुद्ध मोहिम उभारण्याला बापूवर राग असणारा, नानावर लोभ ठेवणारा आणि फौजबंद असा सरदार काय तो महादाजी एकटाच होता. तेव्हां बारभाईच्या सरदारांच्या सांखळींतील कमकुवत दुवा म्हणून नानानें त्याच्यावर प्रयोग करण्याचें ठरविलें.

३ बापूच्या अधिकारात नानानें गंगाबाईच्याकडून शह दिला:—

बारभाईच्या कारभारांत बापूनें 'द्यावें' असा शेरा मारावयाचा व 'देववावें' असा शेरा नानानें मारावयाचा असा शिरस्ता होता. पेशव्याचे अधिकार बापूकडे व कारभाऱ्याचे अधिकार नानाकडे असे होते. कोणत्याही गोष्टीस मंजूरी देण्याचा अधिकार बापूचा होता व तो अमलांत आणण्याचें काम नाना करीत असे. बापूंचा स्वभाव व वर्तन कांटेकोर व सरळ असल्यानें कोणाचीहि भीड चालत नसे. नानांचे व्यवहार बरेच वाममार्गाचे असल्यामुळें त्यांना बापूकडून मंजूरी मिळवणें शक्य होत नसे. नानांचें जसजसें दरबारांत वजन वाढूं लागलें, तसतसें त्यांचे असले व्यवहारहि वाढूं लागले आणि बापूकडून तर त्यांना मंजूरी मिळवितां येईना. त्यामूळें नानांना या अडचणींतून दुसरा कांहीं मार्ग काढणें भाग होतें. नानानें सवाई माधवरावाची आई इजला आपल्या वजनाखालीं आणलें व "द्यावें" असा तिच्याकडून शेरा मारून "देववावें" असें आपण करून कामें उरकण्याची प्रथा नानानें सुरू केली. तेव्हां बऱ्याच व्यवहाराबाबत बापूला न कळत गोष्टी घडूं लागल्या.

४ शिद्यांना मलिदा देऊन नानानें त्यास आपणाकडे वळवलें:— ★

वर सांगितल्या प्रमाणें शिंदे व बापू यांचें मनोमन बरें नव्हतें. शिंदे हा स्वार्थी व मतलबी असल्यानें त्याला कांहीं मलिदा दिल्यास आपलें काम होईल असें जाणून बापूंना कांहीं पत्ता न लागू देतां परभारें गंगाबाईच्या सहीनें नानानें त्याला दहा लाखाची जाहागीर व अशीरगडचा किल्ला दिला. या वेळीं कोल्हापूर व बारभाई यांच्यांत तंटा सुरू होता. तो बंद करावा असें बापूचें मत होतें. पण या तंट्यांत पटवर्धनांचा फायदा असल्यानें तो बंद करण्यास नाना कसा कबूल होईल? तो तसाच चालू करून नानानें त्या कामगिरीवर महादाजीची नेमणूक केली. यामुळें महादाजी नानाच्या उपकाराच्या ओझ्याखालीं राहिला व बापूविरुद्ध नानाला साहाय्य कर-

ण्याचें त्यानें वचन दिलें. नाना व महादाजी यांच्यामध्यें या वेळीं बापूला कारभारांतून काढून टाकण्याचें नक्की ठरलें असलें पाहिजे. बापू हे आपलें शत्रू आहेत असें नानाला वाटत होतें. व त्या शत्रू पासून नानाला वांचवल्याबद्दल शिद्यानें पुढें नानाला सवाल टाकल्या-चेंहि दिसतें.

### ५ नानाबद्दल बापूला संशयः— ★

बापूंना न विचारतां नानानें अनियंत्रितपणें गंगाबाईच्या सहीनें हुकुम काढून कारभार करण्यास सुरवात केल्यानंतर कांहीं दिवसांनीं या गोष्टी बापूला समजल्या व नाना असें कां करीत असावा याचा तो विचार करूं लागला. बापूला बाजूस सारून गंगाबाईच्या सहीनें कारभार उरकण्यांत नाना आपली सत्ता आपल्या इच्छेप्रमाणें गाजवूं पाहात होता हें तर स्पष्ट दिसत होतेंच. शिवाय ज्या व्यवहाराबाबत नानानें असें केलें होतें त्या व्यवहाराबाबत चौकशी करतां बापूला असें स्पष्ट दिसूं लागलें कीं ते व्यवहार नानाची सत्ता राज्यांत प्रबळ करण्याकरतां व जरूर प्रसंगीं बापूविरुद्ध मदत देण्याकरतांच होते. यामुळें बापूच्या मनांत नानाबद्दल संशय उत्पन्न झाला.

### ६ नाना सर्वसत्ताधीश झाला तर ?— ★

नानाच्या एकंदर हालचालीवरून तो आपल्याला लवकरच राज्य-कारभारांतून हांकलणार व पेशवाईचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत घेणार. नानाच्या हातांत अनियंत्रित सत्ता गेल्यास पेशवाईचें भवितव्य काय असा प्रश्न साहजिकच बापूपुढें उभा राहिला. माधवरावाच्या कारकीर्दींत दादा व माधवराव यांच्यांत तंटा लावण्यांत, नारायणरावाच्या कारकीर्दींत त्याला दादाविरुद्ध बिथरवून कलह उत्पन्न करण्यांत, कोंकणस्थांनीं एकवटून राज्यांत सवत्यासुभ्याची स्थापना करण्यांत आणि दादा व बारभाई यांच्यामधील तंटा समेट करून न मिटविण्यांत नानानें कधीं तरी राज्याच्या सुरक्षिततेच्या अगर हिताच्या दृष्टीनें विचार केला होता काय याची बापूनें छाननी केली. नानाची एकंदर भूमिका स्वार्थी होती. आपण

प्रमुख बनावें, राज्यसत्ता आपल्या हातांत असावी, पेशवादेखील आपला अंकित असावा अशा प्रकारची होती. आपल्या हातांत सत्ता ठेवण्यापायीं दौलतीची खैरात करण्यासहि नाना मागेंपुढें पाहाणार नाहीं असें बापूंना वाटलें. नाना हुषार, कर्तबगार, कारस्थानी होता तसाच तो अप्रामाणिक, अनैतिक आणि दीर्घद्वेषी होता. त्याच्या हातांत अनियंत्रित सत्ता गेल्यास पेशवाईंतील प्रजेच्या मालमत्तेची, त्यांच्या शीलाची व जीविताची शाश्वती राहाणार नाहीं आणि असें झाल्यास पेशवाईच डबघाईला येणार असा हृदयविदारक देखावा बापूच्या विचारचक्षूपुढें नाचूं लागला.

**७ बापूच्या विचाराचें चक्र फिरूं लागलें:—** ☆

नानाच्या सुलतानी मनोवृत्तीचा विचार करीत असतांना नारायणरावाच्या कारकीर्दीत पेशवाई वांचवण्यासाठीं आपण नारायणरावाला धरण्याचा कट, त्या कटाचें झालेलें पर्यवसान, दादावरील खुनाचा आरोप, बारभाईच्या कारस्थानाची स्थापना, इत्यादि गोष्टींचा ताजा चित्रपट बापूच्या डोळ्यांपुढून सरकला. आपण बारभाईमध्यें कां सामील झालों? दादाविरुद्ध बारभाईंनीं केलेलें बंड पेशवाई टिकवण्यासाठीं होतें का? कीं त्यांत नानाचा दादाबद्दलचा व्यक्तिद्वेष होता? दादा खरोखरी खुनी होता कीं नानानें तसें पटवून देण्यांत आपल्याला चकवलें? दादाशीं समेट न करतां दादावर सूड उगविण्याचा नाना प्रयत्न करीत आहे का? आपण बारभाईंत सामील झालों नसतों तर काय परिस्थिति झाली असती? वगैरे अनेक विचार बापूच्या डोक्यांत थैमान घालूं लागले.

**८ बारभाईंत सामील होण्यांत आपली चूक झाली हें बापूंना पटलें:—**

आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं बापूंच्या चलबिचल मनस्थितीचा फायदा घेऊन त्यांना दादाविरुद्ध बिथरवलें होतें. पण आतां बापू पूर्ण विचार करण्याच्या मनस्थितींत होते. त्या वेळीं घडलेल्या

प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार करून सत्यासत्याच्या निकषावर त्या घासून बापूनीं पाहिल्या, तेव्हां सर्व चित्र त्यांना निराळेंच दिसूं लागलें. विचार सरळ प्रवाहानें वाहूं लागतांच प्रत्येक गोष्टीचें सत्यदर्शन होणें प्राप्तच होतें. बापूंना खात्री पटली कीं बारभाईच्या कारस्थानाची उभारणी पेशवाईची घडी सरळ बसविण्यासाठीं केली नसून नानाच्या सत्तेची प्रतिष्ठापना करण्यासाठीं ती उभारणी होती. हा वेळपर्यंत आपल्याला मोठेपणा दिला गेला होता तो परिस्थितीच्या पेंचामुळें होता. आतां सर्व स्थिरस्थावर झालें होतें. तेव्हां आपली आतां नानाला गरज नव्हती म्हणून नानानें आपणाला डावलण्याचा उपक्रम सुरू केला. आपण चूक केली! दादावरील आरोप खोटा असेल! नानानें आपल्याला फसवलें! आपण फसून स्वतःची, दादाची व पेशवाईची फसवणूक केली!! अशा प्रकारचें विचारचक्र बापूंच्या डोक्यांत थैमान घालूं लागलें.

## ९ आपल्या चुकीचा परिणाम बापूंनीं पाहिलाः— ★

बारभाईची उभारणी करण्यांत पेशवाईच्या हिताच्या दृष्टीनें विचार केला असतां आपण मोठी चूक केली हें बापूना पटलें. नारायणरावाच्या कारकीर्दीत पेशवाई डबघाईला आली होती. तो मरण पावल्यानंतर परिस्थिती थोडीच निवळली होती! अशा वेळीं दादा बरोबर भांडून पेशवाईंत दुही पाडली. प्रजेला सारखी चिंता; दादा पुनः पुण्याला येईल का? आला तर बारभाईला मदत केल्याबद्दल शिक्षा करील का? प्रत्येकानें पेशवाईचे वाभाडे काढावयास सुरवात केली. भांडणांत दादाला तेरा लक्षाचा मुलूख दिला नाहीं. पण निजामाला १८ लक्षाचा, शिंद्याला १० लक्षाचा, इंग्रजांना ३ लक्षाचा मुलूख मात्र आपण दिला. शिवाय पैसा किती खर्च झाला त्याचा हिशेब नाहीं. साष्टी, वसई सारखी ठाणीं इंग्रजांच्या हवाली झालीं. आणि इंग्रजांचा हात पेशवाईंत शिरकवला गेला! दादाला विरोधी पक्षांत घालून त्यांचे सरदार व बायको-मुलें यांचे हाल हाल करण्यांत आलें. पेशवाईमधील बऱ्याच सरदारांमध्यें तेढ उत्पन्न झाली. दादाच्या

बाजूच्या सरदारांना आपल्या बाजूस वळवून घेण्याच्या नानाच्या शिरस्त्यामुळें सरदारांना मलिदा चारल्याशिवाय काम न करण्याची संवय झाली. पेशवाईंतील लढवय्यांची दानत कमी झाली. एवढें सर्व पाप घडलें असलें तरी हरकत नव्हती. या सर्वांवर कळस म्हणून नानाच्या हातांत अनियंत्रित सत्ता गेली होती ! या सर्व परिणामांना आपण बऱ्याच अंशीं न कळत का होईना, पण कारण झालों याचें बापूला वैषम्य वाटलें.

## १० बापूनें आपल्या पापाचें परिमार्जन करण्याचें ठरविलें:— ★

आपण स्वत: फसलों. दादावर अन्याय केला. आपल्या गैरसमजुतीमुळें बारभाईंत सामील होऊन नानाला सुलतान बनण्याची संधि प्राप्त करून दिली. हें त्यांच्या मनानें घेतलें. बापूचें नैतिक वर्तन चोख असल्यामुळें सदसद्विवेक बुद्धीची त्यांना टोंचणी सुरू झाली. आपण या पापाचें परिमार्जन केलें पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. आणि कांहींही होवो पण नानाच्या हातांतून सत्ता काढून घेतल्याशिवाय पेशवाई जगूं शकत नाहीं; तेव्हां आपलें पहिलें कर्तव्य म्हणजे नानाच्या हातून सत्ता काढून घेणें होय असें वाटून, बापू त्या मार्गाला लागले. या बाबत स. रं. सुंठणकर म्हणतात:–– "आपल्या विरुद्ध नानाचें कारस्थान चाललेलें पाहून बापूच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडला व राघोबाविरुद्ध नानानें उभारलेल्या कारस्थानांत आपण सामील झाल्याबद्दल बापूस मनस्वी पश्चात्ताप झाला. पेशवाईचा अनियंत्रित सुलतान बनण्याचा नानाचा डाव बापूच्या पक्का लक्षांत आला. म्हणून नानास अधिकारच्युत करून दादास त्याच्या पूर्वस्थळीं म्हणजे कारभारीपदावर आणून कृतकर्माचें परिमार्जन करण्याचा बापूनें घाट घातला. राघोबास पदच्युत केल्यामुळें पेशवाईस कसे शत्रु निर्माण झाले व पेशवाईची कसकशी हानी होत गेली याचा चित्रपट बापूच्या डोळ्यांपुढें उभा राहिला. या पेशवाईच्या हानीस आपण बारभाईच्या कारस्थानांत पुढाकार घेतल्यानें कारणीभूत

झालों. म्हणून झालेली चूक निस्तरतां यावी व पुनः पेशवाईची स्थीर व्यवस्था होऊन झालेलें नुकसान भरून निघावें अशा धोरणाची आंखणी करण्याचा विचार बापूनें चालविला." ( स. रं. सुंठणकरकृत " राघो भरारी " पा, १८६ )

★

## ११ मोरोबाचें कारस्थान:—

मोरोबा फडणीस हा नानाचा चुलत भाऊ होता. तो हुषार व कर्तबगार होता. माधवरावाच्या कारकीर्दीत तो कांहीं दिवस कारभारीपदावर होता. बारभाईच्या कारस्थानांत प्रथम तो सामील होता. पण योग्यतेचा असूनहि त्याला कोणतीच हुद्याची जागा देण्यांत आली नव्हती. त्यामुळें तो बारभाईवर रुष्ट होता. सवाईमाधवरावाच्या जन्मानंतर १७७४ च्या जून महिन्यांत बजाबा व बापूजी नाईक यांच्या साहाय्यानें बापू, नाना, गंगाबाई व सवाई माधवराव यांना पकडून राघोबास गादीवर आणण्याचा मोरोबांनीं कट केला होता, पण तो साधला नव्हता. त्यानंतर पुढें त्यानें असा कट वगैरे केला नाहीं. पण तो नाखूष व रुष्ट होता. कारभाऱ्यांना ( बापू व नाना ) पेशव्याच्या कारभारांतून हांकलून दिलें पाहिजे अशा प्रकारचें प्रतिपादन तो उघड रीतीनें करीत असे. पण नाना व बापू यांचे अधिकार घट्ट झाल्यामुळें तो स्वस्थ बसला होता. बापूंच्या मनांतहि नानांना काढून दादांना कारभारांत आणावें असें आल्यामुळें त्यांनीं मोरोबाशीं संधान बांधलें व त्यांची मसलत ठरली ती अशी:—

१ सवाई माधवराव याजकडे पेशवेपद राहावें, वडिलकीचा मान राघोबास द्यावा.

२ सखारामबापू मुख्य कारभारी असावेत.

३ दुय्यम कारभाऱ्याचें काम मोरोबांनीं पाहावें.

४ नानास काढून लावावें.

**१२ खोल विचाराअंतीं ही मसलत केली होती:--** ★

दादांना वडिलकीचा मान दिल्यानें नारायणरावाचा खून केल्याचा दादावरील आरोप धुतला जाऊन शिवाय त्याच्या बाजूच्या मंडळीचें या मसलतींत साहाय्य होणार होतें. बापू कारभारीपदावर असल्यामुळें बापू बद्दल आदर व प्रेम असलेल्या प्रजेला आनंद वाटणार होता. सवाई माधवराव पेशवेपदावर असल्यानें इतर मंडळींनाहि समाधान वाटणार होतें. नानाला कारभारांतून हांकलून टाकल्यानें पेशवाईस लागलेली ही कीड नाहींशी होणार होती. फक्त नुकसान काय तें नानाचें होणार होतें व नानाकंपूतील लोक नाराज होणार होते. या सर्व बाजूंनीं विचार करूनच ही मसलत आंखली गेली.

**१३ मोरोबाचें कारस्थान राष्ट्रहिताचें होतें:--** ★

बारभाई व दादा यांच्या भांडणांत पेशव्यांचें सैन्य दुभागलें होतें. शत्रूंना फावलें होतें. इंग्रज आपला शिरकाव करूं पाहात होते. दादांनाच गादीवर कारभारी म्हणून आणल्यानें हा सर्व तंटा मिटणार होता. दादाला वगळून पेशव्यावर चढाई करण्याची इंग्रजांची कुवत नव्हती. दादा कारभारांत आल्यानें इंग्रजांना मूग गिळून स्वस्थ बसावें लागणार होतें. नानाची फूस असल्यानें शिंदे मगरूर झाले होते. कोणतेंहि काम बक्षिसी आधीं घेतल्याशिवाय ते करीत नसत. पेशव्यांनाच हात दाखविण्यापर्यंत शिंदे आले होते. बापू व दादा कारभारावर आल्यानंतर कमीजास्त हालचाल केल्यास आपण गादीलाच मुकूं या धाकाखालीं शिंदे सुतासारखा सरळ वागला असता. या गोष्टी साधल्या असत्या तर उत्तर पेशवाईचा इतिहास निराळा झाला असता ! या उलट नाना अधिकारावरून गेला असता तर काय नुकसान होणार होतें ?

**१४ कारस्थानाची सिद्धता:--** ★

मोरोबाची ही मसलत पार पाडावयास सैन्याची गरज होती. मोरोबानें कांहीं पठाण व गारदी नोकरीस ठेवले. होळकरांना पांच

सं. क्र. ............

लक्ष रुपये देणेचें करून त्यांची मदत मिळण्याचें वचन घेतलें. इंग्रजांची मदत व्हावी म्हणून इंग्रजांचा वकील मॉस्टीन यासहि सामील करून घेतलें व नंतर दादाशींहि वाटाघाट सुरू झाली. दादानें वडिलकी करावी व कारभाऱ्यांनीं कारभार करावा असें ठरलें. दादाला तरी इंग्रज कुठें हवे होते? इंग्रजांच्या हाताखालीं राज्य भोगण्यापेक्षां आपल्या कारभाऱ्यांच्या हाताखालीं दिवस काढणें अधिक बरें असें दादाला वाटलें, म्हणून त्यांनीं या कारस्थानास आपली संमति दिली.

### १५ नानाबद्दल दादाला पूर्ण अविश्वास होता:— ★

दादाशीं बारभाईनीं समेटाची भाषा सुरू केली त्यावेळीं बारभाईच्या हातांत सांपडावयाचें नाहीं म्हणून त्यांनीं त्या अटी नाकारल्या होत्या. आतां मोरोबाच्या हाताखालीं दादा यावयास कसे तयार झाले हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. बारभाईमध्यें नाना प्रमुख होता. बारभाईच्या हातांत आपण जावयाचें म्हणजे नानाच्या मगरमिठींत सांपडावयाचें होतें. त्यामुळें नानाचा दादाशीं असलेला द्वेषभाव व नानाची सूडबुद्धी या गोष्टी विचारांत घेतां आपल्याला नाना मारणार अगर डोंगरी किल्ल्यांत डांबून हाल करणार याची पूर्ण कल्पना दादाला होती. म्हणून दादानें त्या वेळीं बारभाईच्या हातीं लागण्याचें नाकारलें. मोरोबा अगर बापू यांच्या स्वभावाची दादांना पूर्ण कल्पना असलेमुळें त्यांच्या हातीं जाण्यांत कांहीं दगा नाहीं अशी दादाला खात्री होती म्हणून त्यांनीं या वेळीं या अटी मान्य केल्या.

### १६ मोरोबाचें इंग्रजांना आमंत्रण:— ★

कारस्थान येथपर्यंत साधल्यानंतर मोरोबानें इंग्रजांना कळवलें कीं सखारामबापू, होळकर व पुरंदरे यांच्यासारखी बडीबडी मंडळी दादांना अनुकूल आहेत; इंग्रजांनीं दादांना फौजेसह पुण्यास आणावें. इंग्रजांनाहि पुणें दरबारांत हस्तक्षेप करण्याची संधी हवीच होती. त्यांनीं मोरोबाच्या म्हणण्यास कबूली दिली. याबाबत त्यांच्या कौन्सिल-

मध्यें ठराव झाला तो असा: " सखारामबापूसारखा पहिल्या दर्जाचा अधिकारी व दिवाण कर्नल अॅप्टननें ज्याच्याशीं तह केला व ज्याची तहावर पहिली सही आहे असा वडा मनुष्य आपणांस सैन्याची मदत मागेल तर ती जरूर देण्यांत येईल. त्यामुळें मराठ्यांशी मागें झालेल्या तहास यत्किंचितहि बाध येऊं शकत नाहीं. " इंग्रज या आमंत्रणाप्रमाणें दादास घेऊन साष्टीस येऊन राहिले व मोरोबाची सूचना जातांच त्यांनीं सैन्यासह पुण्यास यावें असा मोरोबाचा व इंग्रजांचा बेत ठरला होता.

**१७ नानाचे मदतनीस या वेळीं फार दूर होते:—** ★

या वेळीं कर्नाटकांत मोहिम सुरू असल्यानें हरिपंत आदि करून बरीच मंडळी त्यांत आपापल्या सैन्यासह गुंतली होती. हरिपंतांनीं अधिक सैन्याची मागणी केली होती. त्याप्रमाणें बाजीपंत व अप्पा बळवंत यांचे बरोबर पुनः सैन्य पाठवलें. ही संधि साधून मोरोबाचा आपलें कार्य उरकून घेण्याचा बेत होता. या सुमारास नाना मेणवलीस गेला होता. तो परत आल्यानंतर त्याला याचा वास लागला. त्यानें मोरोबाची गांठ घेऊन त्याची समजूत काढण्याची खटपट केली. पण मोरोबानें तेवढ्याचा फायदा घेऊन नानावर रागावल्याचा आव आणून बारामतीस प्रयाण केलें. होळकर वाफगांवास येऊन राहिले. नानानें बापूची गांठ घेऊन त्यांच्याकडून माहिती काढण्याचा प्रयत्न केला. पण बापूनें सुगावा लागूं दिला नाहीं. पुढें एके दिवशीं मोरोबाचे शिद्दीफराद व ८०० पठाण नोकरीच्या निमित्तानें पुण्यांत आले. त्यांच्यामध्यें व नानाच्या शिपायामध्यें तंटा झाला. त्याची चौकशी करतां हे लोक मोरोबाचे आहेत हें बाहेर पडलें. यामुळें नानांना सर्व उमजलें. त्यांनीं आपली बाजू बळकट करण्याची तजवीज केली. निजामाकडून त्यांनीं फौज मागविली. शिंद्यांना करवीरकराशीं तह करून येणेस कळवलें. हरिपंत व परशरामभाऊ यांना हैदरची मोहिम टाकून शिंद्याच्या मदतीस मिरजेस बोलावलें. नानाचे

साथीदार लांब असेपर्यंतच हें काम सोप्या रीतीनें उरकण्यासारखें होतें.

## १८ मोरोबानें पुणें हस्तगत केलें:— ★

कारस्थानाची बातमी कळतांच नानाच्या हालचाली काय होणार याची कल्पना बापूला होती. त्यानें मोरोबाला कळवलें " मंत्र फुटला त्वरा करा. " हा इषारा मिळतांच मोरोबा, होळकर व त्याचे साथीदार यांनीं पुण्यावर १६-१७ हजार फौजेनिशीं चाल केली व शहर आणि जरिपटका शिक्के कटचार वगैरे हस्तगत केले. नानास कांहीं सुचेनासें झालें म्हणून ते पळून पुरंदरास गेले. तेथेंहि गडकऱ्यांनीं त्यांना गडावर घेतलें नाहीं. अशा केविलवाण्या परिस्थितींत नाना बापूंना शरण गेले व आपल्याला वांचवा म्हणून गयावया करूं लागले. बापूच्या मनांत सूडबुद्धि मुळींच नसल्यानें नानाची ही अगतिक स्थिति पाहून त्यांना कळवळा आला. त्यांनीं मोरोबाशीं समेट करण्याचा नानाला सल्ला दिला. नानानें तसें घडवून आणावें म्हणून बापूस विनविलें व बापूनें तें मान्य केलें.

## १९ नाना व मोरोबाचा बापूंनीं तह घडवून आणला:— ★

मोरोबानें आपल्या मताप्रमाणें कारभार सुरूं केला. बापू मुख्य कारभारी झाले. मोरोबाच्या कारस्थानांतील दादाला आणण्याच्या बाबीखेरीज बाकी सर्व झालें होतें. " जंगी सरंजाम घेऊन येतों. निजाम उलट आला तरी त्याचाहि मोड करतां येईल इतकें सैन्य घेऊन येतों. " बापूंना दादा हवे होते. पण इंग्रजांचा शिरकाव मराठी राज्यांत नको होता. ( प. कॅ. ५-१७५ ) म्हणून बापूनें मोरोबा व नाना यांचा समेट घडवून आणला व ही अनिष्ट गोष्ट शिताफीनें टाळली. समेटाच्या अटी खालीलप्रमाणें होत्या:—१ बापू मुख्य कारभारी. २ मोरोबा दुय्यम कारभारी. ३ मोरोबानें नानाच्या सल्ल्याशिवाय कांहीं करावयाचें नाहीं. ४ पुरंदरचा बंदोबस्त व पेशव्यांचें संरक्षण नानाकडे. ५ राघो-

मध्यें ठराव झाला तो असाः " सखारामबापूसारखा पहिल्या दर्जाचा अधिकारी व दिवाण कर्नल अॅप्टननें ज्याच्याशीं तह केला व ज्याची तहावर पहिली सही आहे असा वडा मनुष्य आपणांस सैन्याची मदत मागेल तर ती जरूर देण्यांत येईल. त्यामुळें मराठयांशी मागें झालेल्या तहास यत्किंचितहि बाध येऊं शकत नाहीं. " इंग्रज या आमंत्रणाप्रमाणें दादास घेऊन साष्टीस येऊन राहिले व मोरोबाची सूचना जातांच त्यांनीं सैन्यासह पुण्यास यावें असा मोरोबाचा व इंग्रजांचा बेत ठरला होता.

### १७ नानाचे मदतनीस या वेळीं फार दूर होतेः— ★

या वेळीं कर्नाटकांत मोहिम सुरू असल्यानें हरिपंत आदि करून बरीच मंडळी त्यांत आपापल्या सैन्यासह गुंतली होती. हरिपंतांनीं अधिक सैन्याची मागणी केली होती. त्याप्रमाणें बाजीपंत व अप्पा बळवंत यांचे बरोबर पुनः सैन्य पाठवलें. ही संधि साधून मोरोबाचा आपलें कार्य उरकून घेण्याचा बेत होता. या सुमारास नाना मेणवलीस गेला होता. तो परत आल्यानंतर त्याला याचा वास लागला. त्यानें मोरोबाची गांठ घेऊन त्याची समजूत काढण्याची खटपट केली. पण मोरोबानें तेवढयाचा फायदा घेऊन नानावर रागावल्याचा आव आणून बारामतीस प्रयाण केलें. होळकर वाफगांवास येऊन राहिले. नानानें बापूची गांठ घेऊन त्यांच्याकडून माहिती काढण्याचा प्रयत्न केला. पण बापूनें सुगावा लागूं दिला नाहीं. पुढें एके दिवशीं मोरोबाचे शिद्दीफराद व ८०० पठाण नोकरीच्या निमित्तानें पुण्यांत आले. त्यांच्यामध्यें व नानाच्या शिपायामध्यें तंटा झाला. त्याची चौकशी करतां हे लोक मोरोबाचे आहेत हें बाहेर पडलें. यामुळें नानांना सर्व उमजलें. त्यांनीं आपली बाजू बळकट करण्याची तजवीज केली. निजामाकडून त्यांनीं फौज मागविली. शिंद्यांना करवीरकराशीं तह करून येणेस कळवलें. हरिपंत व परशरामभाऊ यांना हैदरची मोहिम टाकून शिंद्याच्या मदतीस मिरजेस बोलावलें. नानाचे

साथीदार लांब असेपर्यंतच हें काम सोप्या रीतीनें उरकण्या-सारखें होतें.

## १८ मोरोबानें पुणें हस्तगत केलें:— ★

कारस्थानाची बातमी कळतांच नानाच्या हालचाली काय होणार याची कल्पना बापूला होती. त्यानें मोरोबाला कळवलें " मंत्र फुटला त्वरा करा. " हा इषारा मिळतांच मोरोबा, होळकर व त्याचे साथीदार यांनीं पुण्यावर १६-१७ हजार फौजेनिशीं चाल केली व शहर आणि जरिपटका शिक्के कटचार वगैरे हस्तगत केले. नानास कांहीं सुचेनासें झालें म्हणून ते पळून पुरंदरास गेले. तेथेंहि गडक-ऱ्यांनीं त्यांना गडावर घेतलें नाहीं. अशा केविलवाण्या परिस्थितींत नाना बापूंना शरण गेले व आपल्याला वांचवा म्हणून गयावया करूं लागले. बापूच्या मनांत सूडबुद्धि मुळींच नसल्यानें नानाची ही अगतिक स्थिति पाहून त्यांना कळवळा आला. त्यांनीं मोरोबाशीं समेट कर-ण्याचा नानाला सल्ला दिला. नानानें तसें घडवून आणावें म्हणून बापूस विनविलें व बापूनें तें मान्य केलें.

## १९ नाना व मोरोबाचा बापूंनीं तह घडवून आणला:— ★

मोरोबानें आपल्या मताप्रमाणें कारभार सुरूं केला. बापू मुख्य कारभारी झाले. मोरोबाच्या कारस्थानांतील दादाला आणण्याच्या बाबी-खेरीज बाकी सर्व झालें होतें. " जंगी सरंजाम घेऊन येतों. निजाम उलट आला तरी त्याचाहि मोड करतां येईल इतकें सैन्य घेऊन येतों. " बापूंना दादा हवे होते. पण इंग्रजांचा शिरकाव मराठी राज्यांत नको होता. ( प. कॅ. ५-१७५ ) म्हणून बापूनें मोरोबा व नाना यांचा समेट घडवून आणला व ही अनिष्ट गोष्ट शिताफीनें टाळली. समेटाच्या अटी खालीलप्रमाणें होत्या:—१ बापू मुख्य कारभारी. २ मोरोबा दुय्यम कारभारी. ३ मोरोबानें नानाच्या सल्ल्याशिवाय कांहीं करावयाचें नाहीं. ४ पुरंदरचा बंदोबस्त व पेशव्यांचें संरक्षण नानाकडे. ५ राघो-

वास तूर्त आणावयाचें नाहीं. असें ठरून त्याप्रमाणें कारभार सुरूं झाला.

२० दादा शिक्षा करतील या भीतीनें बापूंनीं समेट केला नाहीं:—

हा समेट घडवून आणल्याबद्दल श्री. य. गो. कानेटकर म्हणतात:–"दादा पुण्यास येणें ही गोष्ट बापूस पसंत नव्हती. कारण दादा व इंग्रज पुण्यास आले तर ते आपणांस कोणत्या ना कोणत्या कारणावरून शिक्षा करतील हें बापू जाणून होते. कारण दादांच्या दृष्टीनें बापू पहिल्या प्रतीचे हरामखोर." (सं. बा. चरित्र पा. १८७) हें विधान साफ चुकीचें आहे. कारण या पूर्वीं दादाशीं समेट करावा असें बापूचें मत होतें हें सिद्ध आहे. त्या वेळीं दादा पुण्यास येणार या गोष्टीचें भय बापूस वाटलें नव्हतें. शिवाय दादा उदार मनाचा व वीरवृत्तीचा होता. त्याच्या स्वभावाची बापूंना खात्री होती. नानाचा स्वभावधर्महि बापू ओळखून होते. नानापेक्षां दादाकडून बापूंना भय कमी होते खास. वरील समेट बापूंनीं दादाच्या भयामुळें केला नाहीं. त्या परिस्थितींत तसें करणें योग्य आहे असें पटल्यानें त्यानीं तसें केलें. या समेटामुळें मोरोबाहि संतुष्ट झाला, नानाहि खूष राहिला आणि इंग्रजांचा पुणें दरबारांत होणारा हस्तक्षेप टळला. सतत बापूंना शिव्या देणाऱ्या पटवर्धनांनीं सुद्धां "राजश्री बापूचे कारस्थानास जोड नाहीं" असे प्रशंसोद्गार काढले आहेत.

२१ समेट झाला तरी नानाची कारवाई सुरूंच होती:— ★

मोरोबा व नाना यांचा समेट झाला असला तरी "राजकारण ठरल्याप्रमाणें लांबणीवर टाकूं नये" असा इंग्रजांचा तगादा मोरोबास सुरूं होता. मोरोबा समेट झाला असल्यानें इंग्रजांना दाद देत नव्हता. आहे त्या स्थितीवर मोरोबा संतुष्ट होता. नानाला देखील तक्रार करण्याचें कांहीं कारण नव्हतें. मोरोबानें प्रत्येक गोष्ट नानाच्या सल्ल्यानेंच करावयाची असल्यानें नानाचें महत्व कायम होतें.

पण नानाच्या चोरट्या व्यवहारांना मोरोबाची अडचण होणार होती. नानाला एकटा बापू देखील कारभारांत नको होता तर बापू व मोरोबा दोघे कसे नानाला चालणार ? त्यांनीं आपली तयारी सुरूच ठेवली. शिंदे, हरिपंत व पटवर्धन यांना जलदीनें निमंत्रणें गेलीं. त्यांच्या फौजा येत आहेत असें कळतांच मोरोबानें दादाला घेऊन येण्याबद्दल इंग्रजांना पाचारण केलें. इंग्रजांनीं बापूच्या सहीचा कागद मागितला. बापूंना इंग्रजासह दादानें सुद्धां पुण्यांत येऊं नये असें वाटत होतें, मग ते इंग्रजांना आपण होऊन लेखी आमंत्रण देणें कसें शक्य होतें ? त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं आपण लिहून बिवून कांहीं देणार नाहीं. ''

२२ **बापूंनीं नानाशीं सख्य जोडिलें:—** ★

हरिपंत व शिंदे पुण्याजवळ येतांच बापूंनीं नाना व शिंदे यांच्याशीं सख्य जोडिलें. याबाबत बापूंनीं मोरोबाला व इंग्रजांना दगा दिला असा त्यांच्यावर आरोप केला जातो. बापूंच्या या वर्तनाबद्दल श्री. कानेटकर म्हणतात " हा खेळ खेळून बापूनें कांहीं राष्ट्रकार्य केलें असें तर नाहींच, परंतु आजपर्यंतच्या त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी-वर सर्वस्वी बोळा फिरविण्याचें कार्य मोरोबास हातांशीं धरून त्यांनीं केलें असें म्हणावें लागतें. '' ( स. बा. चरित्र पान १९५ ) त्यांनीं असेंहि विधान केलें आहे कीं–" अशा प्रकारें परिस्थितीस कलाटणी देण्याच्या कामांत मात्र दुटप्पीपणा, विश्वासघात, स्वार्थपरायणता याचें माप त्यांच्या पदरांत पडलें "– बापूनें नानाशीं सख्य जोडिलें याबाबतचा वरील आरोपांचा पूर्ण विचार आम्ही पुढें करणारच आहों.

२३ **कानेटकर व इतर इतिहासकारांनीं बापूवर असे आरोप कां केले?:–**

बारभाईमधील बापूंच्या कामगिरीबद्दल सर्व इतिहासकार बापूला शिफारसपत्र देतात. कारण नानाबरोबर सहकार्यानें बापू त्या वेळीं वागत होता. माधवरावाच्या कारकीर्दींतहि बापूवर टीका झाली त्याचेंहि

मुख्य कारण त्या वेळीं बापूचा नानाशीं विरोध होता. मोरोबाच्या कारस्थानांतहि बापूनें नानाविरुद्ध बंडास मदत केली तेव्हां टीका झाली. याचाच अर्थ असा कीं नानाविरुद्ध बापूचें झालेलें वर्तन राष्ट्रघातकीपणाचें अगर स्वार्थी होतें असें मानण्याचें कारण असें आहे कीं आज पावेतों सर्व इतिहासकारांनीं नाना हे सर्व गुणांचें माहेरघर होते; पेशवाई टिकवण्याची त्यांनीं शिकस्त केली; त्यांच्या निधनानंतर पेशवाईंत कर्तबगार माणूस राहिला नाहीं म्हणून पेशवाई बुडाली वगैरे गोष्टी गृहीत धरून त्यांच्याशीं विसंगत वर्तन कोणीहि केलें असेल तर तें देशद्रोहीपणाचें, विश्वासघाताचें व नीचपणाचें होतें असें म्हणण्याची परंपरा त्यांनीं पतकरली आहे. हें मूल्यमापन सर्वस्वी चुकीचें आहे.

## २४ नानाची महाराष्ट्रांत स्तुति कां झाली ? :— ★

इंग्रजाविरुद्ध हिंदुस्थानांत राष्ट्रीय चळवळ सुरूं झाली त्यावेळीं ऐतिहासिक थोर पुरुषांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करण्याचा प्रघात पडला. त्याचप्रमाणें लोकांच्या मनांत स्वदेशाबद्दल अभिमान उत्पन्न करावा व आपल्या पूर्वजांबद्दल आदर उत्पन्न व्हावा या दृष्टीनें आमच्या ऐतिहासिक व्यक्तिपैकी ज्यांनीं इंग्रजांना नमदलें त्यांचें उदाहरण प्रामुख्यानें दाखवण्याची प्रथा पडली. मराठ्यांच्या इतिहासांत इंग्रजांशीं नानाचाच अधिक संबंध आला व नाना असेतोंपर्यंत त्यानें इंग्रजांशीं टक्कर दिली व त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच काळांत पेशवाई बुडाली. या सर्व कारणांमुळें नानाबद्दल तत्कालीन लोकांचें मत अनुकूल झालें. त्याची थोरवी एकानें गायली म्हणून दुसरा गाऊं लागला आणि अनेक लोकांनीं नानाची थोरवी गायिली म्हणून कांहीं थोड्या लोकांची नानावर—यांना पटलें असूनहि—टीका करण्याची छाती झाली नाहीं. म्हणून नाना अनायासें थोर व्यक्तीच्या मालिकेंत जाऊन बसला. नाना थोर नव्हता असें आम्हीहि म्हणत नाहीं. त्याची थोरवी त्याच्या स्वार्थी व महत्वाकांक्षी वर्तणुकींत नाश पावली. त्याच्या धोरणामुळें

पेशवाईंत यादवी माजली, फितूर झाला व पेशवाईचा डोलारा त्याच्या हयातींत कसाबसा जीव धरून राहिला होता तरी तो पूर्णपणें पोखरला गेला होता व कोणत्याही अल्पशा कारणामुळेंहि तो ढासळण्याच्या स्थितीस पोंचला होता, हें सत्य दृष्टीआड करतां येणार नाहीं.

**२५ मोरोबाच्या कारस्थानांत बापू सामील झाले तें योग्यच होतें:—**

आम्हीं मागें सांगितल्याप्रमाणें नानाच्या मनांत पेशवाईचा सुलतान व्हावयाचें आहे ही गोष्ट बापूला समजल्यानंतर नानाला अधिकारावरून ओढण्याच्या प्रयत्नास बापू लागले तर त्यांत कोणता राष्ट्रघात झाला ? बापूच्या एकंदर कारकीर्दींत प्रजेच्या संरक्षणाच्या दृष्टीनें, पेशवाईच्या हिताच्या दृष्टीनें किंवा बारभाईच्या स्थैर्याच्या दृष्टीनें बापूनें कोणतेंहि घातक वर्तन केल्याचें कोणाचेंहि–नानाचेंहि–म्हणणें नाहीं. बारभाईची स्थापना ज्या नियमावर झाली होती ते नियम त्यांतील सर्वांना--नानासकट–लागू होते. सर्वांच्या मतानें बापूकडे मुख्य अधिकार असतां तो डावलून गंगाबाईच्या सहीनें बापूच्या संमतिशिवाय कारभारांत घालमेल करण्याचा नानाला कोणी अधिकार दिला होता ? बापूच्या हातची सत्ता अशा रीतीनें आपल्या हातांत घेण्याचें नानाला काय कारण होतें ? हें कृत्य कोणत्या राष्ट्रहिताचें होतें ? गंगाबाईच्या नांवावर बारभाईचें कारस्थान उभारून दादावर वैयक्तिक सूड नाना उगवीत होते. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें दादाबरोबर समेट करणें इष्ट असतांना व पेशवाईंतील सर्व मुख्य लोकांना समेट व्हावा असें वाटत असतांना नाना व त्यांच्या साथीदारांनीं वैयक्तिक सूडामुळें तो घडूं दिला नाहीं व दादाशीं तंटा चालू ठेऊन पेशवाईवर अनेक संकटें ओढवून घेतली, व पेशवाईचा बराच मुलूख मदतनीसांना मलिदा म्हणून गमवावा लागला. अशा परिस्थितीत पेशवाईची सर्व सत्ता बळकावून सुलतान होण्याची नानाची मनीषा आहे हें स्पष्ट दिसल्यानंतर नानाला अधिकारा-

वरून ओढून काढण्याच्या कामीं बापूंनीं मोरोबाला मदत केली नसती तर त्यांना राष्ट्रहिताची चाड नव्हती असें म्हणण्याचा प्रसंग आला असता.

### २६ कानेटकरांचे आरोप निराधारः— ★

श्री. कानेटकर यांनीं सखारामबापू चरित्र पान १७९ वर मोरोबाच्या मसलतींत सामील झाल्याबद्दल "दुटप्पीपणा, विश्वासघात, स्वार्थपरायणता याचे माप बापूंच्या पदरांत पडलें" असा आरोप केला आहे. वरील आरोपांचा क्रमशः विचार करणें प्राप्त आहे.

१ दुटप्पीपणाः—पहिल्यांदा बापू नानाच्या बाजूस होते व नाना विरुद्ध मोरोबाला त्यांनीं मदत केली म्हणून दुटप्पीपणाचा आरोप केला जातो. पण यांत बापूंना काय साधावयाचें होतें? त्यांचें स्थान होतें तेंच राहाणार होतें. नाना देखील बापूंना कारभारांतून काढून टाकूं इच्छित नव्हते. राज्यकारभार आहे तसाच राहाणार होता. फक्त नाना तेवढा कारभारांतून जाणार होता आणि नानाच्या सुलतानी महत्त्वाकांक्षेकडे व त्यामुळें पेशवाईवर येणाऱ्या अनिष्टाकडे पाहातां नानाला काढणें जरूरीचें होतें व त्या कामांत बापूंनीं मदत केली तर त्यांत दुटप्पीपणाचा आरोप त्याच्यावर कसा येऊं शकतो?

२ विश्वासघातः—बापूनें कोणाचा विश्वासघात केला? नानाचा! दादावर खोटा आरोप करून बापूची दिशाभूल करून त्याला पेंचांत पकडून बारभाईमध्यें सामील होण्यास भाग पाडण्यांत नानानें बापूचा विश्वासघात केला नव्हता काय? गंगाबाई व सवाई माधवराव यांच्या नांवाखालीं बारभाईचें कारस्थान उभारून आपण सुलतान होण्याची मनीषा बाळगण्यांत नानानें सर्वांचा विश्वासघात केला नव्हता काय? स्वतःचे हात अन्यायानें बरबटले असतां दुसऱ्याकडून न्यायाची अपेक्षा करण्याचा नानाला काय हक्क होता? बापू बारभाईचें उच्चाटण करणार नव्हते. सवाई माधवरावांना काढून टाकून दादांना गादीवर

बसवणार नव्हते. नानाला मात्र कारभारांतून काढून टाकणार होते. यांत विश्वासघात काय होता? तसें करणें परिस्थित्यनुरूप प्राप्तच होतें.

३ स्वार्थपरायणता:— बापूंचा यांत स्वार्थ कांहींच नव्हता. बापूंचा दर्जा आहे तोच राहणार होता. नानाच्या ऐवजीं मोरोबा येणार होता. मोरोबाला हातांशीं धरण्यांत बापूंचा स्वार्थच असेल तर तो एवढाच होता कीं नानाला आहे यापेक्षां अधिक अधिकार संपादन करण्याचा मोका जाणार होता. नानाची सुलतान होण्याची मनीषा जिरणार होती. असें होण्यांत पेशवाईचें काय नुकसान होणार होतें? कोणाहि इतिहासकारांनीं करामतीच्या दृष्टीनें नाना बापूपेक्षां श्रेष्ठ होता असें म्हटलेलें नाहीं. या उलट नानाला मात्र बापूशिवाय अडचणींतून पार पडतां येण्यासारखें नव्हतें. अशा स्थितींत नाना कामावरून कमी झाला तर त्यांत आकांडतांडव करण्यासारखें काय होतें?

२७ नाना बऱ्याच लोकांना कारभारांत नको होता:— ★

मोरोबाला नाना कारभारांत असूं नये असें वाटलें. मोरोबा माधवरावाच्या वेळीं कारभारीपदावर होता यावरून तो मामुली माणूस नव्हता हें दिसून येतें. त्याला नाना कारभारांत नकोसा वाटत होता. सखारामबापूच्या योग्यतेबद्दल वादच नव्हता. अशा माणसाला नाना कारभारांत नकोसा वाटत होता. माधवरावांनीं मरण समयीं नानाकडे कारभार दिला नाहीं यावरून नाना कारभारांत असावा असें त्यांनाहि वाटत नसावें असें वाटतें. बापूला नानानें कैदेंत टाकल्यानंतर हरिपंत फडक्यांनीं बापूला म्हटलें "शिंद्यांनीं निवळ दगाबाजीनें तुम्हांस कैद केलें तरी सुटण्याचा प्रयत्न करून पुनः राज्य कारभार करण्यास तयार असल्यास सर्वजण येऊन मिळतील." याचा अर्थ हरिपंतालाहि आतां नाना राज्यकारभारांत नकोसा झाला होता. महादाजी शिंद्यालाहि पुढें नाना कारभारांत नकोसा झाला

होता हें जगजाहीर आहे. नानांचे पित्ते परशरामभाऊ पटवर्धन पण त्यांनाहि पुढें नाना कारभारांत असूं नये असें वाटलें व त्यांनीं नानाविरुद्ध बंड करून कारभार आपल्या हातांत घेण्याचा प्रयत्न केला. यावरून असें सिद्ध होतें कीं पेशवाईतील बऱ्याच थोर मुत्सद्यांना नाना कारभारांत असूं नये असें वाटलें. या सर्वांचा एकच उघड अर्थ आहे कीं नानाचा कारभार पेशवाईच्या हिताचा नव्हता. तो सुलतानी महत्वाकांक्षेचा होता. ज्यांच्या जेव्हां हें लक्षांत आलें तेव्हां त्यांनीं नानाची उचलबांगडी करण्याची खटपट केली. बापू व मोरोबा हे फार हुषार मुत्सद्दी असल्यानें इतरांना जें कांहीं वर्षांनंतर कळलें वा पटलें तें त्यांना सर्वांआधीं पटलें. म्हणून त्यांनीं नानाविरुद्ध कारस्थान केलें. इतरांनीं नाना सुलतान झाल्यानंतर प्रयत्न केले. पण तो तसा सुलतान होणार हें जाणून आधींच त्याला खालीं ओढण्याचा योग्य वेळीं प्रयत्न केल्याबद्दल बापू व मोरोबा हे स्तुतीस पात्र ठरतात.

२८ बापूंची पेशवाईची कळकळः— ★

बापूंनीं शिंद्याशीं व नानाशीं सख्य जोडलें तें इंग्रजांना पेशवाईंत येऊं द्यावयाचें नाहीं, त्यापायीं आपली आहुति द्यावी लागली तरी चालेल अशा भूमिकेमुळें. त्यांनीं शिंद्यांना शरणागति घातली व " चूक आपणाकडे पण राखावें " म्हटलें. या ठिकाणीं बापूंना आत्मसंरक्षणासाठीं शिंद्याला शरण जाण्याची जरूरी नव्हती. इंग्रजांना बोलावून स्वतःचें संरक्षण बापूंना सहज करतां येत होतें. पण स्वतःकडे दोष घेऊन मानहानी पतकरून बापू शिंद्याला शरण जातो, पण इंग्रजांना बोलावण्यास तयार होत नाहीं यांत बापूची पेशवाईबद्दलची कळकळच दिसून येते. या कृतींत दुटप्पीपणा अगर स्वार्थपरायणता इत्यादींचा वास देखील दिसून येत नाहीं.

### २९ मोरोबाची कैदः— ★

या नंतर मोरोबाची सर्व बाजूंनीं नाकेबंदी झाल्यामुळें तो नानाच्या हातीं लागला. नानांनीं त्याला नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें. मोरोबाला तो मरेपर्यंत कैदेंत डांबून ठेवण्याची नानानें दक्षता घेतली. मोरोबाचा कैदेंतच हाल अपेष्टांत अंत झाला. या कारस्थानांत सामील असलेल्या सर्वांकडून नानानें भरपूर भूदंड वसूल केला. त्यांचा बचाव करण्याची बापूनें खूप खटपट केली. पण नानानें दाद दिली नाहीं. क्षमा ही गोष्ट नानाला माहीतच नव्हती.

### ३० इंग्रजांशीं पुनः बेबनावः— ★

मोरोबाच्या कैदेनंतर इंग्रजांना बारभाईशीं लढा देणें प्राप्त झालें. बापूमार्फत इंग्रजांचा पेशवाईंत शिरकाव झाला नाहीं याबद्दल इंग्रजांना फार विषाद वाटला. आणि बारभाईंना हात दाखवून त्यांची रग जिरविण्याचा इंग्रजांनीं विचार केला. पुणें दरबारांत फ्रेंच वकील होता. त्याच्याशीं बारभाईची मसलत चालू होती. तेव्हां सुरतेच्या बंदोबस्तासाठीं म्हणून इंग्रजांनीं कर्नल लेस्लीच्या हाताखाली सैन्य देऊन काल्पीमार्गें खुष्कीनें तें जाण्यासाठीं रवाना केलें. सैन्य खुष्कीनें सुरतेस जावयाचें म्हणजे पेशव्यांच्या मुलुखांतून जाणें प्राप्त होतें. म्हणून तसें जाण्याचा परवाना पेशव्यांच्याकडे मागितला. इंग्रजांच्या सैन्यानें आपल्या मुलुखाची पाहणी करीत जावें हें बापूंना पसंत नव्हतें. म्हणून बापूनें परवाना देण्यास टाळाटाळ सुरू केली. पुरंदरच्या तहांत तशी अट नाहीं असें बापूनें हेस्टिंग्सला कळवळें. आंतून बुंदेलखंडांतून सैन्य जात असतां त्याचा मार्ग अडवण्याचे हुकूम आपल्या लोकांना देऊन ठेविले. त्याप्रमाणें बाळाजी गोविंद खेर यांनीं काल्पीच्या किल्ल्याजवळ कर्नल लेस्लीला आडविलें. या ठिकाणीं जंगी लढाई होऊन तोफांच्या सहाय्यानें लेस्लीनें किल्ला हस्तगत केला पण या लढयांत लेस्लीचीहि चांगलीच रग जिरली. याबद्दल हेस्टिंग्सनें बापूकडे तक्रार केली. त्याला बापूनें उत्तर दिलें “काल्पीच्या

किल्लेदारानें जी गोष्ट केली ती बरोबरच आहे. कोणत्या हेतूनें इंग्रज सैन्य पुढें चाललें आहे हें समजून घेणें किल्लेदाराचें कर्तव्यच होतें. तें केल्याशिवाय सैन्य पुढें जाऊं देणें म्हणजे त्या अधिकाऱ्यानें आपलें काम बरोबर बजावलें नाहीं असा अर्थ होतो. परंतु यावरून सलूख मोडण्याचा आमचा प्रयत्न आहे असें आपण समजूं नये."

### ३१ इंग्रजांना बापूनें त्यांच्याच कृतीनें उत्तर दिलें:— ★

या वेळीं इंग्रजांचें सैन्य खरोखरीच मुंबईकरांना मदत करण्यासाठीं येत होतें. पण दाखवीत होतें निराळें कारण. कोणतीहि गोष्ट आपल्या मनाप्रमाणें करावयाची आणि बाहेर सरळपणा दाखवावयाचा ही इंग्रजांचीच पद्धत बापूंनीं उपयोगांत आणल्यामुळें चोराची खूण चोराला पटावी त्याप्रमाणें झालें, व काल्पीच्या मार्गानें जाणें आपणांला अशक्य आहे हें पाहून इंग्रजी सैन्य नागपूर मार्गानें जाऊं लागलें.

### ३२ भोसल्यांना अनुकूल करून घेण्याचा इंग्रजांचा प्रयत्न:— ★

मुधोजी भोसल्याला सातारच्या गादीवर बसवतों असा बूट काढून हेस्टिंग्सनें त्याच्याशीं संधान सुरू केलें. हें बापूस समजतांच त्यानें लक्ष्मण–रावजीस लिहिलें "हल्ली इंग्रज नागपुरास येणार. तुम्हांस कदाचित म्हणतील कीं तुमचा आमचा स्नेह. आम्हांस मुंबईस जाणें. तरी त्यास सांगावें दर्यांतून जावें. खुष्कींतून मुलूख पाहात जाणें याचें कारण काय? हिंदुस्थानाचा मुलूख खराब करून पैका घेतला या गोष्टी जाबसालाच्या मोठ्या आहेत. तहनाम्यांत खुष्कीनें इंग्रजांनीं यावें असें नसतां हिंदुस्थानांत यावयाचें कारण कोणतें? तहनाम्यांत अर्थ कांहींच नसतां हे चाल त्यांनीं नवीन केली. प्रामाणिकता कोठें राहिली? सुजाउद्दौल्याचें केलें त्याप्रमाणें या राज्यांत करूं पाहातात." याबरोबर इंग्रज कदाचित तहाचें बोलणें करतील तर काय बोलावें याबद्दल आपल्या वकीलाला त्यांनीं सूचना देऊन ठेविली

कीं जें बोलणें. करावयाचें तें मुंबईकरांना घेऊन करा कारण कलकत्तेकर लाब व संबंध येणार तो नेहमीं मुंबईकराशीं. तेव्हां मुंबईकरच वाटाघाटींत असलेले बरे. शेवटीं एक मंत्र सांगून ठेविला " गोड बोलावें, त्रिकाळ सत्ता दाखवावी आणि राज्यच घ्यावें हे इंग्रजास सवे लागली आहे याचा पूर्ता विचार पाहावा. " अशा प्रकारें इंग्रजांना खुष्कीच्या मार्गानें जाऊं देऊं नये अशी बापूंची धडपड होती. पण भोसले नरमले व त्यांनीं आपल्या मुलखांतून इंग्रजांना जाण्यास परवानगी दिली आणि गॉडार्ड सरळ सुरतेस पोंचला.

### ३३ बापूनें इंग्रजांची समजूत घातली:— ★

गॉडॉर्ड सुरतेस पोंचल्याबरोबर बापूनें फ्रेंच वकीलाला निरोप दिला व हेस्टिंग्सला कळविलें कीं आम्ही फ्रेंच वकीलास मागेंच निरोप दिला आहे. पण जहाजाच्या दुरुस्तीसाठीं तो कांहीं दिवस राहिला होता. त्यानें पुणे दरबार १२ जुलैलाच सोडला असून मॉस्टीन थापा मारून दोन्ही सरकारांत गैरसमज उत्पन्न करतो. तर त्याला परत बोलवावा. ( प. कॅ. २०१; २४० ) त्याचप्रमाणें नागपुरास असलेल्या आपल्या वकीलास बापूंनीं कळवून ठेविलें कीं " फ्रेंच वकीलासंबंधीं भाषा निघाल्यास त्याला पुणे दरबारनीं आमचे इंग्रजांचे मध्यें सलोखा आहे तर आपण निघोन जावे असा निरोप मागेंच दिला होता. पण आपली २-४ जहाजें माल आला आहे तो विकावयास परवानगी द्या. मोठ्या देशाचे लोक. नाहीं कसें म्हणावें? परवानगी दिली आणि त्यांना सांगितलें कीं पुनः माल आणाल तर भागणार नाहीं. पण तो राहिला याबद्दल इंग्रजांना संशय आला म्हणून त्याला काढून लावणेंबद्दल इंग्रजांकडून पत्रें आलीं. त्या प्रमाणें फ्रेंच वकीलास काढून लावलें आहे. असें सांगावें. " वास्तविक दबाब बसवण्यासाठींच बापूनें फ्रेंच वकीलास ठेऊन घेतलें होतें. पण इंग्रजांना बेमालूम लोणकडी देऊन बापूनें मजेदार भाषेंत समाधानकारक उत्तर पाठवलें.

**३४ इंग्रजांशीं लढाई:—** ★

मोरोबाच्या कारस्थानापैंकीं बापूच काय तो बाहेर राहिला होता. त्याचें व नानाचें बरें नव्हतें. याचा फायदा घेऊन बापूला फोडण्याची मॉस्टीननें बरीच खटपट केली. पण बापूनें दाद दिली नाहीं. राघोबानेंहि पुन: बोलणीं सुरूं केलीं. पण त्यालाहि कारभाऱ्यानीं दाद दिली नाहीं. उलट इंग्रजांशीं लढण्याची तयारी कारभाऱ्यांनीं सुरूं केली. ताबडतोब इंग्रजांनीं व दादानें मिळून मराठ्यांच्या फौजेवर चाल केली. बारभाईंच्या फौजेचा इंग्रज व दादा यांच्या संयुक्त फौजेपुढें निभाव लागेना. बारभाईंच्या सैन्याला रेटीत रेटीत इंग्रज व दादा तळेगांव पर्यंत पुढें आले. आतां इंग्रज व दादा पुणें घेणार असें वाटूं लागलें. नानाचें धाबें दणाणलें.

**३५ दादाला चीत करण्याची नानाची अजब युक्ति:—** ★

दादा आणि इंग्रज यांच्या संयुक्त सैन्यापुढें बारभाईच्या सैन्याचा निभाव लागेना व आतां राजधानीचें शहरच दादाच्या हातीं जाणार असा रंग दिसतांच नानानें एक युक्ति काढली. दादाच्या स्वभावांतील नाजूक भाग नानाला माहीत होता. त्यावर त्यानें नेमका घाव घातला आणि पाहाडासारखें दादाचें खंबीर मन त्यामुळें दुभंगलें. "दादा पुण्यावर येतील तर पुणें शहर जाळून फस्त करतों. पुण्यापासून तळेगांवपर्यंतचा मुलूख बेचिराख करतों." असा निरोप नानानें दादाकडे पाठवला व कळविलें "इंग्रजांच्या जोरावर श्रीमंत पुण्यास येणार तर येवोत. पण नांदती राजधानी मी त्यांच्या हातास लागूं देणार नाहीं. पुण्याची राखरांगोळी करीन. मग राखेच्या पुंजीवर बसून श्रीमंतांनीं खुशाल राज्य करावें" आणि जरूर तर पुणें जाळण्याची नानानें सर्व तयारी करून ठेविली. पुणें जाळण्यास बापू, शिंदे व होळकर यांची मुळींच संमति नव्हती. "नानांचे मतें पुणें जाळावें. होळकर शिंदे यांचें मतें न जाळावें." (ऐ. ले. सं. नं. २४६० ) पण नानाच्या हातीं अनियंत्रित सत्ता आलेली होती. त्यामुळें नानाच्या इच्छेपुढें कोणाचें काय चालणार ?

**३६ दादाला ही मात्र अचूक लागू पडली:—** ★

दादा पेशव्यांच्या रक्ताचे होते. शनिवार वाडा त्यांचा होता. पुण्याच्या मोठेपणासाठीं त्यांचें रक्त आटलेलें होतें. आपली ही पुण्याची राजधानी जाळणार हें ऐकून दादाला धक्का बसला. आपण पुढें गेलों तर म्हटल्याप्रमाणें पुणें शहर जाळून टाकल्याशिवाय नाना राहाणार नाहीं याची दादाला खात्री होती. दादाच्या मनांत विचार-चक्र सुरूं झालें. "पुणें जाळून आपण काय मिळविणार ? राज्याचा कारभार ! केवळ राज्याच्या कारभारासाठीं किंवा बारभाईवरच्या ईर्षेसाठीं पुणें जळूं देण्यापेक्षां ही कारभाराची आशाच सोडून दिलेली काय वाईट ? कोणी का कारभार करेना, माझी राजधानी शाबूत राहूं द्या" अशा प्रकारें दादाच्या भावना उसळल्याबरोबर दादानें इंग्रजांना सोडून दिलें व तो आपण होऊन शिंद्यांच्या हवालीं झाला. आपण खुषीनें राज्याचा त्याग केला असें त्यानें सांगितलें व त्यांनीं खालील अटी घातल्या:– १ दादाच्या खासगी खर्चा करितां १२ लक्षाचा मुलूख द्यावा व दादानें झांशींत रहावें. २ श्रीमंत सवाई माधवरावानें धनीपण करावें. ३ बाजीरावानें कारभार करावा. ४ मुलें थोर होईतों व नाना बापू यांनीं कारभार करून राज्य सांभाळावें

**३७ दादा बारभाईंचा पराभव करण्यास या वेळीं समर्थ होते:—**

वास्तविक पाहातां सर्व बाजूंनीं यश येत असतां दादानें या वेळीं आपण होऊन शिंद्यांच्या हवालीं होण्याचें कारण नव्हतें. आम्हीं वर नमूद केल्याप्रमाणें दादांना पुणें जाळणार या गोष्टीचा धक्का बसला, म्हणूनच त्यांनीं हा शरणागतीचा मार्ग धरला हेंच ठरतें. आणि बारभाईचीहि जिरली होती हेंहि दिसतें. कारण माधव-रावानें देऊं केल्याप्रमाणें १३ लक्षाचा मुलूख द्या असेंच दादाचें मागणें होतें. तें आजपर्यंत अमान्य करून बारभाईंनीं दादाशीं झुंज दिली होती व त्या पायीं निजाम व इतर सरदार यांना मलिदा

म्हणून कित्येक लक्षांचा मुलूख दिला होता. पण दादाला तेरा लक्षाचा मुलूख द्यावयाला नाना तयार नव्हता. अशा प्रकारें हट्टानें हें प्रकरण चिघळविलें गेलें होतें. तें या अडचणीच्या प्रसंगीं दादाच्या त्यागी-वृत्तीनें व बारभाईवरील परिस्थितीच्या दडपणामुळें मिटलें. हेंच बारभाईंनीं सुरवातीलाच केलें असतें तर बराच अनर्थ टळला असता. पण नानाला दादावर सूड घ्यावयाची तळमळ होती म्हणून त्यांनीं ह्य तह घडवून आणला नव्हता. आपल्या हातांतून सत्ता जाणार तर राजधानी जाळून टाकूं अशी नानाची वृत्ति होती. व कोणा-च्याहि मताला मान न देतां स्वतःचेंच म्हणणें खरें करण्याइतकी सुलतानी सत्ता नानाला प्राप्त झाली होती.

**३८ वडगांवचा तह:—** ★

नानाच्या पुणें जाळण्याच्या धाकाला बळी पडून दादा शिंद्यांच्या हवालीं झाले व त्यामुळें इंग्रजांची त्रेधा उडाली. त्यांना माघार घ्यावी लागली. शेवटीं वडगांव येथें इंग्रजांना दांतीं तृण धरून मराठ्यांना शरण यावें लागलें. शेवटीं बारभाईंशीं इंग्रजांना अत्यंत मानहानिकारक असा तह करणें भाग पडलें. हा तह "वडगांवचा तह" या नांवानें प्रसिद्ध आहे. यामुळें बारभाईंच्या पाठीशीं लागलेला इंग्रजांचा भुंगा थंड झाला. दादाशीं युद्धहि थांबलें व बारभाईंना स्वास्थ्य मिळालें.

## प्रकरण १२ वें

# "बापूंचा शोचनीय शेवट"

**१ नानाची वक्र दृष्टि बापूवर फिरली:—** ★

मोरोबाच्या कारस्थानांत बापू सामील झाल्याचें नानाला पूर्वींच माहीत झालें होतें. पण इंग्रजांशी लढाई सुरू असल्यानें त्या वेळीं नानाला बापूच्या कर्तृत्वाची जोड हवी होती. म्हणून वरपांगीं

नाना बापूविरुद्ध कांहीं न बोलतां सलोखाच दाखवीत होता. तळेगांवच्या लढाईंत सुद्धां बापूनें जातीनें भाग घेतला होता. त्याच्या पथकानें इंग्रजांवर बंदूकीचा भडिमार केल्याचा उल्लेख आढळतो. ( प. कें. ५-२८९ ). पण वडगांवच्या तहानंतर इंग्रजांचा व दादाचाहि कायमचा बंदोबस्त झाल्यामुळें नानाला स्वास्थ्य लाभलें व त्याची बापूवर सूड उगविण्याची बुद्धि जागृत झाली. नानाची वक्र दृष्टि फिरल्यानंतर मग कोणाचें काय चालणार होतें ? बापूला कैद करण्याचा घाट नानानें घातला व कारण शोधून काढण्याच्या तजविजीला नाना लागला.

## २ बापूंना कैद करण्यास लटकें कारण काढलें:— ★

नानानें विचार करून बापूवर फितूरीचा आरोप लादून त्याला कैद करावयाचें असें ठरविलें. " चितो विठ्ठलास इंग्रजाला फितूर झाल्याबद्दल शिक्षा करण्याचें शिद्यांनीं ठरवलें तेव्हां चितो विठ्ठल म्हणाला " मला शिक्षा करणार तर बापूंना कां करीत नाहीं? याबद्दल दादांना विचारा. " याप्रमाणें चितो विठ्ठलास घेऊन शिंदे दादाकडे गेले व त्यांनीं दादाला बापूबद्दल विचारलें. त्या वेळीं दादा पोथी वाचीत बसले होते. त्या पोथींतून दादानें बापूच्या दोन चिठ्या काढून दिल्या. त्या शिद्यांनीं ठेविल्या. नानांनींहि अशींच पत्रें धोंडभट काटके व जोतीपंत यांच्याकडून पकडलीं. या पुराव्याच्या जोरावर शिद्यांनीं बापूंना पकडलें " असें सांगण्यांत येतें.

## ३ शिद्यांनीं बापूंना कैद केलें:— ★

बापूंना पकडण्यास कोणी तरी जबरदस्त मनुष्य हवा होता म्हणून नानानें हें काम शिद्यामार्फत उरकण्याचें ठरविलें. आपल्या मुलीच्या लग्नासाठीं बापू वाईला गेले होते. ते तळेगांवला आले व शिंदे वगैरेसह पुरंदरास गेले. शिद्यांनीं बापूला ता. २७-२-१७७९ रोजीं कैद केलें ! याबाबत पर्शियन कॅलेंडरमध्यें खालील उल्लेख सांपडतो. " शिद्यांनीं एकांतांत बापूची गांठ घेतली व फितूर केले-

त्यांना काय शिक्षा द्यावी असें विचारलें. कैद करून डोंगरी किल्ल्यावर पोंचवावें असें बापूंनीं उत्तर दिलें. शिंद्यानें चिठ्या पुढें टाकून अपराध बापूंच्या पदरांत बांधून कैद करून सिंहगडाला पाठविलें. ”

४ बापूंच्या कैदेमुळें निर्माण झालेली परिस्थितिः— ★

बापू कैद झाल्यानंतर पेशवाईचा आब गेला. लोकांना कारभाऱ्याबद्दल विश्वास वाटेनासा झाला. शिवाय एवढा मोठा माणूस एकाएकी कैद झाल्यामुळें बऱ्याच लोकांना वाईट वाटलें व बरेच लोक नानाच्या लगामीं लवकर आले नाहींत. त्यामुळें कांहीं दिवस तरी अंदाधुंदी माजणें स्वाभाविक होतें. या परिस्थितीचें वर्णन बाजीपंत बरवे यांनीं आपल्या पत्रांत उत्तम रीतीनें दिलें आहे. “ सखाराम भगवंत कोशकीटकाप्रमाणें कैद झाल्यावर राहिलेल्यांची केवळ आब गेली. इतबार राहिला नाहीं. आणि आश्चर्य करितात कीं या निर्माल्याचा आंदेशा करून तांब आदिकरून दिवसगतावर घालतात. फौजेस कपर्दिकहि देत नाहींत. जीवमात्र राजी नाहीं. आहे त्यांत बंदोबस्त नाहीं. कांहीं मिळत नाहीं. सरदार राजी नाहींत. फौजहि नाहीं. आहे त्यास खावयास मिळत नाहीं. किल्लेदार सर्व बेदिल. हजार पांचशें माणसांनीं काय करावें. तेहि दैवहत बुद्धिहत झाले आहेत. अलीकडे शिंद्याचें आचरण फंदावांचोन नाहीं. त्यास बुद्धीनें टाकिलें आहे. होळकरांचा प्रकार तर जघन्य. ” (पे. द. ३६-३८५ ).

५ बापूच्या कैदेनंतर निर्माण झालेल्या स्थितीस जबाबदार कोण ?:—

बापूच्या कैदेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचें खापर नाना कंपूनें बापूच्या डोक्यावर फोडलें. आणि त्याचाच पाठपुरावा इतिहासकारांनीं केला आहे. श्री. कानेटकर म्हणतात “ सखारामबापू मोरोबाच्या मसलतींत अनुकूल झाल्यामुळें चालत्या गाड्यास खीळ घातली गेली व त्याचें पर्यवसान म्हणजे चोहोंकडे अव्यवस्था व बंडें उद्भवली ही गोष्ट मात्र खरी. ” हें विधान मुळींच बरोबर नाहीं. मोरोबाच्या कारस्थानांतून बारभाई या वेळीं पुरे पार पडलेले होते. इंग्रजांचा नक्षा

उतरला होता. दादाचा वादहि मिटला होता. बापूंना कैद करेपर्यंत बापूकडून सर्व जबाबदारीचीं व जोखमीचीं कामें नानानें करवून घेतलीं होतीं. बारभाईंच्या गाड्याला मुळींच खीळ बसली नव्हती. तो गाडा बापू आपल्या कैदेपर्यंत व्यवस्थित हांकीत आले होते. बापूंना कैद केल्यामुळें ही परिस्थिति निर्माण झाली होती. बारभाईंचा आब बापू कैद झाल्यामुळें गेला. कोणत्याही काळीं नानाबद्दल लोकांत प्रेम, आदर अगर विश्वास असल्याचें दिसून येत नाहीं. बापूंना अन्यायानें कैद केलें असा सार्वत्रिक समज होता. निजामानें बापूंना कैद केल्याबद्दल खुलासा विचारला. हरिपंत फडके स्वतः बापूला तुरुंगांत भेटला व तुम्ही मोकळे होऊन कारभार करण्यास तयार असल्यास सर्वजण अनुकूल होतील असें त्यानें सांगितलें. बारभाईनीं कर्ज उभारलें होतें तें बापूंच्या सहीनें. त्यामुळें बापूंना कैद केल्यामुळें आपल्या कर्जाची शाश्वती नानाच्या राज्यांत सावकारांना वाटेना. बापूंची सर्व इस्टेट नानानें जप्त केली व त्याच्या कुटुंबांतील मंडळींना देशोधडीला लावलें! बापूसारख्या कर्तव्यनिष्ठ, कर्तबगार, वजनदार अशा मुख्य कारभाऱ्याला देखील ज्या राज्यांत विनाकारण तुरुंगांत डांबलें गेलें, त्या राजवटींत अराजकता माजली नसती तरच आश्चर्य! शिवाय बारभाईंची आर्थिक परिस्थिति अद्याप वाईटच होती. सर्वत्र शत्रू उठलेले होते. त्यांचा बंदोबस्त करावयाचा म्हणजे सैन्य हवें. आणि सैन्य उभारावयाचें म्हणजे पैसा हवा. नानाला कर्ज कोण देणार? या सर्व कारणांमुळें बापूंना कैद केल्यामुळेंच ही परिस्थिति निर्माण झाली आणि याला नानाची सुलतानशाहीच कारण झाली असेंच म्हणावें लागतें.

**६. बापूला कैद करण्यास दाखवलेलें कारण साफ खोटें —** ☆

इंग्रजांना बापू फितूर झाले. त्यांच्या हातच्या चिठ्या मिळाल्या. त्या त्याच्या पदरांत घालून शिंद्यानें बापूंना कैद केलें असा प्रवाद आहे. मोरोबाच्या कारस्थानापर्यंत तर बापूविरुद्ध कांहींच नव्हतें. हें सर्वमान्य आहे. आयत्या वेळीं मोरोबाचा हात सोडून बापू शिंद्याकडे गेले.

व इंग्रजांना आपण कांहीं लिहून देणार नाहीं असें सांगितलें व त्यानंतर बापूनें इंग्रजांविरुद्ध कसून लढा दिला हेंहि नमूद आहे. म्हणजे शिंद्याशीं बापूनें आपली चूक कबूल करून " राखावें " म्हणून अभय मागितल्यानंतर बापूनें नानाविरुद्ध अगर बारभाईविरुद्ध कांहींच कारवाई केलेली नाहीं हें स्पष्ट दिसतें. बापू मोरोबाच्या कारस्थानांत सामील होते हें खरें आहे. व ती गोष्ट त्यांनीं स्वतः कबूल केली व "याचा दोष मजकडे, राखावें" असें शिंद्यापाशीं अभय मागितलें. त्याप्रमाणें याबद्दल बापूंना माफी करूनच पुनः कारभारांत घेण्यांत आलें होतें. मोरोबाच्या कारस्थानांत सामील होण्यापलीकडे बापूनें कांहींच केलें नव्हतें. व तो अपराध त्यांनीं आपण होऊनच कबूल केला होता. तीच फितूरी त्यांच्या माथीं मारून त्याला पकडणें अन्यायाचें होतें. इंग्रजांचा हात पेशवाईमध्यें शिरूं नये म्हणून बापूनें आत्महुती देऊन मोरोबाला दिलेलें आपलें सहकार्य त्यानें मागें घेतलें व शिंद्यापाशीं क्षमा मागून बारभाईशीं हार्दिक सहकार्य केलें. तेव्हां बापूंची फितूरी अशी कांहींच नव्हती कीं जी उघडकीला आणावी व त्याबद्दल त्याला शिक्षा करावी.

### ७ फितूरीच्या चिठ्या बनावट असल्या पाहिजेतः— ★

फितूरीच्या चिठ्या मिळाल्या वगैरे जी हकीगत सांगितली जाते ती तर अगदीं हास्यास्पद आहे. बापू लेखी कधींच गुंतत नव्हते अशी त्यांच्याबद्दल ख्याति आहे. इंग्रजांना आपण कांहीं लिहून देणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. अशा परिस्थितींत या चिठ्या बापूनें कोणास कशासाठीं लिहिल्या होत्या ? त्या चिठ्यांतील मजकूर कां बाहेर फोडला नाहीं ? आपण कसल्याहि चिठ्या कोणास दिल्या नाहींत असें बापूचें म्हणणें होतें. मोरोबाच्या कारस्थानांत आपण सामील नव्हतों असें बापूचें म्हणणेंच नव्हतें. मग बापूनें या चिठ्यांचा इनकार कां करावा ? फितूरीच्या चिठ्या दादापाशीं होत्या याचा

अर्थ त्या दादाला लिहिल्या होत्या असा आहे. असल्या महत्वाच्या चिठ्या दादा पोथींत ठेवतात हें कसें ? शिंदे दादाकडे जातात. दादा पोथी वाचीत बसलेला आहे. तो पोथींतून ताबडतोब चिठ्या काढून देतो हें सर्व पूर्वरचित देखाव्यासारखें वाटतें. तात्पर्य सदरच्या चिठ्या हा बनावट कागदांचा नानारचित दुसरा मासला असला पाहिजे हेंच ठरतें.

८ कैद झाल्या वेळची बापूची मनोभूमिकाः— ★

मोरोबाच्या कारस्थानांत सामील झाल्याबद्दल व नंतर त्याचा हात सोडून नानाला मदत केल्याबद्दल बापूची मनोभूमिका आपण एक अत्यंत योग्य व जरूर तें कर्तव्यकर्म केलें, त्यांत आपण पराभूत झालों तरी दुःख नाहीं अशा प्रकारची विवेकी व समाधानाची होती हें खालीं दिलेल्या गोष्टीवरून सिद्ध होतें:—

(१) नाना व महादाजी आपणास पकडणार हें बापू जाणून होता. त्याबद्दल कांहींनीं त्याला सुचवलें असतां त्यानें उत्तर दिलें " सांप्रत आपल्याला कैद करून प्राण घेतील यांत आपली क्रिया राहून परत्र साधन घडेल. वाचणें तरी किती दिवस ? कोणीहि अग्रेसर होऊन श्रीमंतांचे दौलतीचे पैरवी बांधावी हे नैक सल्ला."

(२) नाना आपणाला पकडणार तर आपण निजामाची मदत घ्यावी असाहि सल्ला कांहींनीं त्याला दिला असतां बापू म्हणाला " अंतःकलहांत परक्याला हात घालूं दिला तर राज्यनाश होतो. तें आपणांस कर्तव्य नाहीं. मग त्यांत आपलें कांहींही होवो. " ( ऐ. गो. २-५० ).

(३) कैदेंत बापूची गांठ घेऊन हरिपंतांनीं म्हटलें " शिंद्यांनीं तुम्हांस निवळ दगाबाजीनें पकडलें. सुटून कारभार करावा. " अशी विनंति केली तेव्हां बापू म्हणाला " आतां आपलें म्हातारपण झाल्यामुळें उपाधीचा आपणांस वीट आला आहे. यदाकदाचित नानांनीं मुक्त केल्यास काशीस जाऊन राहूं. कारभाराची दगदग नको. " ( प. कॅ. ५-३४९ ).

(४) कैदेंत नानानें बापूची गांठ घेतली असतां बापू म्हणालाः— "तुम्ही हें कृत्य केलें, फार चांगलें. उगाच प्राकृत संसार करण्यांत चार हुकुम असल्यास पुरें पडत नाहीं. तेव्हां ही तर दौलत त्यांत धनी नाहीं. चार हुकुम म्हणजे दौलतीचा नाश. परंतु या दौलतीचें रफीक पूर्वीपासून होळकरांचें घर. सांप्रत तुम्ही शिंदीबन वाढविलें आहे. यापासून तुम्हांस अपाय होईल हें खचित मनांत वागवून फार जपावें." ( इ. सं. हो. कै. पृ. ६ ). या सर्व उद्‌गारांत बापूच्या मनाची ठेवण काय होती हें स्पष्ट दिसून येतें. दौलतीची कळकळ, स्वतःच्या बचावासाठीं दौलतीला घातक होईल असें वर्तन न करण्याचा निर्धार, यापुढें नानाचें एक व आपलें एक असें मत पडत गेल्यास तें पेशवाईस घातक होईल. तेव्हां नाना एकटाच कारभारांत राहील हें एका दृष्टीनें बरें, अशी मनोभूमिका वगैरे स्पष्ट दिसून येतात. फितूरी केलेल्या माणसाचे विचार असे असूं शकत नाहींत. बापूच्या या उद्‌गारांत सदसद्विवेक बुद्धीला स्मरून आपण वागलों याची समाधानता दिसते.

९ बापूचा सरंजाम व सर्व मिळकत जप्तः— ★

बापूच्या सरंजामाची यादी श्री. कानेटकर यांनीं " सखारामबापू चरित्र " पान २६१ वर दिली आहे. त्यावरून त्याचा सरंजाम २७–२८ ठिकाणीं होता व त्याचे फौजेकडील सरंजामाचें उत्पन्न सालीना रु. २०, ८०, ६९३ इतकें होतें. याशिवाय सरदार दरकदार यांचेकडे बापूंचे दरख असत. हे सर्व जप्त करण्यांत आले. बापूच्या घरांतील रोखड पन्नास लक्षाची जप्त करण्यांत आली. सर्व दागदागिने जप्त करण्यांत आले. बापूंचा वाडा पाडवून पैसे वसूल करण्यांत आले ! बापूच्या मागें त्यांची पत्नी व सून ह्यांना देशोधडीला लावलें. त्यांना मोठ्या मिनतवारीनें नानानें सालीना रु. ८००० ची उदार (?) पोटगी मंजूर केली !


बापूंचा झरा

बापूंच्या वाड्यांतील विहीर.

नों. न. ३७३०८



* वीं. न. ............ *

## बापूंचा झरा.

" बापूंचा झरा " या नांवाचे दोन झरे होते अशी माहिती मिळते. पैकीं एक भांबुर्डा येथें आहे. सदर छाया चित्र त्याचें आहे. दुसरा ओंकारेश्वरापाशीं होता. त्याचें पाणी पिण्यासाठीं बापू नेत असत. सदर चित्रांतील झऱ्यास बापू दररोज भेट देत असत व तेथें स्नानहि करीत असत. सदरच्या झऱ्याची हल्लीं दुरस्ती होऊन हें स्वरूप त्यास आलें आहे. तथापि नांव अद्याप तसेंच आहे.

## बापूंच्या वाड्यांतील विहीर.

बापूंचा वाडा शनिवार पेठेंत मेहेंदळयाच्या गणपतीसमोर होता. तो पाडून त्यावरून नानानें नांगर फिरविला ! त्यामुळें मूळ वाडयाचा कोणताहि भाग आतां शिल्लक नाहीं. फक्त त्यांतील विहीर तेवढी अद्याप चालू स्थितींत असून, लोक तिचें पाणी नेतात. सदरची विहीर २० फूट खोल असून तीस पाणी भरपूर आहे. तिचा व्यास २० फूट आहे. त्या विहिरीचें सदर छायाचित्र आहे. सदर विहीर हल्लीं घर नं. ३५२ मध्यें आहे. बापूंच्या वाडयाची जागा हल्लीं श्रीयुत पंडित सराफ यांचे मालकीची आहे.

१० तुरुंगांत बापूचे हाल:—

★

बापूला कैद केल्यानंतर त्याच्या घरच्या मंडळीची व बापूची शेवटपर्यंत भेट होऊं दिली नाहीं. "बापूच्या पायांत ४० शेराची बेडी घातली होती व तुरुंगांत त्याचें खाण्यापिण्याचे फार हाल झाले" असा उल्लेख धाकटे शाहू राजे यांच्या चरित्रांत ४९–५० पानावर आढळतो. पण श्री. कानेटकरांनीं "बापूंच्या कैदेंत नानांनीं त्यांची उत्तम व्यवस्था ठेविली होती असें सर्टिफिकेट नानाला दिलें आहे. ते म्हणतात " नाना फडणवीसानें बापूस जरी चौकी पाहाऱ्यांत ठेविलें होतें, तरी बापूंची एकंदर बरदास्त फारच चांगली ठेविली होती. दोन नोकर, नित्य दानास १० रुपये, व्यतिपाताचे दिवशीं २१ तोळे सोन्याच्या २८ पुतळ्या दानधर्मास; उत्तम जेवण, विडयाचीं पानें श्राद्धविधी वगैरे सर्व बाबतींतली तरतूज केलेली होती. बापू प्रतापगडीं असतांना दुधाकरितां १ गाय व म्हैस पुण्याहून पाठविल्याची माहिती मिळते. यावरून बापूची दूध पिण्याचीहि व्यवस्था ठेविली होती असें दिसतें. अशा प्रकारें बापूस सन्माननीय राजकीय कैदी म्हणून मानण्यांत येऊन त्यास सर्व प्रकारच्या सवलती देण्यांत आल्या होत्या."

११ श्री. कानेटकरांचें बापूच्या तुरुंगवासाबाबतचें विधान चुकीचें:—

बापूंना सन्माननीय कैदी म्हणून वागविण्याइतकी नानाची उदार बुद्धि होती तर नानानें त्यांचें सर्वस्व जप्त कां केलें ? त्यांचा वाडा कां पाडून टाकला ? त्यांच्या घरच्या मंडळीची भेट कां होऊं दिली नाहीं ? त्यांच्या पत्नीला व सुनेला मिळून फक्त रु. ८००० ची पोटगी देऊन त्यांना दारिद्र्यांत कां ठेविलें ? बापूंना नानानें सन्मानानें वागवणें हें नानाच्या स्वभावधर्माला सोडून होतें. सदाशिवराव भाऊला तोतया ठरवून उपवास घडवून नानानें मारिलें. राघोबा दादास वैयक्तिक सूडामुळें देशोधडीला लाविलें. आनंदीबाईला तुरुंगांत डांबून तिचे हाल केले. पार्वतीबाईला भाऊला सोडवितों अशी आशा दाखवून शेवटपर्यंत फसविलें. सवाई माधवरावास राज्य म्हणजे

तुरुंगवास असें वाटून आत्महत्या करण्याची पाळी त्याच्यावर आणली-गंगाबाईच्या मृत्यूबद्दलहि नानावर आरोप कांहीं लोक ठेवतात. दुसऱ्या बाजीरावासहि नानाचा तुरुंगवास असह्य झाला होता. स्वतःचा चुलत बंधु मोरोबा याचे हाल करण्यांत आले. राघोबापक्षाच्या सखाराम हरी गुप्ते, व्यंकटराव घोरपडे वगैरे उमद्या सरदारांना हालहाल करून मारण्यांत आलें. जन्मभर नानाला मदत केलेल्या माहादाजी शिंदे व परशरामभाऊ पटवर्धन यांना नानानें मारेकऱ्यांमार्फत मारविलें असाहि प्रवाद नानाविरुद्ध आहे. वरील सर्व व्यक्तींच्या बाबतींतील नानाची सूडबुद्धि व कठोर वर्तन पाहिलें म्हणजे बापूला त्यांनीं सन्माननीय कैदी म्हनून वागवलें असणें संभवनीय नाहीं. नानाच्या बाजूनें जे उल्लेख आढळतात ते नानाच्या वतीनें सरकारी खुलासे असणें शक्य आहे. बापूच्या दुधासाठीं गाय व म्हैस पुण्याहून प्रतापगडावर पाठविणें खरें वाटतें कीं काय? गाय अगर म्हैसच द्यावयाची असती तर गडकऱ्यांना सांगून तशी व्यवस्था केली असती. प्रतापगडास गाय अगर म्हैस अप्राप्य असल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. तेव्हां वरील उल्लेख अतिशयोक्त अतएव खोटा वाटतो.

### १२ तुरुंगांतच बापूंचा अंतः— ★

बापूंना पहिल्यांदा सिंहगड व नंतर नगरच्या किल्ल्यांत आणण्यांत आलें व नंतर त्यांना रायगडाला नेण्यांत आलें. त्या ठिकाणींच या कर्तबगार, राष्ट्रनिष्ठ उमद्या मुत्सद्याचें अतिसाराचे विकारानें ता. २-८-१७८१ रोजीं देहावसान झालें! त्यांच्या अशा मरणाबद्दल ग्रँड डफ म्हणतोः—

" This venerable old man, the once great Sakharambapu perished miserably in Raygad after sharing every vicissitude of privation and grandeur, of toil and triumph, which a leader in camps and courts of a great empire must experience. " ( Duff Vol. II 165-6 )

" विशाल साम्राज्यांत सेनापति व कारभारी या दोन्ही हुद्यावर असलेल्या नेत्याच्या वांट्यास येणारे वैभव व हाल अपेष्टा, कष्ट आणि विजयानंद अशीं सर्व स्थित्यंतरें अनुभविलेला–एके काळी सखारामबापू म्हणून गाजलेला–हा आदरणीय वयोवृद्ध थोर पुरुष अत्यंत शोचनीय रीतीनें रायगड येथें निधन पावला. "

" बापूंना कैद केल्यानंतर नाना फडणवीस दख्खनचा राजा झाला व शिंदे त्याचे सहकारी बनले. " ( प. कॅ. ५-३४० ) अशा तऱ्हेनें या वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध, कर्तबगार आणि आपल्या आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत पेशवाईची काळजी वाहिलेल्या बापूचा आपल्या सुलतानी इच्छेच्या पूर्ततेसाठीं नानानें अत्यंत निंद्य रीतीनें शेवट केला ! !

## १३ बापूंची योग्यता:— ★

बापूंची योग्यता फार मोठी होती. त्यांच्या कर्तबगारीबद्दल कोणाचेंहि दुमत नाहीं. समरांगणावरील त्यांची तलवार श्रेष्ठ होती कीं मुत्सद्देगिरींतील त्यांची लेखणी श्रेष्ठ होती हें सांगतां येणार नाहीं. लढाईचे व राजकारणाचे डाव ते सारख्याच सफाईनें खेळत असत. त्यांनीं अटकेपासून म्हैसूरपर्यंत तलवार गाजविली होती. त्यांच्या लेखणीनें कुटिल इंग्रजांनाहि खाली मान घालावयाला लावलें. राज्याची धुरा वाहाण्यास ते किती लायख होते हें मागें आलेंच आहे. बापूंच्या इतका अष्टपैलू मुत्सद्दी पेशवाईंत दुसरा झाला नाहीं म्हटलें तरी चालेल. त्यांच्यावर दुटप्पीपणाचा आरोप करणाऱ्यांनीं बापूंनीं आयुष्यभर पेशवाईच्या हितासाठीं त्यागच केला होता याकडे पाहिलें नाहीं याचें दुःख बाटतें.

## १४ बापूंचा स्वभाव व खासगी आयुष्य:— ★

बापू जसे हुषार व कर्तबगार होते तसेंच अत्यंत सरळ व प्रामाणिक होते. त्यांचें खासगी चारित्र्य निष्कलंक होतें. त्यांचें बोलणें

स्पष्ट, मुद्देसूद व आत्मविश्वासानें भरलेलें असे. आपल्या प्रतिस्पर्ध्यांशीं त्यांचें वर्तन उदारपणाचें असे. वीरवृत्ति असल्यानें द्वेष अगर सूडाची भावना त्यांच्या ठायीं नव्हती. त्यांचा मनोनिग्रह दांडगा होता व कार्यक्षमता वाखाणण्यासारखी होती. पेशवाईच्या शत्रूंना ते पुरे ओळखीत होते. आपापसांतील भांडणें मिटविण्याची त्यांची वृत्ति असे. आपलें म्हणणें आवडो अगर नावडो खुद्द पेशव्यांनाही स्पष्टपणें सांगण्याची त्यांची रीत असे. ते अत्यंत वचनिक असल्यानें त्यांच्यावर सर्वांचा विश्वास असे. पेशवाईत व इतर राज्यांतहि बापूंना अत्यंत मानीत असत. पेशवाईच्या हितासाठीं आपला मान बाजूला ठेवून पड खाण्याची त्यांची वृत्ति दिसून येते. बदलत्या परिस्थितीप्रमाणें स्वतःची मनोभूमिका ठेवण्याची त्यांची तयारी असे. ते अत्यंत धार्मिक, विचारी व वेदांती वृत्तीचे होते.

### १५ बापूंचा खासगी कारभारः— ★

बापूंचा खासगी कारभार देशस्थी वृत्तीचा होता असें श्री. कानेटकर म्हणतात. त्यांच्या घरीं भोजनाचा थाट उत्कृष्ट असे. नोकर चाकरांची संख्या वाजवीपेक्षां जास्त असे. त्यांच्या घरीं बऱ्याच नातेवाईकांना आश्रय असे. त्यांचा खर्च सढळपणें चाले. कोणीहि भिक्षुक त्यांच्या घरांतून विन्मुख जात नसे. त्यांच्या घरीं शास्त्री पुराणिक वैदिक वगैरेंची संभावना चांगली होत असे. नटनर्तकादि कलावंतांचेंहि ते चीज करीत असत. सुंदर वस्तूंचा संग्रह करण्याचीहि त्यांना फार हौस असे. इतकें असूनहि त्यांचा खर्च मर्यादित असे. इ. स. १७७३ मध्यें बापूंच्या कीर्दीत रुपये २०३३०४ जमा असून रुपये १९१२४६ खर्च आहेत. यावरून मर्यादेच्या बाहेर जावयाचें नाहीं व शिल्लक ठेवण्याची धडपड नाहीं अशी त्यांची वृत्ति दिसते.

### १६ नानाचा स्वभावधर्मः— ★

बापूंच्या थोरवीची कल्पना येण्यासाठीं त्यांना गाढून पुढें आलेल्या नानाचा स्वभाव पाहणें अवश्य आहे. नानाचा स्वभावधर्म ठरवितांना

* ...

त्याच्या आयुष्याचा तांत्रिक आढावा घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं. तो घेतांना कांहीं गोष्टी ज्या सर्व मान्य आहेत त्या येथें देतों. नानाच्या घराण्याकडे पेशव्यांची फडणिशी होती. ती नानाच्या आजोबापासून होती. अर्थात फडणीस म्हणजे कांहीं सरदार नव्हे. त्यांना उत्पन्नहि वेताचेंच असे. म्हणजे ते इतर सरदार सरंजामदार यांच्या बरोबरीचे नव्हते एवढें खास. नानाच्या मरणसमयीं मात्र नाना नवकोट नारायण होते. होळकरांचें पैसे भागविणेस दुसऱ्या बाजीरावास शक्ति नव्हती. पण " नानांनीं दिलें तरच शक्य आहे " अशा आशयाच्या पत्राचा उल्लेख नानांच्या शकावलींत आढळतो. त्याचप्रमाणें पैसे उकळण्याकरितां नानांना कैद कराण्याचा धाक होळकर दाखवीत होते, असाहि एक उल्लेख सदर पुस्तकांत आहे. यावरून नानांची आर्थिक परिस्थिति अत्यंत श्रीमंतीची जाहली होती हें सिद्ध होतें.

नानांनीं एकूण ५ लग्नें केलीं. पैकीं नानांच्या मरणसमयीं त्यांच्या दोन पत्न्या जिवंत होत्या. त्यांचीं वयें अनुक्रमें १६ व ९ अशीं होतीं, व नानाचें वय ६० च्या घरांत होतें. मुलें नसलीं म्हणजे लग्नें करण्याचा शिरस्ता त्या वेळीं होता. पण १६ वर्षांची पत्नी असतांना ९ वर्षाच्या मुलीशी ६० वर्षाच्या नानासारख्या शाहाण्या माणसानें लग्न करावें हें कसेसेंच वाटतें.

घाशीरामासारख्या माणसाला नाना वांचवण्याचा प्रयत्न करतात यावरून नानाची न्यायबुद्धी समजण्यासारखी आहे.

नानांच्या नैतिक वर्तनाबद्दलचा बभ्रा प्रसिद्ध आहे. नाना सूडबुद्धीचे होते, हें त्यांच्या राघोबादादा, सदाशिवरावभाऊ, आनंदीबाई, सवाईमाधवराव, दुसरा बाजीराव, सखारामबापू, महादजी शिंदे, मोरोबा फडणीस परशरामभाऊ पटवर्धन, सखाराम हरी आदिकरून दादाचे साथीदार, यांच्याशीं झालेल्या वर्तनावरून सिद्ध होतें.

नानाला पेशवाईपेक्षां स्वतःच्या हातांत सत्ता कशी राहील हा मुद्दा महत्वाचा वाटत होता, हें त्यांच्या आयुष्यभर झालेल्या वर्तनावरून दिसण्या-

सारखें आहे. त्यापायीं कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्याची, पेशवाईंतील पैशाची अगर प्रांताची आहुति द्यावयाला ते नेहमीं सिद्ध होते असेंच दिसतें. तत्कालीन लोकांमध्यें नानाबद्दल प्रेम अगर आदर किंवा विश्वास असल्याचें कोठेंहि नमूद नाहीं.

गंगाबाई, महादजी शिंदे, सवाईमाधवराव व परशरामभाऊ पटवर्धन यांच्या मृत्यूला नानाच कारण होते असाहि प्रवाद आहे. तथापि त्याला समाधानकारक पुरावा मिळत नाहीं.

नानांच्या मृत्यूनंतर पेशवाईंत कोणी हळहळल्याचा दाखला नाहीं. सारांश नाना हे सूडबुद्धीचे, स्वार्थलोलुप, अनाचारी व अप्रामाणिक होते असेंच ठरतें. ते अत्यंत धूर्त व बुद्धिमान होते त्याचप्रमाणें पातळयंत्री होते.

साधु देवनाथ म्हणून एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांनीं नानाची सर्व कारकीर्द पाहिली होती. ते गंगाबाईचे मोक्षगुरू होते. अशा सत्पुरुषानें नानाबद्दल एक कवन केलें आहे तेंच खालीं देतो म्हणजे वाचकांनींच त्यांचें नानाबद्दल काय मत होतें तें पाहावें.

" सो बी अकलवंत बडा है । नसीब सिकंदर है उसका ॥ धृ ॥
जबलो पल्लो गठडी तबलग ज्यो करेसो उसी का ।
हता रावन कीरत बढी जद अंधधुंद मो राज किया ॥
तेहतीस कोटी देव पकड के दारबंद मो कैद किया ।
सुनो अकल की तारीफ जिन्हें चार बेदका खोज किया ॥
चौदा चौकडे राज झुकाया दौलता खुब हजा लिया ।
छुटी पल्लोकी गठडी जद आध घडी को डुबा दिया ॥
अकलकी बे नकल रही जिने समस्त कुल भस्म किया ।
बिभीखनने बहोत सिखाया जरा न माने उसी का ॥
आली कलकी घडी चुके नहीं फिरा काल जद दैतो का
बस मौत लिखी ॥ १ ॥

अनंतफंदीने नाना फडणीसकी अक्कलकी तारीफ किई।
क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेकी डुबा दिई ॥
ज्यो मैं करूंगा सोही होयेगा ऐसी मन में मगरूरी भई।
माल खजीना आपने हात खावंद के घर कछउ न रही ॥
सवाई माधवराव मुवा जद अक्कल चोदी भूल गई।
बाजीराव कू देता गादी सो बी जानत हता सही ॥
फिरा नसीबा चुकी किरिया कहा ठिकाणा अक्कलका ।
नमक हरामी करे खावंदसो किने बजाया है डंका
बे अबी सुनो ॥२॥

छोटे छोटे आदमी बढाये उसीपास मो आन खडे।
आपने आगे कछुगत नहीं ज्यो होय सो आप बडे ॥
ना खावंदका घरहि राखा ना फौजो साबूत खडे ।
मनमें मगरूरी कर के गाफल ना वैरीसो जरा अडे ॥
कंबकतीका पहेरा यारो बदमस्ती सो बहोत चढे ।
करम गंडिया आखर नाना जा सिंदे के कैद पडे ॥
मिलाई सोई खोई यारो लिया ठिकारा आप जस का।
देवनाथ कहे मुझे गरज नहीं राज डुबाया बम्हन का ॥
वे कछु न किया ॥ ३ ॥

( वैदर्भ देशस्थ प्रसिद्ध साधुवर्य देवनाथ महाराज कृत कविता संग्रह २१. पद ११८ वें पान ११८ ).

श्री. य. रा. गुप्ते यांनीं बरेच दाखले देऊन " सखाराम हरी " या पुस्तकांत असेंच प्रतिपादन केलें आहे. ( स. ह. चरित्र पान १६१ ते १६८ ) तात्पर्य नानांचा मनोधर्म चांगला नव्हता. त्यांची नीतिमत्ता ठीक नव्हती. दानत तर नव्हतीच पण देशप्रेमहि नव्हतें ! नानानें पेशवाई टिकविण्यासाठीं म्हणून हयातींत जे कांहीं प्रयत्न केले ते केवळ पेशवाईचीं सूत्रें आपल्या हातीं राहण्याच्या स्वार्थ बुद्धीनेंच असें दुःखानें म्हणावें लागतें.

### १७ बापूंचा मनोधर्मः— ★

बापूंचा मनोधर्म याच्या अगदीं उलट होता. नानासाहेब, राघोबा, आनंदीबाई, माधवराव या पेशवे लोकांनीं बापूंच्या कर्तृत्वावर व प्रामाणिकपणावर सदैव विश्वास दाखविला आहे. बारभाईच्या कारस्थानांत बापूंच्या नांवाचीं खतें देऊन सावकारांनीं व प्रजेनें बापूवरील विश्वास व्यक्त केला आहे. बापूंना पकडल्याबद्दल शत्रूंना देखील अन्याय वाटला व तसें त्यांनीं नानास पत्र पाठवून विचारलेंहि बापूबद्दल गैरविश्वास नानाला देखील वाटत नव्हता. बापू सरळपणानें जाणारा. बापू कारस्थानें करण्यांत तरबेज पण नानाप्रमाणें स्वकीयांवर कारस्थान करून सूड उगविण्याचें कृत्य त्यांनीं कधींच केलें नाहीं. बापू राज्यनिष्ठ होते. राज्याचें हिताहित पाहून जरूर त्या ठिकाणीं मानहानि देखील त्यांनीं पतकरली होती. देशघात करून स्वतःचा जीव वांचवण्यासहि ते तयार झाले नाहींत. राजकीय प्रतिस्पर्ध्यांनाहि त्यांनीं कधीं रगडून काढलें नाहीं. उदारमनानें क्षमा केली. बापूमध्यें विश्वासूपणा, दानत, राष्ट्रप्रेम, राजप्रेम नेहमी वसत होतें.

### १८ बापूंची आत्माहुतिः— ★

बापू जसे शूर, कर्तबगार, मुत्सद्दी व राजकारणधुरंदर होते तसेच पेशवाईबद्दल त्यांना त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आत्यंतिक तळमळ वाटत होती. पेशवाईच्या हितासाठीं त्यांनीं अनेक वेळां वैयक्तिक त्याग केलेला होता. परकीयांच्या हातांत पेशवाई न जावी. त्यापेक्षां आपल्या घरचा नाना सुलतान झाला तरी चालेल या भावनेनें त्यांनीं आपल्या राजकीय आयुष्याची नानांच्या हातीं सांपडून जाणून बुजून आत्माहुति दिली !

### १९ बापूंचा एकमेव दोषः— ★

त्यांच्या सर्व गुणांत एकच दोष होता. त्याला दोष म्हटल्याबांचून राहावत नाहीं. तो म्हणजे प्रतिस्पर्धी व शत्रू यांच्याबद्दल

औदार्य दाखवण्याची वीर मनोवृत्ति होय. औदार्य दाखवतांना त्यांनी पात्रापात्रतेचा विचार केला नाहीं. परित्राण फक्त साधूंचें करावयाचें आणि दुष्कृतांचा विनाशच करावयाचा हें तत्व त्यांनीं कसून आचरणांत आणलें नाहीं. पेशवाईत वावरणाऱ्या नागाला दूध न पाजतां वेळींच ठेंचण्याची दक्षता त्यांनी घेतली नाहीं. म्हणून त्या सर्पानें नानारूपानें दंश करून बापूंच्या आयुष्याचा शेवट मनोविदारक असा केला !

★

### २० राजकारण व भावना-प्रधानता:—

आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर भावनाप्रधान असा मनुष्य कितीहि बुद्धिमान व कर्तृत्ववान असला तरी राजकारणांत पराभव पावतो असें दिसून येईल. सम्राट नेपोलियनइतका कर्तृत्ववान पुरुष झाला नाहीं असें म्हणतात. पण त्याला अंतःकरण होतें, भावना होत्या. अशियाचा राजा, रशियाचा बादशाहा वगैरे सर्व राजे पराभूत होवून त्यांच्या कैदेंत असतां त्यांच्या बद्दल नेपोलियनला वाईट वाटलें व त्यांना त्यांना बंधमुक्त केलें ! त्यांनीच शेवटीं एक होऊंन मागील औदार्य अगर उपकार कांहीं न स्मरतां नेपोलियनचा पराभव होतांच त्याला सेंट हेलिना मध्यें गाडून अपमानांत डांबून मारिले ! नेपोलियननें त्यांना यमसदनाची वाट त्याच वेळी दाखवली असती तर त्याचा शेवट असा झाला नउता ! मीरोबाच्या कारस्थानानंतर बापूंनीं नानांना डांबून ठेवण्याचा कठोरपणा दाखवला असता तर मराठ्यांचा इतिहास निरांळा लिहावा लागला असता !!

समाजामध्यें सर्व काळांत कोणी तरी नाना असतो व तो एखाद्या बापूला आपल्या अधिकाराच्या बळावर जमीन दोस्त करतो हें पाहून अशा नाना पासून सावध राहण्यांची दक्षता वाचकांनीं घेण्याचें ठरविलें तर माझ्या या लिखाणाचें सार्थक झालें असें मी मानेन.

८८८३

REFBK-0007783

# ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशन समिति बेळगांव-नें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

वरील समितीनें यापूर्वी खालील आठ ग्रंथ प्रकाशित केले असून शिवाय "**सखारामबापू**" चें चरित्र हें आतां **नववें पुष्प** म्हणून प्रकाशित झालें आहे:—

१ **नारायणराव पेशवे य[illegible] कीं आत्महत्या**:—लेखक इतिहासभास्कर पां. गो. रानडे. पृष्ठ संख्या १५००. या ग्रंथाचे दोन भाग असून महाराष्ट्राचे इतिहासांत [illegible]नें क्रांति केली आहे. दोन्ही भागांची किंमत १४ रु.

२ **तोतयाचें बंड**:—लेखक इतिहासभास्कर पां. गो. रानडे. पानिपतच्या लढाईत सदाशिवरावभाऊ हे मारले गेले नसून ते जिवंत परत पुण्यास येऊं लागले असतां त्यांनाच तोतया ठरविण्याच्या पाताळयंत्री कारस्थानाचा इतिहास किंमत १।. रु.

३ **राघोभरारी**:—लेखक स. रं. सुंठणकर. आठ छायाचित्रें. आकर्षक बांधणी. किंमत ४ रु.

४ **सदाशिवरावभाऊ**:—लेखक वि. म. भुस्कुटे, पुणें. किं. ४ रु.

५ **सखाराम हरी**:—लेखक इतिहास-संशोधक य. र. गुप्ते, बी. ए., एम आर. ए. एस्. पुणें. आकर्षक बांधणी किंमत ३रु.

६ **त्रिंबक सूर्याजी**:—लेखक बा. स. कुलकर्णी मुंबई. किं. १ रु.

७ **जुळे तोतये**:—सदाशिवरावभाऊ पेशवे व जनकोजी शिंदे या थोर पुरुषांना पेशवे दरबारानें कां व कशाकरितां तोतये ठरविलें याचा इतिहास. लेखक—वि. स. वाकसकर. किंमत ४ रु.

८ **मोंगलमर्दिनी ताराबाई**:—लेखक वै. सौ. रंगूबाई जाधव (कैसर-ई-हिंद) पृष्ठसंख्या ५४०. सुंदर बांधणी. नामांकित लेखकांचे उत्तम अभिप्राय. किंमत ७ रु.

वरील आठ पुस्तकांच्या गटाची सवलतीची किंमत फक्त रु. २० ठेवलेली आहे, पण त्याच गटाबरोबर "**सखारामबापू**" चें चरित्रहि घेणारास किंमत २२ रु. पडेल. व्ही. पी. व इतर खर्च निराळा. फुटकळ ग्रंथांस भरपूर कमिशन.

मागणी व पत्रव्यवहार करा:—**का. गो. रानडे,** चिटणीस, ऐ. ग्रं. प्र. समिति (बेळगांव), ९७५ सदाशिव-पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.